परस्परं भावयन्त:

मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र


# हितगुज


अंक ७५ ‘अमृतमहोत्सवी’ ❖ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ❖ सप्टेंबर २००८

वेबसाईट : www.marathepratishthan.org ई-मेल : maratheparivar@yahoo.co.in

(व्यक्तींची नावे देताना ‘मराठे’ आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.) (फक्त खाजगी वितरणासाठी)





(मुलाखत पृ.३५ वर)


## संपादकीय



*प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार. आज ‘हितगुज’चा पंच्याहत्तरावा अंक प्रकाशित होताना मला धन्य वाटत आहे. तुम्हा सर्व कपि गोत्री परिवाराच्या सदिच्छांमुळे आणि मराठे प्रतिष्ठानच्या सहकार्यामुळे ‘हितगुज’ अमृतमहोत्सवी ७५व्या अंकात पदार्पण करीत आहे. मराठे प्रतिष्ठानचे भीष्म पितामह श्री.भाऊसाहेब मराठे, श्री.सुरेशभाऊ मराठे, श्री.वा.ग. मराठे, श्री.वि.के.मराठे इत्यादींनी प्रतिष्ठानला मूर्त स्वरूप देण्यासाठी अक्षरश: खस्ता खाल्या, यासाठी त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करणे उचित ठरते. १९८१ मध्ये ‘मुखपत्र’ म्हणून वहीच्या आकाराच्या आठ पानांचे हस्तलिखित स्वरूपात मराठे प्रतिष्ठानची ‘परिवार समाचार पत्रिका’ निघत असे.*


(पुढे चालू)



❖ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे : ८/१३, सहकार नगर, वडाळा (प), मुंबई-४०००३१ ❖

दूरध्वनी : २४१५०८८९ ● ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

❖ अतिथी संपादक : श्री.भाऊ मराठे ❖ अक्षरजुळणी : सौ.सुप्रिया जयंत रेडकर (लक्ष्मी ग्राफिक्स), दादर ❖

# तव स्मरण सतत स्फूर्तिदायी घडो



जन्म १०/९/१९३८ मृत्यू ५/२/२०००

## मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक व आधारस्तंभ कै. सुरेशभाऊ सखाराम मराठे

(पृ.३९९)

मराठे प्रतिष्ठान,मराठे अुद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५.
दूरध्वनी - २४३०२४५३.

## यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन

## *संपादकीय .....(पुढे चालू)*

मराठे प्रतिष्ठानचे पूर्वीपासूनचे कृतीशील ज्येष्ठ सदस्य श्री.विनायक केशव (पृ.२०) वरळी यांनी 'हितगुज' हे समर्पक नाव दिले. नोव्हेंबर १९८७ मध्ये 'हितगुज'चा १०वा अंक छापिल स्वरूपात निघाला. चित्रकार राजाभाऊ मराठे यांनी 'हितगुज'चा उत्कृष्ट लोगो तयार केला. त्यानंतर 'हितगुज'चा ५०वा सुवर्णमहोत्सवी अंक जून २००२ मध्ये निघाला. मी स्वत: त्या कार्यक्रमाची अुपस्थित साक्षीदार होते. माननीय श्री.लक्ष्मणराव शंकर यांच्या संपादकीय कौशल्याने आणि परिश्रमाने 'हितगुज'ला स्वास्थ मिळाले. 'हितगुज'चे आरोग्य लक्ष्मणरावांनी चोखपणे सांभाळले आणि हे त्रैमासिक नियमित, वेळेवर निघू लागले. त्याची वाचनीयता वाढली. 'हितगुज'ला वाङमयीन दर्जा प्राप्त झाला. त्याचे श्रेय सहसंपादक सी.गो. खांबेटे यांना जाते. तसेच त्यांनी 'हितगुज'ची वेबसाईट परिश्रमपूर्वक बनविली.

'मराठे प्रतिष्ठान'चे नियोजित कार्य कसे चालले आहे, त्यात अुल्लेखनीय प्रगती किती झाली, भावी योजना काय, वैद्यकीय मदत, शिक्षणासाठी कर्ज, पारितोषिके, विविध अुपक्रम या सर्व गोष्टींची माहिती सभासदांना करून देणे त्यांच्या प्रतिक्रिया मागविणे हा 'हितगुज'चा मुख्य हेतू आहे. परस्परांच्या साह्याने सर्व कुलबांधव-भगिनींचे हित साधणे, त्या अनुषंगाने सभासदांची ओळख करून देणे, पत्रव्यवहार करणे, सूचना करणे, आपुलकीचे, आत्मीयतेचे संबंध दृढ करणे, कुलबांधवांच्या कार्याचा गौरव करणे हे 'हितगुज'चे धोरण आहे.

शाईनिंग इंडिया मध्ये अनेक शाइनिंग मराठे राहात आहेत. किंबहुना या शाईनिंग मराठ्यांच्या कार्यामुळेच इंडिया शाईनिंग झाली आहे असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती वाटू नये. याला कारण या अंकात तशीच कर्तबगार, आपापल्या क्षेत्रात महनीय कार्य करून स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा अुमटविणाऱ्या विद्यावान, धनवान, गुणवान, नीतीमान मराठे परिवारातील कर्तृत्ववान व्यक्तींचे दर्शन आपल्याला होणार आहे. आपल्या कुलबांधवांमध्ये अनेक झाकली माणकं आहेत त्यांना बोलते करण्यासाठी त्यांच्या विशेष मुलाखती घेतल्या आहेत. ७५व्या अंकाचे स्वरूप निश्चित करताना, मुलाखतींवर भर दिलेला आहे. मुलाखत घेणे ही अेक प्रकारची कला आहे. मुलाखत म्हंटली की 'फुल खिले है गुलशन गुलशन' तबस्सुम आणि कै.सुहासिनी मुळगावकर यांची आठवण होते. अतिथी संपादक मा.श्री.भाऊ मराठे यांनी अनेक मान्यवरांच्या दिलखुलास मुलाखती घेतल्या आहेत. त्या वाचनीय तर आहेतच पण आपले त्या व्यक्तिबद्दलचे वाटणारे कुतूहल शमविण्याऱ्याही आहेत हे त्यांचे वैशिष्ट्य. काहींच्या मुलाखती मी ही घेतल्या आहेत. माणसांना बोलते करणं हे किती अवघड काम आहे याचा अनुभव मला आला. आपले कुलबांधव-भगिनी कमालीचे संकोची, नम्र स्वभावाचे असल्यामुळे स्वत: बद्दल सांगायला, स्वत:च्या गुणांचे कौतुक करायलाही त्यांना कठीण वाटत असावे. मला मात्र कर्तबगार, गुणी व्यक्तींचा सहवास, त्यांनी माझे आदराने केलेले स्वागत, पाहुणचार इ.गोष्टी आनंददायी वाटल्या. प्रवासाचा शीण विसरायला लावणाऱ्या वाटल्या. त्यांनी आपापल्या क्षेत्रात केलेली भरीव कार्ये पाहून मनाला तरतरी आली, अुभारी आली. असो.

'हितगुज'च्या दिरंगाईबद्दल, वेळेवर निघत नाही म्हणून मी मागच्या अंकात खंत व्यक्त केली होती आणि तो वेळेवर आपल्या हातात पडावा यासाठी आटोकाट प्रयत्नही करीत आहे. कुलबांधवांना विनंती ही की आपण आपल्या सूचना अवश्य कळवाव्यात. 'हितगुज' मध्ये सुधारणा करण्याचा मी प्रयत्न करीन. त्या आपल्या सहकार्यामुळे शक्य होईल.

कोणत्यीही व्यक्तीचा वाढदिवस म्हणजे त्याचे आयुष्यातील अेक वर्ष सरल्याची खूण, मात्र मासिकाचे, नियतकालिकाचे तसे नसते. मासिकाचा वर्धापनदिन म्हणजे मासिकाच्या वाढीची, प्रगतीची, विकासाची खूण. 'हितगुज'च्या या पंच्याहत्तराव्या अंकाचे विशेष महत्त्व त्यासाठी आहे. 'हितगुज'चा अमृतमहोत्सव म्हणजे संपूर्ण मराठे परिवाराला मिळालेली अमृतसंजीवनी आहे, असे मी मानते. दिवसेंदिवस 'हितगुज' असाच वर्धिष्णु, वर्धमान होवो ही मंगलमूर्ती मोरया चरणी प्रार्थना करते.

आपली शुभचिंतक,<br>
**डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे** (पृ.१२०)<br>
**(संपादिका-हितगुज)**(दि.४ सप्टेंबर, ०८)

### अनुक्रमणिका


| क्रमांक | विषय | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १) | सौ.मंजिरी मराठे (मुलाखत) | श्री.भाऊ मराठे | ०३ |
| २) | श्रीमती अनुराधा मुकुंद मराठे (मुलाखत) | श्री.भाऊ मराठे | ०४ |
| ३) | हितगुज संपादक : प्राथमिक जुळवाजुळव | श्री.लक्ष्मण शं. मराठे | ०६ |
| ४) | नेत्ररोगतज्ज्ञ डॉ.सौ.ऋता अभिजित मराठे | डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे | ०८ |
| ५) | आमच्या लग्नाची गोष्ट | सौ.वसुंधरा श्री. मराठे | ११ |
| ६) | श्री.शेखर खांबेटे (मुलाखत) | श्री.भाऊ मराठे | १३ |
| ७) | वडिलांचे मुलाला पत्र | श्रीनिवास गोपाळ मराठे | १४ |
| ८) | डॉक्टर ते लेखिका.... सीमाचा प्रवास (मुलाखत) | सौ.निलांबरी मराठे | १५ |
| ९) | हार्मोनियमवादक प्रमोद मराठे (मुलाखत) | श्री.भाऊ मराठे | १९ |
| १०) | सौ.मालविका मराठे (मुलाखत) | श्री.भाऊ मराठे | २० |
| ११) | माझी सेकंड इनिंग | श्रीमती शुभदा मराठे | २१ |
| १२) | रत्नपारखी : सौ.सुप्रिया मंदार मराठे (मुलाखत) | डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे | २२ |
| १३) | कॉटन किंग : श्री.प्रदीप मराठे (मुलाखत) | श्रीनिवास गोपाळ मराठे | २४ |
| १४) | ओढ (कथा) | श्री.विनायक के. मराठे | २७ |
| १५) | वीरांगना मॅडम कामा | डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे | ३१ |
| १६) | लग्न म्हणजे काय असतं ? | कालिदास बा. मराठे | ३४ |
| १७) | प्रसिद्धी झोतातली गुणी अभिनेत्री - प्रिया मराठे | डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे | ३५ |
| १८) | स्वयंसेवक - अेक अनुभव | सौ.रोहिणी वि. मराठे | ३७ |
| १९) | आरोग्याची दिंडी पंढरीची | श्री.अभय वामन मराठे | ४३ |
| २०) | गीतेतील यज्ञ संकल्पना | सौ.माधवी क. जाईल | ४५ |
| २१) | मराठे कुलाविषयी सामान्य माहिती | (कुलवृत्तांतावरून) | ४९ |
| २२) | तीन पिढ्यांचा सराफी व्यवसाय | श्री.लक्ष्मण शंकर | ५२ |
| २३) | आम्ही दर्यापार (प्रवास वर्णन) | श्री.ग.भा. मराठे | ५४ |
| २४) | अभिनेत्री अुषा किरण (मुलाखत) | श्री.वि.के.मराठे, वा.ग. मराठे | ६० |
| २५) | मला उमगलेले अध्यात्म | श्री.यशवंतराव मराठे | ६२ |
| २६) | ज्ञानतपस्वीनी सौ.शुभा रमाकांत विद्वांस | डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे | ६८ |

# क्रांतिकारक त्र्यंबक गंगाधर मराठे

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'अभिनव भारत' या गुप्त क्रांतिकारक संघटनेचे श्री. त्र्यंबक गंगाधर मराठे हे कृतीशील सदस्य होते.

स्वातंत्र्यवीर सावरकर आणि त्यांचे 'अभिनव भारता'तील सदतीस सदस्यांवर ''ब्रिटीश शासना विरुद्ध सशस्त्र युद्ध करण्यासाठी कट केल्याचा' धारा १२१ ते १२३ अन्वये अभियोग दाखल करण्यात आला. वरील आरोपींमधे त्र्यंबक गंगाधर मराठे यांचाही समावेश होता. हा अभियोग दि. १५ सप्टेंबर १९९० ला न्यायालयात सुरु झाला. या अभियोगाचा निर्णय दि. २४ डिसेंबर ला घोषित करण्यात आला. त्यात मुख्य आरोपी स्वातंत्र्यवीर सावरकर यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. तर त्यांचे सहकारी त्र्यंबक गंगाधर मराठे यांना दहा वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा देण्यात आली.

श्री. त्र्यंबक गंगाधर मराठे हे पेण येथे सरकारी ट्रेंड शिक्षक म्हणून सरकारी शाळेत नोकरी करीत होते. लंडनहून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पाठविलेले 'बॉम्ब मॅन्युअल' त्यांना मिळाले. त्यानुसार त्यांनी पेणे येथे बॉम्ब तयार करण्याचा छुपा कारखाना अुभारला होता. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पाठविलेल्या पिस्तुलांपैकी दोन पिस्तुले त्यांच्याकडे होती.

'अभिनव भारत' क्रांति संघटनेचे सदस्य अनंत कान्हेरे यांनी नाशिकचे कलेक्टर जॅक्सन याचा विजयानंद नाट्यमंदिरात वध केल्याच्या प्रकरणी श्री.मराठे ही गुंतविले जाण्याची शक्यता होती. परंतु श्री.मराठे यांनी चपळाईने बॉम्बच्या कारखान्याचे साहित्य नष्ट केले. पिस्तुले हस्तांतरीत केली. त्यामुळे ते बचावले.

परंतु नंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांसह 'अभिनव भारता'च्या अडतीस क्रांतिकारकांवर ब्रिटीशांनी भरलेल्या राजद्रोहाच्या अभियोगात त्यांचाही समावेश होता आणि या खटल्यात मात्र त्यांना १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली. अनंत कान्हेरे यांचे साथीदार कृष्णाजी गोपाळ कर्वे व विनायक नारायण देशपांडे यांना १८ अेप्रिल १९१० ला ठाणे येथील तुरुंगात फाशी दिली.

भारतीय स्वातंत्र्ययुद्धात सहभागी झालेल्या देशभक्तांत, क्रांतिकारक त्र्यंबक गंगाधर मराठे यांचा ही महत्त्वाचा सहभाग होता हे कळल्यावर मराठे परिवाराला निश्चीतच अभिमान वाटेल.

संदर्भ - श्री. शि.ल. करंदीकर लिखित, 'सावरकर चरित्र' दुसरी आवृत्ती - दि. २८ मे १९४७. डॉ.वि.म. भट लिखत, 'अभिनव भारत'. ❑❑❑

## ● मानसन्मान

क्रिकेटवीर कुमार सुशांत हेमंत मराठे अेम्.कॉम. परीक्षेत अुत्तीर्ण झाले. म.प्र. तर्फे यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन.

क्रिकेटवीर सुशांत हेमंत मराठे यांनी कांगा क्रिकेट साखळीत अवघ्या १८ चेंडूत १८ चौकार, दोन षटकारांची बरसात करत १२६ धावा चोपून काढल्या. निलेश पटवर्धनच्या नाबाद १०१, तर सुशांत मराठेच्या नाबाद १२६ धावांच्या लढतीत, मुंबई पोलिसांविरुद्ध १ बाद २४३ धावा अुभारल्या. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी नाबाद २२८ धावांची भागीदारी रचली. कांगाच्या ६१ वर्षांच्या इतिहासात दुसऱ्या विकेटसाठी रचलेली ही सर्वोत्तम भागीदारी ठरली. सुशांतचे हार्दिक अभिनंदन

## मराठे प्रतिष्ठान

सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र.७९१८ (मुं.) दि.१२.१.८१
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५.)

**ई-मेल :**
maratheparivar@yahoo.co.in

**वेबसाईट :**
www.marthepratishthan.org

आजीव सभासद व हितगुज तहहयात वर्गणीदार होण्यासाठी करावयाचा अर्ज

**(नमुना)**

मराठे प्रतिष्ठानची घटना व नियमांनुसार मी मराठे प्रतिष्ठानचा आजीव सदस्य व हितगुज या त्रैमासिक मुखपत्रासाठी तहहयात सदस्य होऊ इच्छित आहे.

आजीव सदस्य वर्गणी रु.१०० व हितगुजची तहहयात वर्गणी रु. २०० मिळून एकूण रु.३०० सोबत रोख / मनीऑर्डरने / मुंबईतील बँकेवर काढलेल्या डिमांड ड्राफ्टने / चेकने पाठवीत आहे.

ड्राफ्ट/चेक क्रमांक दिनांक
बँकेचे व शाखेचे नाव:
सही
संपूर्ण नांव:
जन्मतारीख
पत्ता:
पिनकोड
टेलिफोन/सेल
ई-मेल:
व्यवसाय/नोकरी पूर्ण तपशीलासह
कार्यालयीन पत्ता :
कार्यालयीन टेलिफोन व इ-मेल

*(वि.सू.- विवाहित सासुरवाशिणींनी पतीचे संपूर्ण नाव व पत्ता, तसेच माहेरवाशिणींनी पित्याचे संपूर्ण नाव व पत्ता कळवावा.)*

## हसरे हितगुज

अेक विशाल महिला गाडी शिकत होती. गाडी चालविण्यापूर्वी तिने सगळ्या गोष्टी व्यवस्थित आहेत का ते गाडी शिकविणाऱ्या माणसाला विचारले.

'होय बाईसाहेब' तो म्हणाला. 'ब्रेक वगैरे सगळं व्यवस्थित आहे.' तिने गाडी सुरू केली आणि त्या शेजारी बसलेल्या माणसाला ती रागाने म्हणाली, 'कुठं सगळ्या गोष्टी व्यवस्थित आहेत ? तुम्ही काही गाडी नीट चेक केली नाही.'

'का ? काय झालं बाईसाहेब ?' त्याने विचारले.

'हा आरसा कुठं नीट बसवलाय !... सारख्या मागच्या गाड्या दिसताहेत पण माझा चेहरा दिसेल तर शपथ !'

# सौ.मंजिरी मराठे (पृ.३१२)

**मुलाखतकार : श्री.भाऊ मराठे**

१९९१ सालापासून म्हणजे गेली १६ वर्ष आपण सौ. मंजिरी मराठे ह्यांच्या कडून दूरदर्शनवर बातम्या ऐकत आहोत. ''मंजिरी मराठे'' हे व्यक्तिमत्त्व प्रसन्न आहेच. त्यांच्याशी बोलताना त्यांचे स्पष्ट विचार प्रकर्षाने जाणवतात.

**प्रश्न :** टिव्ही वर येण्याची प्रेरणा कोणती ?

**मंजिरी :** माझी आई छान भाषण करायची. मी लहान असतानानेहमी तिच्याबरोबर जात असे. भाषण झाल्यावर माझ्या आईचं होणारं कौतुकही मी पाहत असे. तिचं भाषण ऐकताना मला सारखं वाटायचं की मला असं बोलता आलं पाहिजे. आज जरी मी दूरदर्शनवर बातम्या देत असले तरी मला भाषण करता येत नाही ही रुखरुख आहेच. पण माझ्या आईचं होणारं कौतुक मला कुठेतरी टेलिव्हिजनवर येण्यासाठी उद्युक्त करत होतं.

**प्रश्न :** पण प्रत्यक्ष दूरदर्शनवर केव्हा आलात ?

**मंजिरी :** ८३ साली विवाहानंतर मी मुंबईला आले. १९८४ साली Announcer या पदासाठी रीतसर अर्ज केला. मला संधी मिळाली ती ''हिंदी युवदर्शन'' या कार्यक्रमात. त्यानंतर १९८४ ते १९९० सालापर्यंत सुगम संगीत, आजचे पाहुणे असेही कार्यक्रम सादर केले. पण १९९१ सालापासून मी दूरदर्शनवर फक्त ''बातम्या'' सादर करत आहे.

**प्रश्न :** News Reader म्हणून कोणी Idol होता का ?

**मंजिरी :** Idol असं कोणी म्हटता येणार नाही, कारण त्यावेळेस टीव्ही खूप कमी बघितला जायचा. प्रदिप भिड्यांनी दिलेल्या छान प्रोत्साहनाचा मला फायदा झाला.

**प्रश्न :** बातम्या हा Live कार्यक्रम आहे. एका वेळेस लाखो लोक तुम्हाला पाहत/ऐकत असतात. तुम्ही बातम्या सांगत असताना खूप Relaxed दिसता. काही दडपण जाणवत नाही का ?

**मंजिरी :** दडपण असतंच - ते कोणाला चुकलं आहे ? पण आपल्या स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा भाग असतोच प्रत्यक्ष बातम्या वाचत असताना आजूबाजूला खूप माणसं वावरत असतात. ती माणसं त्या कार्यक्रमाचा एक घटक असतो. इथे मनाची एकाग्रता हवी. त्यासाठी सतत सराव करावा लागतो. ही एकाग्रता असली की बातम्या सांगताना सहजता येते.

**प्रश्न :** तुमचा शब्दांचा उच्चार स्पष्ट-सुटासुटा पण दळदार असतो. हे कसं शक्य झालं ?

**मंजिरी :** अहो मी माहेरची गोखले आहे. त्यातून पुण्याची. आपण कोंकणस्थांनी सुंदर नाही बोलायचं तर कोणी बोलायचं ?

**प्रश्न :** काही जणांचे उच्चार निसटते असतात म्हणून हा प्रश्न विचारला.

**मंजिरी :** तुम्ही म्हणता ती गोष्ट खरी आहे. कारण मी हल्ली ऐकत असते - बातमीदार बोलत असतो - अमुक अमुक एक घटना ''घडलीय'' किंवा निर्णय ''घेतलाय'' - हे माझ्या दृष्टीनं चुकीचं बोलणं आहे. अमुक अमुक एक घटना घडली आहे किंवा निर्णय घेतला आहे असं बोललं पाहिजे. बारिक सारिक गोष्टी असतात. त्यामुळे बोलण्याचा तोल सांभाळता येतो.

**प्रश्न :** Scripting बातमीचं भाषा बोजड असते का ?

**मंजिरी :** बोजडच असते असं नाही. सोपं लिहिता आलं पाहिजे. त्यादृष्टीने बातम्यांच्या भाषेत सुधारणा करायला खूप वाव असतो. त्यासाठी भाषेवर प्रभुत्व असायला पाहिजे. नको तो शब्द योजला तर सगळा घोळ होतो. त्याची एक गंमत सांगते. ''दो आँखे बारह हाथ'' ह्या चित्रपटाला ५० पूर्ण झाल्याची प्रतिनिधीत खूप छान बातमी पाठवली होती. पण त्या बातमीच्या शेवटच्या वाक्यामुळे सगळा विचका झाला असता. त्या बातमीचे शेवटचं वाक्य होतं: ''दो आँखे बारह हाथ'' ह्या चित्रपटाला सवंग लोकप्रियता मिळाली. लिहिणाऱ्याला ''सवंग'' ह्याचा अर्थ ''खूप छान'' असं वाटलं होतं. भाषेवर प्रभुत्व नसल्यामुळे असे घोटाळे होतात. त्यावर बातम्यांमध्ये दाखवण्यासाठी मला एक वृत्तांत बनवायचा होता. ''सवंग'' ह्या शब्दाचा अर्थ माहित नसलेल्या कोणी तो वृत्तांत शब्दाचा अर्थ माहित नसलेल्या कोणी तो वृत्तांत लिहिला असता आणि आधी तपासली न जाता ती वाचली असती तर खूपच गोंधळ झाला असता. पण ते आधी वाचल्याने खूप मोठी चूक टळली.

**प्रश्न :** असं प्रसंगावधान खूप वेळा ठेवावं लागत असेल.

**मंजिरी :** ठेवावं लागतंच. कधी कालचा मुख्यमंत्री आज सत्तेवर नसतो. आज नवीनच मुख्यमंत्री सत्तेवर आलेला असतो. जुन्या मुख्यमंत्र्याचे नाव आपल्या तोंडात बसलेलं असतं. अशा वेळेस नवीन मुख्यमंत्र्याचं नाव न घेता जुन्या मुख्यमंत्र्यांचं नाव घेतलं की घोळ ठरलेला !

**प्रश्न :** News Reader म्हणून करिअर होऊ शखते का ?

**मंजिरी :** निश्चित होऊ शकते. रेडिओ-टेलिव्हिजन हे Monsters राक्षस आहेत. ह्या माध्यमांना सतत खाद्य भरवावं लागतं. त्या माध्यमांना खाद्य भरवलं नाही तर ती माध्यमं तुम्हाला खातात. आज Scripting: Editing : Reporting : Presentation ह्या सगळ्या गोष्टी एकाच व्यक्तीला कराव्या लागतात. हे सगळं करायची ज्याची क्षमता आहे त्याला ही करिअर करता येईल. माझ्या घरातल्या जबाबदाऱ्यांमुळे मला ते करता आलं नाही.

**प्रश्न :** सध्या तुमचा ''शोध हा नवा-शतजन्म शोधिताना'' हा कार्यक्रम गाजतो आहे.

**मंजिरी :** ह्या कार्यक्रमाची निर्मिती ही माझ्या फार आनंदाची बाब आहे. माझ्या वडिलांना - श्री. पु. गोखले ह्यांना स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जवळ जवळ दीड तप सहवास लाभला होता. स्वातंत्र्यवीर सावरकर माझ्या घरी पुण्याला मुक्कामालाही असत. त्यामुळे माझ्या माहेरी ''स्वातंत्र्यवीर सावरकर'' हे प्रात:स्मरणीय नाव होतं. त्यामुळे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार-साहित्य-कविता दृक्‌श्राव्य माध्यमातून आजच्या तरुण पिढीपर्यंत पोचवावी ही माझी तळमळ आहे. अर्थात सावरकर स्मारक समितीपासून अनेकांचा सहभाग असल्यामुळेच ह्या सुंदर कार्यक्रमाची निर्मिती होऊ शकली. ह्या कार्यक्रमाची संपूर्ण संहिता मी लिहिली आहे. पहिल्या प्रयोगाला माझा मुलगा निखिल निव्वळ टाइम-पास म्हणून बसला होता. परंतु कार्यक्रम संपल्यावर त्याने भारावून मला ज्या आवेगाने मिठी मारली त्यात मला सगळं मिळालं. तो क्षण मी कधीही विसरणार नाही. आज माझा मुलगा निखिल स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कविता गुणगुणत असतो ते ऐकून मन सुखावतं.

- मंजिरीताई तुमच्या पुढच्या उपक्रमांना मराठे परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा -

❑❑❑

## ● मानसन्मान

श्री.गजानन भास्कर मराठे (पृ.४२७) यांचा नातू व अशोक व मानसी मराठे यांचा पुत्र चि.अभिजीत अशोक मराठे हा नुकताच एम.बी.ए. परीक्षा उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाला. त्याने बी.ई. (इलेक्ट्रिकल) झाल्यानंतर, एक वर्ष नोकरीचा अनुभव घेऊन एम.बी.ए.च्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला व दोन वर्षांचा कोर्स केला.

मराठे प्रतिष्ठान तर्फे चि.अभिजीतचे हार्दिक अभिनंदन

***– संपादिका***

# श्रीमती अनुराधा मुकुंद मराठे (पृ.२१७)

**मुलाखतकार : श्री.भाऊ मराठे**

गायिका अनुराधा मराठे म्हणजे गात असताना हसऱ्या चेहऱ्यामागचा जाणवणारा आत्मविश्वास - सुदर निकोप आवाज आणि लयीची जबरदस्त जाण. अनुराधाबाई गाणं नुसतं गात नाहीत तर गाणं सांगतात. अनुराधाबाईंशी झालेल्या या मनमोकळ्या गप्पा:

**प्रश्न : आज तुम्ही ज्येष्ठ गायिका म्हणून रसिकांना परिचित आहात. पण तुम्ही मूळच्या कुठल्या?**

**अनुराधा :** माझे वडील विष्णु वामन नेने मूळचे कराडचे. कॉंग्रेसचे अत्यंत निष्ठावंत कार्यकर्ते. राष्ट्रसेवादलाचे काम करायचे. पुढे कामगार संघटनेचं काम करण्याची जबाबदारी कॉंग्रेसने सोपवली म्हणून धुळ्याला आले आणि तिथेच स्थायीक झाले.

**प्रश्न : नुसता चांगला आवाज असून भागत नाही. त्याच्यावर शास्त्रशुद्ध संस्कार व्हावे लागतात. तुमच्यावर कोणाचे संस्कार झाले.**

**अनुराधा :** माझं गाण्याचं शिक्षण धुळ्याला डॉ.श्रीपाद नाईक यांच्याकडे सलग १८ वर्ष झालं. तिथे मी ''संगीत अलंकार'' झाले. धुळ्याला मी ३ तासाची शास्त्रीय संगीताची मैफिल करत असे. इतकी माझी तयारी होती. पुढे विवाहानंतर पुण्याला त्रिंबकराव जानोरीकर (भेंडीबाजार घराणे) यांच्याकडे शिकू लागले.

कॉलेजात धुळ्याला शिकत असताना महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेसाठी मी दोन नाटकात भूमिकासुद्धा केल्या. First Yearला ''बुडत्याचा पाय खोलात'' या फार्समध्ये आणि Third Year ला ''धुक्यात हरवली वाट'' या नाटकामध्ये. त्या दोन्ही भूमिकांसाठी मला रौप्यपदक मिळालं. ''धुक्यात हरवली वाट''चं रौप्यपदक मी ग.दि. माडगूळकरांच्या हस्ते स्वीकारलं होतं.

**प्रश्न : विवाहानंतर पुण्याला आल्यावर संगीत क्षेत्रात प्रवास कसा सुरु झाला?**

**अनुराधा :** माझे पती श्री.मुकुंद मराठे ह्यांना गाण्याची विशेष आवड नव्हती. पण माझ्या सासूबाईंनी मला खूप प्रोत्साहन दिलं. कृष्णराव मेहेंदळे यांचं पुण्यात वाद्याचं दुकान होतं. त्यांच्या घरी माझा पुण्यातला पहिला कार्यक्रम झाला. तेव्हा माझी चांगलीच तयारी होती. मला ''सवाई गंधर्व महोत्सवा''त गाण्याचं निमंत्रण आला. पण तेव्हा मला डोहाळे लागल्यामुळे गाता आलं नाही आणि संधी हुकली ती कायमची. ''सवाई गंधर्व महोत्सवा''सारख्या अत्यंत महत्त्वाच्या कार्यक्रमात गाता आलं नाही ही रुखरुख कायम मनात राहील.

**प्रश्न : सुगम संगीताकडे कशा वळलात?**

**अनुराधा :** कृष्णराव मेहेंदळे ह्यांच्या पुढाकाराने पुण्यात एक गायन स्पर्धा आयोजित केली होती. मी त्यात भाग घेतला आणि पहिला नंबर मिळवला. दुसरं म्हणजे भावगीत गायनातले श्रेष्ठ गायक आणि संगीत दिग्दर्शक गजाननराव (अण्णा) वाटवे आमच्या घराजवळ राहायचे. पण माझ्या संकोची स्वभावामुळे ''मला गाण शिकवाल का?'' असं विचारायचं धाडस मला झालं नाही. ते माझी मुलगी अश्विनी हिने विचारलं. पण माझा आवाज ऐकून अण्णा खूश झाले आणि त्यांनी मला भावगीत गायनाचे पहिले धडे द्यायला सुरुवात केली. त्यावेळी अण्णा श्री.चोकसे यांनी केलेल्या हरीवंशराय बच्चन यांच्या ''मधुशाला''च्या मराठी रुपांतराला स्वरबद्ध करत होते. त्या कार्यक्रमात अण्णांनी मला गायची संधी दिली. ह्या कार्यक्रमाला स्वत: हरीवंशराय बच्चन आणि जया भादुरी आले होते. हरीवंशराय बच्चन यांना हा कार्यक्रम आवडला आहे हे त्यांच्या चेहऱ्यावरून दिसत होतं.

त्याच सुमाराला सुधीर मोघे आणि अजित सोमण हे दोघेजण ''आणिले टिपुनी अमृतकण'' या ग.दि. माडगूळकरांच्या गीतांच्या कार्यक्रमाची जुळवाजुळव करत होते. त्या कार्यक्रमात मी गायले. नंतर ''मंतरलेल्या चैत्रबनात'' ह्या महाराष्ट्रात अतोनात गाजलेल्या कार्यक्रमात गायले. ह्यानंतर मी मागे वळून पाहिलं नाही.

**प्रश्न : तुम्ही गात असल्यामुळे संगीत क्षेत्रातील अनेक नामवंतांचा सहवास तुम्हाला लाभला असेल - त्यांच्याकडून शिकायला मिळालं असेल.**

**अनुराधा :** खूप शिकायला मिळालं. गाण्यातले शब्दोच्चार कसे करायचे ते गजाननराव वाटवे आणि यशवंत देव ह्यांनी शिकवलं. ''गाणं सांगता आलं पाहिजे'' असे देवकाका नेहमी का सांगतात ते गाणं गाताना जाणवतं. श्रीनिवास खळ्यांच्यामुळे लयीचा अंदाज आला. श्रीनिवास खळ्यांच्या गाण्यातली लय फार बिकट असते. त्या लयीला लगटून कसं गायचं ते श्रीनिवास खळ्यांनी शिकवलं. आणि लावणी राम कदमांनी शिकवली.

राम कदम ह्यांच्या दूरदर्शनवरच्या ''शब्दांच्या पलीकडले'' या कार्यक्रमात ''श्रावणातल्या त्या रात्रीची शपथ घालते तुला'' हे गीत मी सुंदर गायले. राम कदम त्यांच्या गाण्यांच्या चाली क्षणात बदलायचे, इतक्या अनंत चाली त्यांच्या डोक्यात असत. त्यामुळे नोटेशन करूनच गायला लागायचं. हे माझं गाणं ऐकून राम कदमांनी ''गाव तुझं चांगलं पण वेशीला टांगलं'' या चित्रपटात ''इष्काचा ॲटमबॉंब फुटला'' ही लावणी माझ्याकडून गाऊन घेतली. या वेळेस राम कदमांनी मला एक संदेश दिला : ''फक्त गाणं बघा - नाती विसरा!'' आणि मी मोकळी झाले. त्यामुळे आजही गाताना मी मोकळ्या मनाने गाते. पुढे सदाशिव जावडेकर यांनी लिहिलेल्या ''बंदा रुपया'' या ध्वनिफितीत १० नवीन लावण्या राम कदमांच्या संगीत दिग्दर्शनाखाली गायले. राम कदम अक्षरश: दोन मिनिटात चाल लावीत असत. इतका प्रतिभावंत कलाकार होता तो.

**प्रश्न : अशा खूप आठवणी असतील.**

**अनुराधा :** खूप आहेत. श्रीनिवास खळ्यांच्या ६०व्या वाढदिवसानिमित्त झालेल्या कार्यक्रमात मी गायले. या ना त्या कारणाने मला रिहर्सलला जाता आले नव्हते. तरी मी गेले. या कार्यक्रमाला पं.भीमसेन जोशी, सुलोचना, यशवंत देव, सुरेश वाडकर, माणिक वर्मा, कविवर्य मंगेश पाडगावकर असे अतिरथी महारथी उपस्थित होते. माझ्या अगोदर सुरेश वाडकरांनी अप्रतिम गाऊन कार्यक्रम एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवला. मी विंगेत उभी होते. प्रसिद्ध पखवाज वादक अर्जुन शेजवळ

कुणारा तरी विचारीत होते, ''ही मराठे कोण?'' मी म्हटलं ''मी !'' मला म्हणाले, ''मी 'भेटी लागे जीवा'' या अभंगाला पखवाजची साथ करणार आहे !'' अर्जुन शेजवळ म्हणजे पखवाज वादनातला दादा व्यक्तिमत्त्व. माझ्या मनावर प्रचंड दडपण. रंगमंचावर गेले आणि मध्यंतरात कविवर्य मंगेश पाडगावकर मला म्हणाले : ''मला वाटलं तू 'भेटी लागे जीवा'' या अभंगाचा राडा करणार. पण फार छान गायलीस. घरी गेल्यावर दृष्ट काढून घे !'' शेजारी उभे असलेले श्रीनिवास खळे मला म्हणाले, ''आता कळलं तुला का बोलावलं ते !''

राम कदमांच्या पंचाहत्तरीच्या कार्यक्रमात नौशादसाहेब प्रमुख पाहुणे होते. त्या कार्यक्रमात राम कदमांनी स्वरबद्ध केलेल्या एका अभंगात पिलू लागातील दोन गंधार मी लावले. नौशादसाहेबांनी तिथल्या तिथे मला दाद दिली. कार्यक्रम संपल्यावर नौशादसाहेब मला म्हणाले, ''क्या गला पाया है ! आज आपने बनारस ढंग की ठुमरी का बाज दिखाया !'' पुढे मला नौशादसाहेबांनी त्यांचे एक गाणं गाण्याकरता मला बोलावलं. पण त्यावेळेस माझ्या सासूबाई खूप आजारी असल्यामुळे मला जाता आलं नाही. पण नौशादसाहेबांसारख्या दिग्गज संगीतकाराने आपल्याला गायला बोलावलं याच्यातच मी भारून पावले.

राम कदमांच्या दूरदर्शनवरचा ''शब्दांच्या पलीकडले'' हा कार्यक्रम ऐकल्यावर पु.ल. देशपांड्यांनी आवर्जून फोन करून माझं भरभरून कौतुक केलं. आणि जाता जाता खास त्यांच्या शैलीत मला म्हणाले, ''तुझं गाणे श्राव्य आणि दृश्य असं दोनही होतं !''

पं. हृदयनाथ मंगेशकरांचे ''भावसरगम'' ह्या कार्यक्रमात मी २०-२५ प्रयोग गेले. त्या पहिल्याच कार्यक्रमात मला ''तरुण आहे रात्र अजुनी'' या गाण्याला ONCE MORE मिळाला. कार्यक्रम संपल्यावर पं.हृदयनाथ मंगेशकर एका नोटेवर सही करून माझ्या हातात ती नोट देऊन मला म्हणाले, ''छान गायलात. पुढच्या कार्यक्रमाला याल ना?''

पं.हृदयनाथ मंगेशकरांनी मला त्यांचं ''सखी ग मुरली मोही मना'' हे गाणं शिकवलं. फार कठीण गाणं आहे ते. एकदा तालीम चालली होती. समोर आशा भोसले बसल्या होत्या. एकदम पं.हृदयनाथ मला म्हणाले, ''अनुराधाबाई 'सखी ग मुरली' या गाण्यातली ती विशिष्ठ जागा जरा आशाला गाऊन दाखवा !'' हे ऐकल्यावर मी आंतर्बाह्य थरथरत होते. प्रत्यक्ष आशाबाईंनी प्रथम गायलेलं ते गाणं. पण माझं गाणं ऐकल्यावर आशाबाईंनी खूप कौतुक केलं.

**प्रश्न : तुमच्या गाण्याच्या कारकीर्दीत पुरस्कारही खूप मिळाले असतील?**

**अनुराधा :** खूप मिळाले.

१) स्वरानंद प्रतिष्ठानने निर्माण केलेला ''माणिक वर्मा : चतुरस्त्र बहुस्पर्शी गायिका'' हा पुरस्कार पहिल्याच वर्षी मिळाला.

२) मालती पांडे-बर्वे पुरस्कार

३) अग्रवाल प्रतिष्ठानचा ''आदिशक्ती'' हा पहिलाच पुरस्कार

४) अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचा ''चित्रकर्मी'' हा पुरस्कार, असे अनेक पुरस्कार मिळाले.

गाणं म्हणजे गाणं नसतंच कधी. गाणं गाणं म्हणजे आपल्या विश्वाएवढ्या काळजाला पाऱ्यासारखं तळहातावर धरणं असतं. गाणं सोपं नसतं. ती आकाशाची वीज असते. श्रीरामाच्या शिवधनुष्यापेक्षा तिला पेलून दाखवणं अवघड असतं. पण ज्याने अनुराधा मराठ्यांसारखा गाण्यावर जीव ओवाळून टाकलेला असतो त्याला तो देवाघरचा पाऊस सहज लाभतो. अनुराधाबाईंनी त्या पावसात रसिकांना सतत चिंब भिजवावं ही मराठे प्रतिष्ठानची शुभेच्छा !

❑❑❑

## 'आजोबा'चे अभिनंदन

''मराठे प्रतिष्ठान'' च्या संकल्पनेचे आद्य प्रवर्तक श्री.वा.ग. मराठे (पृ.५०३) हे आजोबा झाल्याची खुषखबर देताना आनंद होत आहे. वा.ग. चे चिरंजीव पुष्कराज व सून सौ. गौरी हिला दि. ६ ऑगस्टला, नागपंचमीच्या दिवशी कन्यारत्न झाले. 'आजोबा' झाल्याबद्‌ल वा.ग. चे म.प्र. तर्फे अभिनंदन आणि चिमुकल्या बाळाला शुभाशिर्वाद.

## अभिनंदनीय सुयश



### कुमार अमित गो. मराठे

श्री.गोविंद ना. मराठे, सेवा निवृत्त स.प्रा.शिक्षक देऊळवाडा पाळी, ता.डिचोली, गोवा यांचे चिरंजीव कुमार अमित गो. मराठे हा नवी दिल्ली येथील आय.आय.टी. मधून मास्टर ऑफ डिझाईन (M.Des.) मध्ये 'बी' ग्रेड मध्ये उत्तीर्ण झाला असून त्याला बेंगळूरच्या (कर्नाटका) इन्फोसेस व मुंबईच्या गोदरेज कंपनीत सेवेत घेण्याबाबत विचारणा करण्यात आली आहे. कु.अमित याचा जन्म ८ सप्टेंबर १९८२ रोजी फोंडा येथे झाला. प्राथमिक शिक्षण वडिलांच्या देखरेखी खाली झाले. उच्च माध्यमिक शिक्षण, फोंडा येथे व मेकॅनिकल डिप्लोमा मये (डिचोली) येथे झाला. बी.ई. पदवी परीक्षा कोल्हापूर येथे विशेष श्रेणीत पास झाल्यावर, पुणे येथे क्रॉम्प्टन ग्रिव्हज येथे काही काळ नोकरी केल्यावर, प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावर आय.आय.टी. दिल्ली येथे दोन वर्षांच्या तंत्रज्ञान अभ्यासक्रमाच्या (M.Des.) साठी निवड होऊन वरील सुयश प्राप्त केले. याबद्दल सर्व थरातून त्याचे अभिनंदन होत आहे.

म.प्र. तर्फे कुमार अमितचे हार्दिक अभिनंदन

# मी हितगुज संपादक : प्राथमिक जुळवाजुळव

**- श्री.लक्ष्मण शंकर (पृ.५२०)**

***हितगुजच्या ५० अंकाची नॉनस्टॉप वाटचाल लक्ष्मणरावांनी केली. मराठे प्रतिष्ठानचे मुखपत्र हितगुज च्या पडत्या काळात त्यांनी संपादकपदाची धुरा खांद्यावर घेतली आणि वेळेवर, नियमित हितगुज अंक प्रकाशित होऊ लागला. त्यांचे हे मनोगत - संपादिका***

***'भटो भटो लग्न कर, तर म्हणे तूच हो नवरी' असं काहींस झालं, आणि मी हितगुजचा संपादक झालो.***

मराठे प्रतिष्ठानची परिवार पत्रिका म्हणून वहीच्या आकाराच्या ८ पानांचे हस्तलिखित 'मुखपत्र' १९८१ मधे सुरू झाले. ही पृष्ठसंख्या क्रमाक्रमाने ४८ पर्यंत वाढत गेली. 'मुखपत्र'चे नामांतर 'हितगुज' झाले. प्रचलित 'लोगो' स्वीकारला गेला. नोव्हेंबर १९८७ मधील १०व्या अंकापासून छापील स्वरुपात हितगुज निघू लागले.

मात्र फेब्रुवारी ९२ मधील १६व्या अंकानंतर पैशांअभावी हितगुज बंद करण्याचा प्रस्ताव ऑक्टोबर १९९३ मधे वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे आला. त्या वेळी मी उत्साहाच्या भरात असा विचार मांडला की मराठे परिवारांतील संपर्काचे माध्यम म्हणून हितगुज चालू राहिलेच पाहिजे आणि तहह्यात वर्गणीदार नोंदणी करून ते नियमितपणे प्रसिद्ध करणे शक्य आहे. सभेत सर्वानुमते तत्त्वत: हा विचार मान्य करण्यात आला.

त्यानंतरच्या मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाच्या सभेला मला खास निमंत्रित म्हणून बोलावण्यात आले आणि मी माझी हितगुज प्रकाशनाबाबतची योजना या सभेत विचारार्थ मांडावी असे सांगण्यात आले. माझ्या योजनेवर साधक-बाधक चर्चा होऊन हितगुज प्रकाशनाची 'स्वयंपूर्ण' योजना मान्य करण्यात आली. ती अशी -

१. प्रतिष्ठानच्या सुमारें ५०० सभासदांकडून रुपये २०० (एकरकमी) तहह्यात वर्गणी घेऊन यापुढे फक्त अशा वर्गणीदारांनाच हितगुज पाठवावे. मराठे प्रतिष्ठानच्या सर्व सभासदांना हितगुज विनामूल्य पाठवण्याची प्रचलित पद्धत बंद करण्यात यावी.

२. हितगुजचे किमान ८ पानांचे ४ त्रैमासिक अंक दरवर्षी मार्च, जून, सप्टेंबर, आणि डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत नियमितपणे प्रसिद्ध करण्यात यावे. ५०० तहह्यात वर्गणीदारांकडून मिळणाऱ्या रु. १ लाख रकमेच्या व्याजातून एवढा खर्च भागेल.

३. जाहिराती व हितगुज निधीसाठी देणाग्यांद्वारे अधिक रक्कम मिळवून पृष्ठसंख्या वाढवावी व अंक अधिकाधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न करावा.

४. आतापर्यंतच्या १६ अंकांत प्रसिद्ध झालेल्या मजकुराप्रमाणेच अंकाचे स्वरुप सर्वसाधारणपणे असावे.

५. हितगुजसाठी एक सल्लागार समिती असावी. या समितीच्या मार्गदर्शनानुसार हितगुजच्या संपादकांनी संपादन, मुद्रण, प्रकाशन आणि वितरण याबाबतची जबाबदारी पार पाडावी. (अनेकदा हितगुजमधून आवाहन करूनहि कोणीही सभासद आपण होऊन या समितीत काम करण्यासाठी पुढे न आल्यामुळे म.प्र.चे कार्यकारी मंडळ हीच सल्लागार समिती ठरली आणि कार्यकारी मंडळाच्या मार्गदर्शनानुसार हितगुज प्रकाशित होत राहिले.)

मीच संपादक म्हणून काम करावे असे कार्यकारी मंडळाने आग्रहपूर्वक सांगितले आणि मी हि ते मान्य केले. मात्र किमान १०० तहह्यात वर्गणीदार झाल्यानंतरच यापुढचा अंक प्रसिद्ध करावा, म्हणजे व्याज व मुद्दल रकमेतून आठ-दहा अंक तरी निश्चित प्रसिद्ध होऊ शकतील हाहि माझा विचार सर्वमान्य झाला. आणि मी हितगुजचा संपादक म्हणून कामाला लागलो.

पहिले लक्ष्य होते महिना-दीड-महिन्यांत १०० वर्गणीदार नोंदवण्याचे. त्यासाठी कुलवृत्ताचे संपादक भाऊसाहेब (वि.गो.) मराठे यांचेकडील कुळबांधवांच्या यादींतून मुंबईची वेगवेगळी अुपनगरे आणि मुंबई जवळील कल्याण, कसारा, अंबरनाथ, बदलापूरपर्यंत येथील कुळबांधवांचा विभागवार याद्या तयार करण्यांत आल्या. गिरगांवपासून पश्चिम रेल्वेवर दहिसरपर्यंत आणि मध्यरेल्वेवरील कल्याण-अंबरनाथ-बदलापूरपर्यंत एकेका अुपनगरांत-विभागांत २/३, २/३ दिवस जाऊन पत्ते शोधून काढून कुलबांधवांना भेटून त्यांना नवीन योजना समजावून देऊन वर्गणीदार नोंदणीचा धडक कार्यक्रम राबवण्यांत आला. मी १९९१ अखेर नोकरींतून निवृत्त झालो होतो आणि निवृत्तीनंतर पैसा मिळवण्यासाठी कांहीहि काम स्वीकारायचे नाही असे ठरविलेले असल्यामुळे मला या कामासाठी पूर्ण वेळ म्हणजे आठ तास नव्हे; तर १०-१०, १२-१२ तास देणे शक्य झाले.

दादर, विलेपार्ले, बोरिवली, मुलुंड, ठाणे, कल्याण अशा ठिकाणी मराठे बहुसंख्येने असल्यामुळे या केंद्रांवर प्रयत्नांचे केंद्रीकरण करण्यात आले. तसेच पुण्यांतहि कै. आण्णा मराठे, सौ. नीलांबरी मराठे, श्री अरुणराव मराठे या कार्यकर्त्यांमार्फत प्रयत्न करण्यात आले. मी माझ्या घरी गोव्यांत दहा-बारा दिवसांसाठी गेलो असतां गोव्यांतल्या बहुतेक साऱ्या मराठ्यांना भेटून आलो. गोव्याहून येतांना वाटेत बेळगांवला ४ दिवस व मिरजेला २/३ दिवस राहून मिरज-सांगलींतल्या मराठ्यांनाहि भेटून आलो.

परिणामी १०० वर्गणीदारांचे लक्ष्य गाठून हितगुजचा नवीन योजनेतला पहिला अंक (हितगुज अंक १७) मार्च १९९४ मधे प्रसिद्ध करण्यांत आला (पाने १६). तो पूर्वीप्रमाणे मराठे प्रतिष्ठानच्या सर्वच सभासदांना पाठवण्यांत आला आणि या अंकात प्रतिष्ठानच्या अध्यक्षांनी हितगुज प्रकाशनाच्या स्वयंपूर्ण योजनेचा माहिती देऊन 'सर्व सभासदांना विनामूल्य पाठवण्याचा हितगुजचा हा शेवटचा अंक असून नाइलाजाने हा निर्णय घ्यावा लागत आहे. याबद्दल क्षमस्व' असे सांगून पुढील जूनचा अंक मिळण्यासाठी १५ मे १९९४ पूर्वी तहह्यात वर्गणीदार होण्याचे सर्व सभासदांना आवाहन केले. तसेंच एप्रिल ९४ मधें सुमारे ५०० सभासदांना अंतर्देशीय पत्रे पाठवून 'हितगुजचा अपमृत्यू टळला. आता पालनपोषणाची जबाबदारी आली' अशा तऱ्हेने अध्यक्षांनी वर्गणीदार होण्याची विनंती केली.

या आवाहनाचा पाठपुरावा म्हणून

पोस्टांतून कार्डे आणून नात्यांतल्या, ओळखीतल्या सुमारे ४०-५० लोकांकडून ठराविक मजकुराची १०, १५, २५, ३०, ४० अशी करून सुमारे पाचसहाशे पत्रे निरनिराळ्या जिल्ह्यांतल्या लोकांना पाठवून तहह्यात वर्गणीदार होण्याची विनंती पुन:पुन्हा करत करत वर्गणीदार नोंदणीचा धडाका चालूच राहिल. यामधे विशेष नोंद घेण्यासारखा अनुभव - दादरला एका घरी वर्गणीदार होण्याची विनंती करण्यासाठी गेलो असता घरांत भेटल्या एक साठीच्या पुढच्या आजी. त्यांनी आमच्या प्रयत्नांचे स्वरुप ऐकून घेतले आणि म्हणाल्या मीहि तुम्हाला कांहीं पत्रे लिहून देते. तुम्ही कशाला तसदी घेतां, इतर तरुण मुलें, विद्यार्थी यांचेकडून पुरेशी पत्रें मला लिहून मिळतील असे सांगितले तर ऐकेचनात. म्हणाल्या मलाहि काहींतरी प्रतिष्ठानसाठी करूं द्या ना! शेवटी त्यांनाहि मी १० कार्डे व मजकूर दिला आणि ५/६ दिवसांनी त्यांचेकडूनहि लिहिलेली कार्डे आणून पत्ते लिहून रवाना केली.

असाच आणखी एक अनुभव - १९व्या अंकांत (सप्टेंबर ९४) आम्ही लिहिले 'मी वर्गणीदार नसूनहि मला हा अंक कसा आला ? असा प्रश्न तुम्हांला पडला असेल. आपल्यासारख्या कांही मान्यवर वाचकांना आम्ही तो मुद्दामच पाठवला आहे. केवळ अनवधनाने आपली वर्गणी पाठवायची राहिली असेल या कल्पनेने ! कारण आपणाला हितगुज हवे असणार असा आम्हाला विश्वास आहे. त्वरित वर्गणी पाठवून आपली विश्वासार्हता सिद्ध कराल अशी खात्री आहे' याला एका कुळबांधवांचे अुत्तर आलें - ''वर्गणी पाठवून आपली विश्वासार्हता सिद्ध कराल अशी खात्री आहे'' असे आवाहन करून वाचकांना धर्मसंकटांत पाडण्याची कल्पना अभिनव. त्याबद्दल अभिनंदन. माझी वर्गणी पाठवण्याची इच्छा नाही.''

यासर्व प्रयत्नांचे फलित म्हणजे मार्च १९९६ अखेर वर्गणीदार संख्या ५०९ म्हणजे प्राथमिक लक्ष्य पूर्ण झाले. पण पुढे प्रयत्न चालूच राहिले आणि वर्गणीदार संख्या १००० च्या पुढे पोंचली.

१७वा अंक मार्च १९९४ मधे १६ पानांचा नंतरचे २ अंक ८ पानी, त्यानंतर ९ अंक १२ पानी आणि त्यानंतर अंक २८ पासून अंक ६७ पर्यंत (४० अंक) १६ पानी काढले. यामधें कांही खास अंक जास्त पानांचेहि होते. याप्रमाणे अंक १७ पासून ६७ पर्यंत ५१ अंक नियमितपणे मार्च, जून, सप्टेंबर आणि डिसेंबर मधे १९९४ जे १९९६ सप्टेंबर पर्यंत प्रसिद्ध करण्यात आले. वयोमानानुसार येणाऱ्या वैयक्तिक शारिरिक अक्षमतेमुळे त्यापुढें ही जबाबदारी पेलणे कठीण झाल्यामुळे मी हे काम थांबवले.

संपादक म्हणून अंकांतील साहित्याचे स्वरुप इत्यादीबाबत सविस्तर पुढील वेळी.

❑❑❑

## हार्दिक निमंत्रण


'हितगुज'चा ७५ वा अमृतमहोत्सवी प्रकाशन समारंभ

शनिवार दि. २७ सप्टेंबर २००८ ला दुपारी ४.३० वा. ठाणे येथे लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, खोपट, ठाणे (पश्चिम) पिन.४००६०२, या ठिकाणी विख्यात साहित्यिक आणि नाटककार माननीय श्री. सुरेश खरे यांच्या शुभहस्ते मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र असलेल्या 'हितगुज' ७५व्या अंकाचा शानदार प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे.

तसेच संध्या खांबेटे, कृपा पाटील, निषाद पाटील यांचा गाण्याचा कार्यक्रमही आयोजित केला आहे.

तरी या कार्यक्रमाला सर्व कुलबांधवांनी आवर्जून अुपस्थित राहावे ही विनंती आणि आग्रहाचे निमंत्रण.

**अध्यक्ष (मराठे प्रतिष्ठान)**
**श्री. आनंदराव मराठे (पृ.२७७)**

**ती.कै. शंकर गणेश मराठे, बिंबल, गोवा**
(४.७.१९०३ ते २६.१२.१९९३)
यांच्या स्मरणार्थ

## 'हितगुज'च्या ७५व्या अंकानिमित्त हार्दिक शुभेच्छा

## सौ. उर्मिला आणि लक्ष्मण शंकर (पृ.५२०)

**मुलाखत**

# नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. सौ. ऋता अभिजित मराठे (पृ.२१२)

**'डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे', 'डोळे हे जुलुमी गडे, रोखूनि मज पाहू नका', 'ते नयन बोलिले काहीतरी' अशी असंख्य बोलकी गाणी डोळ्यांवर आहेत. 'कर्माचे डोळे ज्ञान' असे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनीही म्हटले आहे. 'चक्षुर्वैसत्यं, याचि देही याचि डोळा', हिंदीमध्ये 'आँखो देखा हाल' असे आपण सहजपणे म्हणतो. असा हा आपला शरीराचा अत्यंत महत्त्वाचा अवयव डोळा. त्या डोळ्याच्या अभ्यासात निष्णात असलेल्या नेत्रविशारद डॉ.सौ.ऋता अभिजित मराठे यांची ही मुलाखत.**

**- संपादिका**



**डॉ. सौ. ऋता अभिजित मराठे**

मराठे प्रतिष्ठानच्या बैठकीत 'हितगुजच्या' ७५व्या अंकाविषयी चर्चा चाललेली असताना भूतपूर्व संपादक माननीय श्री. लक्ष्मणराव म्हणाले की अरविंदरावांची सून स्पेशालिस्ट डॉक्टर आहे तिची मुलाखत घ्यायला हरकत नाही. मी हे ऐकले मात्र आणि मनाशी ठरविले की ही मुलाखत आपण घ्यायचीच. पण आधी बोलले काही नाही. कारण डोंबिवलीला जायचे, पावसाचे दिवस त्यात माझे व्याप, गृहिणीची कर्तव्ये आपल्याला उरकले पाहिजे, समजा तिने वेळ दिली तरी त्यावेळेला आपल्याला अनुकूलता हवी इ. प्रश्न मनात येत होते. ....त्याचवेळी शनिवार दि. १४ जून दुपारी ४ वाजता श्री. अरविंदरावांच्या घरी, डोंबिवली येथे मराठे प्रतिष्ठानची बैठक होणार आहे. प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीवर आम्ही अुभयता कार्यरत असल्यामुळे सहसा बैठक चुकवत नाही, मिटींगना नेहमी अुपस्थित राहातो. तेव्हा अनायासे योग आला आहे डॉ. ऋताची मुलाखत घेता येईल, अेकात अेक काम होईल या हेतूने मी अरविंदरावांच्या घरी फोन लावला, सौ. अनुराधा वहिनींकडून डॉ. ऋताचा मोबाईल नंबर मिळविला. आणि फोन करताच, ''गणराज रंगी नाचतो, नाचतो....'' या कॉलरट्यूनच्या गाण्याने मन अेकदम पवित्र झाले. प्रसन्न मन:स्थितीतच डॉ. ऋताला म्हटले, म.प्र. बैठक आटोपली की मला थोडा निवांत वेळ मुलाखत द्यायला देणार का, तिने लागलीच होकार दिला. ....पण कसले काय? आपण ठरवितो, योजतो ते सगळे तसेच त्यावेळेला होतेच असे नाही, याचा प्रत्यय आला. कारण खूप पाऊस पडल्यामुळे त्यांच्या घरची मिटींग कॅन्सल झाली होती.

....पण तरीही मनात इच्छा होती त्यामुळे पाऊस थांबल्यावर ४-६ दिवसांनी डॉ. ऋताला मोबाईल केला तेव्हा ती नेमकी बाहेरगावी गेली होती. मग पुन्हा ८ दिवसांनी संपर्क साधला असता ती म्हणाली तुम्ही तुमच्या सोयीने कधीही या. संध्याकाळी ५ नंतर मी घरीच असते. लगेच दुसऱ्या दिवशी मंगळवारी ८ जुलैची ५वाजताची भेट निश्चित झाली. डॉ ऋताशी दिलखुलास जी बातचीत झाली त्याचा सत्वांश देत आहे.

डॉ. सौ. ऋता अभिजित मराठे (नेत्ररोगतज्ञ)

जन्म दिनांक २६ नोव्हेंबर १९७४, कर्नाटकात गोकाक येथे झाला. माहेरचे नाव ऋता विलास ढोले. सारस्वत. शालेय शिक्षण डोंबिवली येथे झाले. १०वीत ८७% मार्कस् पडले. १२वी ठाणे कॉलेजातून, त्यानंतर डोनेशन न देता, गुणवत्तेच्या निकषावर गव्हर्मेंटच्या कोट्यातून त्यांना मेडिकलला ॲडमिशन मिळाली. १९९७ साली कोल्हापूर येथील डी.वाय. पाटील कॉलेजातून त्या अेम्.बी.बी.अेस्. झाल्या. त्यांची डॉक्टर मेडिकल ऑफिसर म्हणून पहिली नेमणूक इगतपुरीजवळ खेड येथे झाली. त्यानंतर सोलापूर येथे वैशंपायन कॉलेजात (DOMS) ऑप्थल्मॉलॉजीची ॲडमिशन घेऊन दोन वर्षे शिक्षण पूर्ण करून त्या ऑप्थल्मॉलॉजिस्ट, नेत्ररोगतज्ञ झाल्या.

''डॉक्टर आणि रुग्ण यांचे संबंध बदलत आहेत. पूर्वी डॉक्टरला परमेश्वर समजून तो जे काही बरेवाईट करेल, ते स्वीकारणारे रुग्ण होते. चांगले झाले तर डॉक्टरने केले व वाईट झाले ते नशिबाने झाले असे मानत होते पण आज तुमच्या वैद्यकीय क्षेत्रात अशी परिस्थिती आहे का?'' असे विचारल्यावर त्याम्हणाल्या, ''रुग्णाच्या अशा अंधश्रद्धाळू प्रवृत्तीतूनच डॉक्टर 'परमेश्वर' बनला व त्याची प्रवृत्ती बदलली. 'मी करेन तेच खरे', 'वैद्यकीय व्यवसाय ही माझी कला आहे आणि त्याबद्दल रुग्णाने मला काही विचारायचे नाही' अशी वृत्ती काही डॉक्टरांमधे वाढू लागली. पण आजचे रुग्णही जागरूक झालेले आहेत. ते त्यांच्या शरीरावर कोणता अुपचार केला जाणार आहे. ऑपरेशन कसे करणार आहेत, औषधांचे साईड इफेक्टस् याविषयी संपूर्ण माहिती मिळवितो. मी स्वत: रुग्णाशी सुसंवाद साधते, केवळ माहिती देणे वेगळे आणि सुसंवाद साधणे वेगळे. असा सुसंवाद साधला तर, आपल्या शरीरावर जे अुपचार केले जाणार आहेत त्यासाठी तो मानसिक दृष्ट्या तयार होतो. त्यातून औषध योग्य प्रमाणात वेळेवर घेणे, सांगितलेले पथ्यपाणी पाळणे, प्रतिबंधात्मक अुपाय आचरणे इत्यादीत तो डॉक्टरांना संपूर्ण सहकार्य देऊ शकतो. मी तर पेशंटस्ना नेहमी सांगते आम्ही ऑपरेशन्स व्यवस्थितच करतो, पुढे ते सक्सेसफूल करणे सर्वस्वी तुमच्या हातात आहे. पुष्कळदा पेशंटस् 'हयगय' करतात आणि जर काही बिघडले तर डॉक्टरांना नावं ठेवतात; दोष देतात, आज गर्भवती महिलांसाठी सर्व अद्ययावत सुविधा आहेत त्याचा लाभ करून घेतला तर फायदा त्यांनाच होतो पूर्वीपेक्षा बाळंतपणातील मृत्यूची संख्या फार कमी झाली आहे.

## मानवकल्याण केंद्रात हेड ऑफ दि डिपार्टमेंट

डॉ. ऋता या गेली सात वर्षे डोंबिवली येथील मानवकल्याण केंद्रात, हेड ऑफ दि डिपार्टमेंट, वैद्यकीय प्रमुख अधिकारी म्हणून जबाबदारीने काम पाहात आहेत. डोंबिवलीचे मानवकल्याण केंद्र हे आधुनिक वैद्यकीय सोयी सुविधांनी सुसज्ज आहे. वारेमाप पैसे न घेता योग्य तेवढ्या वाजवी पैशात या केंद्रात रुग्णावर अुपचार केले जातात. डॉ. ऋता रोज ४-५ मोतीबिंदूची ऑपरेशन्स् करतात. त्यांनी या पाच वर्षात १३० नेत्ररोपणाची ऑपरेशन्स केली आहे. ४०० च्या वर आय बँक कलेक्शन केले आहे. हे त्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. कारण डॉ. ऋता यांची कार्यतत्परता.

## प्रोजेक्टस् - योजना

डॉ. ऋता यांची गुणवत्ता, वैद्यकीय सर्जनकुशलता, कामाची तातडीने अंमलबजावणी करणे या वैशिष्ट्यांमुळे त्यांच्याकडे पुष्कळ प्रकल्प राबविण्यासाठी आहेत, त्यातील प्रमुख नेत्रदान पेढी, आय बँक कलेक्शन आहे. त्याचे क्षेत्र कल्याण, डोंबिवली, बदलापूर, भिवंडी, अंबरनाथ या गावांसाठी सुद्धा आहे. तसेच वृद्धाश्रमाचा प्रोजेक्ट आहे. कल्याण, डोंबिवली, बदलापूर आणि अंबरनाथ येथील वृद्धाश्रमातील वृद्ध पेशंटची ऑपरेशन्स करण्याची योजना त्यांच्या मदतीने अवलंबिली जात आहे.

डॉ. ऋता यांच्या समर्थ कार्यक्षमतेमुळे या योजना केवळ कागदावरच राहात नाहीत तर प्रत्यक्षात यशस्वीरित्या राबविल्या जातात.

## मानसन्मान

आनंदाची गोष्ट ही की, डॉ. ऋता यांच्या या भरीव, वैद्यकीय सेवेची कार्यांची दखल घेऊन त्यांचा सत्कार केला आहे. समाज अशाच व्यक्तींचा सत्कार करते की ज्यांनी समाजजीवन आपल्या बहुमोल योगदानाने संपन्न व समृद्धकेले आहे. सत्कार करणे हा समाजाच्या गुणग्राहकतेचा आणि कृतज्ञवृत्तीचा सुंदर अविष्कार आहे. डॉ. ऋता यांचा, 'महाराष्ट्र स्टेट ब्लाईंडनेस कंट्रोल सोसायटी, मुंबई, नॅशनल प्रोग्रॅम फॉर कंट्रोल ऑफ ब्लाईंडनेस' संस्थेतर्फे पुष्पगुच्छ आणि प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला आहे. तसेच डोंबिवलीतील




**नॅशनल स्टेट ब्लाईंड कंट्रोल सोसायटी तर्फे डॉ.कुंभार यांच्या हस्ते डॉ.सौ.ऋता मराठे यांचा सत्कार**

रोटरीक्लबच्या वतीने डॉ. ऋता यांना मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला आहे.

गप्पांच्या ओघात त्यांना छंदाविषयी विचारले असता, ''वैद्यकीय सेवा हाच माझा छंद आहे'' असे त्या म्हणाल्या तेव्हा वाटलं आपला छंदच आपल्या दैनंदिन कामाचा भाग असावा यापेक्षा सुदैव ते काय?

अेकदा अेका शाळेतील लहान मुलगी खेळताना डोळ्यात पेन्सिलीचे टोक गेले म्हणून रडत आली. पालक-शिक्षक ही घाबरलेल्या अवस्थेत. पण डॉ. ऋताने आपल्या कौशल्याने त्या लहान मुलीचा डोळा वाचविला. तो क्षण सार्थकतेचा अनुभव देऊन गेला. आजही ती लहान मुलगी आणि तिचे पालक डॉ. ऋताला भेटायला येऊन कृतज्ञतेची भावना व्यक्त करत असतात.

## 'अस्स् सासरं ''सुरेख'' बाई....

डॉ. सौ.ऋता यांचा प्रेमविवाह आहे. त्यांचे पती श्री. अभिजित नामांकित चार्टंड अकौंटंट, सीसापदवी प्राप्त आहेत. श्री. अभिजितचा तिला कायम 'मेंटली सपोर्ट' असतो. श्री. आभिजित या क्षेत्रातला नाही तरीही या क्षेत्रात येणाऱ्या समस्या, अडचणी तो फार चांगल्या समजून घेतो. तिच्या सासूबाईंचाही (सौ. अनुराधावहिनी) फार आधार आणि मदत तिला मिळत असते. तिला सासरकडून पूर्ण पाठिंबा असल्यामुळेच मेडिकलचे शिक्षण लग्नानंतरही पुरे करता आले. शिक्षिका असलेल्या तिच्या आईने बालपणी तिच्यावर चांगले, अुत्तम संस्कार केल्याचे ती मानते. तिच्या आजेसासूबाई कै. श्रीमती सत्यभामाताई ज्यांनी शंभरी पूर्ण केली होती (हितगुजच्या अंकात सविस्तर वृत्त वाचलेले कुलबांधवांना आठवत असेल) त्यांनाही तिचे 'डॉक्टर' म्हणून फार कौतुक वाटे. त्या नेहमी तिला सांगत, ''हे बघ, ऋता, आम्हाला इच्छा असूनही शिकायला मिळाले नाही. कारण तो काळ आणि ती परिस्थिती यामुळे, तू शिकलीस, मोठ्ठी डॉक्टर झालीस पण अेक लक्षात ठेव, पैसे कितीही कमाव पण वर्षातून एखादं तरी ऑपरेशन फुकट कर. गरीब, दुर्बलांची जाणीव ठेव.'' 'तव स्मरण आम्ही स्फूर्तिदायी घडो' अशा आजेसासूबाईनी सांगितलेल्या वचनाचे डॉ. ऋता पालन करते. ऑपरेशन्स पार पाडली की आजही अनुराधावहिनी देवा पुढे साखर ठेवतात हे सांगायलाही ती विसरली नाही.

इतर आयांना असतं तसं डॉ. ऋतालाही तिच्या दोन्ही छकुल्यांच खूप कौतुक आहे. पहिली सहा वर्षाची आभा आणि दुसरी दिड

(पृष्ठ १० वर)

## वाचकांचा पत्रव्यवहार

**(हितगुज जून २००७च्या अंकात 'प्रकाशझोत' या सदरात यशस्वी अुद्योजक आणि साहसी गिर्यारोहक श्री. सुनील जोशी यांचा संपादिका डॉ.सौ. सुमेधा प्रभाकर मराठे यांनी लिहिलेला परिचय लेख प्रसिद्ध केला होता हे वाटकांना आठवत असेलच. त्यांनी पाठविलेले पत्र प्रकाशित करीत आहोत.)**

स.न.

आपल्या जुन २००७ च्या 'हितगुज' त्रैमासिकांत माझ्या जीवन वाटचालीचा वृत्तांत प्रकाशित करून मला बहूमानित केले त्या कौतुकाबद्दल मी व्यक्तिश: आपले व सर्व सबंधित सहकाऱ्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

आपले प्रतिष्ठान समजाउपयोगी नित्यनवे स्तुत्य उपक्रम विशिष्ट हेतू उद्दीष्ट्यांसाठी सदैव अवलंबित असते या वरून आपल्या सजग व सृजनतेची यथोचित जाणिव प्रत्ययास येते.

अशाच पैकी एक म्हणजे आपला त्रैमासिकाचा उपक्रम. या मासिका अंतर्गत अनेक गुणी जनांच्या कलागुणांचे कौतूक होऊन त्याची प्रचिती व प्रसिद्धी अधिक समाजभिमूख होणच्या दृष्टीने असे उपक्रम निश्चितपणे उपयुक्त ठरतात.

माझ्या जीवन वाटचालीचा आढावा आपण ज्या सूचक व समर्पकरित्या सचित्र प्रकाशित केला आहे तो माझ्या आकांक्षांना एक स्त्रोत म्हणून सदैव पाठबळ देत राहिल असा दृढ विश्वास येथे व्यक्त करतो.

**श्री. सुनिल मु. जोशी**
मालक: ग्रेट आऊटडोअर्स

~~~

''आपल्या संपादनाखाली 'हितगुज' अधिकाधिक रोचक व वाचनीय तसेच देखणा होत आहे. याबद्दल माझ्या हार्दिक शुभेच्छा.''

**- श्री. श्रीराम व्यंकटेश मराठे**
(पृ.४३) पुणे.

~~~

स.न.वि.वि.

फक्त खाजगी वितरणासाठी असलेले, मराठे प्रतिष्ठानचे हितगुज पाहण्यात आले. (मार्च २००८) हितगुज वाचनीय तर आहेच, पण मराठ्यांचे विविध विधायक कार्यक्रम हितगुजामुळे समजते. मराठे मंडळींची कमाल आहे !

या मुखपत्रातील टाइप मला लहान वाचण्यास त्रासदायक वाटला. (माझे वय ७७ आहे, माझ्या डोळ्यांवर तीन शस्त्रक्रिया झाल्या आहेत. हेही एक कारण असू शकेल) मी भिंग लावून पूर्ण अंक वाचला कारण वाचल्यावाचून राहवेना.

टाईप मोठा करणे म्हणजे पानांची संख्या वाढणे, म्हणजे अर्थव्यवहार आला हे तर आहेच !

माझ्या वयाचे हितगुजचे मराठे वाचक असतील. पुढच्या वयात आपली मंडळी काय करतात हे जाणून घेण्याची इच्छा तीव्र असते. म्हणून मी टाईपाबाबत लिहिले. मुळात मी मराठे नाही, माझी पत्नीही माहेरची मराठे नाही. तरीही ही सूचना मी नम्रतापूर्वक व सद्भावनेने करत आहे.

**भा.ल. महाबळ**

ता.क. रमाकांत विद्वांस हे माझे १९५५-५८ या काळातील इंजि. कॉलेजातील वर्गमित्र आहेत. त्यांनी दैनंदिनी तोंडासमोर घेऊन चेहरा का लपवला आहे बरे ?

**हसरे हितगुज**

### ऑफिसचे गणित

स्मार्ट बॉस + स्मार्ट कर्मचारी = नफा
स्मार्ट बॉस + ढ कर्मचारी = उत्पादन
ढ बॉस + स्मार्ट कर्मचारी = प्रमोशन
ढ बॉस + ढ कर्मचारी = ओव्हरटाइम

(पृष्ठ ९ वरून)

## मुलाखत : नेत्ररोगतज्ञ डॉ. सौ. ऋता अभिजित मराठे

वर्षांची अनन्या खरोखरच त्यांच्या नावाप्रमाणेच गोड मुली आहेत.

परदेशगमनात डॉ.सौ. ऋताला रस नाही. मातृभूमीतच राहून देशांतील लोकांची सेवा करण्यात, वाहून घेण्यात ध्येयमार्गावरून चालत त्यांनी आत्ताचा टप्पा गाठला आहे. त्यातच पुढील अत्तुंग भरारीची बिजं आहेत.

### सामाजिक बांधिलकी

आज सर्वच क्षेत्रात स्वार्थाची बजबजपुरी माजल्याचे आपण पाहातो. मी आणि माझे यापलीकडे विचार करण्यासही कित्येक लोकांना वेळ नसतो. समाजाने ज्यांचा आदर्श ठेवावा अशी मंडळीच वैयक्तिक आयुष्यात स्वार्थाने बरबटलेली असतात. अशा पार्श्वभूमीवर डॉ. सौ. ऋता यांच्या बुद्धिमत्तेला, कुशल सर्जनतेला सामाजिक बांधिलकीची असलेली जोड पाहून मन उल्हासित होते, मनाची मरगळ दूर होते. खाजगी प्रॅक्टिस करून खोऱ्याने पैसा मिळविणे शक्य असताना, नि:स्वार्थीपणातला अवर्णनीय आनंद त्यांना अुमगला आणि म्हणूनच मानवकल्याणकेंद्रात काम करताना त्या रममाण झाल्या आणि म्हणूनच ज्या समाजामधे आपण राहातो, त्याचं देणं आपण लागतो, आणि ते दिलंच पाहिजे असा विचार करून कृतीत आणणाऱ्या सुसंस्कृत आणि संवेदनशील मनाच्या डॉ. ऋता अभिजित मराठे या व्यक्तिमत्वाकडे मान अुंचावूनच आपणास पाहावे लागते.

डॉ. सौ. ऋताशी बोलत असताना असं लक्षात आलं की, मराठे प्रतिष्ठान, मराठे मंडळी याविषयी तिला आपुलकी आणि प्रेम आहे ते तसंच राहो ही सदिच्छा.

**- डॉ.सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
संपादक - हितगुज

❑❑❑

(पारितोषिक प्राप्त निबंध)

# आमच्या लग्नाची गोष्ट

कै. चिंतामण बळवंत स्मृतीदिना प्रित्यर्थ निबंध स्पर्धा २००८

**सौ. वसुंधरा श्रीकांत मराठे**

१४, श्रीकृष्ण गोविंदप्रसाद, भास्कर कॉलनी,

नौपाडा,(ठाणे) प. ४००६०२ दूरध्वनी-२५३९४७९८

लग्न हा प्रत्येक माणसाच्या जिव्हाळ्याचा विषय असतो. मग प्रेमविवाह असो किंवा ठरवून केलेलं लग्न असो. ठराविक वय माणसाला लग्न या गोष्टीकडे वळून बघायला लावतेच. साधारण २४-२५ पर्यंत तरी मुलीचे लग्न होणे गरजेचे असते. माझं लग्न माझ्या वयाच्या पंचविसाव्या वर्षी झालं. माझ्या लग्नाला २४ वर्षे झाली. तेव्हा साधा फोनही नव्हता. त्यामुळे सगळे व्यवहार पत्राने चालत होते. माझ्या वडिलांनी स्थळ मिळाल्यावर पत्र व पत्रिका पाठविली. चार-पाच दिवसांनी पत्र आलं की पत्रिका जमत आहे. पुढचे ठरविण्यासाठी या. तेव्हाच त्या पत्रात माझ्या सासूबाईंनी लिहीलं होतं की मुलगी बारीक, गोरी आणि चष्मा नको. सर्व्हिस पार्टटाईम असली तरी चालेल. या सगळ्यात बसत असेल तर दाखवायचा कार्यक्रम कधी करायचा ते ठरवायला या. त्यावेळी कसं होत की मुलगा आधी बघायला मिळाला तर बरं. त्या उद्देशाने बडीलही संध्याकाळी त्यांच्या घरी गेले. त्यावेळी कल्याणला ही मंडळी राहात होती.

माझे वडील ह्यांच्या घरी गेले तो शनिवार होता. त्यांनी ठरवलं की उद्याच रविवारी मी मुलीला घेऊन येतो. सर्वजण माझ्या वडिलांना घरी भेटले. त्यांनी असे पत्र पाठविले होते म्हणून आम्हांलाही उत्सुकता होती. वडील कल्याणहून घरी ठाण्याला आले. मी त्यावेळी एका डॉक्टरांकडे पार्टटाईम रिसेप्शनिस्टचा जॉब करत होते. संध्याकाळी ५ ते ९ साधारण ९॥चा होत असत. वडील जेव्हां त्यांच्या घरी गेले तेव्हां कुठल्या डॉक्टरांकडे जाते. कुठे हॉस्पिटल आहे वगैरे चौकशी झालीच होती. मी पण त्या शनिवारी हॉस्पिटलमध्ये गेले होते. माझ्या यजमानांच्या नातेवाइकांचे कुणाचं तरी ऑपरेशन तिकडे झाले होते. त्यामुळे त्या लोकांना ते हॉस्पिटल माहित होते. वडील ठाण्याला घरी आले तेव्हा मी घरात नव्हते. त्यामुळे मला माहित नाही की उद्याच आपल्याला जायये आहे. ते घरी आल्यावर कळले.

झालं, माझे वडील त्यांच्या घरातून कधी निघतात त्याचीच वाट बघत होते. त्यांच्या मागोमाग माझे यजमान आणि दीर ठाण्याला यायला निघाले. त्यांच्या नातेवाइकाचे आधी ऑपरेशन झाल्यामुळे त्यांना मलासुद्धा बघितल्याचे आठवत होते. माझ्या वडिलांनी वर्णन केलेली आणि ह्यांनी बघितलेली ती मीच आहे का याची खात्री करण्याकरिता ते दोघे हॉस्पिटलला आले. त्यांनी काय केले की माझे मिस्टर खालीच थांबले. साधारण क्लिनीक संपेल ९ वाजता तेव्हांच ते तिथे पोचले. दीर माझे वरती आले. आमचं कन्सलटिंग संपलेच होते आणि सर निघाले की आम्ही निघणार होतो. तेवढ्यात माझे दीर वर आले आणि त्यांनी मला विचारलं की हे डोळ्यांचे हॉस्पिटल आहे का? बाहेर बोर्ड कान-नाक-घसा तज्ञ असा होता तरी हा माणूस डोळ्यांचे डॉक्टर काय विचारतो? माणूस तर चांगलपा शिकलेला दिसत होता. पण मला उत्तर द्यायलाच हवे होते. मी म्हटलं नाही हे कान-ना-घसाचे हॉस्पिटल आहे. तेव्हा त्यांनी डोक्यावर हात ठेवला आणिते खाली गेले. माझ्याबरोबर इतर स्टाफ होता आम्ही हसायला लागलो. तेव्हढ्यात आमचे सर बाहेर आले आणि घरी जायला निघाले. आम्ही हसताना पाहून ते म्हणाले काय झालं. मी म्हटलं चांगला शिकलेला तर माणूस होता आणि हे डोळ्यांचे हॉस्पिटल आहे कां असे विचारत होता. बाहेर उभे राहून बोर्डही वाचत होता. तरी असा प्रश्न विचारल्यामुळे आम्ही हसत होतो.

सर गेल्यावर आम्हीसुद्धा खाली आलो. तेव्हा हे दोघे खाली उभे होते पण कडेला. मला दिसलेच नाहीत. त्यांनी मात्र मला उतरताना बघितले आणि माझ्या मागे काही अंतर ते आले आणि नंतर कल्याणला गेले. मी घरी आले. माझ्या वडिलांनी मला सांगितले की उद्याच आपल्याला कल्याणला जायचे आहे. दुसऱ्या दिवशी मी ही तयारी केली. थोडोसे टेंशन होतेच. कारण माझा पहिलाच कार्यक्रम होता. मी आणि माझे वडिल कल्याणला ह्यांच्या घरी गेले. माल तिथे काल हॉस्पिटलमधे डोळ्यांचे डॉक्टर येतात कां? असा प्रश्न विचारणारी व्यक्तिच ह्यांच्या घरी आणि ते अर्थातच ह्यांचे भाऊ होते. मला तेव्हा गंमतच वाटली की कालच आपण ह्या माणसाला बघितले. तो एक योगायोग आहे असे मला वाटले म्हणून मी काहीच विचारले नाही. बघण्याचा कार्यक्रम पार पडला. दोन दिवसांनी त्यांची पसंती त्यांनी कळविली. आम्हांला पण ठिकाण, मुलगा पसंत होता तसं आम्ही पण त्यांना कळवलं. माझ्या आईने मला बघितलं नव्हते म्हणून सासूबाईंनी सांगितले की मुलीच्या आईने पण मुलाला बघू दे आणि मग सांगा. नंतर आईनेही ह्यांना बघितले आणि १० दिवसांत साखरपुडा झाला. त्यानंतर लग्न ही १ महिन्यांनी लगेच झाले.

तेवढ्या एक महिन्यात आम्ही खूप वेळा भेटलो. हे ठाण्याला हॉस्पिटलला यायचे आम्ही मधेच खाली उतरून आईसक्रिम खाऊन यायचो. तेव्हां मी एकदा विचारलेकी तुमचे भाऊ कशासाठी आले होते तेव्हां माझे मिस्टर म्हणाले की आम्हांला जी आठवत होती ती तुच आहेस कां हे बघण्यासाठी आम्ही आलो होतो. मी म्हटलं आम्ही दुसऱ्याच दिवशी तुमच्या घरी येणार होतो. तेव्हां कळलंच असतं की. पण त्यांचीही उत्सुकता किती होती. पसंत नापसंती नंतरची गोष्ट पण आधी दाखविलेली उत्सुकता मला मात्र नंतर कळली तेव्हा फारच गंमत वाटली. अशी ही आमच्या लग्नाची गोष्ट. त्यामधील नाट्यमयता ही अशी होती. पुढेही आमचा संसार खेळीमेळीने चालू आहे. सर्वांनीच एकमेकांना समजून वागल्यानंतर फारशी अडचणी येतच नाहीत. थोड्याफार कुरबुरी आणि काही आंबट गोट प्रसंग जीवनांत येतातच. त्यालाच मी तरी संसार असे म्हणते. संसार हा तीन अक्षरी शब्द असला तरी त्याची व्याप्ती खूपच मोठी आहे. संसार रथाची दोन चाकं म्हणजे नवरा आणि बायको. तो रथ ओढायचा म्हणजे दोन्ही चाकांनी बरोबरच चालावं लागतं. तसेच आमचेही आनंदाने चालू आहे. म्हणून असे म्हणावेसे वाटते की -

***संसार मंदिरी या, आता उणे न काही***
***आनंद दाटतो ग, आनंद गीत गाई॥***

**- सौ. वसुंधरा श्रीकांत मराठे**

❑❑❑

## हितगुजच्या ७५व्या अंकास
## हार्दिक शुभेच्छा

आमचे तीर्थरुप

श्री. प्रभाकर वासुदेव फडणीस (मराठे)

यांच्या ७५व्या वर्षात

पदार्पणा निमित्त

अभिजित प्रभाकर फडणीस

सौ. ऐश्वर्या अभिजित फडणीस

चि. देविका, चि. वैदेही, चि. आर्यमान

समस्त फडणीस (मराठे) परिवार

● मुलाखत

# श्री.शेखर खांबेटे (पृ.६७६)

**मुलाखतकार : श्री.भाऊ मराठे**

शास्त्रीय संगीताच्या मैफलीचं सुरुवातीचं गंभीर वातावरण : गायक बैठकीवर विराजमान झालेले आहेत, हार्मोनियमच्या साथीदाराने तबला सुरात लावण्यासाठी हार्मोनियमवर सूर दिलेला आहे. तबलजी प्रथम तबला प्रेमाने कुरवाळतो; हातोडी उचलून तबला फिरवत फिरवत तालात ठाकठोक करून तबल्याची मनधरणी करतो. डग्ग्यावर हातोडीची हलके ठकठक होते आणि मनासारखं वाद्य सुरात लागलं की त्या तबलजीच्या चेहऱ्यावर प्रसन्न हास्य फुलतं. ते हास्य म्हणजे पुढच्या मैफलीच्या रंगतदार साथीची नांदी असते - तो तबलजी म्हणजे शेखर खांबेटे. गप्पांच्या ओघात शेखर खांबेटे सांगत होते - माझे तबल्याचे गुरू म्हणजे श्रीधर पाध्ये. मी ४थी इयत्तेत असताना प्रथम लोकांसमोर तबला वाजवला. ते एक असं वय असतं की मंचभय वगैरे काही नसतं. त्याचा पुढे मला फार फायदा झाला. आजही मला मंचभय वगैरे काही नाही.

**प्रश्न :** तबला हे फक्त साथीचं वाद्य आहे की एकल (Solo) वादनही करता येतं?

**शेखर :** माझ्या मते दोन्ही. तबला हे तालवाद्य. ताल हा गाण्याचा प्राण असतो. सूर आणि ताल सुंदररित्या एकत्र आल्यावर श्रोता डोलायला पाहिजे. तबलजी जर साथीदाराच्या भूमिकेत असेल तर ठेका इतका डौलदार धरावा लागतो की गायकाला त्या ठेक्यावर आपण गात राहिलं पाहिजे असं वाटलं पाहिजे. एकल (Solo) वादनाच्या संदर्भात बोलायचं झालं तर शास्त्रीय परिभाषेत पेशकश-कायदा-रेला-परण-चक्रधार हे सगळं लयीच्या अंगाने सुंदर वाजवता येतं. एकल वादनात कुठल्याही वेड्यावाकड्या कसरती न करता तबला तुम्हाला तास-दीडतास रिझवू शकतो. शास्त्राच्या सगळ्या कसोट्या पाळून झाकीर हुसेनने केलेलं एकल तबलावादन मी ऐकलं आहे. म्हणून तबला हे साथीचं आणि एकल वादनाचं वाद्य आहे.

**प्रश्न :** तुम्ही साथीला असलेल्या खूप बैठकी मी ऐकल्या आहेत. गाण्याची तबल्यातून जी पहिली उठावाज असते ती तुम्ही फार छान करता. याचा अभ्यास कसा केला?

**शेखर :** माझा Classical Base उत्तम तयार आहे. मी पं.नारायणराव बोडस, शरद जांभेकर, वीणा सहस्रबुद्धे, श्रुती सडोलीकर अशा वेगवेगळ्या गायकांची/गायिकांची साथ केली आहे. आपला स्वत:चा Classical Base तयार असला की वेगवेगळ्या घराण्यांची खासियत लक्षात घेऊन वाजवता येतं. शिवाय रियाज असतोच. तो कुठल्या कलावंताला चुकला आहे ? (पुलंच्या भाषेत बोलायचं झालं तर रियाज करायचा ज्याला कंटाळा आला त्यानं गाणं/बजावणं सोडून राजकारणात दिग्गजांनी शिरावं. तिथे बेसूर लोकांची फार आवश्यकता असते. सुराला सूर मिळवणं याला राजकारणात काही अर्थ नसतो. बेसूर लावता आला पाहिजे. - मी)

पं. राम मराठे ह्यांना डिचोलीच्या कार्यक्रमात प्रथम साथ केली. तो माझ्या आयुष्यातला एक फार आनंदाचा क्षण आहे. पं. राम मराठ्यांची साथ करायची म्हणजे येऱ्या गबाळ्याचं काम नाही. दाण दाण जाणारं गाणं होतं ते. क्षणाची उसंत मिळत नसे. माझ्या वडिलांच्या मते ''पं. राम मराठे'' हा एकच गायक होता. मी घरी आल्यावर वडिलांच्या फोटो समोर उभा राहून म्हणालो, ''बाबा, मी पं. राम मराठ्यांना साथ करून आलो आहे. आता तुम्ही मला तबलजी मानाल !''

**प्रश्न :** तुम्ही संगीत नाटकांनासुद्धा साथ केली आहे.

**शेखर :** मी संगीत नाटकाच्या प्रेमापोटी साथ करतो. संगीत नाटक टिकलं पाहिजे हे माझं प्रामाणिक मत आहे. अहो भास्करबुवा बखले, रामकृष्णबुवा वझे, मास्तर कृष्णराव अशा दिग्गजांनी बनवलेली ती गाणी आहेत. नाटकातली वरीचशी गाणी ही शास्त्रीय संगीतावर आधारलेली आहेत. इथेसुद्धा माझा Classical Base मला उपयोगी पडला. पुन्हा नाटक चालू असताना तबल्याची साथ करणं हे एक वेगळं तंत्र आहे. कारण नाटकात मायक्रोफोन तबल्यापासून लांब असतो. त्यामुळे तबल्यावर थापच अशी पडली पाहिजे की अभिनेत्याला / अभिनेत्रीला आणि प्रेक्षकांना सगळ्यांनाच उत्साह वाटला पाहिजे. गाण्याच्या बैठकीत मायक्रोफोन तबल्याजवळ असल्यामुळे त्या तंत्राने वाजवायला लागतो. आजच्या आधुनिक तंत्राचा तबलजीनेसुद्धा अभ्यास करायला पाहिजे.

**प्रश्न :** नवीन अशा कुठल्या संगीत नाटकाची साथ केलीत ?

**शेखर :** तो योग आला पं. जीतेंद्र अभिषेकींनी स्वरबद्ध केलेल्या ''धाडिला तिने राम का वनी'' या नाटकाच्या निमित्ताने. त्यावेळेस मुंबई मराठी साहित्य संघाच्या ''सहापुत्रलिका'' या नाटकात दिलीप कोल्हटकरांच्या दिग्दर्शनाखाली अभिनय करत होतो. (त्या नाटकात मला अभिनयाचं रौप्यपदक मिळालं) या दोन्ही नाटकांची तालीम साहित्य संघातच चालायची. आमच्या नाटकाची तालीम संपल्यावर मला वेळ असायचा म्हणून ''धाडिला तिने राम का वनी'' या नाटकाच्या गाण्यांची तालीम ऐकायला बसायचो. एक दिवस त्या नाटकासाठी मुक्रर केलेला तबलजी आला नव्हता. मी खाली उभा असलेला पाहून पं. नारायणराव बोडस मला वर घेऊन गेले. मुक्रर केलेला तबलजी गैरहजर राहिल्यामुळे त्यांची अडचण झाली होती. म्हणून मी तालमीत साथ केली होती. पण पं. जीतेंद्र अभिषेकींना मी केलेली साथ आवडली असावी. त्यामुळे मी ह्या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाची साथ केली. ''हयवदन'' नाटकात पात्रांच्या हालचाली नुसार मी ''रिदम'' बसवला होता. त्यानंतर मी ''कधी तरी कोठे तरी'', ''कांते फार तुला मजसाठी'' ह्या नाटकांतही तबल्याची साथ केली.

**प्रश्न :** National Center for Performing Arts या मान्यवर संस्थेशी कसा संबंध आला ?

**शेखर :** १९७९ साली ''संगीत शाकुंतल'' या विजया मेहतांनी दिग्दर्शित केलेल्या संगीत नाटकाने NCPA चं उद्घाटन झालं. नंतर पु.ल. देशपांडे आले, पाठोपाठ पं. अशोक रानडे आले. ह्या दोघांनी NCPA मध्ये अतिशय उत्कृष्ट कार्यक्रम सादर केले. खरं म्हटलं तर ह्या दोघांनी मराठी माणसांना NCPA मध्ये कार्यक्रम ऐकायला यायची सवय लावली. माझं तबलावादन पुलंनी पुण्याला ऐकलं होतं आणि माझं तबलावादन त्यांना आवडत आहे हे मला त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होतं. पुढे पुलं आणि पं. अशोक रानडे यांना NCPA त सादर केलेल्या पहिल्याच कार्यक्रमात मी तबलजी होतो. मग मात्र ह्या दोघांनी मला सतत तबलजी म्हणून निवडलं. पण NCPA मुळे I was exposed to

(पृष्ठ १४ वर)

# वडिलांचे मुलाला पत्र

प्रिय बाळा,

ज्या दिवशी तुला मी म्हातारा झालो आहे असे वाटले, त्यादिवशी मला समजून घे, कारण म्हातारपण हे दुसरे बालपणच आहे.

जेवतांना कधी माझं कपड्यावर सांडलं, माझे हात बरबटले किंवा मला शर्टची बटणं लावता आली नाहीत, तरी ते समजून घे. तुला शर्ट चड्डी घालायला मी किती शांतपणे शिकविलं होतं..... आठवतंय ?

कित्येकदा मी एकच गोष्ट तुला पुन्हा पुन्हा सांगत असतो. पण मला थांबवू नकोस. ऐकून घे, तुला माहित आहे कां ? तूं लहान असताना तुला झोपविताना एकच गोष्ट एक हजार वेळा मी तुला सांगत असे.... अगदी तूं गाढ झोपे पर्यंत.

जर मला एखाद्या दिवशी आंघोळीला सुट्टी घ्यावीशी वाटली तर माझी लाज वाटू देवू नकोस किंवा मला रागावूही नकोस, आठवतंय तुला, तुझ्या लहानपणी तुला आंघोळ घालण्यासाठी तुझ्यामागून मी धावायचो आणि तू आंघोळ करावीस म्हणून हजारो कारणे रचून सांगायचो.

मी तुला खूप गोष्टी शिकविल्या. व्यवस्थित जेवायला, नीट कपडे घालायला, आयुष्याशी सामना करायला.....

तुझ्याशी बोलताना जर कधी माझी आठवण अडखळली, तर मला ते आठवायला पुरेसा वेळ दे आणि समजा मला आठवलंच नाही तर काळजी करू नकोस, कारण खरं सांगू कां, मी तुझ्याशी काय बोलतोय हे महत्वाचे नाहीच आहे पण माझ्याशेजारी बसून तूं माझं बोलणं ऐकतोयस, हेच माझ्यासाठी महत्वाचे आहे.

कधी मला खावंसं वाटलं नाही, तर मला आग्रह करुं नकोस. मला केंव्हा खायला हवं आहे आणि केंव्हा नको, हे खरंच मला कळतं.

तुम्ही मुलं मोबाईल, डी.व्ही.डी. सारखी अत्याधुनिक उपकरणं सहजपणे वापरता, मला त्यामधलं फारसं काही कळत नाही, पण माझ्या ह्याविषयीच्या अज्ञानाची चेष्टा करू नकोस. मी हे सारं शिकेन, फक्त मला पुरेसा वेळ दे.

ज्यावेळी माझी पावलं थकून चालायला नाकारतील त्यावेळी, तू अडखळत पहिली पावलं टाकत होतास तेंव्हा ''चाल चाल माते'' असे म्हणत मी तुला हाताला धरून चालायला शिकविलं ते आठव आणि आज माझ्या अडखळणाऱ्या या पावलांना तसाच तुझा हात दे आणि जेंव्हा एखाद्या दिवशी मी म्हणेन की, मला आता आणखी जगण्याचा कंटाळा आला आहे, मला मरण आले तर बरे, तेव्हा बाळा, माझ्यावर रागावू नकोस, केंव्हा ना केंव्हा तुझे वय वाढल्यावर हे सारे तुलाही उमजेलच.

मला आणि माझ्या म्हातारपणाला नीट समजून घे, आज मी जे जीवन जगतो आहे ते जगणे नाही नुसते असणेच आहे.

आयुष्यांत कदाचित मी खूप चुका केल्या असतील, पण तुला वाढवितांना जगात जे जे चांगले असेल तेते तुला मिळावे हीच माझी इच्छा होती. त्यानुसारच तुझ्या आयुष्याला आम्ही वळण लावले हे एक ना एक दिवस तुला उमजेल.

तुम्ही कामात असता हे मलापण समजते, पण ज्यावेळी मी तुझ्याजवळ येतो तेंव्हा मला रागावू नकोस, वाईटही वाटून घेऊ नकोस किंवा माझ्या म्हाताऱ्या स्थितीमुळे हतबल होऊ नकोस. तू फक्त माझ्याजवळ रहा. मला समजून घेण्याचा प्रयत्न कर. तुझ्या बालपणात जसा मी तुझा आधार झालो, तसाच तूही माझा आधार हो, मला समजून घे.

माझ्या सुर्यास्ताच्या वाटचालीत मला मदत कर आणि मला माझा मार्ग प्रेमाने आणि धीराने पूर्ण करू दे. याबदली तुला मी काय देणार ? केवळ माझें हसूं किंवा खरं तर बोलू नये अशा कृतज्ञतेचे अश्रू. तुझ्याबद्दल माझ्या मनी असणारे विलक्षण प्रेम विसरु नकोस.

तुझ्यावर प्रचंड प्रेम करणारा,

तुझा बाबा

भावानुवाद : डॉ. शरदचंद्र गोखले, सौ. नीता कुलकर्णी

(कोपनेहगन परिषदेत हैद्राबादचे डॉ. बालाजी पाणी बापूजी ह्यांच्या सुंदर भाषणातील पत्रावर आधारीत)

वरील पत्र संग्राहक श्री. य.वा. शिंदे ह्यांनी अथश्री त्रैमासिकाच्या ऑगस्ट-ऑक्टोबर २००६ च्या अंकातून सर्व ज्येष्ठांनी (निवृत्तांनी) मुला नातवंडांना वाचण्यास देण्यासाठी वितरीत केले आहे.

श्रीनिवास गोपाळ मराठे पृ.३८९.
१/६ त्रिवेणी, पाटबंधारे सोसायटी,
३६/९, एरंडवणे, पुणे-४११०३८.
दूरध्वनी - (०२०-२५४६४७०६)

---

(पृष्ठ १३ वरून)

## मुलाखत .... श्री.शेखर खांबेटे

bigger audience आणि पुल - अशोक रानडे या दोघांमुळे एखाद्या विषयाचा परिपूर्ण अभ्यास कसा करायचा याची दृष्टी मिळाली.

**प्रश्न :** आठवणीत राहतील अशा मैफिली किती ?

**शेखर :** बऱ्याच आहेत. अलिबागला फैय्याजच्या कार्यक्रमात साथीला बसलो होतो. फैय्याझ ''लागी करेजवा कटार'' तुफान गात होत्या. मी सुद्धा सुंदर साथ करत होतो वेगवेगळ्या लग्ग्या वाजवत होतो. ठुमरी संपल्यावर एका रसिकाने माझ्या हातात ५ रुपये देऊन म्हणाला, ''क्या लग्गी बजाया - वा !'' हा रसिक मला परत भेटला नाही.

आमचा ''देवगाणी'' हा कार्यक्रम दिल्लीला होता. पं. रविशंकर प्रमुख पाहुणे होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे फार वेळ बसणार नव्हते. पण तेही रंगले. कार्यक्रमात कसा कुणास ठाऊक मी पाच मात्रांचा एक ताल वाजवला. तो ऐकल्याबरोबर पं. रवी शंकर उठून पुढे आले आणि मला मनापासून दाद दिली. अरे, पं. रवीशंकरांसारख्या दिग्गज कलावंताकडून मला दाद मिळाली यापरतं दुसरं भाग्य कोणतं ? अच्छा !

- शेखर खांबेटे यांनी खूप अभ्यास करून बसवलेल्या चक्रसंगीत : कृष्ण गाथा : विठ्ठल गीती गावा : भावगीताच्या पाऊलखुणा आणि रंग लावणीचे या त्यांच्या पाच कार्यक्रमांची सविस्तर माहिती ''हितगूज'' च्या जूनच्या अंकात दिलीच आहे.

- शेखर खांबेटे कलावंताची मैफिल सुंदर व्हावी ह्या भावनेने साथीला बसतात. ते नुसते अनुचरक नाहीत तर कलावंताचे सहचर आहेत. तरबेज गायक असेल तर त्याला आणखी पूरक काय वाजवायचं आणि नवीन गायक असेल तर त्याला कसं सांभाळून घ्यायचं ह्या सगळ्या खुब्या त्यांना ठाऊक आहेत. शेखर खांबेटे कधी ट्बलजी झाले नाहीत ते अप्रतिम तबलजीच राहिले. त्यांच्या पुढच्या सांगीतिक वाटचालीला मराठे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक शुभेच्छा.

❑❑❑

# डॉक्टर ते लेखिका..... सीमाचा प्रवास

**मुलाखतकार - सौ.निलांबरी मराठे**

*सौ. निलांबरी मराठेने घेतलेला डॉ. सौ. सीमा मराठेच्या कार्याचा हा अतिसंक्षिप्त रुपातील आढावा. निलांबरीला खूप काही जाणून घ्यायचं होतं आणि सीमालाही सांगायचं होतं. परन्तु फार दीर्घ मुलाखत वाचकांनाही कंटाळवाणी होते. सीमाच्या आयुष्याचा हा लहानसा आलेख तिच्या असामान्यतेबद्दलची ओळख नक्कीच करून देईल.* **- संपादिका**

डॉ. सौ. सीमा मराठेची ओळख बऱ्याच वर्षांपासून होतीच परन्तु 'मराठे प्रतिष्ठानच्या गोव्यातील संमेलनाच्या निमित्ताने आमचा अधिक सहवास झाला आणि तिच्यातील अनेक पैलूंची माहिती झाली. तिची मुलाखत घ्यायचं ठरवलं. ही मुलाखत मराठे परिवारासमोर 'हितगुज' मासिकाच्या माध्यमातून ठेवावी असा जणू निर्धारच केला. तिची अपॉइंटमेंट घेणं तसं अवघड नव्हतं. माझं अप्पाबळवंत चौकातील कार्यालय आणि सीमाचं क्लिनिक अवघ्या पाच मिनिटांच्या अंतरातलं. दुपारचा वेळ दोघींनाही निवांत असाच होता.

मी सीमाच्या क्लिनिकमध्ये गेले त्यावेळी सीमा काहीतरी लिहित होती. मला पाहिल्यावर ती उठली आणि प्रेमादराने बसण्याची विनंती केली.

'काही महत्त्वाचं लिहित होतीस कां ?'

'अगं, तसं झालंय लिहून. 'डेझर्ट सफारी'च्या प्रवास वर्णनाची शेवटचीच वाक्य पूर्ण केली. सांग काय घेणार ? कोल्डड्रिंक, कॉफी, लस्सी....? शेजारीच मिळतं सगळं. फोन केला की होमसर्व्हीस !'

'लस्सी चालेल.'

'ठीक आहे.'

आम्ही दोघीही रिलॅक्स झालो. आणि मग सुरू झाले माझे प्रश्न आणि त्यांना अनुसरून तिची प्रदीर्घ उत्तरं. सीमा मनमोकळेपणाने आणि सहजतेने बोलत होती.

'सीमा, मला तुझी प्रथमपासूनची पार्श्वभूमी सांग ना ! म्हणजे तुझा जन्म माहेरचं नांव वगैरे.....'

'माझा जन्म नाशिक येथे झाला. माझे वडिल नारायण जोगळेकर त्यावेळी देवळालीला डिफेन्स डिपार्टमेंटमध्ये अकौंटंट होते. आमचा जोगळेकरांचा वाडा होता. आजोळही नाशिकचंच. आजोबा 'शंकर लेले' वकील होते. ह्या जगात पहिलं पाऊल माझं नाशिकमध्येच पडलं. माझं पूर्वाश्रमीचं नांव तारा नारायण जोगळेकर.'



**महापौरांच्या हस्ते सत्कार**

'किती भावंडं आहेत तुला ?'

सीमा स्तब्ध झाली. पण क्षणभरच !

'निलांबरी, मी एकुलती एक आहे. भाऊ बहिण नाही. मला भावंडं असतं तर फार बरं झालं असतं असं सतत वाटत आलंय. एकटेपणा जाणवत आलाय.'

'मग, तुझं लहानपण कुठे गेलं?'

'पुढे वडिलांची बदली ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील ऑर्डनन्स फॅक्टरी येथे झाली. माझं संपूर्ण बालपण तेथील डिफेन्स एरियात गेलं. शालेय शिक्षण तेथीलच 'स्टाफ चिल्ड्रेन हायस्कूल' मध्ये झालं.'

'शालेय शिक्षणाचा काळ कसा केला? काय अचीव्हमेंटस् आहेत त्या वेळच्या?'

उत्सुकतेने मी विचारलं.

'निलांबरी, शालेय शिक्षणाची वर्ष माझी फारच छान गेली. शाळा उत्तम होती. डिफेन्स एरिया असल्या कारणाने वातावरण कॉस्मॉपॉलिटन. शिक्षणाचे माध्यम अर्थातच इंग्रजी होते. इयत्ता ७वी मध्ये ठाणे जिल्ह्यातील स्कॉलरशिप परिक्षेत मी ७वी आले. आणि वर्गात पहिली. सातवी नंतर मी दोन हिंदीच्या, दोन संस्कृतच्या व दोन ड्रॉईंगच्या परिक्षा दिल्या. शाळेतर्फेच शिकविण्याची सोय होती. परिक्षा कल्याण नाही तर ठाण्यालाच असायच्या. तेथपर्यंत जायला यायलाही मिलिटरीच्या गाड्यांची सोय केली होती.

'तुझं अभ्यासाचं करियर पहिल्या पासूनच उच्च होतं तर ! अभ्यासाव्यतिरिक्तही तुझे उपक्रम नक्कीच असणार. त्याबद्दल सांग ना !'

'इयत्ता पाचवी पासूनच शास्त्रोक्त संगीताचे शिक्षण व्हायोलिनवादक 'शेणॉय मास्तर' यांच्याकडून घेवू लागले. गायनाच्या स्पर्धांमध्ये भाग घेवू लागले आणि चक्क पारितोषिकेही मिळवली. मास्तरांनी मला भजनं, गाणीही शिकवली होती.

पुढे स्पर्धांमध्ये भाग घेण्याचा छंदच लागला आणि सोपंही वाटू लागलं. 'निबंध स्पर्धा', 'गीता पठण', मनाचे श्लोक वगैरेत पारितोषिके मिळायची. स्पोर्टसपैकी रनिंग रेसमध्ये बहुतेकवेळा पहिली नाहीतर दुसरी यायची. लेझिम खेळायला आवडायचे.

शाळेच्या पी.टी.च्या मास्तरांनी लेझिम शिकविले. त्याचप्रमाणे योगासनेही शिकविली. त्यातही खूप मन रमायचं. निलांबरी, तुला सांगते, शाळेत असल्यापासूनच वाचनाची अत्यंत आवड होती. इंग्रजी व मराठी पुस्तकांचे खूप वाचन केले आणि मलाही लिखाणाची स्फूर्ति मिळाली. शाळेच्या वार्षिक हस्तलिखित मासिकामध्ये मी लघुकथा, निबंध लिहित असे. एवढंच नाही तर एखादं चित्रंही काढीत असे.

शाळेत मराठी मुलं मोजकीच. शाळेच्या गॅदरिंगकरितां सौनवरे टीचर आमचं मराठी नाटक दरवर्षी बसवायच्या. नाटकाला 'वाहवा' मिळायची. गायन नृत्यातही गॅदरिंगमध्ये माझा सहभाग असायचा. खूप उत्साह वाटायचा सर्व करण्यात.

शालय शिक्षण परिपूर्ण करण्यामध्यें माझे माता पिता, सर्व शिक्षक वर्ग यांचा फार मोठा वाटा आहे. त्यांनीच मला घडवलं. सुसंस्कारित केलं. थोड्या वेळात खूप काही करण्याची स्फूर्ति दिली. मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.'

'सीमा, याचाच अर्थ तुझं बालपण भविष्यातील कारकिर्दीस पोषक ठरलं. असंच म्हणायला हवं.'

'निश्चितच ! डिफेन्स एरियातील वातावरणही अतिशय सुरक्षित व शिस्तिचंही होतं. इतर कुटुंबही सुशिक्षित, सुसंस्कारित होती. भारताच्या सर्व राज्यांमधून आलेली होती. आणि म्हणूनच स्वभावात संकुचितपणा राहिला नाही. असं मला वाटतं. बालपणाबद्दल खूप काही सांगण्यासारखं आहे. परन्तु थोड्या वेळात ते शक्य नाही.'

एवढं बोलून सीमा थांबली. सीमाच्या पुढील आयुष्यात डोकावण्याची तयारी करून विचारले 'सीमा, महाविद्यालयीन शिक्षण कोठे व कसे झाले त्याबद्दलही कळू दे मला.'

'पुण्याच्या एम्.ई.एस्. कॉलसेजमध्ये सायन्सची दोन वर्षे केली. होस्टेलवर राहात होते. बालपणी जसा मोठा मित्रपरिवार होता तसा कॉलेजात नव्हता. आमचा चार जणींचा ग्रूप होता. सर्वजणी अभ्यासात हुशार. एकत्र अभ्यास करायचो.

दोन वर्षे एन्.सी.सी. चे शिक्षण घेतले. त्यामुळे शिस्त व निर्भयता आली. देशप्रेम व कर्तव्यबुद्धीही वृद्धींगत झाली. एन्.सी.सी. मला मनापासून आवडली.

टेबलटेनिस शिकले. कॉलेजच्या खो-खो स्पर्धेत सहभागी झाले. गॅदरिंग व होस्टेलच्या



**डॉ.गिरीश ओक यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन**

वार्षिक उत्सवात उत्साहाने भाग घेतला. कॉलेजच्या काळात कविता करू लागले. सुरुवातीला इंग्रजी भाषेतच करीत असे. पुढे मराठीतही करू लागले. कॉलेजच्या मासिकात छापून यायच्या. एवढंच नाही तर बोर्डावरसुद्धा लावल्या जायच्या. अभ्यासामुळे इतर लेखनास वेळ मिळाला नाही. पंधरा दिवसातून एकदा आम्ही मैत्रिणी जवळच कुठेतरी ट्रीप काढायचो. सायकलवरून जायचो. परिक्षेच्या आदल्या दिवशी पर्वतीवर देवदर्शनाला आवर्जुन जायचो आणि देव पावायचा हे मात्र खरं !'

पुणे येथीलच टिळक आयुर्वेद महाविद्यालयात वैद्यकीय शिक्षण साडेचार वर्षे घेतले. इंटिग्रेटेड कोर्स असल्याकारणाने ॲलोपथी व आयुर्वेद असे दोन्ही शिक्षण मिळाले. अभ्यास प्रचंड होता. कष्ट फार पडले. अर्थात् कष्ठाशिवाय सहजपणे काहीही मिळत नाही याचा अनुभव मला होताच.'

'मग पुढे करिअर कसं सुरू झालं ? शिक्षणाचा उपयोग कसा केलास ? मेडिकलच्या शेवटच्या वर्षी डॉ. शाम मराठे यांचेशी वडिलांनी विवाह ठरविला. दोघंही डॉक्टर असल्याचा खूपच फायदा झाला. एक ठराविक उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून शिक्षण घेतले त्यानुसार २० वर्षे यशस्वीरित्या मॅटर्निटी होम चालविले. डॉ. शाम अनेस्थेटिस्ट असल्याकारणाने ऑपरेशन्स ठरविणे व करणे सोईचे झाले. रुग्णांची अहोरात्र सेवा हातून घडली.

स्वत:ची तीन मुलं वाढवणं, वैद्यकीय व्यवसाय (तेही मॅटर्निटीहोम) करणं, त्याचबरोबर कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पेलणं अशा वेगवेगळ्या भूमिका वढवतांना तारेवरची कसरत झाली. काम जास्त अन् वेळ कमी. दिवसाचे चोवीसतासच कां असतात ? जास्त कां असत नाहीत असा वेड्यासारखा प्रश्न मी स्वत:लाच विचारी. परन्तु 'वेळेचं व्यवस्थापन' करणं हे जमलं. प्रसूतिगृहाचं काम केल्याचं समाधान वाटे. बाळ बाळंतीण सुखरूप असली की एक अवर्णनीय आनंद वाटायचा. आणि त्यानंतर त्या स्त्रीचे व माझे एक अतुट नाते निर्माण व्हायचे. हे अनुभव शब्दांत सांगणे अवघड आहे. वेगवेगळ्या इमर्जन्सीस् हॅन्डल करणं आणि पेशंटचा जीव वाचवणं हे ध्येय होतं. कर्तव्य होतं. ते मी पाळलं. अर्थात् अजूनही मी करतेच आहे.

एकीकडे म्हणजेच १९७७ साली E.S.I. (राज्य कामगार विमा योजना) याचेही रजिस्ट्रेशन मिळाले. यामुळे जनरल प्रॅक्टीस व इतर मायनर सर्जरीज केल्यामुळे वैद्यकीय प्रॅक्टीसमध्ये परिपूर्णता आली. खूप समाधान मिळाले व मिळत आहे. आता मॅटर्निटी मात्र बंद केलं आहे. कंसल्टींग चालूच आहे.

ट्रिपल, पोलिओ, हेपटायटीस बी सलीकरणांचे कॅम्प घेतले. 'एडस्'वरील एका शैक्षणिक टी.व्ही. फिल्म मध्ये ही भूमिका



**रोटरीयन रविंद्रन यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना**

केली. श्रीरंग गोडबोले यांच्या डायरेक्शनमध्ये ही फिल्म बनविण्यात आली होती. आणि अल्फा टी.व्ही.वर अनेकवेळा दाखविण्यातही आली. तो एक वेगळाच अनुभव मिळाला.

'सीमा, या व्यतिरिक्त तू सुनामी ग्रस्तांसाठीही कार्य केलेस. सकाळ पेपरमध्ये आला होता तुझा फोटो आणि बातमी. त्याबद्दल काही सांगशील ?'

'तो मात्र एक अविस्मरणीय अनुभव होता. इंडियन रेडक्रॉस सोसायटी तर्फे आठ डॉक्टरांची निवड झाली. त्यामध्ये मी होते. आमचं महाराष्ट्रातील पहिलंच पथक केरळच्या दक्षिणेकडील कोस्टल एरियात गेलं. तेथील सुनामीग्रस्तांची सेवा केली. तेथील परिस्थिती प्रत्यक्ष डोळ्याने पाहिली. लोकांच्या कथा ऐकून मन हेलावून गेलं.'

'त्याबद्दल तुला पारितोषिकही मिळालं. रेडक्रॉसकडून आणि महाराष्ट्र राज्याकडून हो ना ?'

'हो. खरं आहे. परन्तु हे सामाजिक कार्य परमेश्वराने माझ्या हातून करून घेतले व पुढेही करण्यास इच्छाशक्ती व शारिरीक बळ देवो अशी आशा करते.'

'तू 'रोटरी क्लबची' मेंबर होतीस असं ऐकलं. त्या काळात काय केलंस तू ?'

'मी रोटरी क्लबची तीन वर्ष ॲक्टीव्ह मेंबर होते. 'मोती बिंदू' ऑपरेशन्सच्या प्रोजेक्टची मी ऑर्गनायझर होते. क्लबमध्ये कविसंम्मेलन घेतले. एक वर्षी रोटरी क्लबच्या साप्ताहिकाची संपादिका होते. आणि त्यास डिस्ट्रीक्ट मध्ये पहिला नंबर मिळाला. शिवाय स्पोर्टस्‌मध्येही सहभागी झाले. इतरही अनेक गोष्टींमध्ये उत्साहाने सहभागी झाले. 'रोटरी'ची तीनही वर्ष माझ्या दृष्टीने फारच महत्त्वाची व आनंदाची गेली.'

'आता आपण तुझ्या वाङ्‌मयीन प्रवासाकडे वळू या का ? तू साहित्याकडे कशी काय वळलीस ? त्याबद्दल जाणून घेण्याची फार इच्छा आहे.'

'सन २००० साली मी ध्यानीमनी नसतांना लिखाण करू लागले. सर्वप्रथम माझ्या कथा व कविता 'स्त्री' मासिकाने प्रकाशित केल्या. त्यामुळे माझी उमेद वाढली. ॲन्ड सिन्स देन देअर वॉज नो लुकिंग बॅक. मी कविता, कादंबऱ्या, कथा, वैद्यकीय विषयांवरील लेख वगैरे अनेक विषयांवर लिहू लागले.'

'सीमा, कसं गं जमलं तुला हे ? कसा वेळ मिळाला तुला इतकं सर्व करायला ?'

'पूर्वीच मी सांगितलं ना तुला ? वेळेचे व्यवस्थापन ! तेच मी केले. अगं साधं घर ते क्लिनिक या प्रवासात मी कविता मनात रचायची आणि क्लिनिकमध्ये आले की लिहून काढायची. त्याचप्रमाणे इतर लेखनाचं व्यक्ति, कुटुंबे, समाज, निसर्ग यांचं अवलोकन करणं हे मला प्रथमपासूनच जमलंय. प्रवासात किंवा मोकळ्या वेळात त्यांचा विचार करून, मग योग्यजुळणी करून कागदावर विचार उमटले गेले. अगदी सहजपणे. मला स्वत:लाही काही वेळा आश्चर्य वाटतं याचं !'

'तू पुस्तकं ही लिहिलीस. किती झाली प्रकाशित तुझी पुस्तकं ?'

'एकूण पंधरा झाली. काही महिन्यांपूर्वीच माझं पंधरावं पुस्तक प्रकाशित झालं. 'योगवासिष्ठातील कथा व उपदेशामृत'

'तुला योगवासिष्ठावर लिहावसं कसं वाटलं ?'

'पूर्वी पासून मी ते वाचत आले आहे. संक्षिप्तरुपात त्यातील कथा व उपदेशामृत लिहावे असे वाटले. कारण बऱ्याच लोकांना 'योगवासिष्ठ'उद्युक्त व्हावे ही इच्छा ठेवून हे पुस्तक लिहिले.'

'विशेष म्हणजे तू खाद्यपदार्थांवरही पुस्तकं लिहिली आहेस.'

'हो. वैद्यकीय दृष्टिकोण ठेवून लिहिली आहेत. एकूण ६ आहेत. लवकरच सातवंही प्रकाशित होईल.'

'तुझा हा साहित्याचं कार्य पाहून आणि ऐकून मी तर थक्क झाले. वैद्यकीय व्यवसाय ते वाङ्‌मयीन योगदान हा प्रवास खरोखरीच आश्चर्यकारक आहे. सीमा, लेखन कार्याकरितां तू काही विशेष शिक्षण घेतलं होतंस कां ? कोणाचं मार्गदर्शन मिळालं का ?'

'नाही. मी उत्स्फूर्तपणे लिहू लागले. कागदावर माझी लेखणी झरझर चालू लागली. पुढे साहित्य परिषदेच्या काव्यशिल्पाची व पौड रोडवरील कवी दरबारची मी मेंबर झाले. तीन वर्षे इतरांच्या कविता ऐकण्यात व माझ्या कविता सादर करण्यात खूप आनंद मिळाला. शिवाय मी अनेक साहित्य संम्मेलनं अटेन्ड केली. त्यामध्ये इतर लेखकांचे विचार, त्यांचे अनुभव ऐकायला मिळाले. शिवाय माझ्याही कवितांचे सादरीकरण करता आले. काही परिसंवादांमध्येही सहभागी झाले. 'शालिनी' फाऊंडेशनची मी सल्लागार आहे. लायन्स क्लब, रोटरी क्लब तर्फे घेण्यात येणाऱ्या वक्तृत्व स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, कविता स्पर्धांचीा परिक्षण म्हणून काम केलं. या सर्व कार्यामुळे अर्थातच साहित्य क्षेत्राशी आणखीनच जवळीक आली आणि ज्ञानात व अनुभवात भर पडली. अधीकाधीक या शब्दविश्वाकडे आकर्षित झाले. दोन वर्षांपूर्वी मात्र यशवंतराव प्रतिष्ठान तर्फे घेण्यात आलेल्या 'एकांकिका लेखन, दिग्दर्शन व अभिनय' या शिबिरांमध्ये मी शिक्षण घेतले. एकांकिका लिहिण्याकरितां मला त्याचा फार उपयोग झाला.

कारण ते एक वेगळं तंत्रज्ञान आहे. एकांकिकेचं स्टेजवर सादरीकरण कसं करायचं, स्टेजची मांडणी कशी करायची ह्याही बाबी ध्यानात घ्याव्या लागतात. हे शिक्षण मात्र महत्त्वाचं ठरलं.

'सीमा, ह्यापुढेही तू लिखाण करीत राहणार कां ? काय ठरवलंयस् ?'

'हो तर ! लिखाण करणं हा माझ्या आयुष्यातला आता अविभाज्य भाग होऊन बसलाय. मी लिहित राहणार. मी केलेलं लिखाण इतरांनी वाचावं अशी मात्र माझी इच्छा आहे. काही लायब्र्यांमध्ये ती आहेत. वाचकांचा प्रतिसादही चांगला मिळतो.'

'तुझ्या प्रकाशित पुस्तकांची नांवं सांगशील का ? आपल्या मराठे प्रतिष्ठानच्या सदस्यांना माहिती होईल.'

'ही यादीच ठेवते तुझ्यासमोर.' असं म्हणून सीमाने एक कागद माझ्यासमोर ठेवला. त्यातील पुस्तकांची नांवे खालील प्रमाणे -

१) काव्यसंग्रह - प्रतिबिंब, मानस

२) कथा संग्रह - 'भूमिका'

३) कादंबऱ्या - प्राक्तन, पुनर्वसन, निर्धार, अवमानिता (अप्रकाशित)

४. सुखी दीर्घायुष्याची गुरुकिल्ली

५. सौंदर्य वर्धन

६. वैद्यकीय दृष्टीकोण ठेवून खाद्यपदार्थांची सहा पुस्तके

७. योगवासिष्ठातील कथा व उपदेशामृत (संक्षिप्त स्वरुपात)

मी ती यादी वाचून स्वत:जवळ ठेवली. सीमाच्या वाङ्मयीन कारकीर्दीबद्दल तसं बरंचसं जाणून घेतलं. अर्थात् या थोड्याश्या वेळात जेवढं सांगता आलं ते तिने सांगितले. मला जाणून घ्यायचं होतं ते तिला मिळालेल्या ॲवॉर्डस् व पारितोषिकांबद्दल. तिची ४५ सर्टिफिकेटस् अनेक ॲवॉर्डस् व ते घेतांना घेतलेले फोटो मी तिच्या घरी पाहिले होते. त्यावर प्रकाशझोत तिने टाकावा असं वाटून मी विचारलं.

'तुला अनेक पारितोषिके मिळाली. तुझी शोकेस तर त्यांनीच सुशोभित झाली आहे. शिवाय ही मोठ्ठाली सर्टिफिकेट्सही अनेक आहेत. याबद्दल आपल्या हितगूजच्या वाचकांना तुला सांगायलाच हवं.'

'निलांबरी, लहानपणापासूनच पारितोषिके मिळत गेली. मात्र इ.स.२००० पासून पुढे जी मिळाली त्यांची मी खरोखरीच अपेक्षा नव्हती केली. जी जी कार्ये केली त्यांची पावती मिळत गेली. कौतुकाची पाठीवर थाप पडत गेली. सत्कारही झाले. हे सर्व देवाच्या कृपेनेच झाले.

सर्वात अभिमान वाटावा असं पारितोषिक म्हणजे पुणे महानगरपालिकेतर्फे मिळालेला गौरव पुरस्कार. २६ जानेवारी २००४ रोजी वैद्यकीय, सामाजिक व साहित्य या कार्यांकरिता संयुक्तपणे हा गौरव पुरस्कार मिळाला. दीप्ती चौधरी त्यावेळी महापौर होत्या. पुण्यासारख्या शैक्षणिक राजधानीत मला पुरस्कार मिळाल्याने मी कृतार्थ झाले.

'सुनामी' ग्रस्तांसाठी केलेल्या सेवेकरितां 'Outstanding Work Done' हा पुरस्कार रोटरी क्लबने दिला. त्याचप्रमाणे या कार्यासाठी महाराष्ट्र राज्य व रेडक्रॉस यांच्याकडूनही पारितोषिके व सर्टिफिकेट्स मिळाली, ही पण माझ्या दृष्टीने महत्त्वाची ठरली.

इतरही वैद्यकीय सेवांकरितां माझ्या कार्यांचे कौतुक झाले व सर्टिफिकेटस्सह सत्कारही झाले.

'साहित्या'मध्ये तर अनेक मिळाली. प्रत्योकाचे वर्णन करणं शक्य नाही. रोटरीक्लबच्या साप्ताहिकाचे संपादन केल्याबद्दल डिस्ट्रीक्टमध्ये प्रथम पारितोषिक मिळाले. हे जरा नवीन क्षेत्रातील होते.

इतर साहित्याकरितां मिळालेल्या पारितोषिकांचे स्वरुप स्मृतिचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ व पैसे असे असायचे. साहित्य संम्मेलनांमध्ये व इतर स्पर्धांमधील ही होती.'

'सीमा, तुला अनेक क्षेत्रात यश मिळालं. आपण कोणतंही काम परफेक्ट केलं की त्याला दाद दिली जातेच. तुझं कौतुक करावं तेवढं थोडंच आहे.

मला एक आणखीनही उत्सुकता आहे ती म्हणजे एवढं सगळं करण्याकरितां तुला श्रम करावेच लागले आहेत. त्याकरितां तू तुझी तब्बेत चांगली ठेवलीस. काही विशेष केलंस कां व्यक्तिमत्व चांगलं ठेवण्याकरिता ? म्हणजे विशेष आहार, व्यायाम, योगासनं... वगैरे ?'

'नाही गं ! या कशालाही वेगळा वेळ मिळाला नाही. नेहमीच शाकाहारी जेवण आणि रोजच्या कामाची हालचाल असं नैसर्गिकच उपचार सहजपणे केले गेले. विशेष काहीही केलं नाही.'

सीमाशी माझा संवाद झाला तो म्हणजे हिमनगाचाच भाग. खोलात जाऊ पहाता तिचा स्पष्टपक्तेपणा, अभ्यासूवृत्ती, बुद्धीमत्ता श्रेष्ठ असूनही अतिशय विनम्र स्वभाव ही वैशिष्ट्ये मला फार भावली. तिच्या मनाची स्थिरता आणि बोलण्यातील सहजता यामुळे मलाही तिच्याशी बोलण्यात आनंद वाटला.

तिच्या हातून समाजसेवा घडो, साहित्य क्षेत्रात उत्तरोत्तर प्रगती होवून तिच्या हातून अनेक पुस्तके लिहिली जावोत अशी मी तिला शुभेच्छा देते आणि या मुलाखतीची सांगता करते.

❑❑❑


With Best Compliments from :

**S.P. SERVICES**

- All Type of Curtains
- Sobeet Latch Lock
- Aluminium Sliding Windows
- Grills, Safety Doors
- All Types of Furniture etc.

Kirtee Nagar Co. Hsg. Soc.,
F-6, Wadgaon BK., Pune - 41
Ph.: 24351284,
Mob.: 9822026615

***Prop. : S.S. Marathe***

# 'हार्मोनियमवादक'
# प्रमोद मराठे

**मुलाखतकार : श्री.भाऊ मराठे**

हार्मोनियम (पेटी) हे गरिबाचं वाद्य. (पु.ल. देशपांडे एका भाषणात म्हणाले : ''माझा पेटीवादनाचा कोर्स १५ रुपयांच्या पेटीने सुरु झाला होता) पण पं.गोविंदराव टेंबे यांच्यासारख्या उत्कृष्ट हार्मोनियम वादकाने या वाद्याला मैफिलीत एक प्रतिष्ठा मिळवून दिली. आणि त्यांच्यापासून महाराष्ट्रात उत्कृष्ट हार्मोनियम वादकांची एक परंपरा सुरु झाली. आज ती परंपरा समर्थपणे पुढे नेणारे प्रमोद मराठे ह्यांच्याबरोबर झालेल्या या गप्पा:

मी प्रथम गाणं शिकलो. पण वयाच्या एका टप्प्यावर माझा आवाज फुटला. त्यामुळे मला नाईलाजाने गाणं बंद करावं लागलं. पण मी नाऊमेद झालो नाही. मी हार्मोनियम शिकायला सुरुवात केली. हार्मोनियम वादनाचे प्राथमिक धडे माझे वडील पं.धुंडिराज मराठे ह्यांच्याकडे घेतले. पुढे श्री.दिलिप गोसावी आणि पं. मनोहर चिमोटे यांच्या अत्यंत कुशल मार्गदर्शनाखाली माझं शिक्षण झालं.

मी १२-१२ तास रियाज केला आहे. मी गाणं शिकलो असल्यामुळे हार्मोनियम वादनात खूप फायदा झाला. त्यामुळे वेगवेगळ्या घराण्यांच्या गायक/गायिकांना साथ करताना पोषक कसं वाजवायचं याचा अभ्यास झाला. पंधरा वर्ष शिक्षण झाल्यावर मी गायकाच्या साथीला बसू लागलो. सुप्रसिद्ध गायिका डॉ.वीणा सहस्रबुद्धे यांच्या साथीला १९८५ साली बसलो. ती माझी पहिली मैफिल.

त्यानंतर मी मागे वळून पाहिलं नाही. आजपर्यंत मी पं.भीमसेन जोशी, पं.जीतेंद्र अभिषेकी, गंगूबाई हनगल, मालिनी राजूरकर, पं.राजन आणि साजन मिश्रा, डॉ.प्रभा अत्रे, पं.प्रभाकर कारेकर, उस्ताद रशीद खआन, आरती अंकलीकर, पं.सी.आर व्यास, संजीव अभ्यंकर अशा अनेक मान्यवर गायक/ गायिकांना हार्मोनियमची साथ केली आहे.

चांगली कला तीच जी पंताची पगडी डोलवते आणि सामान्य श्रोत्याचं अंत:करण हेलावते. या संदर्भात बोलताना प्रमोद मराठे सांगत होते, माझ्या हार्मोनियम वादनाच्या साथीला पं.यशवंतबुवा जोशी, पं.बाळासाहेब पूछवाले, पं.के.जी. गिंडे, पं. दिनकर कैकिणी अशा संगीत क्षेत्रातल्या दिग्गजांनी दाद दिली आहे. त्याचप्रमाणे कित्येक सामान्य श्रोत्यांनीसुद्धा माझ्या वादनाचं कौतुक केलं आहे. पण आशा खाडिलकरांची पुण्याची अविस्मरणीय मैफिल मी कधीही विसरणार नाही. आशा खाडिलकर पुढे दोन दिवस मला फोन करून दाद देत होत्या.

माझ्या हार्मोनियम वादनाबरोबरच गेली ३ वर्ष मी ''गांधर्व महाविद्यालय-पुणे' या संस्थेचा प्राचार्य म्हणून कार्यरत आहे. ''गांधर्व महाविद्याल'' हा संगीताचा अहोरात्र चालणारा महायज्ञ आहे. पुण्याचं ''गांधर्व महाविद्यालय'' १९३२ साली पं.विनायकराव पटवर्धन ह्यांनी स्थापन केलं. पं. विनायकराव पटवर्धन म्हणजे माझ्या आत्याचे यजमान. पुढे ह्या महाविद्यालयाची धुरा माझे वडील आणि काका यांनी सांभाळली. आज मी सांभाळतो आहे. गेली ५१ वर्ष ''गांधर्व महाविद्यालय'' मराठे कुटुंबियांनी सांभाळलं आहे याचा मला अभिमान आहे.

आपण सांगावं आणि वाद्यानं ऐकावं यासारखं दुसरं सुख नाही. वाद्य बोललं पाहिजे. बरेच हार्मोनियम वादक पट्टीला पट्टी दाबत बसलेले असतात. त्यामुळे आपण पट्टीचे वादक आहोत असाही त्यांचा गैरसमज झालेला असतो. प्रमोद मराठ्यांच्या वादनातून आपल्याला गाणं ऐकायला येतं. प्रमोद मराठे बोटांतून गातात म्हणून ते आपल्याला जवळचे वाटतात. ''वाऱ्याची हलकी झुळुक यावी तशी पेटी वाजली पाहिजे'' असं पु.ल. देशपांड्यांनी म्हटलं आहे. अशी झुळझुळणारी हार्मोनियम आम्हाला प्रमोद मराठ्यांकडून आयुष्यभर ऐकायला मिळावी ही ''मराठे प्रतिष्ठान'' आणि ''हितगुज''ची मनोमन शुभेच्छा !

❑❑❑

## नांदा सौख्यभरे

पुणे येथील सदस्य श्री. एकनाथ दामोदर मराठे यांच्या कन्या चि. चंद्रकला हिचा शुभविवाह चि. कैलास सु. दोनखले यांचेबरोबर ३० एप्रिल २००८ रोजी संतोष हॉल, पुणे येथे संपन्न झाला.

चि. देवकी हिचा शुभविवाह चि. सचिन अ. नाखरे यांचे बरोबर २० जुलै २००८ रोजी स्वामी कृपा हॉल, पुणे, कर्वे रस्ता येथे संपन्न झाला.

पुणे येथील सदस्य श्री. रामचंद्र गणेश मराठे यांची कन्या (माहेरवाशिण) पूर्वाश्रमीची जयश्री मराठे) सौ. सुपर्णा सुहास जोग यांची कन्या चि. सौ.कां. धनश्री हिचा विवाह सौ. स्वप्ना व श्री. वसंत अभ्यंकर यांचे सुपुत्र चि. ओंकार यांचे बरेबर दि. ८ जुलै २००८ ला पुणे येथे संपन्न झाला. नवविवाहितांना मराठे प्रतिष्ठान तर्फे शुभेच्छा.

(सौ. सुपर्णा सुहास जोग या नीलांबरीताईंच्या नणंद आहेत.)

पुणे येथील सदस्य श्री. माधव दत्तात्रय मराठे यांचे सुपुत्र चि. मुकुल यांचा विवाह श्री. विद्याधर सांब जोशी यांची सुकन्या चि.सौ.कां. प्रतिभा हिजबरोबर दि. ६.७.२००८ ला पुणे येथे संपन्न झाला. नवविवाहितांना मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा.

## हसरे हितगुज

तुम्ही न्यूज चॅनेल पाहात नसाल, तर तुम्हाला जगाबद्दल काहीच माहिती कळत नाही...

तुम्ही न्यूज चॅनेल पाहात असाल, तर तुम्हाला जगाबद्दल चुकीची माहिती कळत जाते !!!!

# सौ. मालविका मराठे

**मुलाखतकार : श्री.भाऊ मराठे**

''हितगुज'' च्या ७५व्या अंकाच्या निमित्ताने सौ. मालविका मराठे ह्यांची मुलाखत घ्यायला गेलो. सौ. मालविका मराठे म्हणजे दूरदर्शनवरचं लोभस व्यक्तिमत्त्व. मुलाखतीच्या ऐवजी आम्हा दोघांचा गप्पांचा फडच रंगला. सौ. मालविका मराठे सागंत होत्या:

माझं माहेर गोव्याचं पं. जीतेंद्र अभिषेकी माहेरून आमच्या नात्यात आहेत. गोव्यात मूळ असल्यामुळे माझ्या वडिलांना गाण्याची आणि संगीत नाटकांची अतोनात आवड होती. नोकरीवरून घरी आले की हार्मोनियम घेऊन बसत. उत्कृष्ट वाजवायचे. संगीत नाटकांची इतकी आवड की माझं नाव ''भामिनी'' ठेवलं. संगीत ''मानापमाना''तली ''भामिनी''. घरातच गाणं होतं, पण तो संस्कार माझ्या भावाने घेतला. आजतो गोव्यात संगीत शिक्षक आहे. पण माझ्या डोक्यात नाटक होतं. मी लहानपणी नाटक पाहत असताना त्या त्या भूमिकेत स्वत:ला पाहत असे. घरी आल्यावर 'नकला' सुरू. इतकं माझ्या डोक्यात नाटक होतं. अशी अभिनेत्री मला होता आलं पाहिजे ही मनात ईर्षा होती. पण माझ्या वडिलांनी मी अभिनेत्री होण्यासाठी विशेष प्रोत्साहन दिलं नाही. तशा मी BEST च्या रंगमंचावर काही भूमिका केल्या. पण ते तेवढ्यापुरतंच राहिलं.

* माझे वडील BEST मध्ये नोकरी करीत असल्यामुळे आम्ही BEST कॉलनीमध्ये राहत होतो. त्यावेळेस आमच्या BEST कॉलनीत फक्त दोघांकडे टेलिव्हिजन होते. त्यातली एक सिंधी बाई टेलिव्हिजनवर सिनेमा दाखवायला चार आणे घ्यायची. एकदा माझ्या आवडीचा चित्रपट टेलिव्हिजनवर दाखवणार होते. मी माझ्या वडिलांकडे चार आण्यांसाठी हट्ट धरला. माझे वडील रागावले नाहीत. पण मला म्हणाले: ''नुसता'' टेलिव्हिजन काय पहातेस? लोकांनी तुला टेलिव्हिजनवर पहायला पाहिजे, असं काही तरी करून दाखव!'' तो माझ्या आयुष्यातला फार महत्त्वाचा क्षण होता.

* १९८९ साली मी पदवीधर झाले आणि रेडिओ ड्रामा ऑडिशनची परीक्षा पास झाले. माझी नाटकाची हौस मी रेडिओवर थोडीफार भागवून घेतली. पुढे रीतसर मुंबई दूरदर्शनवर निवड झाली.

* टेलिव्हिजन हे फार वेगळं माध्यम आहे. हे CLOSE-UP चं माध्यम आहे. इथे प्रथम PRESENTABLE दिसणं फार महत्त्वाचं! टेलिव्हिजनवर स्त्रीला नखरा करता आलाच पाहिजे हे मी सुहासिनीबाई मुळगावकरांकडून शिकले. कार्यक्रम सादर करण्यात त्यांची जी एकाग्रता होती तितकीच एकाग्रता MAKE-UP करण्यातसुद्धा होती. MAKE-UP केल्यावर आपण छोट्या पडद्यावर कशा ''दिसणार'' आहोत याचं त्यांना पूर्ण भान होतं. त्यामुळे स्वत:चं समाधान होईपर्यंत MAKE-UP करीत असत. आणि एकदा केसात तिरकस फूल खोवलं की स्वत:वरच खूष होत असत. त्या क्षणाला त्यांच्या चेहऱ्यावर कार्यक्रम उत्तम रीतीने सादर करण्याचा आत्मविश्वास दिसायला लागायचा. मी या सगळ्याचं फार बारकाईने निरिक्षण केलं आहे. त्याचा मला माझा कार्यक्रम उत्तम रीतीने सादर करताना फार उपयोग होतो.

* आणखी एका व्यक्तीकडे मी फार बारकाईने पाहत असे, ती म्हणजे भक्ति बर्वे. त्यांच्याबद्दल सगळ्यांना एक आदरयुक्त भीती वाटायची. त्या बातम्या वाचायच्या आणि साप्ताहिकीही सादर करायच्या. त्यांच्यामध्ये एक नैसर्गिक EASE होता - सहजता होती. कदाचित रंगभूमीवर वावरल्यामुळे ती सहजता त्यांनी आत्मसात केली असेल. त्या पडद्यावर असताना मी त्यांच्या चेहऱ्यावर कधीही टेंशन पाहिलं नाही.

* ह्या सगळ्या मोठ्या मंडळींचं निरिक्षण करून शिकले आणि आजही शिकत असते. कारण 'बोलणे' हा माझ्या व्यवसायाचा एक फार महत्त्वाचा घटक आहे. पद्याला जशी लय असते तशी गद्य बोलण्याचीसुद्धा लय पकडावी लागते. कुठल्या शब्दावर जोर द्यायचा: एखादा PAUSE कसा घ्यायचा, एखादा शब्द वरच्यावर कसा फेकायचा - हे सगळं लक्षात ठेवून बोलावं लागतं. ''आपण बोलताना दिलेला पूर्णविराम श्रोत्यांना ऐकायला गेला पाहिजे'' - हे आचार्य अत्र्यांचं वाक्य ह्या संदर्भात मला फार महत्त्वाचं वाटतं.

* दुसरी गोष्ट म्हणजे आपला आवाज! भाऊ, तुमच्यासारखा खर्जातला आवाज प्रत्येकाला मिळणं शक्य नाही. परंतु निसर्गाने दिलेल्या आवाजावर मेहनत करून त्या आवाजाला ''गोलाई'' आणणं आपल्या हातात आहे. माझा आवाज ''पातळ'' आहे असल्या पातळ आवाजावरसुद्धा हुकुमत मिळवावी लागते. आणि आवाजावर हुकुमत असली की बोलण्याची पट्टी (PITCH) व्यवस्थित लावता येते.

* आणि सर्वात शेवटी म्हणजे ''सुस्पष्ट'' उच्चार! आपल्या आवाजावर हुकुमत असली की उच्चार सुस्पष्ट येतात. आपल्या आवाजामुळे शब्दांना घनता येते. कापसातून धागा निघावा इतक्या सहजतेने सुस्पष्ट बोललं की श्रोत्यांनाही व्यवस्थित कळतं.

* दूरदर्शनवर मी पूर्वी बातम्या देत असे. गेली काही वर्षं मी ''हॅलो सखी'' ह्या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करत आहे. ''हॅलो सखी'' ह्या कार्यक्रमाचं 'स्वरूप' मनोरंजनात्मक नसून माहितीपर लोकजागृतीपर आहे हे पहिलं ध्यानात ठेवलं पाहिजे. ''हॅलो सखी'' ह्या कार्यक्रमाचे विषय पुष्कळदा सूत्रसंचालकाच्या दृष्टीने अतिशय निरुत्साही करणारे असतात. पण अशावेळीसुद्धा श्रोत्यांना त्या विषयाची जास्तीत जास्त माहिती मिळावी हा माझा नेहमीच प्रामाणिक प्रयत्न असतो. ''हॅलो सखी'' कार्यक्रमात लोकांना स्वारस्य वाटावं म्हणून त्या त्या विषयावरची पुस्तकं वाचते - माझ्या स्वत:च्या नोटस् काढते (त्याला पर्याय नाही.)

* प्रसंगी ''हॅलो सखी'' कार्यक्रमात संगीत दिग्दर्शक श्रीधर फडके, ज्येष्ठ समीक्षक विजया राजाध्यक्ष यांच्यासारखे दिग्गज येतात तेव्हा खूप आनंद होतो. गेल्या पिढीतील ज्येष्ठ अभिनेत्री वनमाला यांची ''हॅलो सखी'' या कार्यक्रमासाठी मी घेतलेली मुलाखत कधीच विसरणार नाही.

* ''हॅलो सखी'' या कार्यक्रमासाठी आलेले पाहुणे बाहेर खूप बोलके असतात. पण कार्यक्रम सुरू झाला की एकदम ''कॉन्शस'' होतात. अशा पाहुण्यांना बोलकं करावं लागते. इथे तुमचा त्या विषयावरचा अभ्यास उपयोगी पडतो. डॉक्टर्स, एंजिनियर्स सारखे

(पृष्ठ २१ वर)

## माझी सेकंड इनिंग
**- श्रीमती शुभदा मराठे, पुणे**

फोनची रिंग वाजली म्हणून उचलून फोन कानाला लावला. पलिकडून माझी मैत्रिण शशी बोलत होती. ''अग नीला मस्त पावसाळ्यातील ट्रीप अरेंज केली आहे. तू पण चल. आता काय एकटीच तर आहेस. कारणे सांगू नकोस.'' माझा थोडासा नकाराचा स्वर. ''अग पण माझी नातवंड सकाळी येतात. त्यांचा अभ्यास. जेवण कोण करणार ? त्यांचे आईबाबा नोकरी करणारे. मी एकटी असले तरी थोडी जबाबदारी आहेच ना ?'' तीचा स्वर 'अगं पण त्या करतील सोय तू कशाला काळजी करतेस.'' आता नको पुन्हा कधीतरी नक्की येईन असे म्हणून मी फोन ठेवला.

शिक्षकी पेशाची नोकरी. आमच्या वेळेला खरं तर गरज म्हणून स्विकारलेली आणि स्विकारलेले काम. प्रामाणिकपणे चोखपणे, आनंदाने करणे ही नकळत स्विकारलेली जबाबदारी. त्यासर्व काळात स्वत:च्या लहान मुलांचे करायचे आणि वर्गात समोरील ६५-७० विद्यार्थ्यांचे स्वभावानुसार थोडे त्यांचे मूड सांभाळत आपल्याला हवे ते त्यांच्याकडून करून घ्यायचे. वर्गाचा रिझल्ट हा चांगलाच हवा. ही शाळेकडून मागणी आहे म्हणून करण्यापेक्षा तो माझा आनंद मला मिळवायचा आहे. या जाणीवेतून असायचा. लहान बाळानं जेवल्यावर त्याची तृप्तता ही आईची तृप्तता असते. तसेच. मुलांच्या चेहऱ्यावरील यशाचा आनंद हा शिक्षकाला आपला आनंद वाटत असतो. स्नेहसंमेलन असो. शाळेच्या स्पर्धा आसो. वक्तृत्व, नृत्य, गायन या सर्वांच्याच आवडीमुळे माझे विद्यार्थी मला माझी मुलेच वाटत.

या विद्यार्थ्यांच्या वर्गात एखादा बाहेरच्या स्पर्धांतून यश मिळवलेल्या विद्यार्थ्यास छोटेसे बक्षीस देऊन कौतुक करणे, वर्गातच स्मरणशक्तीचा स्पर्धा लावणे. एकदा तर एखादा शब्द देऊन त्याच्यातून अनेक शब्द तयार करणे हा मुलांचा ठराविक अभ्यास न होता हसत खेळत जाता जाता विषयाचा विकास होत असे.

शाळेच्या नोकरीची वर्षे थोडी थोडकी नव्हे तर ३२ वर्षे अशी मजेत गेली. नोकरीत शेवटी शेवटी अनेक मानसन्मान ही मिळाले. आदर्श शिक्षिकेचे. पण माझे शिक्षकाचे तसे काम संपलेले नव्हते.

माझ्या समोर जेंव्हा माझी नात, नातू समोर आले. तेंव्हा त्यांच्या गरजानुसार त्यांना मदत करणे त्यांचाही अभ्यास घेणे. माझी मला जबाबदारी वाटू लागली. मुले-सुना नोकरी निमित्त दिवसभर बाहेर असताना ते हक्काने आईकडे पाठवतात. (सर्व स्वतंत्र राहतात) तेंव्हा आजी भात कालवून ठेव हं. मी येतेच आहे असं जेव्हा नात सांगते तेव्हा आजीचटा प्रेमळ हात मीही अनुभवलेले आहे तो आठवतो. ''अगं आजी मला धडा वाचून दाखव. सांगणाऱ्या नातवाशी माझी बांधिलकी त्यांचे माझ्यावरचे हक्क मला आजी या शब्दाची खरी ओळख सांगतात. आणि या शब्दाची माझ्या दृष्टीने असलेली व्याख्या म्हणजे आजही जी आई ती आजी.

नोकरीच्या काळात स्वत:च्या हौशीमौजीकडे लक्ष द्यायला फारसा वेळ नसायचा. आताच्या नोकरी करणाऱ्या मुलींनाही खूप धावपळ दगदग असतेच. पण आर्थिक दृष्ट्या त्या पूर्ण स्वावलंबी असल्यामुळे त्यांचे आनंद त्या जोपासू शकतात. आमच्या वेळी पगार ही फारसे नसायचे. त्यामुळे सगळ्या हौशी, सहली निवृत्ती नंतर मी करणारच अशा आनंदात असणारी मी माझ्या या सेकंड इनिंगलाही आनंदानेच सामोरी जात आहे.

❑❑❑

(पृष्ठ २० वरून)

## (मुलाखत) सौ. मालविका मराठे

PROFESSIONAL पाहुणे येतात तेव्हा प्रश्न नसतो. कारण त्यांचा त्यांच्या विषयाचा अभ्यास झालेला असतो.

* ''हॅलो सखी'' सखी ह्या कार्यक्रमात येणारे श्रोत्यांचे फोन हा एक चिंतनीय विषय आहे. काही मोजकेच श्रोते नेमका प्रश्न विचारतात. काही श्रोत्यांना आपलं नाव आणि आपला आवाज दूरदर्शनवर ऐकायला येतो आहे याचंच त्यांना अप्रूप असतं. त्या नादात प्रश्न विचारताना भरकटत जातात. काही श्रोत्यांचा नेमका प्रश्न काय आहे याचा मलाच प्रश्न पडतो. या सगळ्या गोंधळाचा गोषवारा करून मी पाहुण्यांना प्रश्न विचारते. ही सगळी व्यवधानं सांभाळून ''हॅलो सखी'' कार्यक्रम सादर करणं ही एक तारेवरची कसरत आहे. पण मी दिलेल्या विषयाचा नेहमीच व्यवस्थित अभ्यास करून ''हॅलो सखी'' हा कार्यक्रम सादर करत असल्यामुळेच महत्त्वाच्या कार्यक्रमाला मला बोलवतात हा मी माझा बहुमान समजते.

* दूरदर्शन व्यतिरिक्त मी रेडिओच्या जाहिरातींना माझा आवाज देते. DUBBING (हे एक नवीन शास्त्र उदयाला आलं आहे) माझा आवाज उसना देते. पण आता मला जरा उसंत मिळत आहे. म्हणून माझ्या मनात रुतून बसलेलं नाटक आता मला करायचं आहे. बघू या कसं काय जमतंय ते !

मालविकाताई गप्पा छान रंगल्या. आजपर्यंत केलेल्या वाटचालीबद्दल अभिनंदन आणि पुढच्या योजनांसाठी समस्त ''मराठे'' परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा !

❑❑❑

**श्री.पुरुषोत्तम रामचंद्र खांबेटे व कुटुंबीय यांजकडून ७५व्या अंकासाठी**

**हार्दिक शुभेच्छा !**

**दूरध्वनी : ९५२५०-२४३०२६०**
**मोबाईल : ९८६९७८८०६६**

# रत्नपारखी सौ.सुप्रिया मंदार मराठे (पृ.२७७)
# 'ॲक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व'

**मुलाखतकार : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे**



सौ.सुप्रिया मंदार मराठे

मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री.आनंदराव यांच्या सौ.सुप्रिया मंदार मराठे या स्नूषा होत. सौ.सुप्रियाचे माहेरचे नाव सुप्रिया सुभाष कारखानीस, तिचा जन्म २० नोव्हेंबर १९७१चा, ठाणे येथे झाला. शालेय शिक्षण होलीक्रॉस हायस्कूल मध्ये झाले. त्यानंतर ठाणे कॉलेजातून बी.कॉम् पदवी घेतली. मग 'आयसीडब्ल्यूअे'चा अभ्यास सुरु केला. त्यातही अुत्तम गुणवत्तेत पास होत गेली पण नेमका 'आयसीडब्ल्यूअे'चा शेवटचा पार्ट काही तरी अडचणीमुळे करायचा राहून गेला. सौ.सुप्रियाने अेअर इंडियात १० वर्षे नोकरी केली. तीन वर्षांपूर्वीच नोकरी सोडली.

## बास्केटबॉल चॅम्पीअन्

सुप्रियाला खेळांची आवडही पहिल्यापासून ! त्यात बास्केटबॉल, अर्थलेटिक्स या क्रीडाप्रकारात तिने महाविद्यालयाचं प्रतिनिधित्व केलं. ठाणे, वर्धा, सातारा, पुणे, नाशिक या जिल्ह्यांतून येणाऱ्या अनेक खेळाडूंमधून तिची निवड बास्केटबॉल चॅम्पिअन म्हणून झाली. राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राच्या टीमकडून बास्केटबॉलसाठी तिला दोनदा १९८५, १९८६ मध्ये सुवर्णपदके मिळाली. तसेच राष्ट्रीय स्पर्धा अ‍ॅथेलेटिक्स मध्ये अेक रौप्यपदक मिळाले. कोचमन रविनायर यांना ती यशाचे श्रेय देते. जपानी इकेबाल तसेच ओव्हारा स्कूल ऑफ इकेबारा बिगिनींग कोर्स २००३ साली आणि ओव्हारा स्कूल ऑफ इकेबारा ॲडव्हान्स कोर्स २००४ साली दादर येथे शीलाताई वाघोलीकर यांचाय मार्गदर्शनाखाली सुप्रियाने विशेष प्राविण्यासह पूर्ण केला. नित्य नवे काहीतरी शिकण्याच्या सतत ओढीमुळे सुप्रियाने अच्युत पालव यांच्या शिष्या ज्या अुत्तम कॅरिओग्रॉफर आहेत त्यांच्याकडून कॅरिओग्रॉफिचेही शिक्षण घेतले. तसेच सुप्रियाला ग्लासपेंटिंग येते. तिच्या दिवाणखान्यात अुत्तम चित्र भिंतीवर लावले आहे जे घरात आल्याआल्याच मन वेधून घेतं. ते तिने स्वत: कॅरिओग्रॉफी करून रेखाटले आहे. (जे अेखाद्या प्रोफेशनल चित्रकाराच्याही तोंडात मारेल) असे लाजवाब आहे.

जपानी भाषा शिकल्यामुळे सुप्रियाला जपानी भाषा चांगली अवगत आहे इतकी की तिने काही कंपन्यांसाठी ज्यात जपानी इंजिनिअरचे तंत्रज्ञान आहे ते जपानीतून इंग्रजी भाषेत सांगायला अुपयोग केला (क्रॉम्प्टन ग्रीव्हज् किंवा टेक्रान कंपनीतला कॉम्प्रेसर जपानी इंजिनिअरचा कार्यक्रम, प्लॅनची माहिती, जपानी तंत्रज्ञान यासाठी तिच्या जपानी भाषा शिकण्याचा अुपयोग झाला.

सौ.सुप्रियाचा डिसेंबर १९९८ मध्ये मंदार बरोबर प्रेमविवाह झाला. खरं तर मंदारचा भाऊ शंतनु याची ती बालमैत्रीण असल्यामुळे वरचेवर घरी येत असे. त्यामुळे ओळख होतीच. सुंदर, आकर्षक, हुषार सुप्रिया मंदारच्या मनात न भरली तर नवलच. तिला घरून, मराठे कुटुंबियांकडून मागणी घातली आणि लग्न होऊन कुमारी सुप्रिया कारखानीस सौ.सुप्रिया मंदार मराठे झाली. माहेरच्या वातावरणासारखेच सासरीही मोकळेपणाचे वातावरण होते. अशी अनुकूल आणि संपन्न परिस्थिती मराठे मंडळींकडे होती ज्यामुळे तिचे व्यक्तिमत्त्व अधिकच बहरले गेले, चौफेर फुलून गेले.

## पती मंदारचा पाठिंबा

प्रत्येक यशस्वी पुरुषामागे अेक स्त्री असते असं म्हणतात. पण सुप्रियाच्या यशामागे अेक पुरुष आहे आणि तो म्हणजे साक्षात तिचा नवरा मंदार हा आहे. मौल्यवान खडे पारखण्याचं प्रशिक्षण घेण्यास मंदारने तिला प्रोत्साहन दिले. त्यामुळे I9I इंटरनॅशनल जेमोलॉजिकल इन्स्टिट्यूट मुंबई या संस्थेतून आऊटस्टँडींग स्टुडंट २००७-०८, ५०० पैकी ५०० मार्क्स मिळवून ती पहिली आली. आज सुप्रिया मंदारला त्याच्या व्यवसायात मदत करत असते.

मुलाखतीच्या वेळी सौ.सुप्रियाची आई आवर्जून घरी आली होती. सुप्रिया माझ्याबरोबर बोलताना काही विसरत असली, कदाचित तिच्या दृष्टिने ते कदाचित कमी महत्त्वाचे असेल




म्हणून असेल, आई आठवण करून द्यायची. सुप्रियाने परिश्रम घेऊन सोन्याची सुंदर चेन बनविल्याचे त्यांनी सांगितले तेव्हा सुप्रिया बोलता बोलता म्हणाली आईही, नंदिनीवहिनीही छान नथ तयार करतात. सुप्रियाच्या आईने, 'माझी अेकुलती अेक मुलगी पण मुलाच्या वरचढ आहे असं सांगून तिचा सततोद्याग, काहीतरी सारखं करीत राहाणं, नवंनवं शिकत राहाणं त्यासाठी कष्ट घेण्याची तयारी, चिकाटी आणि जिद्द याविषयी भरभरून सांगितलं, जे मी लेखाची मर्यादा असल्यामुळे थोडक्यात सांगते आहे.

जागुष्टे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक मराठी परिषद मुंबई मोडी लिपी शिक्षण प्रसारक मंडळ प्रमाणपत्र सौ.सुप्रियाने ८-५-२००५ ते ३१-७-२००५ तीन महिन्यांचा मोडी लिपीचा प्राथमिक अभ्यासक्रम पूर्ण करून परीक्षेत विशेष श्रेणी प्राप्त केली.

सौ.सुप्रियाला ट्रेकींगची आवड असल्यामुळे ती आणि मंदार नेहमी गिरिभ्रमण, जंगलदर्शन करतात. पर्यावरणप्रेमी असल्यामुळे निसर्गाच्या सहवासात भटकंती करण्याची आवड दोघांना आहे. नुकतेच रणथंबोरला जाऊन आले होते त्याचे फोटो दाखविले.

### श्रद्धावान सुप्रिया

सुप्रियाशी गप्पा मारताना असं लक्षात आलं की परमेश्वरावर तिची श्रद्धा आहे. श्रीज्ञानेश्वर माऊलीची ती भक्त आहे. वारकरी हा तिच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. दर महिन्याला ती नेमाने आळंदीला जाते आणि समाधीचे दर्शन घेते. तिने ठाणे ते प्रभादेवी (मुंबई) सिद्धिविनायक मंदिर पदयात्रा केली आहे. तसेच ठाणे ते वाशिंद (टिटवाळा कसारा नाशिक जवळ) येथे पदयात्रा करून अक्कलकोट स्वामी महाराजांचे दर्शन घेतले आहे. पंढरपूरलाही आषाढी वारीची पायी दिंडी करण्याची तिची इच्छा आहे.

सुप्रिया स्वयंपाकही छान करते. ऑर्डरी घेऊन चांगले मोदक बनविणाऱ्या बाईंकडून तिने मोदकही शिकून घेतले आहेत. लसणाच्या पाकळीसारखं हुबेहुब मोदक तिने तयार केला होता. जो मला खायला दिला. खायच्या आधी मी त्या मोदकाकडे पाहातच राहिले. इतका छान मोदक हाताने मला मोडवतच नव्हता.

सुप्रियाशी गप्पा मारताना अेक प्रकर्षाने जाणवलं की, हाती घेईल त्या कामात झोकून देण्याची तिची वृत्ती तिला यशापर्यंत घेऊन जाते. सासर-माहेर दोन्हींकडच्या माणसांमधला सुसंवाद तिने कायम चांगला ठेवला आहे. मुळची जिम्नॅस्ट असल्यानेच तिला हे बॅलेन्सिंग छान जमलेले असावे. सौ.नंदिनीवहिनी यांनी 'सासूगिरी' न करता तिला घरातले सगळे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले. त्यामुळेच ती स्वत:चं विश्व निर्माण करू शकली. सुप्रियाचा गोड, चुणचुणीत मुलगा मैत्रेय अजून लहान आहे. त्याला घडवायचे त्याच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडायचे, त्याचे सर्वांगीण, चौफेर व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी प्रयत्न करायचे हे तिचे स्वप्न आहे. ते स्वप्न साकार होवो या शुभेच्छा. सौ.सुप्रियाचा उत्साह आणि तरुणाईची सळसळ ही निर्झरासारखी वाहत होती.

**जेम अ‍ॅण्ड ज्वेलरीकौन्सिलतर्फे दिले जाणारे कलरस्टोन, डायमंड इ. चेही शिक्षण सौ.सुप्रियान घेतले आहे. पाच हजार रुपयांपासून ते पाच लाखापर्यंत हिऱ्यांच्या किंमती असतात. कोणता हिरा हिणकस आणि कोणता मौल्यवान हिरा, त्याची परीक्षा सौ.सुप्रिया अचूक करते त्यामुळे बनावटपणाला ती फसत नाही. बहुमोल हिरे, खडे, मोती, रत्ने यांची ती 'रत्नपारखी'च आहे. केवळ सोन्या-चांदीच्या व्यवसायातच अडकून न पडता तिने हिऱ्यांचे प्रशिक्षण शिकून घेतले त्यातही अव्वल क्रमांकावर स्थान पटकावले. आज हिऱ्यांच्या दागिन्यांचा व्यवसाय सौ.सुप्रियाच्या प्रयत्नांमुळे, हिरेपरीक्षांमुळे दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे. केवळ हिऱ्यांच्या दागिन्यांचे ठाण्यातले अेकमेव, सुसज्ज दुकान ती समर्थपणे सांभाळत आहे.**


*With Best Compliments From :*

# SIFCON

**Propritor - Nilkanth Vidvans**

1/B Anagha CHS, 16 RDP I, Sector II,
Charkop, Kandivali (W), Mumbai-67.
Email - sifcon@rediffmail.com
Tel.Fax.: 28683811

**FOR**
**Investments**
* BSE/NSE. Cash/Derrivatires/Commodities Trading
* Mutual Fund Schemes
* RBI Bonds / Post Office Schemes
* LIC and General Insurance

# कॉटन किंग - श्री.प्रदीप मराठे
# 'एक यशस्वी उद्योजक'

**घराणे ५४वे - वेंगुर्ले (पृष्ठ ४२३)**

**मुलाखतककार - श्रीनिवास गोपाळ**

एखाद्याने आपल्या स्वत:च्या मनाशी एखादे ध्येय निश्चित केले असेल आणि त्यासाठी अपार कष्ट करण्याची, येईल त्या अडचणींना तोंड देण्याची मनापासून तयारी व योग्य दिशेने प्रयत्न केल्यास ध्येय निश्चितपणे गाठता येते ह्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे - कॉटन किंग - प्रदीप मराठे.

प्रदीपरावांचा जन्म विशीष्ठ साचेबंद मध्यमवर्गीय मानसिकता असलेल्या कुटुंबात १९५६ साली मिरज, जिल्हा सांगली येथे झाला. वडील खाजगी कंपनीत विक्री विभागात नोकरी करीत होते. तर आई शिक्षिका. मुलाने उत्तम शिक्षण घेऊन चांगल्या प्रकारची नोकरी करावी आणि म्हातारपणात आधार द्यावा अशी इतर मात्यापित्याप्रमाणेच प्रदीपरावांच्या आईवडीलांची इच्छा होती. त्याप्रमाणे प्रदीपरावांनी मिरज-सांगली येथून त्यांचे B.E. (MECH.) पर्यंत शिक्षण पूर्ण केले. आणि नंतर नाशिकच्या J.D. Bytco Collage of Management येथून M.B.A पूर्ण केले. त्यानंतर कराडच्या किर्लोस्कर ब्रदर्स लि. व किर्लोस्कर कोप्लान्ड लि. ह्या कंपनीत मार्केटिंग विभागात १५ वर्षो नोकरी केली. यशासमय नोकरीत प्रगती गरीत ते 'जनरल मॅनेजर' ह्या पदावर पोहोचले होते. अशाप्रकारे अपेक्षेप्रमाणे सुखासीन आयुष्य चालू होते.

सर्वकाही सुखदायी आणि अनुकुल होते तरी प्रदीपराव मनांत कोठेतरी असमाधानी होते. त्याचे कारण M.B.A. करीत असतानाच मनांत कोठेतरी एक स्फुल्लींग फुलला होता, तो म्हणजे कितीही पगार मिळाला आणि कोणतेही उच्चपद मिळाले तरी ती नोकरीच. आपली सर्व बुद्धी, कौशल्य आणि ज्ञान पणाला लावून दुसऱ्याने बनविलेलेच उत्पादन विकायचे आणि फायदा मालकाचाच करून द्यावयाचा. त्यापेक्षा आपणच एखादे उत्पादन करून ते विकावे. पण ते कसे जमावे, कोणते उत्पादन करावे ह्याबद्दल निश्चित असे काहीच होत नव्हते. पण काहीतरी करावयाचे एवढे मनाशी निश्चित झाले होते.



**कॉटन किंग - श्री.प्रदीप मराठे**

आणि त्यासाठी वयोमर्यादा ठरवली होती वय वर्षे ४० काही झाले तरी वयाचा ४०वा वाढदिवस साजरा करताना स्वत:चा उद्योगधंदा असलाच पाहीजे असा दृढनिश्चय केला होता.

समोर निश्चित असे काहीच नव्हते. फक्त मनाचा निश्चय व उभारी होती. पडतील ते कष्ट करण्याची तयारी होती. जे कांही मिळेल त्यात स्वाभिमानाने जगावयाचे. हा विचार पक्का झाल्यावर १५ वर्षांची सुखासीन नोकरी १९९६ मध्ये सोडून दिली. आणि १५ वर्षाच्या नोकरीच्या अनुभवाच्या शिदोरीवर रेफ्रिजिरेशन व एअर कंडिशनिंग हा व्यवसाय सुरू करण्याचे ठरविले. अर्थात ह्या विचाराला आईवडिलांकडून सुरवातीला काहीसा विरोधच झाला होता. जणू काही सुखातला जीव दु:खात टाकणेच होते. पण पत्नी सौ. शुभदा ह्यांचा संपूर्ण व सक्रिय पाठींबा होता. प्रदीपरावांच्या श्वशुरांचा पण पाठींबा होता. त्यांनी तर कानमंत्रच दिला की, इतकी वर्षे तुम्ही दुसऱ्याचा माल विकला तर स्वत:चा का विकू शकणार नाही ?

पत्नीच्या पाठींब्यामुळे प्रदीपरावांनी पुण्यात कर्वेरोड वर नळस्टॉप जवळ एक वास्तु विकत घेऊन १९९६ मध्ये व्यवसाय सुरू केला. परंतु त्यात मन फारसे रमत नव्हते. शिवाय मनाप्रमाणे फायदा पण दिसत नव्हता.

आता प्रश्न होता की, नवीन कोणता व्यवसाय करावा ? ह्यावेळी त्यांच्या मनाची आवड त्यांच्या कामी आली. प्रदीपरावांना पहिल्यापासून शंभर टक्के सुती कपडे वापरायची आवड आहे. परंतु ते सहजासहजी मनपसंत अशा विविध प्रकारात उपलब्ध होत नसत. त्यासाठी त्यांना फार ठिकाणी वेगवेगळी दुकाने धुंडाळावी लागत. प्रसंगी मुंबईला कुलाबा येथेही जावे लागे. त्यावेळी त्यांच्या मनात आले आपल्यासारखे सुती कपड्यांची आवड असलेले अनेकजण असू शकतील. मग आपण हाच व्यवसाय कां सुरु करु नये ? पुण्यात असे हजारो लोक असू शकतील. मग त्यांना जर त्यांच्या मनाप्रमाणे शर्टस् व पँटस् पुरवू शकलो तर तो व्यवसाय निश्चितच उत्तम प्रकारे चालू शकेल अशी त्यांना खात्री वाटली आणि त्यांनी कपड्याच्या व्यवसायात पडण्याचे ठरविले. त्याप्रमाणे मग त्यांनी रेफ्रिजरेशन व एअर कंडिशनिंगचा व्यवसाय बंद करून त्याच जागेत ५ लाख खेळते भांडवल गुंतवून वेगवेगळ्या नामांकीत ब्रँडनेमच्या कंपन्यांचे शर्ट व पँट विकण्यास सुरवात केली. गिऱ्हाईकांच्या दृष्टीने ते सोयीचे झाले. एकाच जागेत (Under one Umbrella) त्यांना पाहीजे त्या ब्रँडनेमचे कपडे मिळू लागले. व्यवसायाच्या पहिल्याच दिवशी गिऱ्हाईकांचा इतका प्रतिसाद मिळाला की, अक्षरश: त्यांना मान वर करण्यास वेळ मिळाला नाही. ह्यामुळे मात्र प्रदीपरावांना एक फार मोठे समाधान मिळाले की, आपण घेतलेला निर्णय योग्य व बरोबर होता. आणि व्यवसायाच्या प्रगतीचे जणू दारच उघडले गेले. वर्ष दीड वर्ष हा व्यवसाय केल्यानंतर प्रदीपरावाच्या लक्षात आले की, निरनिराळ्या कंपन्यांचे कपडे विकण्यापेक्षा आपणच स्वत: कपडे शिवून का विकू नयेत ? आणखी एक गोष्ट त्यांच्या लक्षात आली की, वेगवेगळ्या कंपन्यांचे कपडे विकतांना गिऱ्हाईकांना कोणाचे फिटींग आवडते, तर कोणाची रंगसंगती, तर कोणाचे स्टिचींग प्रत्येक गिऱ्हाईकाला आपापल्या पसंतीप्रमाणे जर शर्टस् पँटस् मिळाल्या तर खूप गिऱ्हाईकांचा चांगला प्रतिसाद मिळू शकेल. म्हणून त्यांनी स्वत:चे

मॅन्युफॅक्चरींग युनिट सुरू केले. सुरवातीला बाहेर जॉब वर्क देऊन अनुभव घेतला व नंतर ५ कामगारांच्या मदतीने स्वत:च्याच जागेत शिलाई काम सुरू केले. त्याला गिऱ्हाईकांचा भरपूर प्रतिसाद मिळाला. व आज त्यांच्याकडे १५० कामगार काम करीत आहेत. हे युनिट १ जून २००८ पासून बारामती जि. पुणे येथे मोठ्या जागेत चालू आहे. आज वेगवेगळ्या भागात त्यांची १६ विक्री केंद्रे आहेत. इ.सन २००९ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्रभर विक्री केंद्रे सुरू करण्याचा त्यांचा मानस असून इ.सन २०१० ते २०१२ पर्यंत महाराष्ट्राबाहेर विस्तार करण्याची योजना आहे. सध्यातपी निर्यात क्षेत्रात न जाता घरेलू (डोमॅस्टिक) मार्केटवर त्यांनी लक्ष केंद्रीत केले आहे.

व्यवसायाचा विचार करतांना प्रदीप मराठे ह्यांनी कोणत्याही परिस्थितीमध्ये मूळ तत्त्वाशी तडजोड करावयाची नाही हे मनाशी पक्के ठरविले होते. व ते अंमलात आणताना खालील चतु:सूत्रीचे काटेकोर पणे पालन केले.

१) तयार कपडे १००% सुतीच असतील.

२) गिऱ्याईकाला निवड स्वातंत्र्य असण्याच्या दृष्टीने एकाच प्रकारचे अनेक रंगाचे तयार कपडे गिऱ्हाईकाला दाखविणे.

३) कपड्यांच्या गुणवत्तेत नियमितता.

४) गिऱ्हाईक जे मोल देते त्या पैशांचा पूर्णपणे समाधानकारक मोबदला देणे.

ह्याखेरीज आणखी एक गोष्ट कटाक्षाने त्यांनी पाळली ती म्हणजे कामगार व कार्यालयीन कर्मचारी ह्यांना सदैव समाधानी ठेवणे. बारा वर्षाच्या व्यवसायाच्या काळात त्यांनी एकाही कर्मचाऱ्याला कमी केले नाही. पत्नीच्या भागीदारीत लहान प्रमाणात असणारा त्यांचा व्यवसाय १२ वर्षात विस्तार पावून आता १५ कोटी रुपये टर्न ओव्हरपर्यंत येऊन ठेपला आहे. आणि भागीदारीचे स्वरुप जाऊन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी होण्यापर्यंत प्रगतिची झेप त्यांनी घेतली आहे. आज तयार कपड्यांच्या कंपन्यांमध्ये 'कॉटन किंग'चे नाव अभिमानाने घेतले जाते हीच त्यांच्या यशस्वितेतेची पावती आहे.

त्यांच्या ह्या व्यवसायात आता त्यांची पुढची पिढी पण येऊ इच्छीत आहे. त्यांचे पुत्र चि. कौशिक ह्यांनी टेक्सटाईल इंजिनिअरींग मध्ये B.Text पूर्ण केले. असून फॅशन टेक्नि्कमध्ये M.B.A. केले आहे. सध्या ते बेंगलोर येथे एका कंपनीत कामाचा प्रत्यक्ष अनुभव घेत आहेत.

मराठे परिवारातील तरुणांना प्रदीपरावांचे सांगणे आहे की, खूप शिका- अनुभव घ्या पण नोकरीत न रमता स्वत:चा व्यवसाय करा. आपल्यामध्ये व्यवसायास आवश्यक ते सर्वगुण आहेत तेव्हां स्वत: उद्योजक बना.

कुटुंबामध्ये उद्योजक मानसिकता नसतांना आणि म्हणावे तसे आर्थिक पाठबळ नसतांना केवळ जिद्द, मनाचा पक्का निश्चय, अपार कष्टांची तयारी आणि सचोटी ह्या बळावर मेकॅनिकल इंजीनीअरिंगचे शिक्षण व अनुभव असून तयार कपड्यांच्या उद्योगात यशस्वीपणे प्रगति व विस्तार केला त्या प्रदीप मराठेंना मराठे प्रतिष्ठानच्या वतीने व वैयक्तिक माझ्या अनेक हार्दिक शुभेच्छा. येणाऱ्या अनेक वर्षांत त्यांच्या व्यवसायाची भरभरून प्रगती होवो हीच सदिच्छा.


शब्दांकन - श्रीनिवास गोपाळ मराठे
पृ.(३८९)
१/६ त्रिवेणी पाटबंधारे सोसायटी,
३६/९ एरंडवन, पांडुरंग कॉलनी,
पुणे-४११०३८.
दूरध्वनी -०२०-२५४६४७०६


❑❑❑


*With Best Compliments from :*

**Uday D. Marathe**

## Chief Life Insurance Advisor

Life Insurance Corporation of India

A/7, Garuda Society, Gavanpada,
Vidyalay Marg, Mulund (East)
Mumbai 400081.

Res: 2565487 Mob.: 9892265644
Email: udaymarathe@rediffmail.com

‘हितगुज’ला हार्दिक शुभेच्छा

# भाऊ मराठे

मोबाईल क्रमांक : ९८२१३६६२५२

● कथा

# ‘ओढ’

श्री. विनायक केशव मराठे (पृ२०), वरळी. दूरध्वना : २४३०३३२९

दाजीशास्त्री लेले त्यांच्या गावातच नव्हे तर आजूबाजूच्या निदान पांच सहा गावात नावाजलेले होते. वृत्ती शिस्तप्रिय आणि स्वभाव अतिशय तापट. म्हणजे राहूकेतूची जोडीच. धर्मकृत्य करताना ते यजमानांच्या सोईप्रमाणे वेळ निश्चित करीत. पण यजमानांनी कबूल केलेल्या पूर्वतयारीच्या गोष्टी जर वेळेवर झाल्या नाहीत तर दाजींचा संताप अनावर होत असे. यजमानांनाच नाही तर त्यांच्या घरातल्या जाणत्या माणसांनाही ते धारेवर धरीत. पण हा सासूरवास सहन करूनसुद्धा लोक त्यांनाच गुरुजी म्हणून आग्रहाने बोलावीत. कारण धर्मकृत्य अगदी शास्त्रोक्तपणे होत असे. संस्कृत मंत्रांचा अर्थ ते मराठी भाषेत समजून सांगत. कुठेही टाळाटाळ नाही. हातावर ठेवलेली दक्षिणा ते न बघता सदऱ्याच्या खिशात घालीत. आणि तेथेच विषय संपत असे. सहसा ते भोजनाला बसत नसत. अगदी आग्रह झाला तर ते पंक्तीत बसत. कोणताही पदार्थ ते मागून घेत नसत. एकदा पानांत वाढलेले पदार्थच ते संपवीत असत. भोजन आटोपल्यावर यजमानांची व त्यांच्या कुटुंबियांची ते आस्थेने चौकशी करीत. खणखणीत संस्कृत भाषेत ते त्यांना आर्शिवाद देत. यजमानांचा निरोप घेताना एखादे लहाम मूल पुढे आले तर हा दुर्वास मूनी त्याचा प्रेमाने गालगुच्चा घेत पाठ सुद्धा थोपटीत असे.

दाजींच्या पदरी ज्ञानभंडार जरी अमाप असले तरी धनभंडार अगदीच सुमार होते. मुळात दोन-तीन एकर जमीन तीसुद्धा खंडाने दिलेली घरापाठच्या आगरांत तआठ दहा आंब्याची कलमे, पंधरावीस इतर किरकोळ झाडे हीच काय ती त्यांची स्थावर मालमत्ता. पदरी पत्नी, आजारी वृद्ध आई आणि सात मुलांमुलींचा गोतावळा. मोठ्या मुलाला वेदशाळेत दाखल करून बघीतले पण त्यांना त्यात यश आलं नाही. गांवभर भटकण्यात त्याचा दिवस संपत असे. दुसरा मुलगा अनंत अतिशय हुशार आणि महत्वाकांक्षी. त्याची काही स्वप्नं होती. आणि ती प्रत्यक्षात उतरविण्याचा त्याचा निर्धार होता. फायनल परीक्षेत अती उत्तम यश प्राप्त केले होते. तालुक्याच्या ठिकाणी पुढचे शिक्षण घेण्याचे त्याने निश्चित केले होते. ओळखी जमविल्या होत्या.

पण दाजींचा विचार निराळाच होता. पहिल्या मुलाच्या बाबतीत अपयश पदरी पडल्यामुळे आता अनंतावर त्यांच्या आशा एकवटल्या होत्या. अनंताला वेदशाळेत दाखल करून दशग्रंथी ब्राह्मण बनवायचे असा त्यांनी पक्का निर्णय घेतला होता. फायनलचा निकाल हाती आल्यावर त्याची प्रेमाने पाठ थोपटून त्याच्या हातावर साखर ठेवताना त्यांनी तो निर्णय अनंताला ऐकवला होता. अनंत काही न बोलता मान खाली खालून माजघरात निघून गेला.

माजघराकडे पहात दाजी कडाडले, ‘‘वाटलंच मला. माझीच चूक झाली. मुंज आटोपल्यावर देवधरगुरुजींच्या वेदशाळेत तुला दाखल केले असते तर बेस झाले असते. पण विचार केला थोरल्याला वेदविद्या शिकवावी. तुला जमेल तेवढे शिक्षण देऊन शिक्षक बनवावे. पण या दाजीचा एक तरी फांसा मनासारखा पडला असेल तर शप्पथ. ते काही नाही. आपले शास्त्रीपंडिताचे घराणे आहे. समजलास. प्रत्येक पिढीत एक तरी शास्त्री निपजलाच पाहिजे. उद्या चांगला दिवस आहे. दुपारचा चारचा मुहुर्त आहे. उद्याच आपण देवधरगुरुजींकडे जाऊ या.’’

माजघरातून कोणतेही प्रत्युत्तर आले नाही. अनंताचे स्वप्न भंग पावत होते. उध्वस्त होत होते. दाजींची समजूत घालणारे कोणीच नव्हते. अनंत स्वैपाकघरात जाऊन आईला लगटून बसला. डोळे अश्रूंनी भरून वहात होते. आईनी खूप समजूत घातली. शास्त्री होण्यात काहीच कमीपणा नाही. पैसा नशीबात असेल तर मिळतो. आपल्या घरांत आपण सरस्वती पूजली म्हणून लक्ष्मी रागावली नाही पण आपल्या, घराण्यात लक्ष्मीकडे कोणी हात पसरले नाहीत वगैरे डोस अनंताला तिने पाजले. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही.

दुसऱ्या दिवशी देवपूजेला बसल्यावर दाजींनी पुन्हा अनंताला दुपारी तयार राहण्याबद्दल सांगितले. क्षणभर उभं राहून अनंत उगवतीच्या पडवीत पाय आपटीत निघून गेला. दाजींचा रागाचा पारा चढला. पण देवपूजेत व्यत्यय नको म्हणून त्यांनी राग गिळला.

दुपारी माजघरांत जेवणाचे पाट मांडले. ताटं ठेवली. मंडळी पानावर बसली. दाजींचा समोर अनंताचा पाट होता.

पाटावर बसता बसता दाजींनी चांगलेच तोंडसुख घेतले.

‘‘हे बघ अनंता. कालपासून बघतोय तुझ्या तोंडाला कुलुप. काय विहीरीत ढकलायला निघालो आहे कां मी? देवांनी चांगली बुद्धीमत्ता दिली आहे. तुझी वाणी स्पष्ट आहे. तिला चांगला नाद आहे. वेदोच्चाराला अगदी योग्य आहे. शिक्षक बनून नोकरीला लागून आपल्या कुटुंबाला मदत होईल हा विचार स्तुत्य आहे. पण हे काम तुझी धाकटी भावंडेसुद्धा करतील. शास्त्री पंडीत होण्याला तू अगदी सोळा

आणे फिट्ट आहेस. समजलास? तेव्हां मला स्पष्टपणे तुझा होकार दे. आत्ता दे.''

''अहो एवढी काय घाई आहे? जेवणं होऊ द्यांत. मग खुशाल वादविवाद करा पडवीत.'' अनंताच्या आईने समजावणीचा सूर काढला.

दाजींचा पारा पुन्हा चढला. ''ते काही नाही. एवढसं चिमुरडं पोर आणि मिजास ढीगभर. ए बघ अनंता तुझा काय तो विचार आता पहिला घास घेण्याअगोदर सांग. या घरांत राह्यचं असेल तर हो म्हण. नाही तर तू मला मेलास आणि मी तूला मेलो.''

''अहो पण एवढ्या टोकावर जाऊ नका. तो आता अगदी लहान नाही. विचार करू दे त्याला.''

''तू मध्ये बोलू नकोस. एवढा कोण मोठा बाजीराव लागला आहे त्याची विनवणी करायला. अनंता ऐकतो आहेस ना?''

अनंतसुद्धा रागाने लाल झाला. त्याचे ओठ थरथरत होते. त्यानी काही तरी निश्चय केला. हातातला पहीला घास तसाच पानांत टाकला. आपोषणी न घेताच तो पानावरून उठला आणि माजघर, पडवी ओलांडून खळांत गेला.

अनंता रिकाम्या पोटी, उष्ट्या हाताने रणरणत्या भर दुरारी घर सोडून निघून गेला.

घरांतली सारी माणसं दगडासारखी निश्चल झाली.

''जातो कुठे? बैस येईल दोन घटकांनी'' असे दाजी म्हणाले खरे. पण तेसुद्धा हादरून गेले होते.

कपडे भरलेली पिशवी अनंतानी अगोदरच वईवरच्या झाडाच्या फांदीवर ठेवली होती. कारण आपणाला घर सोडून जावं लागणार याची त्याला खात्री होती. अनंतानी तर गाठून होडीने राजापूरला गेला. तिथून गणपत दुकानदाराच्या मदतीनी त्यानी मुंबई गाठली.

मुंबईत नांव गांव बदलून तो पूर्णपणे मिसळून गेला होता. लहान सहान नोकऱ्या करीत तो पदवी परीक्षा उत्तीर्ण झाला. मध्यपूर्वेत बस्तान बसलेल्या आणि मुंबईमध्ये शाखा असलेल्या बँकेत त्याला चांगल्या पगाराची नोकरी मिळाली आणि त्या दरम्यान तो विवाहबद्ध झाला.

मध्य आशियातील एका शाखेचा प्रमुख म्हणून तो मध्यआशियात स्थाईक झाला.

त्यानंतर बरेच पावसाळे लोटले. अनंताची विनंती मान्य करून तो बॅन्केच्या मुख्य कचेरीत उच्च अधिकारी म्हणून रुजू झाला.

एका दिवाळीत भल्यापहाटे पत्नीकडून अंगाला उटणे लावून घेत असताना त्याला अचानक आईच्या हाताच्या स्पर्शाचा भास झाला. लहानपणी तो आईकडून दिवाळीच्या चारही दिवशी आंघोळ करून घेत होता.

अनंताच्या चेहऱ्यावरील बदललेले भाव पाहून पत्नी भांबावून गेली. अनंतानी वेळ मारून नेली. पण फराळ करताना त्याच्या डोळ्यातून अचानक अश्रू ओघळू लागले. एवढी वर्षं दाबून ठेवलेले कढ अचानक उसळी मारु लागले. समोर पत्नी बाजूला मुलं बसलेली. अनंताची अगदी पंचाईत झाली. हातातली थाळी जमिनीवर ठेऊन अनंत बेडरुममध्ये शिरला. दिवाणावर अंग लोटून तो लहान मुलासारखा ओक्साबोक्शी रडू लागला. पाठोपाठ आलेली पत्नी हा प्रकार पाहून अवाकूच झाली.

कठीण परिस्थितीत अभेद्य खडकाप्रमाणे ठाम उभा राहणारा आपला जोडीदार असा अचानक का ढेपाळला हेच तिला कळेना. भावनाचां आवेग ओसरेपर्यंत वाट पहावी म्हणून ती बेडरूमबाहेर आली.

''आशा, आज मी फारच चमत्कारीकपणे वागलो नाही कां?''

''ठीक आहे. अगोदर आपण शांत व्हा. असगळं विसरून जा आणि फराळाला चला. मुलं वाट पाहताहेत.''

''आशा आज मला खूप बोलायचं आहे. तुझ्याशी. एवढे दिवस मनात दाबून ठेवलेल्या गोष्टी तूला सांगून मी मोकळा होणार आहे.''

''माझ्यापासून तुम्ही एकही गोष्ट लपवून ठेवू शकणार नाहीत. तरी पण मी सर्वकाही ऐकेन पण आत्ता नाही मुलं घराबाहेर गेल्यावर संध्याकाळी.''

संध्याकाळी अनंत आपलं मन मोकळं करू लागला.

''आशा आपल्या लग्नाच्यावेळी मी तुला तुझ्या आईवडिलांना माझ्याविषयी सांगितलेली माहिती असत्य नव्हती पण अर्धसत्य होती.''

''म्हणजे?''

''सांगतो ना सर्व काही सांगतो'' असं म्हणत अनंतानी आपला सर्व पूर्वेतिहास तपशिलासह सांगितला.

एखाद्या कथा कादंबरीत शोभतील असे प्रसंग अशा आठवणी ऐकून आशा थक्कच झाली.

''कमाल आहे. तुम्ही यासर्व गोष्टी माझ्या पासून कशाकरता लपवून ठेवल्यात? हे ओझं एवढी वर्षं तुम्ही म्हणूनच संभाळल. घरच्या माणसांशी एवढा दूरावा चांगला नाही. कशीही वागली तरी मोठी माणसं होती.'

''आशा दिवाळी आटोपल्यावर मी माझ्या गावी जाणार म्हणजे जाणार. घरात नाही घेतलं तर उंबरठ्याला नमस्कार करून परत फिरेन.''

''चला आपण दोघं जाऊ या.''

''नाही मुळीच नाही. मी एकटा जाणार.

दिवाळीचे चार दिवस भूर्कन उडून गेले. घरच्या माणसांसमोर श्रीमंतीचं प्रदर्शन नको म्हणून, अनंताने अगदी कमी किंमतीचे साधे सुती आयते कपडे खरेदी केले. आई वडील या जगात नसणार याची खात्री असूनसुद्धा त्यांनी आईसीठी जुन्या पद्धतीचं लुगडं घेतलं. वडील थंडीने कुडकुडत पण लोकरी बंडी घेण्याची सवड

त्यांना मिळाली नाही. अनंतांनी एक लोकरी बंडी घेतली.

एस्.टी. गांवच्या तिठ्यावर थांबली. ऊन पसरलं नव्हतं तरी चक्क उजेड पडला होता. अनंत खाली उतरला. चपलेत खडा अडकल्याचं निमित्त करून अनंतानी चपला काढल्या आणि परशुराम भूमीला स्पर्श केला. अंग थरारून गेलं. अनंत माळावर उभा होता पण त्याचं मन पाखरासारखं भूर्कन उडून घराच्या अंगणांत घुमू लागलं. अनंतानी वळून पाहीलं. धुरळा उडवीत एस्.टी. पुढे निघून जात होती.

अनंत नकळत खुदकन गालातल्या गालात हसला. लहानपणी शाळा सुटल्यावर याच माळावरून तो माकडासारख्या उड्या मारीत घरी जाई आणि आईला घट्ट मिठी मारीत असे. काही तासांचा विरहसुद्धा त्याला सहन होत नसे. आणि आज....

अनंतानी बॅग हातात घेतली. त्याची पावले नकळत घराकडे वळली. पायंदीत मात्र त्याची पावलं जड झाली. मनात काहूर माजलं. कोणते प्रसंग त्याच्यापुढे उभे राहतील याचा त्याला अंदाज घेता येईना. घरातले कोण राहीले असतील? कुठच्या परिस्थितीत असतील? माझ्या बाबतीत त्यांच्या भावना काय असतील? एक ना दोन अनेक प्रश्न शंका त्याच्या भोवती पिंगा घालू लागल्या.

खळात त्याचं पाऊल पडलं. तेवढ्यात एक दहा-बारा वर्षाचा मुलगा पडवीतून खळात येत होता. दोघांची नजरानजर झाली. मुलगा क्षणभर थबकला.

''कोण हवंय तुम्हाला?''

''मला? हे बघ बाळ घरातं कोण आहे?''

''आई आहे. बहीण आहे. लहान भाऊसुद्धा आहे. कोण हवय तुम्हाला?'' त्याच्या प्रश्नापाठोपाठ एक मध्यमवयीन विधवा महिला काय रे माधवा कोण आलेत पाहूणे असं विचारीत खळ्यात आली. अनंताकडे पाहील्यावर ती चकीतच झाली.

अनंताच्या मोठ्या भावाची ती बायको होती. ती विधवा होती. म्हणजे अनंताचा मोठा भाऊ या जगात नव्हता. मुलांनी घरातली माणसं सांगताना फक्त आईचा व भावंडांचा उल्लेख केला म्हणजे अनंताचे आई वडील जग सोडून गेले होते.

अनंताची भावजय चकीत झाली. कारण अनंत आणि त्याचा मोठा भाऊ यांच्यामध्ये खूपच साम्य होते. वास्तविक अनंता भावाच्या विवाहाला उपस्थित नव्हता. तरीसुद्धा पाहुणे म्हणजे आपले दुरावलेले दीरच आहेत अशी तिची खात्री झाली.

''मी....मी.... अनंत अडखळत बोलण्याचा प्रयत्न करीत होता. तेवढ्यात त्यांच्या भावजयीनेच अनंताचं वाक्य पुरं केलं. अनंत लेले खरं ना?''

आपल्याला कोणीच ओळखणार नाही असा विचार करीत असलेल्या अनंताला कधीही न पाहिलेल्या भावजयीनी सहज ओळखावं हा त्याला एक सुखद धक्का होता.

''मला कसं ओळखलंत?''

''कसं म्हणजे? एक तर तुम्ही यांची अगदी कॉपी टू कॉपी आहात. आणि दुसरं कारण सांगू?''

''सांगा ना वैनी?''

वैनी शब्द बऱ्याच वर्षांनी तिच्या कानावर पडत होता. ''तुमचे पाणावलेले डोळेच रक्ताचं नातं सांगत होते.''

''छे???? हे काही तरीच हं वैनी. अनंत बोलायचं म्हणून बोलला. खरं म्हणजे त्याच्या दोन्ही डोळ्यातून एवढा वेळ रोखून ठेवलेल्या अश्रुधारा वाहू लागल्या. अनंत वैनींचं लक्ष्य दुसरीकडे वळवण्यासाठी बॅग उचलू लागला.

''राहू दे भावजी. तुम्ही अगोदर झोपाळ्यावर बसा. मी चहा करून आणते. गरम गरम चहा प्या आणि कपडे बदलून मागच्या विहीरीवर पाय धूवून या.''

अनंताने लहानसा झोका घेतला आणि त्याचं सारं बालपण त्याच्याबरोबर झोके घेऊ लागलं.

याच झोपाळ्यावर आपण कविता, रामरक्षा, पाढे म्हणत होतो. माझा हट्ट पुरवण्यासाठी आई अगदी लहानपणी आपल्याला हा घांस चिऊचा हा घांस काऊचा म्हणून भरवित होती. अमरकोशातले श्लोक खणखणीत आवाजात आपण याच झोपाळ्यावर म्हटले आणि बाबांनी शाबासकी दिली.

आपली भावजय चहाचा कप घेऊन केव्हा समोर उभी आहे हे अनंताला समजलंच नाही.

'भावजी एवढ्या आठवणी उराशी बाळगून तुम्ही इतकी वर्ष दूर राहीलात. एवढा राग कश्यापोटी?''

''वैनी तुला माहीत नाही...''

''सगळं मला माहिती आहे. अगोदर चहा घ्या. कपडे बदला आणि हातपाय धुवून या.''

अनंता काही न बोलता मागच्या दारी गेला. विहरीवर हातपाय धुतले. आणि मावळतीच्या पडवीतून माजघरात पाऊल टाकले. माजघरात अंधारच होता. उगवत्या पडवीत माजघर ओलांडून येणार तोच भावजय हातात पंचा घेऊन उभी राहीली. ''हे घ्या हातपाय पुसा. माजघर ओळखीचे आहे ना?''

''हे काय माझं सगळं बालपण इथेच गेलंय. तसं नव्हे भिंतीला पाट लावलेत ते पाहिलेत का?'' त्यात काय पहायच पाटासारखे पाट.

''तसं नव्हे हो एक पाट भिंतीला लावण्या ऐवजी जमिनीवर ठेवलाय तो पाहिला काय.''

हो त्यात काय पहायचं पाटासारखा पाट. भिंतीला लावून ठेवण्यास कोणी तरी विसरले एवढेच.

''तसं नव्हे भावोजी नीट न्याहळून पहा. तो पाट तुमच्या ओळखीचा नाही का.''

''वहिनी कमाल करता. माणस ओळखीची असतात. घर ओळखीची असतात. पाटाची कसली ओळख?''

अस्सं, म्हणजे तुम्ही ओळख विसरलेली दिसता. आता मी तुम्हाला एका रागावलेल्या मुलाची गोष्ट सांगते. नीट ऐका. बऱ्याच वर्षांपूर्वी, या माजघरात घरातील मुलं माणसं वडील माणसं जेवायला बसली होती. वडिलांचे आणि मुलाचे भांडण जुंपले. रागाच्या भरात हातात घेतलेला घास पानात टाकून एक मुलगा घर सोडून निघून गेला. आपल्या मागे घरातल्या माणसांना काय वाटले असेल. आईला काय वाटले असेल याची त्याने पर्वा केली नाही. घरातल्या साऱ्या माणसांनी बरेच दिवस बरेच महिने बरेच वर्ष वाट पाहिली. पण मुलाच्या आईने धीर सोडला नाही. ती रोज म्हणायची माझा रागावलेला मुलगा एक ना एक दिवस परत येईल या पाटावर बसेल आणि राहिगलेले जेवण पुरे करेल. भावोजी आज त्या मुलाचे वडिल नाहीत आई नाही. त्याच्या पाठोपाठ अंगण संपेपर्यंत जाणारा त्याच्या भाऊही नाही. पण भावोजी हा पाट त्या दिवसापासून त्या तिथेच आहे. इतर पाना बरोबर त्या पाटासमोर दररोज सकाळ संध्याकाळ पान वाढलं जातं. जेवणं संपल्या नंतर ते पान गोठ्यात गायीच्या पुढे ठेवण्यात येत. आज त्या पाटाचं भाग्य उजळलं. भावोजी गोष्ट कळली नाही.

''नको नको वहिनी आता एक ही शब्द बोलू नका. तुमच्या गोष्टीतला प्रत्येक शब्द मला फटकारे मारत होता. छे, या ठिकाणी मला आता उभं राहाता येत नाही मी उगवतीच्या पडवीत झोपाळ्यावर जाऊन बसतो. तुम्हाला चहा फराळासारखं काय द्यायचं असेल ते तिथेच द्या.

अनंतानी इतक्या वेळ दाबून धरलेला हुंदका एखाद्या स्फोटासारखा बाहेर आला. त्यांनी कशीबशी पडवी गाठली आणि झोपाळ्यावर बसून त्यांनी हलकासा झोका घेतला. सारं बालपण त्याच्या बरोबर झोका घेऊ लागलं. अनंता एखाद्या लहान मुला सारखा ओक्साबोक्शी रडत होता. राग, द्वेष, दुरावा, सारं काही त्याच्या अश्रूंच्या पूरात वाहून गेले.

अनंताची भावजय चहाचा कप आणि पोह्याची बशी घेवून माजघराच्या पैठणी वर उभी होती. अनंताचा समाधी भंग करण्याची तिची हिंमतच होईना.

❑❑❑

**हसरे हितगुज**

भिकाऱ्याने फाइव्ह स्टार हॉटेलला फोन केला, ''हॅलो, ताजमहाल हॉटेल... एक पिझ्झा, एक बिर्याणी, एक रेशमी कबाब प्लेट और एक रसमलाई भेज दो.''

ऑर्डर घेणारा अदबीने विचारलं, ''जी साब ! किसके नाम से भेज दूँ ?''

भिकारी म्हणाला, ''भगवान के नाम पे भेज दो !!!!''


**WITH BEST COMPLIMENT**

From

# JAYANT MARATHE

**REGISTERED FINANCIAL CONSULTANT**

For Comprehensive Financial Planning Contact :

R.No.14, KHOT BLDG., AKSHIKAR STREET,
DADAR (WEST), MUMBAI - 400028.
(R) - 24361608, (M) - 9869459408
Email - jrmarathe@gmail.com
Website - JayantMarathe@njFundz.com.

२४ सप्टेंबर जयंती निमित्त लेख

# वीरांगना मॅडम कामा

**- डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे (पृ.१२०)**

***मॅडम कामा यांनी २२ ऑगस्ट १९०७ ला जर्मनीतील फ्रँकफुर्ट येथे भारतीय तिरंगा फडकाविला ज्यावर ''वंदे मातरम्'' लिहिले होते. त्या घटनेची शताब्दी आणि मॅडम कामा शतकमहोत्सव सुरु आहे त्या निमित्ताने हा विशेष अभ्यासपूर्ण लेख लिहिला आहे.***

१५ ऑगस्ट १९४७ला तीन चतुर्थांश हिंदुस्थान स्वतंत्र झाला. हे स्वातंत्र्य मिळविण्यात क्रांतीकारकांचा सिंहाचा वाटा असल्याचे, इतिहासाने सांगितले आहे. या स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात, क्रांतिकारकांच्या गौरवपूर्ण कार्याचे प्रेरणादायक स्मरण करणे न्यायोचित ठरेल. ब्रिटीशांच्या दास्यातून मुक्त होण्यासाठी पहिली मोठी सार्वदेशिक क्रांती करण्यात आली ती १८५७ मध्ये. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या नेतृत्वाखाली, सेनापती तात्या टोपे, बहादूर शहा, वीरांगना झाशीची राणी लक्ष्मीबाई इत्यादी क्रांतीकारकांनी लढलेल्या क्रांतीयुद्धात आपणास जरी पराभव पत्कारावा लागला असला तरी, या क्रांतीयुद्धातूनच पुढे भारतीयांना स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढण्याची प्रेरणा मिळाली. आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांनी प्रारंभ केलेल्या सशस्त्र क्रांतीच्या प्रयत्नांपासून तो थेट नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या 'आझाद हिंद सेने'ने केलेल्या दुसऱ्या क्रांतीयुद्धापर्यंत विविध ठिकाणच्या सुमारे पन्नास क्रांतीकारक संघटनांनी आपापल्या परी देश स्वतंत्र करण्याकरिता निकराचे प्रयत्न केले. १८९९ पासून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सशस्त्र क्रांती करण्यासाठी सुरू केलेले कार्य इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. त्यांनी स्थापन केलेल्या 'अभिनव भारत' या गुप्त क्रांतीकारक संघटनेने केवळ भारतातच नव्हे तर ब्रिटीश साम्राज्याच्या प्रत्यक्ष राजधानी लंडनमध्येही सशस्त्र क्रांतीचा वन्ही चेतविला. 'अभिनव भारता'च्या लंडन येथील शाखेने क्रांतीकार्याचे जाळे संपूर्ण युरोप आणि अमेरिकेत निर्माण केले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या चतुरस्त्र नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या क्रांतीकारक संघटनेत, त्यांच्या चार-पाच प्रमुख सहकाऱ्यांमध्ये वीरांगना मॅडम कामा यांची गणना होते. या लेखात मॅडम कामा यांच्या अद्‌भुत चरित्राचा अल्प परिचय लिहित आहे.

## अंगभूत गुणवत्ता

दिनांक २४ सप्टेंबर १९६१ला मुंबईतील संपन्न पारशी घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सोराबजी फ्रामजी पटेल. श्री.सोराबजींनी आपल्या लाडक्या कन्येचे नाव भिकायजी (भिकाजी) असे ठेवले. भिकाजीचे शालेय शिक्षण अलेक्झांड्रा पारशी गर्ल्स हायस्कूल मध्ये झाले. अभिजात सौंदर्याबरोबर भिकाजीला उत्तम बुद्धिमत्तेची देणगी लाभली होती. विद्यालयीन जीवनात तिने सर्वांगीण प्राविण्य संपादन केले. तिचा सतत पहिला क्रमांक असे. विशेष म्हणजे बालपणापासूनच तिला सामाजिक कार्याची आवड होती.

दिनांक ३ ऑगस्ट १८८५ला भिकाजीचा विवाह श्रीमंत पारशी घराण्यातील देखण्या रुस्तुम के.आर.कामा या तरुणाशी झाला. श्री.रुस्तुमजी कामा बॅरिस्टर होते. सॅलिसिटरचा व्यवसाय करीत. तत्कालिन सर्वसाधारण श्रीमंतांप्रमाणे ते ब्रिटीशनिष्ठ होते. मुंबईच्या ब्रिटीश गव्हर्नरच्यावतीने साजऱ्या होणाऱ्या अनेक समारंभात कामा दाम्पत्याला विशेष आमंत्रण असे. गव्हर्नरच्या आतिथ्याचा सन्मान मोजक्याच प्रतिष्ठितांना लाभे; हे लक्षात घेता कामा पति-पत्निला राजमान्यता मिळाल्याचे स्पष्ट होते. त्यांना मुलेबाळेही झाल्याने त्यांचा संसार परिपूर्ण होता. पण केवळ संसारसुखात रममाण होणाऱ्या सर्वसाधारण गृहिणींपैकी मॅडम भिकाजी कामा नव्हत्या.

सामाजिक कार्य करण्याची मनपूर्वक इच्छा असल्यामुळे स्थानिक पातळीवरील लहान-मोठ्या सामाजिक कामात त्या भाग घेऊ लागल्या.

मॅडम भिकाजी कामा यांचा स्वभाव मूलत: खंबीर, धीट. त्या स्वत:च्या मताशी सदैव प्रामाणिक असत. स्वत:च्या मताप्रमाणे प्रत्यक्षात वागण्याचे धैर्य त्यांच्या जवळ होते. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या त्यागासाठी त्यांची सिद्धता असे. मुंबईत आलेल्या संसर्गजन्य प्लेगच्या साथीत सुश्रुषा करणाऱ्या समाजसेवी पथकात मॅडम भिकाजींनी आपले नाव नोंदविले. निर्भयपणे त्यांनी प्लेगच्या रुग्णाच्या सेवाकार्यात भाग घेतला. इतका की, पुढे त्यांनाच प्लेग झाला. परंतु सुदैवाने जीवावरच्या संकटातून त्या वाचल्या.

मध्यन्तरी मॅडम भिकाजींचे नि त्यांच्या पतीचे काही कौटुंबिक मतभेदांमुळे अजिबात पटेनासे झाले. त्यामुळे ह्या पतीपासून रीतसर विभक्त झाल्या. मात्र त्या आर्थिक स्थितीतही स्वयंपूर्ण असल्याने इच्छेनुसार कार्य करण्यास समर्थ राहिल्या.

प्लेगच्या आजारानंतर त्यांना इतका अशक्तपणा आला की प्रकृती सुधारण्यासाठी त्यांना डॉक्टरी सल्ल्यानुसार (१९०१ मध्ये) युरोपमध्ये जावे लागले. प्रथम त्या पॅरिसमध्ये स्वतंत्ररित्या राहू लागल्या. प्रकृती सुधारल्यावर त्या १९०२ मध्ये, लंडन येथेही अंगीकृत कार्यासाठी जाऊ लागल्या.

## फ्रेंच समाजातही प्रभावी

मानसिक चिंतेतून मुक्त होण्यासाठी त्या प्रतिष्ठित फ्रेंच स्त्री-पुरुषांच्या क्रीडा-मंडळात तसेच मनोरंजन मंडळात भाग घेऊ लागल्या. उच्चभ्रू फ्रेंच स्त्री-पुरुषांच्या गीत-नृत्यादि समारंभात त्या सहभागी होत. त्यांचे उमदे व्यक्तिमत्त्व फ्रेंच मंडळींतही उठून दिसे. त्यांची फ्रेंच पद्धतीची वेशभूषाही आकर्षक असे. त्यांच्या प्रभावशाली व्यक्तिमत्त्वामुळे पॅरिसमधील काही संपन्न, प्रतिष्ठित, विद्वान स्त्रीपुरुष मंडळींशी त्यांचा चांगला परिचय झाला. त्यातही फ्रेंच सौंदर्यवती महिलांपेक्षा त्यांचे आणखी एका कारणामुळे वेगळेपण उठून दिसे. अधून-मधून मॅडम कामा हिन्दुस्थानातील पारशी पद्धतीच्या उंची साड्या नेसून महिलामंडळात वावरत. हिंदी साडी आणि ती नेसण्याची विशेष पद्धत फ्रेंच महिलांना भारून टाकत असे. मॅडम कामा फ्रेंच वेशभूषा उत्तम रीतीने करीत, परंतु फ्रेंच

सौंदर्यवतींना भारतीय पद्धतीची वेशभूषा करणे जमत नसे. अशा रीतीने निश्चित आणि मनोरंजक दिनक्रमात काही काळ व्यतित केल्यानंतर मॅडम कामांची प्रकृती चांगलीच सुधारली. परंतु, ज्यांना व्यक्तिगत संसारसुखातही अंतिम समाधान लाभले नाही, त्यांना केवळ व्यक्तिगत शरीरस्वास्थ्यात कसे समाधान लाभणार?

## राष्ट्रकार्यात सहभागी

मॅडम भिकाजी कामा यांना विद्यार्थीदशेपासून समाजकार्याची आवड होती. त्या तळमळीने त्यांना प्लेगच्या रुग्णांची सुश्रूषा करण्याची प्रेरणा दिली. समाजसेवेचे रुपांतर पुढे राष्ट्रसेवेत झाले. चाळिशी ओलांडलेल्या मॅडम कामांनी नव्या जोमाने मुक्तपणे स्वत:ला राष्ट्र कार्यास वाहून घेतले. पारशी समाजातील ख्यातनाम नेते दादाभाई नवरोजी यांचा परिचय त्यांनी करून घेतला. दादाभाई नवरोजींच्या नेतृत्वाखाली ब्रिटनमध्ये चालत असलेल्या नेमस्त चळवळीत त्या भाग घेऊ लागल्या. दादाभाईंनी ब्रिटीश संसदेच्या लढवलेल्या निवडणुकीत कामाबाईंनी स्वयंसेविका म्हणून पडेल ते काम केले. परंतु हिन्दुस्थानात कर्झनशाहीची दडपशाही चालू असल्याने कामाबाईंचा कल जहाल राजकारणाकडे झुकू लागला. त्यावेळी पंडित शामजीकृष्ण वर्मा यांनी कट्टर राष्ट्रीय बाण्याच्या होमरुल चळवळीला प्रारंभ केला होता.

बौद्धिक अंधश्रद्धा नसल्यामुळे, मॅडम कामा यांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी, दादाभाईंच्या नेमस्त चळवळीपेक्षा, पं.शामजींची होमरुल चळवळ अधिक उपयोगी पडेल हे लक्षात घेऊन तिचा अंगिकार केला.

पुढे क्रांतीकारक सावरकर १९०६ मध्ये लंडनला पोचल्यानंतर कामाबाईंचा त्यांच्याशीही परिचय झाला. त्यावेळी मॅडम कामांचे वय होते सुमारे पंचेचाळीस वर्षांचे. सावरकरांनी लंडनमध्ये अभिनव भारताची शाखा संघटित केली. सावरकरांच्या क्रांतीकारक तत्त्वज्ञानाची ओळख पटल्यानंतर पं.शामजीकृष्ण वर्मा आणि मॅडम कामा या ज्येष्ठ देशभक्तांनी अभिनव भारताची शपथ घेतली. क्रांतीकारक सावरकरांचे नेतृत्व मनोभावे त्यांनी स्वीकारले. अशा रितीने मॅडम कामांनी प्रथम दादाभाई नवरोजी, नंतर पं. शामजी कृष्ण वर्मा आणि नंतर सावरकरांची भेट झाल्यानंतर सावरकरांचे नेतृत्व स्वीकारले.

देशाचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचाच मार्ग अधिक योग्य आहे, असे पटल्याने मॅडम कामांनी सशस्त्र क्रांतीचाच मार्ग स्वीकारला.

## अभिनव भारताच्या माध्यमातून

मात्र अभिनव भारताच्या सदस्या झाल्यानंतर त्यांनी, देशभक्त कार्यकर्त्यांना आपल्या लेखनाद्वारे आणि भाषणांतून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी 'सशस्त्र क्रांती' करण्याची चेतना देणे सुरु केले. प्रत्यक्ष कार्य करण्याची संधी त्या कधीही दवडत नसत. अशीच एक सुवर्णसंधी त्यांना वर्ष १९०७ मध्ये मिळाली.

दि.१८ ऑगस्ट ते २० ऑगस्ट १९०७ या कालावधीत जर्मनीतील 'स्टुटगार्ट' येथे आंतरराष्ट्रीय सोशॅलिस्ट कॉंग्रेस संपन्न होणार होती. 'अभिनव भारता'ने सरदारसिंगजी राणा आणि मॅडम कामा या सदस्यांना आपले प्रतिनिधी म्हणून 'सोशॅलिस्ट कॉंग्रेस' मध्ये उपस्थित राहाण्यासाठी निवडले. या परिषदेत हिंदुस्तानाच्या स्वातंत्र्यासंबंधीचा ठराव मांडण्याचे ठरले. 'सोशॅलिस्ट कॉंग्रेस'च्या परिषदेत, मॅडम कामा यांनी ठराव मांडण्यापूर्वी, स्वतंत्र भारताचा संकल्पित राष्ट्रध्वज फडकवावा अशी योजना ठरली.

## संकल्पित राष्ट्रध्वजाचे स्वरूप

स्वतंत्र भारताच्या ध्वजावर हिरवा, केशरी व तांबडा अशा तीन रंगाचे पट्टे काढलेले होते. हे पट्टे गुणांचे निदर्शक होते. तांबडा वर्ण शक्तीचा निदर्शक आहे. केशरी रंग विजयाचा निदर्शक आहे आणि हिरवा रंग धैर्याचा - उत्साहाचा निदर्शक आहे. मध्यभागी 'वंदेमातरम्' असे स्पष्टपणे लिहिले होते. ध्वजावर आठ कमळे होती, ती हिंदुस्तानच्या (तत्कालिन) आठ प्रांतांची निदर्शक होती. या ध्वजावर सूर्यचंद्राच्या आकृती काढलेल्या होत्या. ध्वजाची संकल्पना वीर सावरकरांनी सुचविली होती. 'अभिनव भारत' या संस्थेने निश्चित केलेला हा ध्वज घेऊन मॅडम कामा आणि बॅ.राणा 'स्टुटगार्ट' परिषदेत उपस्थित राहिले.

या परिषदेला अखिल जगातून एक हजार प्रतिनिधी उपस्थित होते. या आंतरराष्ट्रीय परिषदेत हिंदुस्थानाचा प्रश्न मांडण्याचा प्रसंग आला तेव्हा इंग्लंडच्या मजूर पक्षाचे एक पुढारी रॅमसे मॅक्डोनल्ड याने काही सहकाऱ्यांसमवेत विरोध केला. परंतु त्याच वेळी हिंडमन्, जॉरिस इत्यादी अनेक लोकांनी हिंदी प्रतिनिधींना भरपूर पाठिंबा दिला. त्यामुळे परिषदेत हिंदुस्थानासंबंधीचा एक महत्त्वाचा ठराव संमत झाला.

## विश्वविख्यात कार्य

मॅडम कामा ठराव मांडण्यापूर्वी उभ्या राहिल्या परंतु प्रत्यक्ष ठराव मांडण्यापूर्वी, त्यांनी अकस्मात आपल्या जवळचा स्वतंत्र भारताचा संकल्पित राष्ट्रध्वज लोकांसमोर प्रदर्शित केला. त्या म्हणाल्या, 'हा पहा स्वतंत्र हिंदुस्थानचा राष्ट्रध्वज !' या राष्ट्रध्वजाला उपस्थित प्रतिनिधींनी उभे राहून मानवंदना दिली. अनेकांना वाटले की, ही तडफदार तरुणी भारतीय राजघराण्यातील असावी. असे होते मॅडम कामांचे प्रभावशाली व्यक्तिमत्त्व.

मॅडम कामा यांनी परिषदेपुढे पुढील प्रमाणे ठराव मांडला :- 'हिंदुस्तानांत ब्रिटिशांची सत्ता चालू राहणे ही गोष्ट भारतीयांच्या हिताच्या दृष्टीने निर्विवाद घातक आणि अत्यंत अपमानकारक आहे. त्या दलित देशांत वास्तव्य करणारे लोक हे जगांतल्या मानव समाजाच्या एक पंचमांश इतके आहेत. पण या लोकांना दास्यमुक्त करण्याच्या कामी जगांतल्या सर्व स्वातंत्र्यप्रेमी लोकांनी सहकार्य केले पाहिजे, कारण जगाची सामाजिक घडी निर्दोष स्थितीप्रत पोचवायची असेल तर एक गोष्ट अत्यंत अवश्य आहे. कोणताही लोकसमाज जुलमी व अनियंत्रित राज्यव्यवस्थेच्या अंकित असता कामा नये, हीच ती गोष्ट होय'.

या ठरावावर मॅडम कामा यांनी केलेले ओजस्वी भाषण अतिशय गाजले. ब्रिटीश राज्यकर्ते हिंदुस्थानातील अब्जावधि पौंडांची संपत्ती प्रतिवर्षी इंग्लंडमध्ये नेतात. या लुटीमुळे हिंदुस्थान कमालीचा दरिद्री झाला आहे. हा मुद्दा त्यांनी तपशीलवार सांगितला. हिंदुस्थानासारख्या परावलंबी देशाकडे जगातील सर्व समाजवाद्यांनी सतत लक्ष दिले पाहिजे. हिंदुस्तानाला न्याय मिळवून देण्यासाठी समाजवादी परिषदेत परतंत्र हिंदुस्तानाची बाजू प्रामुख्याने मांडण्याचा निर्धार करणे आवश्यक ठरते; या आशयाचे आवाहन हृदयस्पर्शी शब्दात कामा बाईंनी केले.

हा ठराव आंतरराष्ट्रीय सोशॅलिस्ट काँग्रेसमध्ये संमत झाल्याने हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न जागतिक राजकारणात दुमदुमला. मॅडम कामाबाईंच्या या कर्तृत्वामुळे भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न जागतिक पातळीवर चर्चिला गेला.

पॅरिसला राहून मॅडम कामा यांनी 'अभिनव भारता'च्या माध्यमातून होणाऱ्या सर्व प्रकारच्या कार्याला सतत सर्वकष सहाय्य केले. पॅरिसहून अभिनव भापकाती मुखपत्रे वंदेमातरम् आणि 'तलवार' अभिनव भारताच्या ध्येय धोरणांचा प्रचार करीत. त्यात कामाबाईंचा मोठा सहभाग होता. वृत्तपत्रीय लेखनाद्वारे, प्रत्यक्ष भाषणांद्वारे प्रचारकार्य करीत असतानाच कृतीशील क्रांतीकारकांना मॅडम कामा जामीन राहाण्यापासून अर्थसहाय्य करण्यापर्यंत सर्व प्रकारची मदत करीत. मॅडम कामाबाईंनी केलेल्या सर्वस्पर्शी, सर्वांगीण कार्याचे सविस्तर वर्णन करणे या लेखाच्या मर्यादेत शक्य नाही. परंतु त्यांच्या कृतीशील क्रांतीकार्याचे स्वरुप थोडे तरी लक्षात यावे म्हणून अगदी काही मोजकी उदाहरणे येथे देणे शक्य आहे.

वर्ष १९१०च्या प्रारंभी मॅडम कामा, एम.पी.टी. आचार्य यांनी सावरकर लिखित '१९५७ चे स्वातंत्र्य समर' या ग्रंथाचा फ्रेंच भाषेत अनुवाद करून तो प्रकाशित केला. त्यांनी देशभक्तांना सशस्त्र क्रांतीस प्रवृत्त करणारे विविध प्रकारचे साहित्य सातत्याने प्रसारित केले.

क्रांतीकारक सावरकरांना ब्रिटीश शासनाने साम्राज्य उलथून पाडण्याच्या कट-कारस्थान आणि प्रयत्न केल्याच्या कारणावरून दि.१३ मार्च १९१०ला रात्री लंडन रेल्वे स्थानकावर अटक केली. तत्पूर्वी ते पॅरिसला प्रकृती सुधारण्यासाठी मॅडम कामा यांच्या निवासस्थानी राहिले होते. पॅरिसमध्ये कामाबाईंनी त्या तेजस्वी क्रांतीकारक युवकाची रुग्णावस्थेतील प्रकृती सुधारण्यापासून ते त्यांचे क्रांतीसंघटन कार्य अखंडपणे चालू राहावे यासाठी कार्य केले. लंडन येथे सावरकर कच्च्या कैदेत असताना, त्यांना सोडविण्याचे जे काही अयशस्वी प्रयत्न झाले त्या योजनांमध्येही त्यांचा सहभाग होता. सावरकरांना ब्रिटीश शासनाने त्यांच्या अभियोग चालविण्यासाठी भारतात पाठविण्याचे ठरविले, बंदीवान सावरकरांना घेऊन जाणारी बोट मार्सेलिस बंदरात थांबून पुढे जाणार हे निश्चित होते. त्या अनुषंगाने श्री.व्ही.व्ही.अेस्. अय्यर हे लंडन येथील ब्रिक्स्टन कारागृहात सावरकरांना भेटले. त्यावेळी त्यांना सावरकरांनी मार्सेलिस येथे आपली भेट होईल, असा संकेत दिला. पोलिस पहाऱ्यात दिलेला हा संकेत लक्षात घेऊन श्री.व्ही.व्ही.अेस्. अय्यर पॅरिसला गेले आणि त्यांनी तेथील 'अभिनव भारता'च्या क्रांतीकारक सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून 'मार्सेलिस' बंदरावर बोट थांबली असताना, आवश्यक तर पिस्तुलादी शस्त्रांचा उपयोग करून बोटीतील बंदिगृहातून सावरकरांना सोडविण्याचा प्रयत्न करण्याची धाडसी योजना आखली होती. ह्या योजनेच्या कार्यवाहीसाठी पॅरिसहून व्ही.व्ही.अेस् अय्यर, मॅडम कामा इ. अेका मोटारीतून मार्सेलिसला पोहोचण्यासाठी निघाली. क्रांतीकारक सावरकरांनी दि.८ जुलै १९१०ला पोलिसांची नजर चुकवून बोटीतील टॉयलेट (स्वच्छतागृह)च्या पोर्टहोल मधून समुद्रात अुडी टाकली. ते बंदरावरील तटाची भिंत चढून बाहेर पडले आणि फ्रान्सच्या अधिपत्याखालील मार्सेलिस शहराच्या रस्त्यावरून न्यायालयात पोचण्यासाठी धावत गेले. त्यावेळी अय्यर, मॅडम कामा आदि मंडळींची मोटार बंदरापासून फार दूर होती. ही मोटार काही तास आधी पोचली असती तर सावरकरांचा कैदेतून सुटण्याचा प्रयत्न सफल झाला असता. परंतु तसा योग नव्हता. ब्रिटीश पोलिसांनी पाठलाग करून सावरकरांना पकडले आणि परत बोटीवर नेले.

## आंतरराष्ट्रीय प्रश्न

मॅडम कामा, व्ही.व्ही.अेस्. अय्यर, इत्यादी मंडळींची मोटार मार्सेलिसला उशीरा पोहोचल्याने बोटीतून अुडी मारून किनाऱ्यावर पोहोचलेल्या सावरकरांना तिचा उपयोग झाला नाही व त्यांना परत बोटीवरील बंदीगृहात ब्रिटीश पोलिसांनी बळजबरीने नेले. याची तीव्र खंत मॅडम कामा प्रभृतींना वाटली. पण केवळ दुःख करीत न बसता, मॅडम कामा इत्यादींनी झाल्या प्रकाराचा लाभ आंतरराष्ट्रीय स्तरावर अुठविण्याचे प्रयत्न सुरु केले. त्यांनी त्या घटनेचे वृत्त तारेने पॅरिसला पाठविले. ते वृत्त प्रथम दि.११ जुलै १९१० ला 'डेलि मेल' दैनिकाच्या पॅरिसमधील आवृत्तीत अेका कोपऱ्यात प्रसिद्ध झाले. फ्रेंच भूमीवर अेका क्रांतीकारकाला ब्रिटीश पोलिसांनी बेकायदेशीरपणे ताब्यात घेऊन बोटीवर नेले. ही घटना आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग करणारी होती. ह्या बाबीचा अधिकाधिक प्रचार करण्यासाठी 'ल ह्युमॅनाइट' नावाच्या समाजवादी पत्राकडे कामाप्रभृतींनी त्या घटनेचे सविस्तर वृत्त पाठविले. पत्राचे संपादक जीन लांगुवे (हे कार्ल मार्क्सचे नातू होते) यांनी दि.१२ जुलै १९१०च्या अंकात सविस्तर वृत्त अतिशय ठळकपणे प्रकाशित केले. तसेच मार्सेलिसचा समाजवादी महापौर ज्वारे यांची भेट घेऊन या प्रकारणी न्याय्य सहकार्य मागितले. त्यातूनच, बंदीत असलेल्या सावरकरांची पाठवणी ब्रिटीशांनी तत्काळ फ्रान्सकडे करावी, अशी जोरदार मागणी राजकीय क्षेत्रात करण्यात आली. या सर्व घडामोडींचा परिणाम होअून, हे प्रकरण अखेरीस हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयात प्रविष्ट झाले. या न्यायालयात निर्णय मात्र सावरकारांच्या विरोधात दिला गेला. ब्रिटीशांच्या सामर्थ्यापुढे फ्रान्सला झुकावे लागले या घटनेचे फ्रान्समध्ये तीव्र पडसाद उमटले; इतके की न्यायालयातील निर्णय लागल्यानंतर केवळ तीन दिवसांच्या आत पंतप्रधान ब्रियाँ यांना त्यागपत्र द्यावे लागले ! मॅडम कामा, सरदार सिंग राणा, व्हीव्हीअेस् अय्यर इत्यादींनी केलेल्या प्रयत्नांमुळे सावरकरांची बेकायदेशीर अटक आणि हिंदुस्तानचे स्वातंत्र्य हे विषय साऱ्या जगासमोर मांडले गेले.

## न्यायालयीन कामात मदत

बंदी सावरकरांना ब्रिटीशांनी भारतात आणून त्यांच्यावर न्यायालयीन कार्यवाही सुरु केली. ब्रिटीश साम्राज्य उलथून पाडण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा कट करण्याचा मुख्य आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. सावरकरांच्या न्यायलयीन बचावासाठी, मॅडम कामा यांनी शक्य ते सर्व प्रयत्न केले. त्यांनी मुंबईतील विख्यात विधिज्ञ जोसेफ बॅप्टिस्टा यांना सावरकरांचे वकीलपत्र घेण्याची सूचना केली. त्या सुचनेनुसार दि.१३ सप्टेंबर १९१०ला जोसेफ बॅप्टिस्टा यांनी येरवडा तुरुंगात जाऊन सावरकरांची भेट घेऊन कामाला सुरुवात केली. सावरकरांचे अेक निवेदन त्याने कायदेशीरपणे हेगच्या न्यायालयात पाठविण्याची व्यवस्था केली.

## सावरकर कुटुंबियांना सहकार्य

मॅडम कामा यांनी अभिनव भारताचे नेते क्रांतीकारक विनायक दामोदर सावरकर यांना सर्वतोपरी सहकार्य केलेच परंतु ते पकडले गेल्यानंतर त्यांचे धाकटे बंधु नारायण दामोदर

सावरकर यांनाही त्यांनी शक्य ते सहकार्य केले. सावरकर कुटुंबावर त्यांनी मायेची पाखर घातली. स्वत: स्वातंत्र्यवीर सावरकरांना आणि त्यांचे बंधु व कुटुंबियांना त्याची यथार्थ जाणीव होती. अंदमानातून वीर सावरकरांनी आपले धाकटे बंधु नारायणराव सावरकर यांना लिहिलेल्या पत्रात तसा स्पष्ट उल्लेख आहे. ''मी अंदमानात आल्यानंतर, कामाबाईंनी तुझा (नारायणराव सावरकरांचा) मातेसमान सांभाळ केला आहे.'' असे वीर सावरकरांनी पत्रात लिहिले आहे. याची जाणीवही डॉ.नारायणराव सावरकरांनी अखेरीपर्यंत ठेवली आणि कामाबाईंविषयी अत्यंत आदराची भावना जपली. क्रांतीकारक सावरकर बंधूंच्या जवळच्या नातेवाईकांनीही शासकीय भीतीमुळे सावरकर कुटुंबाशी असलेले संबंध तोडले. परंतु, रक्ताचे नव्हे तर देशभक्तीचे नाते असलेल्या मादाम कामाबाईंनी सावरकर कुटुंबियांची पाठराखण अखेरपर्यंत केली.

## ....जीवनाची अखेर मातृभूमीतच

मॅडम कामा यांनी १९०२ मध्ये मातृभूमी भारत सोडून विदेशात वास्तव्य केले. वर्ष १९३५ पर्यंत त्या विदेशात राहिल्या. मातृभूमीच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी त्यांनी सशस्त्र क्रांतीकारी संघनेच्या माध्यमातून भगीरथ प्रयत्न केले. वृद्धावस्थेतील आजारपण वाढल्याने त्यांना जीवनाची अखेर डोळ्यासमोर दिसू लागली. आपला मृत्यू मातृभूमीतच व्हावा या इच्छेने त्या वर्ष १९३५ मध्ये मुंबईत परतल्या. त्यांना पारसी जनरल हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले. स्वातंत्र्यवीर सावरकर त्यावेळी रत्नागिरीला स्थानबद्ध होते. परंतु त्यांचे धाकटे बंधु डॉ.नारायणराव सावरकर मुंबईला होते. त्यांनी मॅडम कामाबाईंची भेट घेऊन त्यांचे स्वास्थ्य सुधारण्यासाठी काही प्रयत्न केले, परंतु त्याचा उपयोग न होता दि.१३ ऑगस्ट १९३५ला मॅडम कामाबाईंचे देहावसान झाले.

**मॅडम कामा सार्वजनिक जीवनात पुरोगामी असल्या तरी वृत्तीने धार्मिक होत्या. त्यांनी मृत्युपत्रान्वये, रुग्णालयातील खर्च वजा करता, उरलेली रक्कम त्रेपन्न हजार रुपये, मुंबईतील एफ.एन. पटेल अग्यारीला देणगी म्हणून दिली.**

**प्रेषक: कालिदास बाळकृष्ण मराठे** (पृ.५४१)
श्री २१०, ढवळी, पो. कवळे ता. फोंडा, गोवा - ४०३४०१.
मधुरध्वनी.०८३२-२३१३८०५.

लग्न लग्न म्हणजे काय असतं?
त्याच्या मनातल्या विचारांचं
तिच्या चेहऱ्यावर प्रतिबिंब असतं
तिच्या प्रश्नाआधी त्याचं उत्तर तयार असतं
लग्न म्हणजे काय असतं?

त्याला लागताच ठसका
तिच्या डोळ्यात पाणी तरळतं
तिला लागताच ठेच
त्याचं मन कळवळतं

लग्न लग्न म्हणजे काय असतं?
तिने चहा केला तर सरबत हवं असतं
त्याने गजरा आणला की
नेमकं तिला फुल हवं असतं

लग्न लग्न म्हणजे काय असतं?
त्याच्या बेफिकिरीला
तिच्या जाणिवांचं कोंदण असतं
तिच्या खर्चाला
त्याच्या खिशाच आंदण असतं

लग्न लग्न म्हणजे काय असतं?
त्याच्या चुकांना
तिच्या पदराचं पांघरुण असतं
तिच्या दु:खाला
त्याच्या खांद्याचं अंथरूण असतं

लग्न लग्न म्हणजे काय असतं?
कधी समझोता, तर कधी भांडण
असतं
तो चिडला तरी तिनं शांत रहायचं
असतं
कपातल्या वादळाला चहाबरोबर
संपवायचं असतं

लग्न लग्न म्हणजे काय असतं?
कधी दोन जीवांचं मीलन असतं
तर कधी दोन जीवांच भांडण असतं
एकानं विस्कटलं तरी दुसऱ्यान आवरायचं
असतं
संकटाच्या वादळाला दारातच थोपवायचं
असतं

लग्न लग्न म्हणजे काय असतं?
प्रेमाचं ते बंधन असतं
घराचं ते घरपण असतं
विधात्यानं साकारलेलं
ते एक सुंदर स्वप्न असतं !

सहजीवन म्हणजे अवघड वाट
सहजीवन म्हणजे दुस्तर घाट
कधी अगदीच मयसभा आणि
कधी चाकोरीची वहिवाट

सहजीवन म्हणजे अनेक होकार
सहजीवन म्हणजे कितीतरी नकार
सहजीवन म्हणजे एकमेकांच्या
भावनांचा सन्मान

सहजीवन म्हणजे एकमेकांच्या
माणसांचा स्वीकार
सहजीवन म्हणजे परस्परांच्या
मर्यादा समजून घेणं

सहजीवनात एकमेकांना मोठं करत
जाणं
सहजीवन म्हणजे उतायचं नाही
सहजीवन म्हणजे मातायचं नाही
घेतला वसा टाकून कधी
तुटेपर्यंत ताणायचं नाही

भारताला स्वतंत्र करण्यासाठी अनेकानेक देशभक्तांनी आपले सर्वस्व वेचले. त्यात झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्यापासून तो १९४२ च्या लढ्यातील अरुणा असफअली, नि पुढे आझाद हिंदसेनेतील कॅप्टन लक्ष्मी यांच्यापर्यंत अनेक देशभक्त महिलांचाही कौतुकार्ह सहभाग होता. परंतु त्यातही, १९०२ ते १९३५ पर्यंत युरोपमध्ये राहून सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने भारताचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी विलक्षण धैर्याने प्रयत्न करणाऱ्या मॅडम कामाबाईंचे स्थान विशेष महत्त्वाचे ठरते.

स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात केंद्रिय शासनाकडून मॅडम कामा यांचे यथोचित संस्मरण करणे अगत्याचे ठरते.

❑❑❑

# ‘प्रसिद्धी झोतातली गुणी अभिनेत्री’

# प्रिया मराठे (पृ.२७७)

**मुलाखतकार - डॉ.सुमेधा मराठे**



आज टि.व्हि. चा प्रभाव जनमानसावर प्रचंड पडलेला आहे. या दूरदर्शन वाहिन्यांवरील विविध (सिरीयल्स) मालिकांमधे प्रेक्षक इतके गुंतून गेलेले असतात, लहान मुलांपासून ते म्हाताऱ्याव्यक्तीपर्यंत एकाच खोलीत ई.टि.व्ही. किंवा झी टि.व्ही. चॅनेल्सच्या मालिका एका पाठोपाठ एक कंटाळा येऊ न देता तन्मयतेने पाहात असतात..... त्या मालिकांमधल्या पात्रांशीही समरस होताना दिसतात. त्यामुळे त्यांचे प्रश्न, त्यांना भिडणाऱ्या समस्या या जणू त्यांच्याच आयुष्यातील भाग आहेत असे त्यांना वाटू लागते. ट्रेनमध्ये, बसमध्ये, ऑफिसमध्ये, लंच टाईम मध्येही टि.व्ही.च्या मालिकांची चर्चा आपापसात चालू असते. टि.व्ही.च्या मालिका हा विषय अनोळखी व्यक्तींमधेही गप्पा मारायला पुरेसा ठरतो.

दूरदर्शनवरील वाहिन्यांचा पगडा आपल्या जनमानसात फोफावत चालला आहे. परवाचीच गोष्ट पहा ना. मतदार यादीत माझे चुकीचे नोंदलेले नाव बरोबर दुरुस्त करायला म्हणून कार्यालयात गेले. तिथल्या कर्मचारी कारकून असलेल्या महिलेने माझी सही घेऊन नवीन भरलेल्या फॉर्मवर डॉ. सौ. सुमेधा मराठे हे नाव पाहिले मात्र आणि लागलीच तिचे डोळे चमकले. विचारले ‘ या सुखांनो या’ मधली प्रिया मराठे कोण ही तुमची ? तिचा अुत्तेजित झालेला चेहरा मला गढूळ करायचा नव्हता म्हणूम मी ही ठोकून दिले, ‘माझी चुलत पुतणी लागते म्हणून !’ ‘तुमच्या घरी येत असेल ना ?’ ‘कधी तरी येते....’ लगेच पुढचा निरोप, आली की कळवा मला प्रियाची सही पाहिजे आहे.’’

....आणि काय गोड योगायोग बघा... खरोखरंच प्रिया मराठेशी गप्पा मारायला, भेटायला श्री. आनंदरावांमुळे जुळून आले.

डायनिंग टेबलवर जेवता जेवता प्रियाने मनमोकळेपणाने, गप्पा मारल्या कुठेही ग्लॅमरस नाही. स्वभावातला साधेपणा भावला.

प्रियाचा जन्म १९८५ चा. कविता, अभिनय, निवेदन, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रांमध्ये ती सहज संचारकरतेय. नवनवीन आशयगर्भ विषयांवरील मालिकांची ती वाट पाहाते आहे. ज्यात तिला आव्हानात्मक भूमिका करायला आवडेल. परिपक्वतेकडे अभिनयाचा प्रवास तिला करायचा आहे. शाळेत असल्यापासूनच ती गॅदरिंगमधे भाग घेत होती. ठाणे कॉलेजात आपल्या अभिनयकलेची चुणूक दाखविली आहे. एकांकिकेत प्रमुख भूमिका मस्तानी सर्वोत्कृष्ट गुणाची अभिनेत्रीचे बक्षिस मिळाले. ‘अभिनयाकडे मी एक छंद म्हणून बघते. या क्षेत्रातील अनिश्चिततेमुळे इथे करिअर करणं धोकादायक आहे. यापुढेही छंद जोपासण्यासाठी अभिनय करेन. अतिमहत्त्वाकांक्षा नाही. प्रियाने एकदा ठरवले, मनावर घेतलं की ती ते पूर्ण करणारच. हा ध्यासच तिला अनेक स्पर्धा, विविध क्लासेस, योगा, अभिनय, शिक्षण विविध प्रांतात ध्येयपूर्तीकडे घेऊन जाईल. यशाच्या जीवनपथावर नेईल. जीव तोडून मेहनत करणं.. सुंदर इम्पॅक्ट येईपर्यंत स्वत:ला झोकून देणं हे तिच्यात स्वभावत:च असलेले गुण आहेत. माधुरी दीक्षित तिला आवडते पण तिच्यासारखे अनुकरण किंवा नक्कल करायला आवडत नाही. स्वत:ची ओळख स्वकर्तृत्वावर ‘प्रिया मराठे’ म्हणून व्हावी यासाठी ती सदैव प्रयत्नशील असते. नशिबाने तिला चांगली साथ द्यावी मेहनतीने ती त्याचं चीज करेल. सार्थ करेल. स्वत:चा समतोल बिघडू न देता तिचं मार्गक्रमण फारच आशादायी वाटतं.

प्रियाचे वडिल कै. सुहास मराठे हे नाट्यप्रेमी होते. त्याच नाट्यप्रेम इतकं विलक्षण होतं की दादरला शिवाजी मंदिरात लागणारं प्रत्येक नवीन नाटक ते पहिल्या दिवशी पहिल्या रांगेत बसून बघत असत. दुर्दैवीने ते आज नाहीत पण वडिलांची उणीव तिची आई आणि मराठे कुटुंबीय प्रियाला जाणवूं देत नाहीत. तिची आई मृदुला मराठे हिचा भक्कम पाठिंबा प्रियाला असतो. पूर्वी त्या नाटकात काम करीत, साहित्यिक गुणही त्यांच्यात आहेत त्याही लेखिका असून अुत्तम नकला करीत, आजही आकाशवाणीवर त्यांचे कार्यक्रम होत असतात. तेव्हा अशा रसिक, गुणी आईवडिलांचे गुण अुपजतच प्रियाच्या व्यक्तिमत्वात साकारले. तर त्यात नवल ते काय ?

शाळेत स्पोर्टसडेच्या निमित्ताने व पुढे कॉलेजात वेगवेगळ्या एकांकिका स्पर्धांमध्ये प्रियाने अभिनयाला सुरुवात केली. प्रियाने 'बाजीराव मस्तानी' नाटकातील साकारलेली मस्तानी तिच्यातील अंगभूत सौंदर्याने खुलून दिसली. फेअरी टेल, कौन संगे बाधे डोर, अल्फा करंडकसाठी बाजीराव मस्तानी अशा विविध विषयांवरील एकांकिका मधून महत्वाची भूमिका साकारून 'MENTOS FRESH MAKER OF THE CITY' हे बक्षिस तिने पटकाविले.

## सोनेरी क्षण

प्रियाला कॉलेजमधे राहुल प्रॉडक्शनतर्फे दूरध्वनी आला. त्यांना 'या सुखांनो या' या मालिकेसाठी शांत, सोज्वळ, संस्कारी, सात्विक दिसणारी कॉलेजयुवती हवी होती. घरंदाज, खानदानी मराठे कुटुंबातील प्रिया त्यांना योग्य वाटली आणि तिची या मालिकेसाठी निवड झाली. विशेष म्हणजे प्रियाच्या मागे कोणी गॉडफादर नसताना, कोणाचाही वशिला नसताना तिच्या अंगभूत गुणवत्तेला मिळालेली ती सर्वश्रेष्ठ अशी दाद (पावती) होती. तो दिवस होता २५ ऑक्टोबर २००५. तिच्या आईला आणि घरातील सर्वांना तो दिवस फार आनंदाचा वाटला. प्रियाला तर सोनेरी क्षणांचा सोबती असा दिवस तिच्या आयुष्यात आल्याचे जाणवले. प्रियाचे श्रद्धा स्थान म्हणजे घंटाळी देवी. तिने अंधेरीला शुटिंगला जाण्याआधी घंटाळी देवीचे दर्शन घेऊन देवी पुढे साखर ठेवली आणि तिचे कृपाशिर्वाद मिळविले.

## प्रियाचा भाग्ययोगही विलक्षण

देवीचा वरदहस्त असल्यावर प्रियाच्या भाग्ययोगाला काय कमी? तिचा पहिलाच शॉट अभिनयसम्राट श्रेष्ठ अशा विक्रम गोखले या नामवंत दिग्गजांबरोबर होता. प्रिया मनातून खूप घाबरली होती. ''जराही घाबरू नको. तुला ज्याप्रमाणे करावासा वाटेल तसा हा सीन कर. माझा, तुझा, सर्वांचा अभिनय सहजपणे झाला तर तो सीन प्रेक्षकांच्या हृदयापर्यंत पोहोचतो'' असे विक्रम गोखल्यांनी सांगताच प्रियाच्या मनावरचे दडपण दूर झाले. मनावरचा ताण गेला. याप्रमाणे रुपेरी पडद्यावरील प्रियाच्या वाटचालीचा शुभारंभ चांगला झाला.

कॅमेराच्या तांत्रिक बाबी, चित्रीकरणाची भाषाशैली यांचा अभ्यास प्रियाने केला. हळूहळू सहकलाकारांच्या ओळखी झाल्या. सेटवरच्या घरेलु वातावरणात प्रियाला आवडू लागले. पडद्यावरची कस्तुरी - शर्वरी लोहकरे तिची खास मैत्रीण झाली.

## प्रसिद्धीचा झगमगाट

'या सुखांनो या' या मालिकेमुळे प्रिया अनेक प्रेक्षकांच्या घरात जाऊन पोहोचली. सर्व नातेवाईकांनी, घरातल्यांनी, परिचितांनी, मित्रमैत्रिणींनी तिच्यावर कौतुकाचा पाऊस पाडला. स्वाक्षरी घेण्यासाठी आसुसलेले हात, एकाने प्रियाची स्वाक्षरी घेतली तर त्याने तिला थॅंक्यू म्हणायच्या आधी प्रियाने त्याला धन्यवाद देऊन टाकले. बसमध्ये, प्रवासात तिला आता ओळखू लागले.

प्रिया मॉडेलिंगही करते. तिच्या वंदनाकाकूच्या आग्रहावरून पोर्टफोलिओ तयार केला आहे. आशीष, सोमपुरा यांच्याकडे फोटोसेशन केल्यामुळे तिचा चेहरा चित्रलेखा, चारचौघी, प्रियदर्शिनी अशा मासिकांवर झळकू लागला आहे. मराठे प्रतिष्ठानच्या 'हितगुज'वर सुहास्यवदना प्रिया विराजमान झाली आहे.

**'या सुखांनो या' मालिकेत अेक शॉट होता. श्रीदत्ताच्या तसबिरीसमोर अुभे राहून ती दादांना अपशब्द बोलते (चक्क शिव्याच देते म्हणा ना!) प्रियाच्या मुळ स्वभावाविरुद्ध असे काम करायला तिला जड जात होते कारण चांगले संस्कार तिच्या मनात इतके खोलवर रुजलेले होते. पण अेक क्षणभरच तिने विचार केला आणि पुन्हा त्या भूमिकेशी समरस होऊन तिने तो 'शॉट' प्रभावशाली, अप्रतिम साकारला इतका की विक्रम गोखलेंना तिला शाबासकी दिल्याशिवाय राहावले नाही.**

'कसमसे' या हिंदी मालिकेतही ती काम करते. 'गंगूबाई नॉनमॅट्रीक', 'कळत नकळत' मध्येही तिने काम केले आहे. अजूनही तिला बरेच रोल मिळणार आहेत. प्रियाच्या अभिनयाची चढती कमान वाढणारच आहे. वाट्याला येणाऱ्या प्रत्येक भूमिकेला ती योग्य न्याय देऊन ती भूमिका जिवंतपणे वठवते, हे प्रियाचे वैशिष्ठ्य. शरीर आणि मन यांचे आरोग्य सांभाळण्यासाठी प्रिया योग करते. वरळीच्या जॅपनीज शाळेत योगासनांचे प्रात्यक्षिक तिने दाखविले आहे. त्याप्रमाणेच योगाचार्य श्रीकृष्ण व्यवहारे यांच्या 'अथ ध्यानम्' मध्ये तिने केलेल्या योगासनांच्या फोटोंचा समावेश केला आहे.

## शैक्षणिक यशातही मागे नाही

प्रियाला अभ्यासाची आवड आहे त्यामुळे शैक्षणिक कारकीर्द फर्स्टक्लास करिअर अुत्तम आहे. ठाण्याच्या बांदोडकर कॉलेजातून बीएस.सी. फर्स्टक्लास झाली आणि माटुंग्याला वेलिंगकर इंस्टिट्यूट मधून अेमबी.अे करीत आहे. इंग्रजी वाचनाची तिला आवड आहे. रोज दैनंदिनी लिहिते. प्रियाची ही सर्व विजयी वाटचाल पाहताना 'कल्पवृक्ष कन्येसाठी लावूनिया बाबा गेला.... वैभवाने बहरून आला याल का हो बघायला....'' या गाण्याच्या ओळी सहजपणे ओठावर येतात. मराठे प्रतिष्ठानतर्फे प्रियाला तिच्या भावी यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

**- डॉ.सौ. सुमेधा प्रभाकर (पृ.१२०)**
**संपादिका (हितगुज)**

❑❑❑

## मराठे परिवार कट्टा

हितगुजतर्फे स्थानिक पातळीवर नियमितपणे काही छोटे छोटे कार्यक्रम आखावेत. जसा एखादा संवाद गट असतो. ज्यात सहभागींना स्वत:ला व्यक्त व्हायला (अत्रे कट्ट्याप्रमाणे), बोलायला संधी मिळेल, ज्यामुळे लोक अंकात अधिक रस घेऊ लागतील; लोकांचा एकमेकांशी परिचय व संवाद होईल. असा एखादा उपक्रम सुरू करण्याचा मानस आहे. अन्यथा वार्षिक मेळाव्याखेरीज लोक एकमेकांना भेटतच नाहीत. मेळाव्याला येणे प्रत्येकाला शक्य होतेच असे नाही. त्या दृष्टीने हा उपक्रम उपयोगी ठरेल. यातून नवीन कार्यकर्तेही तयार होतील. याबाबत वाचकांनी त्यांच्या कल्पना हितगुजकडे पाठवाव्यात.

यासाठी कृतिशील वाचक-सदस्यांनी आपल्या ideas पाठवाव्यात. जर कुणाचे घर मोठे असेल तर तिथेही असा कार्यक्रम आपण घेऊ शकतो. हॉल वगैरे घेण्याची काही गरज नाही. अशा एखाद्या स्थानिक उपक्रमाला प्रतिष्ठानचे केवळ उत्तेजन व प्रसिद्धीच नव्हे तर सक्रिय मार्गदर्शन व सहाय्यही मिळू शकेल.

***- सहसंपादक***

# स्वयंसेवक - एक अनुभव

**- सौ. रोहिणी विजय मराठे**

वृद्धांनी कसे वागावे ? याबद्दल साध्या सोप्या सरळपणे व्यवहारातील गोष्टींची चर्चा करायची म्हणजे ज्यांनी अनेक उन्हाळे पावसाळे अनुभवलेले आहेत. चांगले वाईट अनुभव घेतले आहेत. खूप कष्ट केले आहेत. अशांना कसे वागायचे हे सांगणे म्हणजे अतीच होत आहे. नाही कां ? त्यांची कैफियत अशीआहे की, आम्हांला सांगण्यापेक्षा तरुणांना वृद्धांशी कसे वागावे हे शिकवण्याची गरज निर्माण झाली आहे. आम्ही जीवनात खूप हालअपेष्टा सोसल्या आहेत काटकसरीने राहिलो आहोत.

आमच्या लहानपणी वडिलधाऱ्या माणसांबद्दल मनात आदरयुक्त भिती असायची. त्यांच्या संमतीशिवाय कोणतीही गोष्ट करत नव्हतो. त्यांचा शब्द प्रमाण असायचा शिस्त कडक असायची. हे वृद्धांनी सांगितलेले खरे आहे. पण आता काळ बदलला आहे. वर्तमानकाळात जगायचं असेल तर खूप गोष्टीत बदल करावा लागेल. आपल्या सवयी बदलल्या पाहिजेत. मतं बदलली पाहिजेत. राहणीमान बदलले पाहिजे. तुमच्या वेळच्या गोष्टी भूतकाळात गेल्या. मुले वर्तमानकाळात वावरत आहेत. नातवंडे त्याच्याही पुढेच आहेत. हल्ली आयुर्मान वाढले आहे. त्यामुळे वृद्ध माणसे वय वाढेल तसे आत्मकेंद्रित होतात. माझे सगळ्यांनी ऐकले पाहिजे. मी सांगेन तसे वागले पाहिजे. आपली विचारपूस केली पाहिजे. काय हवं नको ते विचारले पाहिजे. त्यांनी ही अपेक्षा ठेवणे काही गैर गोष्ट नाही. पण अपेक्षा केली आणि त्याप्रमाणे घडले नाही तर निराशा पदरी येते. वाईट वाटते. म्हणून अपेक्षा न ठेवणेंच चांगले. सध्याचा काळ गतीमान आहे. तरुण पिढीकडे वेळ कमी आणि काम जास्त आहे. त्यामुळे त्यांचे दुर्लक्ष होते. सगळ्या गोष्टी घड्याळाच्या काट्यावर चालतात. जर पहिल्या पिढीने दुसऱ्या पिढीला समजून घेतले तर नातेसंबंधातला तुटकपणा नाहिसा होईल. वागण्याबद्दलची काही पथ्ये पाळली तर वार्धक्य सुसह्य होईल. विचारल्याशिवाय सल्ला द्यायचा नाही.

त्यांना काही शिकवायचं नाही. नसत्याच चौकशा करायच्या नाहीत. विशेषत: सासूबाईंनी सूनबाईंना सूचना द्यायच्या नाहीत. सूचना न केल्यास मतभेदांची धार कमी होईल. तसेच वृद्ध पुरुषांनी मुलांशी मित्राप्रमाणे वागावे. म्हणजे त्यांना आपुलकी वाटेल. आदर वाटेल. साधारण साठाव्या वर्षापासूनच वार्धक्याची तयारी करायला हवी. वार्धक्याकडे जातांना बदलणाऱ्या काळाला स्विकारा. अहंपणा सोडा. आम्ही दोघे मिळून कांही वृद्धांना भेटलो त्यांच्याशी संवाद साधला. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. पण शेवटी कुठल्याही विषयाला दोन बाजू असतात. आम्ही दोघे डॉ. शरच्चंद्र गोखले अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय दीर्घायु केंद्र यांच्या संस्थेत स्वयंसेवक म्हणून काम करतो. स्वयंसेवकाचे काम करताना आलेल्या अनुभवातून दोन्ही बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. डॉ. शरच्चंद्र गोखले यांनी जेष्ठांच्या मदतीसाठी सामाजिक सुरक्षा विभाग पुणे पोलीस आयुक्तालय व आंतरराष्ट्रीय दीर्घायू केंद्र पाषाण पुणे यांच्या मदतीने हेल्पलाईन सुरू केली आहे.

कौटुंबिक ताणतणावांनी त्रस्त झालेल्या, प्रकृती अस्वस्थ आणि त्यात एकाकीपणामुळे असहाय्य झालेल्या, वृद्धाश्रमात प्रवेश घेण्याच्या, स्थावर मालमत्ता किंवा मृत्युपत्रासारख्या कायदे विषयक बाबींबद्दल समस्यांचा सामना करणाऱ्या जेष्ठ नागरिकांना १०९१ ही विशेष नि:शुल्क दूरध्वनी क्रमांक संपर्कासाठी उपलब्ध आहे. ज्येष्ठांच्या समस्यांबाबत वैयक्तिक व कौटुंबिक समुपदेशनाची सोयही उपलब्ध आहे. या सेवेचा लाभ घेण्याकरता सकाळी १०.३० ते संध्याकाळी ५.३० या वेळेत सोमवार ते शुक्रवार संपर्क साधावा.

ज्येष्ठांनी आपला मोकळा वेळ स्वयंसेवक बनून समाजकार्याकरता द्यावा. म्हणजे आपले मन रमेल व गरजूंना मदत मिळेल. संस्थेने आवाहन केले आहे - निवृत्तींनंतरही कार्यक्षम राहण्यासाठी... समाजाचे ऋण फेडण्यासाठी...

''द्यावेत फक्त दोनच तास अन् घ्यावेत समाधानाचे क्षण मनास'' !

*सौ. रोहिणी विजय मराठे*

❑❑❑

## प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळ

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

दि. ११ जुलैला शुक्रवारी दु. ४ वाजता मराठे अुद्योग भवन, प्रभादेवी येथे बैठक झाली. या बैठकीत श्री. भाऊ मराठे (पृ.५०७) आवर्जून अुपस्थित होते. त्यांनी कार्यकारिणीला 'हितगुज' साठी मुलाखती घेत असल्याबद्दलची सविस्तर माहिती सांगितली. संपादिका डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर यांना लवकरच त्या कंपोझिंग करण्यासाठी मिळतील असे सांगितले. प्रतिष्ठानला आलेल्या पत्रांचे वाचन झाले. 'हितगुज'ला जाहिराती मिळविण्याविषयी विचारविनिमय झाला.

दि. ८ ऑगस्टला शुक्रवारी दु. ४ वा. मराठे अुद्योग भवन, प्रभादेवी येथे बैठक झाली. या बैठकीला मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक कै. सुरेश भाऊ मराठे यांचे चिरंजीव श्री. यशवंतराव आवर्जून अुपस्थित होते. त्यांनी कार्यकारिणीशी मनमोकळेपणाने गप्पा मारल्या. मराठे प्रतिष्ठानच्या आगामी योजनांविषयी चर्चा झाली. 'हितगुज' ७५व्या अंकासाठी लेख लिहून देण्याची विनंती मान्य केली. त्याचप्रमाणे या सभेत रविंद्र खांबेटे, ऋता करमरकर या दोन हुषार विद्यार्थ्यांनी शैक्षणिकनिधी मदत मागितली आहे त्या अर्जांचा विचार केला गेला आणि ठराविक रक्कम त्यांना गरज आहे आणि गुणवंत आहेत म्हणून देण्याचे मान्य झाले. हितगुजला जास्तीत जास्त जाहिराती मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत या अध्यक्षांच्या सूचनेला सर्व कार्यकारिणी सदस्यांनी मान्यता दिली. 'हितगुज'चा प्रकाशन कार्यक्रम, हॉल भाड्याने मिळविणे याविषयी महत्त्वपूर्ण चर्चा झाली आणि बैठक संपली.

‘हितगुज’ला हार्दिक शुभेच्छा

# अभय आमडेकर
# “टॉप कलर”

मोबाईल क्रमांक : ९८२००१०३१९

इंग्रजी विभाग

# Twenty 20 Post Match Presentation...

प्रेषक : रमाकांत विद्वंस (पृ.६२३)

Conversation between Ravi Shastri and Dhoni, in the post-match presentation,

Ravi Shastri :"Congratulations to you and the whole Indian team for winning this world cup. You guys have produced a great nail baiting show. and deserves the cup. We welcome you to share the joy with us."

Dhone: "Thanks Ravi, the match was pretty close encounter between two great teams and our guys held the nerve to win the game and cup."

Shastri : "Who was the main reason for this thrilling victory?"

Dhoni: "All us played well but I would say the main reason and man behind this great victory is Ajit Agarkar"

Shocked Shastri: "Agarkar ? ?... how come Agarkar... he didn't played in the final"..

Dhoni: "Yeaph... that's the reason we won this low scoring match... if he could have bowled in final, Pakistan would have scored the winning runs from his 4 overs...."

Shastri: "ok.. fine, To whom you want to thank for winning this final..."

Dhoni: "The team doctor deserves the credit... he really helped us to prepare for the final..."

Shastri: "Is it? ?.... how the doctor helped to prepare for the final.... he is not the coach or physical trainer... I am getting confused"

Dhoni: "Ravi.... nothing to confuse... he has failed Sehwag in the fitness test according to our game plan and we managed to pick a good playing team.. this we weigh the doctor's contribution as very high.... infact its better than our team effort in the field... our game tactic worked well."

Shastri : "To whom you want to dedicate this World Cup?"

Dhoni : "The entire team including myself wants to dedicate this cup to Sachin, Dravid and Ganguly..."

Shastri : "I really really appreciate you... its good that you have so much respect to the seniors... and you..."

Dhoni interrupts : .... "Ravi.. let me complete... India would have exited in the Group matches if they decided to play in the series... thank god they opted out and we managed to play cricket and won the cup.."

Shastri : "The match was thrilling encounter and was concluded by a single mistake of Misbah... Isn't it?"

Dhoni : "Yes you are right, after lofting the ball Misbah told me that he has sent the ball to where there was no one... but he didn't know that there is a malayali in every corner of the world.... The single mistake has coasted the game and won the cup..."

Shastri faints and Dhoni receives the CUP and thats the end of the great Twenty-20 world cup.

❑❑❑

## REASON WHY NEVER VISIT A 5* HOTEL

Conversation between the steward and guest

Steward : "What would Guest like to have. Fruit juice, Soda, Tea, Chocolate, Milo, or Coffee?"

Guest : "tea please"

Steward : "Ceylon tea, Herbal tea, Bush tea, Honey bush tea, Ice tea or green tea?"

Guest : "Ceylon tea"

Steward : "How would Guest like it? Black or White?"

Guest : "White"

Steward : "Milk, Whitener or Condensed milk?"

Guest : "with milk"

Steward : "Goat milk, Camel milk or Cow milk?"

Guest : "with cow milk please"

Steward : "Milk from Freeze land cow or Afrikaner cow?"

Guest : "Um, I'll take it black"

Steward : "Would Guest like it with sweetner, sugar or honey?"

Guest : "with sugar"

Steward : "Beet sugar or cane sugar?"

Guest : "cane sugar"

Steward : "White, brown or yellow sugar?"

Guest : "Forget about tea just give me a glass of water instead."

Steward : "Mineral water or still water?"

Guest : "Mineral water."

Steward : "Flavored or non-flavored?"

Guest : "I'll rather die or thirst."

# आरोग्याचीदिंडी पंढरीची

**- अभय वामन मराठे (पृ.२७७)**

अरे अभय, आज ४ वाजता मंदिरामध्ये, मेडिकल टीमची मिटींग आहे, नेहेमीप्रमाणे सर्व डॉक्टर वेळेवर येतीलच. तेव्हा तू बरोबर ४ वाजता मंदिरात ये !

सकाळीच आईने मला आमच्या मिटींगची आठवण करून दिली व मी पंढरपूरच्या वाटेवरती पोहोचलो देखील !

जवळजवळ वर्षभर आम्ही संबंधित लोकांकडून आम्हाला लागणारी औषधे गोळा करीत असतो, तसेच यात्रेच्या आधी १ महिना काही लोकांशी संपर्क साधून त्यांच्याकडून देणगीस्वरुपात औषधे मिळवत असतो. मात्र काही औषधे आमच्या मंडळाला विकत घ्यावी लागतात. अशा सर्व औषधांची बांधाबांध आम्हाला वेगवेगळ्या बॉक्समधून करावी लागते. मात्र त्याआधी त्या औषधांचे वर्गीकरण करावे लागते. म्हणजे, अँटीबायोटिक्स, ब्लडप्रेशर, डोळे व कानाचे ड्रॉप्स, पेन किलर ट्यूब, ड्रेसिंग मटेरिअल, इंजेक्शनस्, सलाईनसाठीचे आय.व्ही. सेट व बाटल्या वगैरे वगैरे....

यात्रेला निघण्याच्या आदल्या दिवशी, सर्व औषधे, टेंम्पोमध्ये नीट रचून, बांधून ठेवावी लागतात. त्यामधून आम्ही ८-१० जण प्रवास करीत असतो तर दुसऱ्या मॅटॅडोरमध्ये इतर सहकारी व स्वैंपाकाचे सामान न्यावे लागते.

रविवार दि. ६ जुलैरोजी सकाळी ७ वाजता आमच्या दोन्ही चालकांनी ओ.के. म्हटल्यावर आमची यात्रा श्री. ज्ञानेश्वर मंदिर पाचपाखाडी ठाणे येथून पंढरपूर यात्रेमध्ये मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी रवाना झाली.

ह्यावर्षी, नेहेमीच्या सासवडमार्गे न जाता आम्ही लोणंदमार्गे फलटणला जायला निघालो. वाटेत चहा नाश्ता व दुपारी जेवण घेऊन आम्ही ३.३० ला फलटणला पोहोचलो. सासवडमार्गे न जाण्याचा विचार म्हणजे ह्यावर्षी पालखीचा मुक्काम फलटणला एकच दिवस होणार होता.

पालखी म्हणजे श्री ज्ञानेश्वर महाराजांची पालखी सर्व वारकरी भक्तांच्या माऊलीची



**श्री.अभय वामन मराठे**

पालखी... चांदीच्या डौलदार रथाला पांढऱ्या खिल्लारी जोडीने ओढून नेणारी पालखी.... सर्वात पुढे माऊलीचा घोडा व सनईचौघड्यांनी, लोकांना वाट करून देण्यास सांगणारी, व्यवस्था असलेली पालखी.... असा न्याराच थाट....

पालखीचे मुक्काम त्या प्रत्येक तिथीप्रमाणे त्या गावाला होत असतात व ठरलेल्या जागेवरच होत असतात. इतकेच कशाला, पालखीबरोबर भाग घेणाऱ्या सर्व दिंड्याचे मुक्काम देखील ठरविलेल्या जागेवरच होत असतात. अर्थात आमच्या मेडिकल कॅम्पच्या जागासुद्धा ठरलेल्याच असतात. तेथेच आम्ही आमच्या श्री ज्ञानदेव सेवा मंडळातर्फे गेली २२ वर्षे मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देत आहोत. सर्व माऊलीची कृपा !!

फलटणपासून वाखरीपर्यंत पालखीच्या मुक्कामानुसार आम्ही आमच्या कँपच्या जागा ठरविलेल्या आहेत. फलटणला ३.३० ला दुपारी पोहोचल्यावर बरोबर ४.३० ला आमचा कँप सुरु झाला. अर्थात पहिल्या दिवसाचे बॉक्सेस आम्ही वेगळे बांधून घेतले असल्यामुळे लगेचच कँपला सुरुवात करू शकलो.

आमच्या कँपचा पसारा तसा बऱ्यापैकी मोठा असतो. म्हणजे प्लॅस्टिकची २ मोठी किंताने आम्ही सपाट जागेवर, रस्त्याच्या कडेपाल घालतो. त्याच्या मध्यभागी औषधांचे बॉक्सेस ठेवतो. २ बाजूंना वारकरी लोकांना तपासण्यासाठी १-१ डॉक्टरांची व्यवस्था असते तर त्यांना प्रत्येकी १-१ मदतनीस असतो. बी.पी. ॲपरेटस वेअस एक डॉक्टर असतात तर दुसऱ्याबाजूला ड्रेसींगसाठी व इंजेक्शनसाठी आम्हाला बरीच जागा लागते. तेथे २-३ डॉक्टर काम करीत असतात. डिस्पोजेबल निडल व सिरींज आणि ड्रेसिंगचा कचरा म्हणजे कापूस, वायला, ट्यूब, डेटॉलच्या रिकाम्या बाटल्या, सलाईनच्या बाटल्या स्पिरीट यासाठी आमच्या २ मोठ्या बॉक्सेस तयार असतात. तो योग्यप्रकारे आम्ही विल्हेवाट लावीत असतो ! एक दोघे जण संपलेल्या औषधांचे रिकामे बॉक्स उचलून त्याजागी नवीन औषधे, टेंम्पोमधून काढून देण्याचे काम करीत असतात. इतकेच काय तर महिलांची व पुरुषांची वेगवेगळी रांग लावणे व त्यांच्यावर देखरेख ठेवणे इत्यादी काम आमचे चालक स्वखुषीने करीत असतात....

अस्मादिकांची स्वारी मात्र ह्या व्यवस्थेत काही कमी जास्त बघण्याची जबाबदारी सांभाळत असते. थोड्यावेळाने, डॉक्टरांना बदली डॉक्टर उपलब्ध करून देणे, तसेच मदतनीसाला बसून कंटाळाआल्यामुळे पाय मोकळे करायला वेळ देणे.. सर्वांना पाणी, चहा कॉफी व्यवस्था बघणे वगैरे.

फलटणला एका साखर कारखान्याच्या जवळच आम्ही कँप लावत असतो तो जवळजवळ रात्रई ८ पर्यंत. तो आटपल्यावर आम्ही जवळच वाजेगांव येथे रात्रीच्या मुक्कामासाठी गेलो. तेथेच दुसरी दिवशी सकाळी ११ वाजता आम्ही दुसरे कँप चालू सुद्धा केला. तो जवळजवळ ५ पर्यंत. येथे गावातील काही प्रतिष्ठीत व राजकीय मंडळी आमचे काम बघून गेली. त्यांनी आम्हाला काही प्रश्न विचारले. ते खूपच भारावल्यासारखे वाटले. सध्यातरी त्यांनी आम्हाला, पुढीलवर्षासाठी कँपसंदर्भात भरपूर आश्वासने दिली आहेत. बघूया !! माऊलीची कृपा.

सहा वाजता वाजेगांवहून निघून आम्ही थेट पंढरपूरला ९ वाजता पोहोचलो. गर्दी नेहेमीप्रमाणेच भरपूर, तसेच पांडुरंगाचे देऊळ रात्रभर खुले असल्यामुळे आम्ही ११ वाजताच 'मुखदर्शन' घेऊन जाधवजी जेणजी धर्मशाळेत

परत आलो. आमची सेवा बघून ह्या धर्मशाळेचे मालक, ट्रस्टी आमच्याकडून काहीही भाडे घेत नाहीत. उलट दुसरे दिवशीचा नाश्ता त्यांच्यातर्फेच आम्हाला दिला जातो. इतकेच काय गेली २-३ वर्षे स्वत: मालक आमच्याबरोबर २ कँपमध्ये सेवा करण्यासाठी थोडावेळ देऊ लागले आहेत !

पंढरपूरहून सकाळी ११ वाजता निघून आम्ही परत मागे येऊन नातेपुते येथे १ वाजता कँप चालू केला. एका मोठ्या वडाच्या झाडाखाली आम्ही आमचा कँप चालू करतो व विशेष म्हणजे त्या वडाच्या झाडाच्या पारंब्यांचा आम्हाला सलाईन लावायला उपयोग होतो. जवळजवळ १०-१२ सलाईन आम्ही तेथे लावली. ८ पर्यंत काम उरकून रात्री तेथेच मुक्काम करावा लागतो. तर स्त्रियांची व्यवस्था एका शेतामधील घरात केली जाते. जणूकाय फक्त आमच्यासाठी ते घर वारीपुरते उघडले जात असावे, असो ! मला एक गोष्ट नक्की की ज्ञानेश्वर माऊली आपल्या भक्तांची निश्चितच काळजी घेत असते. ह्या मालकाच्या शेतातील विहीरीतून रात्रभर टँकरला पाणीपुरवठा चालू असतो. जवळजवळ १५० टँकर त्यांनी सर्व वारीतील भक्तांसाठी विनामुल्य करून दिले. दरवर्षी प्रमाणेच सरकारतर्फे त्या पाण्याची काळजी ब्लिचींग, क्लोरीन टाकून चांगली घेण्यात येते. जेणेकरून पाण्यामार्फत होणारे रोग पसरवू नयेत. यंदा आम्हाला पोटदुखीचे किंवा पाटाच्या विकाराचे रोगी कमी आढळले. पोट बिघडले की जेवणाचे हाल, त्यामुळे चालताना अशक्तपणा, म्हणून पाय, गुडघे दुखणे वगैरे मात्र आमच्याकडे ह्या सर्वांसाठी अगदी प्रभावशाली औषधे उपलब्ध असतातच. अगदी सलाईन सुद्धा !!

दुसरे दिवशी सकाळी शेतातील विहीरीवर पोहायला मिळाले. काठावरून उड्या मारल्या - सूर मारले. सर्वांचा शिणवटा दूर झाला. सर्वजण फ्रेश झालो !! पुढील कँप माळशिरस येथे ११ वाजता चालू केला. तो बरोबर ८ वाजता कँप संपला. न थांबता न थकता मध्ये जेवणाच्यावेळी २-२ जण जाऊन पोळीभाजी खाऊन पुन्हा कामाला सुरुवात करीत. कोणत्याही परिस्थितीत सेवा थांबवायची नाही असा आमचा शिरस्ता ! आमच्या सोबतच्या महिला वर्गाला अनेक धन्यवाद !! येथे तर एका गॅरेजमध्ये आमच्या बरोबरच्या स्त्रियांनी स्वैंपाक केला, इतकेच काय तर रात्री मुक्कामसुद्धा तेथेच करावा लागला. अर्थात आमचा मुक्काम मात्र त्याच झाडाखाली तेथे आम्ही सकाळपासून रात्रीपर्यंत कँप लावला होता.

येथे पाण्याचे फारच दुर्भिक्ष जाणवले. रात्री १० वाजता पाणी संपले व सकाळी फक्त ७ पर्यंत पाणी उपलब्ध झाले. कारण नंतर लाईट नसतात म्हणून पंप बंद असतो. अर्थात आमच्या बरोबरच्या सर्व डॉक्टरांनी, सहकाऱ्यांनी सेवाभावी वृत्तीमुळे अशा प्रकारच्या अडचणींकडे काणाडोळा केला.

पुढील कँप वेलापूर येथे असतो. म्हणजे ह्या जागेला धावा म्हणून वेगळेच महत्त्व आहे. त्याला थोडीशी पार्श्वभूमी अशी आहे की संत तुकाराम महाराज पांडुरंगाला भेटायला, दर्शनाला उशीर होऊ नये म्हणून खरोखरच धावत जातात. अगदी अनेक वारकरी त्या उतारावरून धावतच जातात. अर्थात काही भक्तगण पाऊसामुळे रस्ता ओला झाल्यामुळे, गर्दीमुळे पडतात अडखळतात. त्यांना ताबडतोब आमच्या कँपवर उपचार होतातच. वेळापूर येथेच अनेक दिंड्यामधून भारुडे सादर केली जातात ! तशी ती प्रथाच आहे. संत एकनाथ महाराजांची अप्रतीम भारुडे त्यातील आशय, त्यांचे सादरीकरण तेथील वातावरण... ठाण्या मुंबईचा माणूस एकदम फ्रेश होतो....

त्या दिवशीच्या रात्रीचा मुक्काम आमचा गांदेगाव येथे असतो. मुख्य रस्त्यापासून हे ५-६ किलोमीटर आतल्या बाजूला असलेले गांव. येथील मळ्यात असलेले घर म्हणजे आम्ही सर्व जणांना घरी आल्यासारखेच वाटते. आमच्या मंडळातील जुन्या कार्यकर्त्यांनी फारच चांगली व मस्त जागा शोधून काढली आहे. मोकळे मैदान, सिताफळ व पेरुच्या बागा, पाण्याचा मोठा हौद, दुभती जनावरे, कापायला तयार झालेला उस आणि ह्या सर्वांच्या राखणीला असणारा त्यांचा वाघ्या कुत्रा....

सकाळी ९ वाजता निघून भंडीरोगाव येथे ११ वाजता कँप चालू केला. हा कँपसुद्धा रात्री ८ पर्यंत केला. अर्थात बरोबर पोळीभाजीची व्यवस्था चोख होतीच. ह्या कँपवर आम्हाला एक वारकरी भेटला त्याचे वय होते फक्त ११२ वर्षे. विशेष म्हणजे तो चालत पंढरपूरची वारी करीत होता. थोडासा चालताना दम लागणे, आणि ऐकायला कमी येणे एवढेच त्याचे प्रॉब्लेम होते. बाकी सर्व व्यवस्थीत. आमच्या डॉक्टर्सनी त्याचे बी.पी. चेक केले. एकदम नॉर्मल. जुजबी गोळ्या व टॉनीकची बाटली घेऊन त्याचे समाधान झाले. मात्र आम्हा सर्व ग्रुपनी त्याच्याबरोबर फोटो काढून ठेवला. जणू काय आम्हाला पांडुरंग भेटल्याचाच आनंद झाला....

रात्रौ परत गावेगांव येथे मुक्काम. ही आमच्या प्रवासामधील शेवटची रात्र. नवीन काही सहकारी, डॉक्टर एकमेकांचे पत्ते, फोन नं. घेण्यात मशगुल तर जुने कार्यकर्ते फुटून कोठे व कधी भेटायचे ठरवण्यात मग्न ! बाकी रात्रभर आतापर्यंतच्या आलेल्या अनुभवांची देवाणघेवाण. येथे दुसऱ्या दिवशी सकाळी पुसेगांव येथून एक दिंडी येते. त्या गावाहून निघालेली ही दिंडी दुसऱ्या दिवशी वाखरी येथे इतर सर्व दिंड्यांना मिळत असते. आमच्या मळ्याच्या मालकांतर्फे सर्व दिंडीला जेवण दिले जाते व आम्ही त्यांच्या आरोग्यसेवा उपलब्ध करून देतो कारण, पुसेगांवहून निघाल्यावर जावेगांवइथे एक मोठे गांव लागते.

एव्हाना दुपारचे ३.३० वाजलेले असतात. आम्हा सर्वांचे सामान व उरलेल्या औषधांच्या बॉक्सेसची बांधाबांध झालेली असते. गावेगांवच्या मालकांचा निरोप घेऊन वाटेत पुणे येथे ९.३० वा जेवून रात्रौ १ वाजता आमच्या दोन्ही गाड्या श्री ज्ञानेश्वर मंदीर ठाणे येथे पोहोचल्या.

खरोखरच, पुढील वर्षभर पुरेल एवढी शक्ती आम्हाला या आठ दिवसांत मिळालेली असते. प्रत्येकजण निरोप घेताना पुढल्यावर्षी मला यायला मिळू दे. सेवा करायची संधी मिळू दे. अशी प्रार्थना श्री ज्ञानेश्वरचरणी करीत आपापल्या घरी परतलेला असतो !!

❑❑❑


गोड साखरेची कहाणी वाचण्यासाठी प्रत्येक कुलबांधवाने आवर्जून वाचावे असे अभ्यासनीय तरीही गोड पुस्तक

**'साखर संघातील माझी वाटचाल'**

**मूल्य : १०० रुपये फक्त**

लेखक - श्री. मोहन सदाशिव मराठे (माजी कार्यकारी संचालक)
महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई (१९७१-१९८७)
राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ नवी दिल्ली (१९८७-२०००)
संपर्कासाठ पत्ता - ५, रामभुवन, अहिंसा मार्ग, खार (प.) मुंबई-४०००५२.
दूरध्वनी - ०२२-२६४६४३५१, ९८१९९६४७६५

‘हितगुज’ला हार्दिक शुभेच्छा

# प्रसाद महाडकर

# ‘‘जीवनगाणी’’

मोबाईल क्रमांक : ९८९२०२९५३१

# कै.चिंतामण बळवंत निबंधस्पर्धा पारितोषिकप्राप्त निबंध

# माझा परिवार

ज.गो. मराठे, ३०४ ॐ रिद्धी सिद्धी अपार्टमेंट, पद्मण नगर, आगाशी ४०१३०१
दूरध्वनी-२५०/२५८८६९५

परिवार हा एक गोड अर्थवाही, शब्द आहे. परि+वृ (वेढणे) परि म्हणजे भोवती. 'परिघ' असा एक शब्द आहे. त्याचा अर्थ वर्तुळ. कंपासाने वर्तुळ काढताना कंपासाचे एक टोक कागदावर स्थीर रहाते. तिथे बिंदू बनतो व भोवती ठराविक अंतरावर पेन्सिलीचे टोक घासत जाते त्यामुळे वर्तुळाचा परिघ तयार होतो. तळ्यांतील निवांत पाण्यांत - अगदी लहानसा खडा टाकला तरी त्यामुळे सुंदर वर्तुळे वाढत जातात. निव्वळ काठावर बसून त्या तरंगाकडे पहाणे सुद्धा आनंद दायी असते. परिवार व परिघ हो दोन्ही शब्द जवळचे वाटतात. मानवी जीवन हे एक सुंदर कमळ आहे आणि त्याभोवती येणारे तरंग पारिवारिक आहेत.

मनुष्य हा समाजांतच जन्मतो, वाढतो व संपतो. अगदी जन्मापासूनच त्याचा परिवार जन्म घेतो. किंबहुना या परिवारापासूनच माणसाची ओळख होते. मी परिवारांत जन्माला येतो यांत माझी अशी काही कर्तबगारी नसते पण मी मोठा झालो की दुसऱ्या परिवारातील एक व्यक्ती मी मला जोडून घेतो. या एकत्र येण्याच्या क्रियेला परिवारांतील अनेक व्यक्ती येतात व माझा स्वतंत्र परिवार करायला आशिर्वाद अनुमती देतात. इथेंच आपण एकापरी परिवारांतून वेगळे होतो. व स्वत:चा वेगळा परिवार सुरु करतो. इथूनच पुढे माझा असा स्वतंत्र परिवार तयार होतो. आपली मुले, जावई, सुना, नातवंडे व त्यांचे सगे सोयरे यामुळे माझा परिवार तयार होतो. माझा परिवार म्हणताना तो आमचा परिवार असतो. वास्तविक आमचा परिवार हा शब्द तेवढासा बरोबर नाही. तो माझाच परिवार असायला हवा.

५०/६० वर्षांपूर्वी परिवार शब्दांचा अर्थ जरा वेगळा होता. त्यावेळी गांवात घरे थोडीच होती. एकेका घराच्या आढ्या खाली १००/२०० माणसे रहात आणि त्याला एकच कुटुंब म्हणत. सगळे एकत्र काम सगळे एकत्र जेवत आणि सगळेच एकमेकांच्या सुखदु:खाशी जोडलेले असत. तिथले सगळे व्यवहार कुलधर्म, कुलाचार असत. म्हणूनच त्यावेळी परिवार शब्दाचा अर्थ आपले 'कुल' असा होता. जे काही करायचे ते कुलासाठी. सगळ्या साठी, कुलदेवता एक, उपासनी एक, व्यवसाय एक असे ते सर्वांचे ऐक्य साधणारे संकुल होते. आज संकुल शब्द आहे पण त्यांत अपार्टमेंट आहे. त्यात फक्त एक जिना तेवढाच सगळ्यांचा आहे बाकी सगळें स्वतंत्र आहे.

वैदिक काळ जाऊ दे पण आपली गोत्रे, ज्यांच्या नावांनी आहेत ते ऋषी हे असेच केव्हां तरी कुलगुरु होते. नंतरच्या काळांत ते कुटुंब प्रमुख झाले (कुटुंब मध्ये कु आहे हं) आणि त्यांनी आपल्या कुटुंबाचे सर्वस्वाचा त्याग करून रक्षण केले. म्हणून ज्याच्यासाठी प्राणद्यावा असे. आपल्या भोवतीचे वर्तुळ म्हणजे परिवार म्हणजे मोठे कुटुंबच होते. कुल किंवा कुटुंब केवढे वाढावे तर वैदिक विचार वसुधै व कुटुंब कं, म्हणजे सगळ की पृथ्वी (भू) कुटुंब व्हावी !

व्यक्ती, कुटुंब, कुल, ग्रांम व राष्ट्र हे पांच परिवार होते. पण हे वाढलेले विश्व कुटुंब व त्यांचे आदर्श टिकले नाहीत. वाढ व संकोच हे दोन्ही धर्म वस्तूला असतात. तसे विश्वकुटुंबाचा संकोच सुरू झाला आणि याची सुरुवात साधारण इंग्रजी शासनानंतर सुरू झाली औद्योगिक क्रांती व व्यक्ती स्वातंत्र्य यामुळे सगळी घडी विस्कटत गेली. त्याबरोबर सगळ्या संकल्पनाच बदलल्या. त्यात 'कुटुंब छोटे सुख मोठे' हे राष्ट्रीय धोरण व तसा व्यवहार आला आणि परिवार म्हणजे नेमकं काय व तो केवढा याच्या व्याख्या बदलल्या.

जुन्या विचारांचे लोक आपल्या परिवार कल्पनेचे कुलवृत्तांत तयार करू लागले. तो एक परिवार म्हणजे कुलरक्षणाचा प्रयत्न होता. पण त्यामुळें काही विशेष साधले असे वाटत नाही. पुढच्या ३०/४० वर्षांत पुन्हा एकदा या कुल रक्षणाच्या अभिमान्यांनी उचल खाली. कुलवृत्तांत संपादन केले व त्याच्या आधारे एक परिवार तयार करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यांतून संम्मे लने सन्मान, सत्कार, प्रोत्साहन त्यासाठी मुखपत्र इ. अनेक उपक्रम उभे राहिले. त्याच बरोबर कार्य विशेषत्वामुळे अनेक परिवार तयार झाले. उद्या गीता परिवार. थोडक्यांत परिवार शब्दाला संख्या हा शब्दाचा अर्थ आला. इथे आर्थिक व्यवहार ही आला. अर्थाशिवाय परिवार कसला. 'जोवरी पैसा तोवरी बैसा' ही रीत पूर्वी होती आज आहे व उद्या रहाणार आणि अर्थ म्हटला की तिथेंच अनर्थाचा सुरवात होते. आज तर पूर्ण अर्थवादी जग होत असताना केवळ पैशासाठी जवळ येणे गरजेचे आहे. तेही काही थोड्या लोकांना. गरिबाला स्वाभिमान आहे त्याला नाइलाज म्हणून परिवार हवा. श्रीमंताला मिरवण्यासाठी परिवार हवा यांत प्रत्येकाने मला परिवार हवा का? हवा तर तो कोणता? त्यात माझा फायदा काय? असे अनेक प्रश्न पडतात. त्यांतूनही मी परिवारिक विचार करीत असेन तरी माझे पारिवारिक (पत्नी मुळे) हे तसाच विचार करतात असे नाही. म्हणून माझा परिवार मला स्वत:ला प्रिय असला तरी त्याला मर्यादा आहेत. ती कल्पना अती ताणणे मला परवडत नाही.

माझी परिवाराची परवड ही अशी आहे.

❑❑❑

**प्रतिष्ठान वृत्त**

मराठे प्रतिष्ठानची बैठक शुक्रवारी दि. २६ जून २००८ ला दुपारी ४ वाजता प्रतिष्ठानचे माननीय अुपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांच्या निवासस्थानी झाली. कार्यकारिणीचे सदस्य मोठ्या संख्येने अुपस्थित होते. नेहमीप्रमाणे कार्यवाहांनी अहवालवाचन केले. प्रतिष्ठानकडे आलेल्या पत्रव्यवहारावर विचार विनिमय झाला. 'हितगुज' वेळेवर निघावा यावर गंभीरपणे चर्चा झाली. त्याचप्रमाणे 'हितगुज' च्या ७५ व्या अंकाचे स्वरुप कसे असावे यावर काही गोष्टी निश्चित करण्यात आल्या. पाहुणे संपादक (गेस्ट एडिटर) श्री. भाऊ मराठे यांची निवड करण्यात आली. मराठे कुळातील अनेक कर्तबगार व्यक्तींच्या मुलाखती ते 'हितगुज' साठी घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. 'हितगुज' साठी जास्तीत जास्त जाहिराती मिळविण्याचे ठरले. अन्य काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले. चहापाना नंतर बैठक संपली.

● प्रकाशझोत

## सौ. अश्विनी कृष्णकांत मयेकर माहेरची अश्विनी अरविंद मराठे

(पृ.२१२)



**सौ. अश्विनी कृष्णकांत मयेकर माहेरची अश्विनी अरविंद मराठे**

(मराठे प्रतिष्ठानचे भूतपूर्व अध्यक्ष श्री. अरविंदराव यांची सुकन्या)

जन्म तारीख १३ मार्च १९६८ वय ४० वर्षे

शिक्षण - एस.एस.सी ला ८९.८६ टक्के.

पुढे मराठी आणि सौंदर्यशास्त्रात, एम.ए., एल.एल.बी. (जनरल), सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम या विषयात अश्विनीने ६७% मार्कस् कॉलेजात तिसरी आली.

मुंबई तरुण भारत मध्ये २ वर्ष संपादकीय विभागात काम. वर्तमानपत्राच्या रंगीत पानांचं आणि रविवार पुरवणीचं संपादन. २००१, २००२ च्या मुंबई तरुण भारतच्या दिवाळी अंकाचं संपादन दोन्ही अंकांना पुरस्कार.

साप्ताहिक विवेकमधून 'आम्ही सावित्रीच्या लेकी' हे सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या, महाराष्ट्रातल्या विविध भागांतल्या महिलांवर २ वर्षे सदर. त्यानंतर वेगळ्या क्षेत्रात करियर करणाऱ्या महिलांवर 'ध्यास नव्या क्षितिजाचा' हे सदर. सकाळ वर्तमानपत्राच्या मुंबई पुरवणीत ३ महिने 'सखी' साठी सदर लेखन.

गेली ५ वर्षे दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर वृत्त विभागात भाषांतरकार - संपादक म्हणून काम. यूएनआय, पीटीआय वरून येणाऱ्या इंग्रजी बातम्यांचे भाषांतर तसेच विविध भागांतल्या वार्ताहरांकडून येणाऱ्या बातम्यांचे पुनर्लेखन करणे. क्वचितप्रसंगी मोठ्या 'स्टोरी'ला आवाज देणे.

डॉक्युमेंटरी, जाहिराती या करीता स्क्रिप्ट रायटिंग (थोड्या प्रमाणात)

डोंबिवलीत स्वत:ची 'ॲड जंक्शन' नावाची जाहिरात संस्था. विविध भाषांतल्या वर्तमानपत्रांसाठी जाहिराती तयार करणे, प्रसिद्ध करणे.

गेली १० वर्षे, ज्ञान प्रवोधिनी या पुणे येथील शैक्षणिक सामाजिक संघटनेचे डोंबिवली येथे काम.

विविध कार्यक्रमांचे सूत्रसंचालन, मुलाखती घेणे तसेच वेगवेगळ्या विषयांवर भाषणे देणे.

(मराठे प्रतिष्ठानचे भूतपूर्व अध्यक्ष श्री. अरविंदराव यांची सुकन्या)


With Best Compliments From :

**S.A. MARATHE**

**PANORAMIC GROUP OF COMPANIES**

**PANCARD CLUBS LIMITED.**

Insured with New India Assurance Co. Ltd.
Central Government Registered Co.

**Wants to Invest Money with Good Returns.**

Invest money in 3,6,9 year's / Pension Plan Quarterly and Monthly and get returns One and Half time, Double Triple of your Investment respectively. Besides this get Medium, Accidental Death Insurance from New India Assurance Co. Ltd. on you Investment absolutely free.

**DONT WASTE TIME**

Invest Good amount

For Details Contact :-

**Shri. S.A. MARATHE**

Mob.: 9326077413, 9960816767

# ‘गीतेतील यज्ञ संकल्पना’

सौ.माधवी कमलाकर जाईल, आदित्य नाकोडा इन्क्लेव्ह फेज-२, पुणे-४११०३०

वेद कालातील धर्म यज्ञ प्रधान होता. निरनिराळ्या प्रकारच्या कामना पूर्ण व्हाव्यात यासाठी निरनिराळे यज्ञ वेदांमध्ये सांगितले होते. धर्माच्या दृष्टीने आवश्यक आचाराचा भाग म्हणून नित्यकर्मरुप असेही काही यज्ञ होते. यज्ञ म्हणजे मुखाने विशिष्ट मंत्राचा उच्चार करून पवित्र अशा होमाग्नीत इष्टदेवतांच्या नावाने आहुती टाकणे असा अर्थ डोळ्यासमोर येतो. गीतेच्या दृष्टीने पूर्वापार चालत आलेला धर्म यज्ञप्रधानच होता. क्षत्रियांनी करावयाचे असे अश्वमेघ किंवा राजसूय यज्ञ सांगितले होते. पण गीतेतील यज्ञसंकल्पना म्हणजे -

***गीताया यज्ञशब्दस्तु कर्तव्यकर्म वाचक: ।***
***पालनीयस्ततो यज्ञो निष्कामैर्मानवैः सदा ।।***

गीतेच्या श्लोकांचा विचार केल्यास हे सिद्ध होते की निष्काम भावाने केलेल्या शास्त्रयुक्त सर्वच शुभ कर्मांचे नाव ‘यज्ञ’ आहे.

भगवान म्हणतात की मनुष्याने केवळ यज्ञासाठीच केलेली सर्व कर्मे ब्रह्मार्पण भावनेनी केली की ती त्याच्याच ठिकाणी (आत्मस्वरूपाचे ठिकाणी) लयाला जातात. ती कर्मे बंधन करक होत नाहीत. ज्याप्रमाणे आकाशात अचानक उत्पन्न झालेले पोकळ ढग-वृष्टी न करता लगेच आले तसे नाहीसे होतात. ‘यज्ञयाचरत: कर्म समग्रं प्रविलीयते’ ज्ञानदेव म्हणतात ‘म्हणोनी स्वधर्मानुष्ठान ! ते अखंड यज्ञ याजन। जो करी तया बंधन। काहीची नव्हे. यज्ञा करिता केल्या जाणाऱ्या कर्मांव्यतिरिक्त सर्व कर्मे बंधनकार होतात. ‘यज्ञार्थात् कर्मणोऽन्यज्ञ लोकोऽयं कर्मबंधन:’

गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णानी एकूण बारा प्रकारच्या यज्ञांचे वर्णनं केले आहे. (१) ब्रह्मयज्ञ, (२) भगवदर्पणरुप यज्ञ, (३) अभिन्ततारुप यज्ञ, (४) संयमरुप यज्ञ, (५) विषयहवनरुप यज्ञ, (६) समाधीरुप यज्ञ, (७) द्रवयज्ञ, (८) तपोयज्ञ, (९) योगयश, (१०) स्वाध्याययज्ञरुप यज्ञ, (११) प्राणायामरुप यज्ञ आणि (१२) स्तम्यवृत्ती प्राणायामरुप यज्ञ असे हे बारा यज्ञ

कर्मयोगाची सर्वोच्च अवस्था ब्रह्मयज्ञाच्या स्वरूपात असते. हवन करण्याची क्रिया ब्रह्म हवी ब्रह्म आणि ब्रह्माग्नीत ब्रह्मानेच हवन केले अशा रितीने सर्वकाही ब्रह्मरुप. पहाणारा ब्रह्मालाच प्राप्त होतो. या ब्रह्म यज्ञाशिवाय इतर यज्ञ सांगितलेच आहेत. द्रव्य यज्ञापेक्षा ज्ञान यज्ञ श्रेष्ठ आहे. कारण सर्व कर्मरुप यज्ञाचे पर्यावसान दिव्य ज्ञानात होते. द्रव्य यज्ञ कुंडात ब्राह्मण म्हणून तांदुळ, तूप, समिधा इ. द्रव्यांचे हवन करतात. परंतु ज्ञानमय यज्ञात संयम, स्वाध्याय, तप, प्राणायाम हे अंतरिक चालणारे यज्ञाचे हवन असते. तेथे अग्नि हवन द्रव्ये अशा जड द्रव्यांची आवश्यकता नसते. हे द्रव्यादी यज्ञ खरे आहेत. पण ताऱ्यांचा डौल जसा सूर्यापुढे चालत नाही. तशी ज्ञानयज्ञाची सर त्यांना येत नाही. ज्ञान यज्ञामुळे त्यांच्या ठिकाणी वैराग्याचे दारिद्र्य दूर होते. विवेकाचा हावरेपणा खुंटतो आणि त्यांच्या ठिकाणी न पहाता आत्मस्वरुप दिसते.

श्रीकृष्ण म्हणतात. - मीच क्रतु, मीच यज्ञ स्वंधा, स्वाहा, मीच मंत्र आज्य अग्नि व आहुती सर्व मीच आहे. जगाचा माता, पीता भ्राता, धाता व पीतामह मीच आहे. सर्वांची गती, सर्वांची भर्ता, प्रभु, साक्षी, निवास उत्पत्ती, स्थिती, प्रलय, निधान आणि अव्ययबीज मीच आहे. याचे ज्ञान प्राप्त होते, म्हणून परमतत्व प्राप्तीचे सर्व उपाय गीतेच्या ‘यज्ञ’ शब्दामध्ये येतात. गीतेचा ‘यज्ञ’ शब्द इतका व्यापक आहे की यात दान, तप तीर्थ व्रत होम इत्यादी सर्वच शास्त्रयुक्त शुभकर्मे येतात. म्हणून भगवान अर्जुनाला म्हणतात. एवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे’ या सर्व यज्ञांना तू कर्मजन्य समज, असे जाणल्याने तू मुक्त होशील’ जन्म कर्मच मे दिव्यम। भगवान म्हणतात माझे जन्म आणि कर्म दिव्य आहेत. त्यात ते म्हणतात - मी सृष्टी आदीचा कर्ता असूनही तू (अर्जुन) मला अकर्ता समज कारण कर्मफलात माझी इच्छा नाही. म्हणून कर्मे मला बंधनकारक होत नाहीत. अशा प्रकारे मला तत्वत: जाणणारा ही कर्मांनी बांधला जात नाही. जो माझ्याप्रमाणे कर्तृत्वाभिमान आणि फलासक्ती रहित होऊन कर्म करील तो सुद्धा कर्मबंधनात पडणार नाही. अशाप्रकारे आपल्या कर्माची दिव्यता त्यांनी सांगितली आहे. जी कर्मे बंधनकारक असतात, तीच मुक्त करणारी होतात. ही कर्माची दिव्यता आहे.

यज्ञ हा विश्वाचा नियम आहे. त्या नियमाचे पालन केल्या खेरीज लाभ होऊ शकत नाही.



सृष्टीच्या आरंभी प्रजापतीने श्री विष्णूकरितां असणाऱ्या यज्ञासह मनुष्य आणि देव यांना निर्माण केले आणि त्यांना असा आशीर्वाद दिला की या यज्ञाने तुम्ही सुखी व्हा, कारण यज्ञ केल्याने तुम्हाला सर्व इष्ट पदार्थांची प्राप्ती होईल. दुसऱ्याच्या हितासाठी केली जाणारी सर्व कर्मे सुद्धा यज्ञच आहेत. आपल्या कर्तव्य कर्मानी परमात्म्याचे पूजन करणे हे देखील यज्ञा सारखेच आहे. बचनाग, भिलावा इत्यादी जहरी वस्तुंना सुद्धा वैद्य लोक शुद्ध करून जेव्हा औषध म्हणून देतात, तेव्हा ते जहर देखील अमृतासमान होऊन मोठेमोठे रोग दूर करते. तसेच कामना, ममता, आसक्ती, पक्षपात, स्वार्थ अभिमान इत्यादी सर्व जहररुप आहे. कर्मामधून हा जहरी भाग काढून टाकला तर ती कर्मे अमृतमय होऊन जन्म मरण रुपी महान रोग दूर करतात. अशी अमृतमय कर्मे सुद्धा यज्ञ म्हटली जातात. परमात्मा सर्व व्यापी असूनही कर्तव्य कर्मरुप यज्ञात नेहमी विद्यमान असतो. जेथे निष्काम भावाने कर्तव्य पालन केले जाते तेथे परमात्मा रहातो. यज्ञ म्हणजे कर्तव्य करण्याची पद्धत होय.

या यज्ञातून शिल्लक राहिलेला अमृताचा अनुभव घेणारे सनातन परब्रह्माला प्राप्त होतात. ‘यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम्’ त्याचप्रमाणे त्याचे फल संपूर्ण पाप नाश, संसाराशी संपूर्ण विच्छेद आणि परमतत्व प्राप्ती होय.

## दैनंदिन जीवनात गीतेचे महत्व

निस्वार्थ प्रेमाची मूर्ती असणारी आपली आई, प्रत्येकाला जितकी जवळची वाटते, तितका हा ग्रंथ लक्षावधी भाविकांना जवळचा वाटणारा व वाटत आलेला आहे. आईच्या दृष्टीने मुलाला आधार वाटतो. तसा आधार गीतेचा आश्रय घेणाऱ्यांना वाटतो. कोणत्याही दु:खाच्या प्रसंगाच्या वेळी, आईच्या मांडीवर आपले डोके टेकल्यावर किंवा प्रौढ वयात पोहचलेल्याने तिच्याजवळ जाऊन नुसते बसल्यावर त्याला साऱ्या दु:खाचा विसर पडतो त्याचप्रमाणे प्रपंचातील आघातामुळे

मन, सैरभैर झाले, तर हा ग्रंथ उघडून एक दोन श्लोकांवर दृष्टी टाकताच, उन्हाळ्याच्या दिवसांत थंडगार वाऱ्याची इवलीशी झुळुक अंगावरून जावी अशा शीतलतेचा अनुभव येतो. प्रेमळ आईच्या सहवासातील प्रत्येक क्षण हा आनंदाचा वाटतो. तसा अल्हाद वाचकाच्या मनाला नेहमी वाटतो.

गीतेने प्राप्त परिस्थितीचा सदुपयोग करून कल्याण कसे करावे हे दाखविले आहे. नातेवाईकांच्या, कुटुंबियांच्या आमच्यावर जो अधिकार आहे. त्याचे प्रत्युपकाराची इच्छा न ठेवता लोभ रहित होऊन, कोणताही दबाव न ठेवता त्यांचे रक्षण करावे. ज्या तऱ्हेने ते राजी होतील, सुखी होतील त्यांचे कल्याण व हित होईल असे काम करित असता, आपली बुद्धी, शक्ती व योग्यता यांचा हातचे काही न राखता पूर्णपणे उपयोग करावा. त्याच प्रमाणे आपण या जगात वाटसरुच्या रुपाने आलो आहोत. आपले तन, मन, धन, बुद्धि, विद्या, योग्यता, पद, अधिकार हे सर्व दुसऱ्याच्या सेवेत लावायचे आहेत. कारण या सर्व गोष्टी आपल्याला येथूनच या जगातून मिळाल्या आहेत. संसारात आपल्याला आपल्यासाठी रहायचे नाही, तर संसारासाठी रहायचे आहे. ही संसारात रहाण्याची विद्या आहे. ही विद्या आपल्याला गीतेने शिकविली आहे.

श्रीमत भगवत गीता ही भगवंताची दिव्य वाणी आहे. तिच्यातील विचार फारच सखोल व सहज कल्याण करणारे आहेत. त्याचे मनन केल्याने आपल्या ह्रदयात नवनवीन भाव प्रगट होतात. समुद्रात मिळणाऱ्या रत्नाचा अंत लागू शकेल, पण गीतेत मिळणारे, मनाला मुग्ध करणाऱ्या भावांचा अंत लागू शकत नाही. गीतेतील विचारांचे योग्य प्रकारे आकलन झाले तर भगवंताचा, अर्जुनाचा म्हणजे गीतेचा व आपल्या स्वरुपाचा योग्य तऱ्हेने बोध होतो. असा बोध झाल्यावर मनुष्य ज्ञानाने कृतकृत्य होतो. त्यामुळे त्यास नंतर काहीही करणे जाणजे किंवा मिळविणे शिल्लक रहात नाही. त्याचा जन्म सर्व प्रकारे सफल होतो.

मानवाच्या लौकीक जीवनातील प्रश्नांचा धागा गीतेमुळे अध्यात्मिक क्षेत्रातील प्रश्नांच्या चिंतनाशी नेऊन भिडविला जातो.

जस जसा विचार करत जाऊ, तस तसे गीतेतील तत्व नवे नवे वाटू लागते. गीतेमध्ये भिन्न प्रकारचे विषय, विश्वचालक शक्ती, विषयाच्या नाना प्रकारच्या कल्पना, तत्वज्ञान, विचारातील अनेक प्रवाह, ईश्वर साक्षात्कार करून घेण्याचे विविध मार्ग आणि त्या मार्गांनी पूर्णत्वाला पोहचलेल्या अध्यात्मिक व्यक्तींची निरनिराळी चित्रे यांचा उल्लेख आलेला आहे.

गीतेचे महात्म्य केवढे आहे हे सांगताना ज्ञानदेव म्हणतात -

इथे गीतेची थोरी। स्वये शंभु विवरी।
जेथे भवानी प्रश्नु करी। चमत्करोनी॥
जेथे हरु म्हणे नेणीजे। देवी जैसे का रूप तुझे।
तैसे नित्य नूतन देखिजे। गीता तत्व॥१-७०-७१॥

## बुद्धी योग

बुद्धी युक्त होऊन कर्म केले असता, ते कर्म बंधनकारक होत नाही. मनुष्य जेव्हा निष्काम कर्म करतो, तेव्हा तो कर्माच्या बंधनातून मुक्त होतो. ज्याप्रमाणे युद्ध करताना कवच अंगावर असेल तर शस्त्राचा वर्षाव सहन करता येतो, व युद्धात जय मिळतो. त्याचप्रमाणे बुद्धीने युक्त कर्म केले तर कर्माचा बंध उत्पन्न होत नाही. असे कर्म केल्याने पाप उत्पन्न होत नाही, आणि कर्म करताना उणे-पणा राहिला तरी ते व्यर्थ जात नाही. कारण बुद्धीयोगाने केलेले कर्म ईश्वराप्रीत्यर्थ होत असते. बुद्धी योग म्हणजे भक्ति योगाच्या पूर्ण आनंदाने आणि ज्ञानाने युक्त असलेल्या कृष्ण भक्तिने प्रेरित होऊन केलेले कर्म असते. समबुद्धी ठेऊन, योगात स्थिर होऊन भक्तीने कर्म करणे, या समत्वालाच योग म्हणतात. या बुद्धीयोगा पेक्षा कर्म कनिष्ठ आहे. ऐनवेळी एखादा वाटसरू दारात येऊन उभा राहिला, तर गरीब घरातील माणूस स्वत:साठी वाढून घेतलेल्या ताटातील भाजी भाकरी त्याला देतो. तेव्हा कोणाच्या तरी पानात अन्न वाढण्याचे ते कर्म नैतिक दृष्ट्या केवढ्या उंचीला जाऊन पोहचते. म्हणजेच कर्मापेक्षा बुद्धी महत्त्वाची आहे. बुद्धिचा वापर सत्:प्रवृत्तीने केल्यास कुठलेही कर्म अवघड होत नाही.

सर्व आसक्ती व अहंकार सोडून वागतो त्यालाच शांती मिळते. यालाच ब्राह्मी म्हणतात. आणि त्यालाच शेवटी मोक्ष मिळतो.

परमेश्वराचे ठिकाणी स्थिर झालेल्या स्थितप्रज्ञाच्या बुद्धिचे ठिकाणीही सुखदु:खादी कोणत्याही विकारांचा परिणाम होत नाही. आणि तो परमेश्वरापासून ढळत नाही. ज्ञानी जगाला विसरतो. पण परमेश्वराला कधीही विसरत नाही. ही स्थितप्रज्ञ स्थिती प्राप्त झाली की मरण काळी देखील बुद्धि मोह न पावता ब्रह्माशीच ऐक्य पावते.

## अहंकाराचे विसर्जन करावे

अहंकारामुळे आपण बऱ्याच वेळा मिळणाऱ्या आनंदाला मुकतो. अहंकारामुळे आपल्या सगे सोयऱ्यांशी असणारे सलोख्याचे संबंध बिघडण्यास कारणीभूत होतो. हा अहंकार फक्त श्रीमंतानाच असतो असे नाही तर गरीबाला सुद्धा असतो. त्यामुळे मिळणारी संधी तो गमावून बसतो. अहंकारामुळे राग येतो. आपल्या मराठीत म्हण आहे - 'अती रागा भीग मागा'. अहंकार हा शेतातील हरळी सारखा असतो. ही हरळी समुळ नाहीशी केल्याशिवाय चांगले पीक येत नाही.

कर्तृत्वाच्या अहंकारामुळे माणूस मत्त आणि सुस्त बनतो. त्याचे जीवन मचुळ व गढूळ बनून जाते. अहंकार हा मनुष्याचा सर्वात मोठा दोष आहे. हा काही केल्या लवकर नाहीसा होत नाही.

अहंकारा सारख्या दुर्गुणामुळे माणसाला स्वत:च्या कर्तुत्वाचा व स्थितीचा फार अभिमान असतो. जो पर्यंत त्याचा अहंकार कमी होत नाही, तोपर्यंत त्याची प्रगतीही होत नाही. मनुष्य अहंकाराने मर्यादेच्या बाहेर गेला, की देव त्याला आपोआप परिस्थितीने जागेवर आणतो.

हा अहंकार कमी करण्यासाठी रामदास स्वामी स्वत: हातात झोळी घेऊन भिक्षा मागत होते, आणि तसे आपल्या शिष्यांनाही सांगत होते.

जीवनाचा खरा अर्थ माणसाला जेव्हा समजतो, तेव्हा अहंकार आपोआप गळून पडतो. जेव्हा आत्मज्ञानाचा दीप उजळतो तेव्हा अहंकाराचा आपोआप अस्त होतो.

ज्ञानेश्वर म्हणतात 'आम्ही मिरवू अहंकार हरिचे भूषावयालागी। अहंकार व मी पणा गेल्याने माणसाचे ह्रदय लवकर मृदु होण्यास मदत होते. ह्या करता प्रत्येकाने ही भावना ठेवली पाहिजे, की आपल्या जीवनात जे काही यश मिळते, आनंद मिळतो तो भगवंताच्या कृपेने म्हणून भगवान श्रीकृष्णानी अर्जुनाला गीतेमध्ये सांगितले आहे की, 'माम अनुस्मर युद्धच। म्हणजे युद्धाच्या वेळी माझे स्मरण कर.

दुर्योधनाची व रावणाची अहंकारानेच हानी झाली व असलेल्या गुणांवर पाणी पडले.

## सत-चित-आनंद

सत्-अस्तित्व-शाश्वत वस्तू पूर्ण पणे नाहीशी न होता रुपांतरीत होते.

चित् - म्हणजे चैतन्य. आपले स्वरूप ठेवून नित्य नवे बनू शकते.

आनंद - याची ज्ञानामुळे जाणीव होते.

ज्ञान किंवा चैतन्य तत्वत: मूळ शद्ध स्वरूपांत सच्चिदानंद स्वरूप असते. सच्चितानंद म्हणजे देवाचा साक्षात्कार करून घेणे. मन इंद्रियाद्वारा विषयाकडे न जाता, ते इंद्रियांना डावलून सरळ स्वरूपानंदाला चिकटून रहाते. जळवा जशा अशुद्ध रक्तासाठी अंगाला चिकटून रहातात, त्याप्रमाणे हे मन स्वानंदासाठी स्वरूपाला चिकटून रहाते.

अशा रितीने स्वस्वरूप डोळे भरून पहाता पहाता साधक वृत्ती रहित होऊन, निवांत होतो व निवृत्ती पदावर आरूढ होतो. या अवस्थेत ज्ञान देव म्हणजे दिव्य ज्ञान प्रगट होऊन, साधकाचे मीपण गळून पडते व त्याला दिव्य स्वरूपाचा साक्षात्कार होऊन तो मुक्त भक्त व प्रशांत होतो.

अशा रितीने मन जेव्हा स्वस्वरूपात मुरते तेव्हा तेच मन उन्मत रूपाने स्वानंदासह सर्व इंद्रियातून स्फूरूं लागते. या अवस्थेत सर्व इंद्रियांचा सुखाचा विषय फक्त एकच असतो व तो म्हणजे नारायण. म्हणजेच स्वरूपानंद होय. हा स्वानंद जेव्हा निरनिराळ्या इंद्रियातून प्रगट होऊ लागतो, तेव्हा सत्साधकाला अतीन्द्रीय अनुभव येऊ लागतात. हा स्वानंद डोळ्यातून वहातो, तेव्हा डोळ्यात आनंदाश्रु येतात व प्रकाश दिसू लागतो. हा स्वानंद कानातून प्रगट होतो, तेव्हा निरनिराळे नाद ऐकू येतात, तो नाकातून प्रसवतो तेव्हा निरनिराळे सुगंध येऊ लागतात. तो जिव्हेच्या द्वारा प्रगट होतो तेव्हा अमृतरसाचा अनुभव येतो. हाच स्वानंद हातातून प्रसवतो तेव्हा तो आनंदाने टाळी वाजवू लागतो. व तोच पायातून प्रगट होतो तेव्हा आनंदाने नाचू लागतो. म्हणूनच संत म्हणतात,

***कंठी प्रेम दाटे, नयनी नीर लोटे। हृदयी प्रगटे रामरुप॥***

***जिव्हे गोड तीन अक्षरांचा रस। अमृत जयास फिके पुढे॥***

***विषय तो त्याचा झाला नारायण। नावडे जन, धन, माता पिता॥***

## 'समदर्शन'

भगवान श्रीकृष्ण म्हणतात-सर्व भूतांच्या ठायी आपण, आणि आपल्या ठायी सर्वभूते पहावीत. सर्व ठिकाणी परमेश्वर आहे, असे जो पहातो आणि माझ्या ठायी सर्व आहेत, अशी ज्यांची दृष्टी झाली, त्याला मी कधी अंतरत नाही. आणि तो ही मला कधी अंतरत नाही.

***विद्या विनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनी।***

***शुनि चैव खपाकेच, पंण्डिता: समदर्शिन: ॥अं ५ श्लो.१८॥***

कृष्ण भावना भावित माणूस जातीभेद मानीत नाही. ब्राह्मण आणि चाण्डाल यांच्यात सामाजिक दृष्ट्या भेद असतो. कुत्रा-गाय-हत्ती यांच्यात प्राणी जातीच्या दृष्टीने भेद असतो, पण समान दृष्टी असलेल्या माणसाला या भेदात काही अर्थ वाटत नाही. कारण परमात्मा हा प्रत्येक प्राणीमात्रांच्या हृदयात आहे.

असा मनुष्य स्थितप्रज्ञ असतो. त्याला कसलाही मोह नसतो. तो ब्रह्मतत्वात स्थिर झालेला असतो. त्याचे मन सर्व ठिकाणी ब्रह्म भावात असते. याला आत्मसुखाच्या भोगामध्ये अशी एक वृत्तीची स्थिती उत्पन्न होते. अहंकार नाहीसा होऊन तो सुखाला अलिंगन देतो, आणि या अलिंगनाने ब्रह्मरूपात एकरुप होतो. ज्याप्रमाणे पाणी पाण्यात मिसळल्यावर वेगळे दिसत नाही.

ज्याचे मन एकरुपतेत आणि समतेत किंवा समवृत्तीत स्थिर झालेले असते. त्यांनी जन्म आणि मृत्यू या अवस्था आधीच जिंकलेल्या असतात. ते ब्रह्माप्रमाणे पवित्र आणि निर्दोष आहेत. आणि अशा रितीने ते ब्रह्माच्या ठिकाणी आधीच स्थिर झालेले असतात.

अंतकाळी भगवंताचे स्मरण व्हावे, म्हणून कसे वागावे. अ.८वा.

एकच ईश्वर प्रत्येक जीवाच्या अंत:करणात प्रतिबिंबित होतो. ईश्वर हा बिंब तर जीव हा प्रतिबिंब आहे. प्रतिबिंबाचे विकार बिंबाला स्पर्श करीत नाहीत. प्रतिबिंबात जर काही फरक घडवून आणायचा असेल तर तो प्रथम बिंबात करावा. म्हणजे प्रतिबिंब आपोआप तसे बनते. जी ईश्वराच्या ठिकाणी, जी भावना ठेवतो, जे सामर्थ्य स्थापतो, जे ज्ञान कल्पितो आणि जो महिमा आरोपितो त्याचे हुबेहुब प्रतिबिंब जीवाच्या ठिकाणी पडते. भक्तीमध्ये जीव ईश्वराशी संबंध जोडतो. प्रत्येक जण, कशाशी तरी कोणाशी तरी कोणता तरी संबंध ठेवतो. जगामध्ये संबंध शून्य व्यक्ति नाही. ज्याच्याशी संबंध जोडायचा, त्याच्या अस्तित्वाबद्दल यत्किंचित संशय नसावा. यालाच भाव म्हणतात. ईश्वर आहेच या विश्वासातून भक्ति जन्म घेते. जीवनात जोपर्यंत एकापेक्षा अधिक सत्ये आहेत असे वाटते तोपर्यंत भाव वाटलेला असतो. पण एक भगवंत तेवढाच सत्य आहे. अशी निश्चित जाणीव झाली की, भाव केंद्रित होते. मग भगवंताबद्दल विकल्परहित, अविचल-विश्वास प्रगट होतो. अशा विश्वासामुळे भगवंताची अखंड स्मृती रहाते. अखंड स्मृतीने सान्निध्य लाभते. सतत सान्निध्याने भगवंताशी तदाकारता येते. तदाकारता स्थिर झाली की, त्याच्याशी आत्मीयता साधते. आत्मीयता प्रीतीरुपाने व्यक्त होते. ईश्वर अनंत, अखंड, अमृत आणि रसमय आहे, म्हणून भगवंताच्या भावामधून जन्म पावलेली प्रीती देखील अमृतरुप, रसमय, अनंत आणि आनंदमयच असते. भगवंताशी आत्मीयता साधली की जीव सर्व प्राणी, प्राणीमात्रांशी एकरस होतो. ही त्याची सहज अवस्था बनते. मग भक्त स्वानंदात डुंबत रहातो. आणि अंतकाळी त्याचे सहज स्मरण होते.

## अध्याय ९वा

'कीर्तन' हा नवविधा भक्तीचा प्रकार आहे. त्याचा व्यापक अर्थ असा आहे.

माणसातील देवत्वाला आर्ततेने, प्रेमाने, हळुवारतेने हाक मारून जागृत करणे म्हणजे कीर्तन होय.

आत्मनिवेदन ही भक्तिची अंतिम अवस्था असली तरी कीर्तनाच्या अपूर्व गोडीत केवळ संतच नव्हे तर प्रत्यक्ष पांडुरंगही रंगून गेला आहे. स्वत: देवालाच कीर्तनाची अत्यंत आवड असल्यामुळे संतानी व भक्तांनी त्यात रंगून गेले तर त्यात नवल नाही. तुकाराम म्हणतात -

कीर्तनाची गोडी। देव निवडी आपणा॥

कलीयुगामाजी करावे कीर्तन। तेणे नारायण देईल भेटी॥

कीर्तनाचा मार्ग हा राजमार्ग. प्रत्यक्ष पांडुरंगाला (भगवंताला) वश करण्याचे सामर्थ्य कीर्तनात आहे. सर्व संतानी ईश्वरप्राप्तीचे सोपे वर्म सांगितले आहे. ते म्हणजे हातात टाळ, वीणा घेऊन श्रीहरीचे नाव घ्यावे व नाचत

रहावे. हाच राजमार्ग आहे. या कीर्तनात भक्तिप्रेमाचा जो ब्रह्मरस असतो, त्यावरून समाधीचे सुख सुद्धा ओवाळून टाकावे अशी याची योग्यता आहे. कीर्तनातील भक्तिप्रेमाच्या सेवनाने भक्तीचे भाग्यबळ लाभते. भक्तिप्रेमाच्या अवस्थेत मनात कसलाही प्रकारचा संदेह निर्माण होत नाही. कारण सलोकता, समीपता, सरुपता व सायुज्यता या चारी मुक्ती कीर्तन करणाऱ्या हरदिासा दासी होऊन रहातात. कीर्तनामुळे मनाला पूर्ण विश्रांती लाभते आणि क्षणार्धात त्रिविध तापाचा पूर्ण नाश होतो. हरिकथा हेच देवाचे खरे ध्यान आहे. सर्व साधनात हरिकीर्तनासारखी दुसरी पुण्यकारक गोष्ट नाही. कारण हरिकीर्तनात स्वत: देव उभा असतो. जेथे हरिकीर्तनाचा गजर असतो त्या ठिकाणी यमदूत फिरकू शकत नाही. प्रत्यक्ष परमेश्वराचे सुदर्शनचक्र भक्ताच्या रक्षणार्थ तेथे फेऱ्या घालत असते. ऋद्धी सिद्धी दासी लोटांगणी आलेल्या असतात. देव भक्त व हरिनाम असा त्रिवेणी संगम, हरिकीर्तनात असतो. वैष्णवांच्या चरणांवरील धुलीकणांना वंदन करून प्रत्यक्ष मानव उत्तम गतीस पोहचू शकतो. कीर्तनाने वाणी पवित्र होते. माणूस भगवंताला योग्य होतो. शीलवान चारित्र्यवान होतो. एकाग्रता साधते. भगवंताबद्दल निश्चय प्राप्त होतो. श्रोते व वक्ता दोघांचे संशय नाहीसे होतात. ब्रह्मदेवाचा मुलगा नारद हा निरंतर भगवंताचे कीर्तन करतो. त्यामुळे सर्व लोक त्याला नारायण म्हणतात. त्याला भगवंतरुप मानतात. कीर्तनाने परमात्मा संतोष पावतो.

### ॐकारातील मात्रा

सृष्टी उत्पन्न करण्याचे पूर्वी ब्रह्मदेव एकटाच वेड्यासारखा गोंधळलेला होता. ज्या ईश्वरापासून (विष्णू) त्याची उत्पत्ती झाली, त्या ईश्वरासही तो ओळखत नव्हता व सृष्टीही उत्पन्न करू शकत नव्हता. ज्या नामाच्या अर्थाचे अंत:करणात चिंतन केल्यामुळे व ज्या ब्रह्मबोधक तीन अक्षराचा जप केल्यामुळे त्या ब्रह्मदेवास सृष्टी उत्पन्न करण्याची योग्यता आली तो सर्व मंत्रांचा राजा श्रेष्ठ ॐकार होय.

या ॐकारात अ उ म आणि नाद बिंदू (अनुस्वर) अशा साडेतीन मात्रा आहेत. ॐकार म्हणजे सारे विश्व. ॐकारातील 'अ' ही मात्रा म्हणजे स्थूल जगत. सारी जड साकार सृष्टी म्हणजेच अ! अकार म्हणजे परमात्म्याचे चरण होत. 'उ'कार म्हणजे सारे सूक्ष्म जगत. म्हणजे मन, बुद्धि, अहंकार यांचे सूक्ष्म जगत. ही सूक्ष्म सृष्टी खूप विशाल आहे. 'म'कार म्हणजे ज्ञान जगत. सारी चैतन्यमयता आणि सारी सृष्टी एकसूत्रात गुंफली आहे. याचे ज्ञान सर्व सृष्टीतील विविधतेला गुंफणारे आत्मतत्व अनुभवणे होय. असे आनंदमय मस्तक अर्धमात्रा म्हणजे नाद बिंदू ही प्रशांत परब्रह्माची अवस्था आहे.

'अ' म्हणजे अकार चरण युगुल. 'उ' म्हणजे उदर विशाल, 'म' म्हणजे मकार महामंडल मस्तकाकोर.

अशा रितीने ब्रह्मदेवापासून सृष्टीपर्यंत ज्ञाता, ज्ञान व कर्म ही निर्माण झाली हेच ॐ (परब्रह्म) तत् (ते) सद् (आहेत) अर्थात सारी विविधतेने नटलेली सृष्टी निर्माण झाली असली तरी ती एकात्मच आहे.

आकाशात उदय पावलेल्या सूर्याला सूर्यच प्रकाशितो. त्याप्रमाणे 'ॐतत्सत' या नामाचा उच्चार ब्रह्माचा आत्मत्त्वाने बोध करून ब्रह्मच करते. म्हणून हे त्र्यक्षरी 'नाम' हे नाव नसून केवळ केवळ ब्रह्मच आहे.

❑❑❑


# व्यंकटेश बुक डेपो

## ज्ञानदा शालेय साहित्य

६४३, नारायण पेठ, नू.म.वि. प्राथमिक शाळेसमोर, अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०. फोन : २४४५६२७० / २४४९०४५९

**शैक्षणिक बालवाडी साहित्याचे वितरक**
**सर्व प्रकारचे कागदी, लॅमिनेटेड, नकाशे, पृथ्वीगोल**
**शालेय व मूल्यशिक्षण तक्ते, शैक्षणिक कॅसेटस् व सी.डी.**
**गुंडाळी फळे, ग्लास बोर्ड, व्हाईट बोर्ड, ब्लॅक बोर्ड**
**विविध प्रकारची फायबरची वैज्ञानिक व भौगोलिक मॉडेलस्**
**मिळण्याचे एकमेव ठिकाण**

# मराठे कुलाविषयी सामान्य माहिती

मराठे आडनाव चित्तपावन, देवरुखे, सारस्वत, मराठा इत्यादी ज्ञातीत आहे. चित्तपावन कपिगोत्री. मराठे आडनावामध्ये विद्वांस, खांबेटे, चक्रदेव, जोशी, जाईल, फडणीस व रटाटे या आडनावांचा समावेश होतो. या आडनावांच्या मंडळींना आपले मूळचे आडनाव मराठे असल्याबद्दल जाणीव आहे. यापैकी काही विद्वांस व रटाटे मंडळी अलीकडे आपले मूळचे मराठे हे आडनाव लावू लागली आहेत.

मराठे यांचे गोत्र कपि, वेद ऋग्वेद, शाखा शाकल आणि सूत्र आश्वलायन. कपिगोत्रामध्ये आश्वलायन सूत्र असलेली आडनावे मराठे, विद्वांस, खांबेटे, चक्रदेव, जोशी, रटाटे, साने, भागवत, लाटे मायदेव.

## मराठे आडनावाची व्युत्पत्ती

मराठे आडनावाची व्युत्पत्ती समजली नाही. आडनावांची प्रथा प्राचीन नाही. शिलालेख, ताम्रपट यांमध्ये व्यक्तीचा उल्लेख करताना आडनावाचा उल्लेख नसून केवळ गोत्र व सूत्र यांचा उल्लेख आढळतो. अलिकडे सुमारे चारशे वर्षापासून आडनावाची प्रथा विशेष चालू झालेली दिसते. काही आडनावे गावाच्या नावाला कर लावून झाली आहेत. काही धंदा, वृत्ति, अधिकार, इत्यादिकांवरून पडलेली आहेत. कित्येक आडनावांना वरील कारणे लागू पडत नाहीत; अशा आडनावांपैकी मराठे हे आडनांव आहे.

मराठे आडनावातून निघालेल्या आडनावांपैकी विद्वांस नावाची व्युत्पत्ति पुढीलप्रमाणे समजते - मराठे घराण्यातील एक पुरुष अत्यंत विद्वान असल्यामुळे त्याला 'विद्वांस' असे म्हणू लागले. पुढे या पुरुषाच्या वंशजांचे विद्वांस असे आडनाव पडले.

मराठे घराण्यातील एक पुरुष यात्रेस गेला. त्याने यात्रेहून परत येताना पुष्कळ चक्रांकित देव आपल्याबरोबर आणले व ते लोकांस दिले. यावरून त्या पुरुषाला चक्रदेव म्हणू लागले. नंतर त्याच्या वंशजांचे चक्रदेव आडनाव पडले.

कोकणात एका गावी मराठे व पाटणकर ही घराणी राहात होती. भाऊबंदकीच्या त्रासाने या दोन घराण्यातील पुरुष दापोली तालुक्यात दुमदेव या गावी राहावयास गेली. तेथे गेल्यावर मराठे यांनी जाईल आडनाव धारण केले आणि पाटणकर यांनी माटे उपनाव धारण केले, तशी दंतकथा आहे.

मराठे घराण्यातील एक पुरुष प्रसिद्ध ज्योतिषी होऊन गेला. त्यावरून त्याच्या वंशजांना जोशी म्हणू लागले. खांबेटे आणि रटाटे या आडनावांची व्युत्पत्ति समजली नाही.

## मराठ्यांचे मूळ गाव

सर्व मराठे मंडळींचा कोकणातील मूळ वास्तव्याचा एकच गाव नाही. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये देवाचे गोठणे, शिवने, कुर्धे, नेवरे पुरळ, वाडेपडेल इत्यादी गावी मराठे यांची पुष्कळ वर्षांपूर्वी वस्ती होती. आणि आजही शिवने, कुर्धे, पुरळ, वाडेपडेल या गावी मराठ्यांची वस्ती आहे. या मूळच्या गावांहून त्याच जिल्ह्यांत कळंबुशी, पालशेत, आडिवरे, हिंदळे, विलये इत्यादी गावी मराठे मंडळी जाऊन स्थायिक झाली आणि काही अन्यत्र गेली.

आज मराठे मंडळींचे वास्तव्य काशी, प्रयागापासून गोमांतक, दक्षिण कन्नड येथपर्यंत ठिकठिकाणी आहे. तसेच इंग्लंड, अमेरिका, आफ्रिका, मध्यपूर्वेचे देश या भागातही व्यवसायाकरिता ही मंडळी जाऊन राहिली आहे.

सध्या निरनिराळ्या ठिकाणी राहात असलेल्या मराठे मंडळींच्या मूळ वास्तव्याच्या ठिकाणावरून त्यांचे समान्यत: पुढीलप्रमाणे ४ विभाग होतात - (१) रत्नागिरी जिल्हा (२) सिंधुदुर्ग जिल्हा (३) गोमांतक आणि (४) दक्षिण कन्नड. मराठे कुलवृत्तांतात समाविष्ट होणाऱ्या विद्वांस, खांबेटे इत्यादिकांची मूळ ठिकाणे रत्नागिरी जिल्ह्यातच असल्यामुळे त्यांचे वेगवेगळे विभाग होत नाहीत.

विद्वांसांचे रत्नागिरी जिल्ह्यातील मूळ ठिकाण केळशी. आजही तेथे त्यांची वस्ती आहे. विद्वांस यांच्या वंशावळीत १५ पिढ्या आहेत. तेव्हा ३७५ वर्षे विद्वांस हे आडनाव रूढ आहे असे दिसते.

खांबेटे यांचे मूळ वास्तव्याचे गाव दापोली तालुक्यात बुरोंडी, कोळथरे, केळशी, आंजर्ले हे आहेत. आज कोळथरे, केळशी, आंजर्ले या गावी खांबेटे यांची वस्ती आहे. खांबेटे यांच्या वंशावळीत १२ पिढ्या आढळतात.

चक्रदेवांचा एक मूळ पुरुष दाखविता येतो. यांचा मूळ गाव कुर्धे. चक्रदेव यांच्या वंशावळीत १४ पिढ्या आहेत. यावरून साडेतीनशे वर्षे चक्रदेव आडनाव प्रचलित आहे. कुर्धे येथे चक्रदेव यांचे स्वतंत्र ठिकाण असून त्यास 'ठिकाण चक्रदेव' असे म्हणतात.

जोशी यांचा मूळ गाव राजापूर तालुक्यातील आडिवरे. तेथे सध्या त्यांची वस्ती नाही. आडिवऱ्याहून काही जोशी पेण व कोर्ले येथे गेले आणि काही जोशी मालवण तालुक्यात मसुरे येथे स्थायिक झाले. यांच्या वंशावळीत जास्तीत जास्त १२ पिढ्या आहेत.

जाईल यांचा मूळ गाव दापोली तालुक्यातील टुमदेव आहे. आज टुमदेव येथे जाईल यांचे वास्तव्य नाही. यांच्या वंशावळीत १४ पिढ्या आहेत.

रटाटे यांचा मूळ गाव दापोली तालुक्यातील जालगाव. तेथून हे कायगाव - टोके येथे व नंतर काशीस गेले. यांच्या वंशावळीत ११ पिढ्या आहेत.

## मराठ्यांची घराणी

मराठे कुलवृत्तांत ११५ घराणी असून त्यांपैकी मराठे यांची ९६, विद्वांसांची ४, खांबेटे यांची ८, चक्रदेवांचे १, जोशी यांची ३, जाईलांचे १ व रटाटे यांची २ अशी घराणी आहेत.

एकंदर ११५ घराण्यांपैकी ३२व्या घराण्यात अधिकात अधिक एकूण पुरुष व्यक्ती ७७१ असून जिवंत पुरुष व्यक्ती ३५० आहेत. तसेच लहानात लहान म्हणजे जिवंत पुरुष व्यक्ति केवळ एकच असलेली घराणी ८, १३, ४० व ८८. घराणे २०, ३१, ९४, ९५ मध्ये एकहि जिवंत पुरुष व्यक्ति नाही.

२८व्या घराण्यातील काही मराठे मंडळी दीक्षित हे आडनाव, आणि ३२व्या घराण्यातील काही लोक फडणीस हे आडनाव लावतात. तसेच ९७व्या घराण्यांतील काही विद्वांस मंडळी आणि ११४व्या घराण्यातील काही रटाटे मंडळी मराठे हे आडनाव लावतात.

मराठे आडनावाच्या मंडळींपैकी काहींना महाजन, ग्रामोपाध्ये, धर्माधिकारी, चिटणीस, देशमुख, नाईक, पंत इ. अुपपदे आहेत.

## कुलदेवता आणि कुलाचार

मंगलकार्याचे प्रसंगी व वार्षिक नैवेद्याचे वेळी कुलदेवतांचे स्मरण करावे लागते. ज्या देवतेच्या कृपाप्रसादामुळे आपल्या पूर्वजांचा अभ्युदय झाला अशी भावना असते, ती देवता त्या घराण्यात परंपरेने कुलदेवता मानली जाते. घराण्यात परंपरागत असलेल्या कुलदेवता व कुलाचार यासंबंधाने निश्चित माहिती फारच थोड्या मंडळींना असते. स्थलांतर झाल्यामुळे मूळच्या देवतेचे विस्मरण होते.

देवतेच्या मूळ नावाचा उल्लेख काही लोक भिन्न प्रकारे करतात. व्याडेश्वर याबद्दल वाडेश्वरी असे लिहितात, जैनवीर याबद्दल जैतवीर किंवा जैतीर, वरदायिनीबद्दल वरदान वर्धनी इत्यादी. देवता एक सांगणारी घराणी मूळची एकाच ठिकाणी राहाणारी असून त्यांचा मूळ पुरुष एक असावा असे अनुमान करता येईल. व्याडेश्वर कुलदेवता सांगणाऱ्या मंडळींचे वास्तव्य गुहागर किंवा त्याच्या आसपास असावे, आदित्यनाथ सांगणारी मंडळी बहुधा नेवरे येथील, वीरभद्रेश्वर सांगणारी मंडळी पुरळ येथील, आणि वेतोबा कुलदेवता सांगणारी मंडळी आजगावची असावी.

मराठे घराण्यांतील मंडळींच्या कुलदेवता मुख्यत्वे गुहागर येथील व्याडेश्वर, आंबे येथील जोगेश्वरी व कोल्हापूर येथील महालक्ष्मी या आहेत. मराठे यांच्या ९६ घराण्यांपैकी १५ घराणी कवड जिल्ह्यातील आहेत. या प्रांतातील मराठे मंडळी लक्ष्मीनारायण कुलस्वामी मानतात. या देवतेचे स्थान त्यांना माहीत नाही. बाकीच्या ८१ घराण्यांपैकी २९ घराण्यांतील लोकांनी व्याडेश्वर, जोगेश्वरी, महालक्ष्मी यांपैकी कोणतीच कुलदेवता सांगितली नाही. त्यांच्यापैकी काहींनी देवांच्या नैवेद्यात ग्रामदेवता मात्र सांगितल्या आहेत.

व्याडेश्वर कुलदेवता सांगणारी घराणी १४, जोगेश्वरी सांगणारी घराणी १४ व महालक्ष्मी कुलदेवता सांगणारी घराणी ३० आहेत. तुळजापूरची भवानी कुलदेवता सांगणारी घराणी दोन आहेत.

मराठे कुलात ज्या देवतांना वार्षिक नैवेद्य दाखवितात त्या सर्व देवतांची नावे अकारादि क्रमाने पुढे दिली आहेत. ज्या देवतेचा गाव समजला तो त्या देवतेच्या नावापुढे कंसात दिला आहे.

अन्नभवना, अंबा (कोकिस्रे व धामापूर), आकारी, आदित्यनाथ (नेवरे), आमणेश्वर (बुरंबाड), कलेश्वर (नेरूर), कवलाई (टेंबवली), कमादेवी (राजापूर), काळभैरव, काळकाई, खाजणादेवी (पाल), गणेश्वर, गांगेश्वर (नारिंग्रे), गांगो भराडी (शिवने), गावराखा, गोवर्धनेश्वर (देवाचे गोठणे), घाडेमुख, चालकोबा, चाळाई, चौंडेश्वरी, जाखाई, जानाई, जैतवीर (सातर्डे), जैनदेव (शिवने), जोखाई, जोगेश्वरी (आंबे), ज्योतिबा (कोल्हापूर), डोंगरादेवी (डोंगर), दुर्गा (विलये), देवी (कडेठाण), धोपेश्वर (राजापूर), पाचाची पूर्वा, पावणाई, पूर्वस, पूर्वापारी, बहिरी (नागाव), बहिर्जी, ब्रम्हन्देव, ब्राम्हण, भगवती (देवली), भवानी (तुळजापूर), भार्गवराम (देवाचे गोठणे), भावाई (नारिंग्रे), भुमका (आजगाव), भूतनाथ, भैरोबा (सातारा), मल्लिकार्जुन, महाकाली (आडिवरे), महापुरुष, महालक्ष्मी (कोल्हापूर, केळशी, मांद्रे), महाविष्णु (कुर्धे), माउली (रेडी), मुंजोबा, रवळनाथ (आजगाव), रामलिंग (तुड्ये, गोवा), रामेश्वर (वेंगुर्ले, विलये, नारिंग्रे, हिंदळे), लक्ष्मीनारायण (धोपेश्वर व कन्नड जिल्हा),


# व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र

६४३, नारायण पेठ, नू.म. वि. प्राथमिक शाळेसमोर,
अप्पा बळवंत चौक, पुणे ४११०३०,
फोन छ ०२० - २४४५६२७०

## I.Q. व Aptitude Testing
**करून शैक्षणिक मार्गदर्शन केले जाते.**

**संचालिका : सौ. नीलांबरी रमेश मराठे**

लिंगेश्वर (इळये), वडदेव (होडावडे), वरदायी, वर्धनी, वाघजाई, व्याडेश्वर (गुहागर), विश्वेश्वर (डोंगर), वीरभद्रेश्वर (पुरळ), वेताळ (आजगाव), शुंभमहादेव, शांतादुर्गा, सत्येश्वर (आडिवरे), सर्वेश्वर (कुर्धे, आजगाव), सागरेश्वर (देवराष्टे), सातेरी (तुळस), सिद्धेश्वर (सिद्धेश्वर व सुर्ल, गोवा), सोमेश्वर (शिरगाव), स्थानपुरुष, स्थानेश्वर (शिवने), हरिहरेश्वर (हरेश्वर), हसळादेवी (देवाचे गोठणे), हेडेश्वर (उपळे), क्षेत्रपाल (होडावडे), इत्यादी.

वरील देवतांना देवदिवाळीस नैवेद्य घालतात. काही घराण्यात देवदिवाळीशिवाय बलिप्रतिपदा, फाल्गुनी पौर्णिमा व श्रावणी सोमवार या दिवशी नैवेद्य घालतात. काही घराण्यांत कोकणातील देवांस वार्षिक नैवेद्य घालीत नाहीत.

आश्विनातील नवरात्र व मंगल कार्यानंतर बोडण हे आचार बहुतेक घराण्यांत आहेत. साधारणत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात राहात असलेल्या घराण्यांत घरी नवरात्र करण्याची चाल दिसत नाही. गावातील देवीच्या देवळातच त्यांचे नवरात्र होत असते. मराठे यांच्या चारपाच घराण्यांत चंपाषष्ठीस खंडोबाची तळी भरणे इत्यादी आचार आहेत. हे आचार कोकण सोडून देशावर बरीच वर्षे स्थायिक झालेल्या घराण्यांत रूढ झालेले दिसतात. मराठे यांच्या बारातेरा घराण्यांत गोंधळाची व ओहर जाण्याची म्हणजे नूतन वधूवरांनी कुलदेवतेच्या दर्शनास जाण्याची चाल आहे. दोन तीन घराण्यांत गिरीचा व्यंकोबा हे दैवत असून त्याचे पारणे करण्याची चाल आहे. एक दोन घराण्यांत भाद्रपदातील गणपति आणण्याची चाल नाही. क्रमांक २० व ६५ या घराण्यांत अनुक्रमे झडके व वाडवळ हे विशिष्ट आचार आहेत.

विद्वांस यांची ४ घराणी आहेत, त्यांमध्ये जोगेश्वरी व कोल्हापूरची महालक्ष्मी या कुलदेवता आहेत. याशिवाय पुढील देवता विद्वांस मंडळी मानतात. व्याघ्रेश्वर (आसूद), महालक्ष्मी (केळशी), कालभैरव (बामणोली), जीवनेश्वर (श्रीवर्धन), हरिहरेश्वर (हरेश्वर), विष्णु, शंकर, बहिरी इत्यादी. या देवतांना देवदिवाळीस नैवेद्य घालतात. काही कुटुंबात फाल्गुनी पौर्णिमेसही नैवेद्य असतात. आश्विनातील नवरात्र, बोडण भरणे हे सामान्य आचार आहेत. लोहगड येथील विद्वांस मंडळी चंपाषष्टीस खंडोबाची तळी भरतात.

खांबेटे यांची आठ घराणी आहेत. यांतील मंडळी जोगेश्वरी, आदित्यनाथ, कोळेश्वर, जाखाई, जोखाई (कोळथरे), लक्ष्मीकेशव (तुरवडे), महालक्ष्मी, बहिरी (केळशी), दारवठकरीण (बुरोंडी), साळकाय, गोळकाय या देवतांना देवदिवाळीस नैवेद्य घालतात. काही खांबेटे मंडळी बलिप्रतिपदा, फाल्गुनी पौर्णिमा व धुळवड या दिवशीही नैवेद्य घालतात. आश्विनातील नवरात्र व बोडण हे आचार आहेत.

चक्रदेव यांचे एकच घराणे असून व्याडेश्वर (गुहागर), जोगेश्वरी (आंबे), महालक्ष्मी (कोल्हापूर), सर्वेश्वर (कुर्धे), रवळनाथ, आदित्यनाथ, पावणाई, महापुरुष, वास्तुपुरुष, गावराखा इत्यादि देवतांना देवदिवाळीस नैवेद्य घालतात. काही कुटुंबात गुढीपाडवा, फाल्गुनी पौर्णिमा व रंगपंचमी या दिवशीही नैवेद्य असतात. आश्विनातील नवरात्र व बोडण हेही आचार आहेत.

जोशी यांची ३ घराणी आहेत. ही मंडळी महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती, सत्येश्वर, बाळेश्वर, नगरेश्वर, रवळनौथ (आडिवरे), ब्रम्हदेव, जुगाई, जैनदेव, गांगोभराडी, रामेश्वर, सोमेश्वर (कोर्ले), शांतादुर्गा, काळभैरव, भावई, ब्रम्हनदेव (हिंदळे), यांना देवदिवाळीस नैवेद्य घालतात. काही मंडळी लक्ष्मी केशव कुलदेवता मानतात. आडिवरे घराण्यात गोंधळाची चाल आहे.

जाईल यांचे एक घराणे आहे. ही मंडळी महालक्ष्मी (कोल्हापूर), व्याडेश्वर (गुहागर), टुमदेव (टुमदेव), बहिरी, क्षेत्रपाळ, चिमादेवी, गणपति, वास्तुपुरुष यांना नैवेद्य घालतात. आश्विनी नवरात्र, बोडण व गोंधळ इत्यादि आचार आहेत.

रटाटे यांची दोन घराणी आहेत. या घराण्यांतील मंडळी महालक्ष्मी (कोल्हापूर), विंध्यवासिनी (रावतळे), व्याघ्रेश्वर, पन्हाळजा, पांगुळजा, बहिरी, गणपति यांना देवदिवाळीस नैवेद्य घालतात. काही कुटुंबात चैत्री व श्रावणी पौर्णिमा या दिवशीही नैवेद्य असतात. आश्विनातील नवरात्र, बोडण, गोंधळ हे आचार आहेत. काशी येथील रटाटे घराण्यात बालाजीचे पारणे करण्याची चाल आहे.

(मराठे कुलवृत्तांतावरून)

❑❑❑

**चित्रकार सौ. कुमुद डोके (मराठे) यांचे दि.१२ ते १८ ऑगस्ट, सकाळी १० ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत नेहरूसेंटर, वरळी (मुंबई) कलादालनात भरलेले दीपाशिखा चित्रप्रदर्शन -**

## दीपशिखा

भारतीय लघुचित्र पद्धतीमध्ये चित्रबद्ध केलेल्या विविध स्त्रीव्यक्तिरेखा म्हणजे दीपशिखा चित्रप्रदर्शन. भारतीय संस्कृतीतील चित्रकर्ती सौ. कुमुद डोके यांना विशेषत्वाने भावलेल्या पतिव्रता, संतश्रेष्ठा, रणरागिणी, संस्कृतकाव्यातील नायिकांच्या जीवनातील प्रसंगांचा चित्राविष्कार म्हणजे दीपशिखा.

चौदा नायिकांच्या लोभस, लालित्यपूर्ण चित्राकृती ब्लॅक इंक, जलरंग, ॲक्रेलीक रंगात रंगविल्या असून प्रत्येक चित्र हा जणू त्या त्या चित्रनायिकेचा जीवनपटच उलगडतो. बालपण, तारुण्य, विशेष घडामोडी, नाट्यप्रसंग यांचा आधार घेऊन चित्ररचनेत कालानुरूप प्रतिकांचा समावेश केला आहे. चित्रातील मूलभूत घटकांचा व रंगसंगतींचा, विशेष म्हणजे जलरंगाचा ओघवतेपणा, पारदर्शकता जपण्याचा आटोकाट प्रयत्न चित्रकार कुमुद डोके यांनी केला आहे.

या देवी सर्वभूतेषु बुद्धी, शक्ती, श्रद्धा, कांती रुपेण संस्थिता. या श्लोकाचा चार विभागांसाठी प्रतिकात्मक पद्धतीने, तसेच देवीच्या आकृतीचा समर्पक उपयोग चित्रीत केला आहे. राजमाता जिजाबाई, सति अहिल्याबाई होळकर आणि पतिव्रता सीता या सर्वाधिक (५४) मनुष्याकृती असलेल्या कलाकृती असून १८ मोठी (ॲम्पीरियल) चित्रे व १४ कॉर्टर साईज मधील आहेत.

प्रदर्शनात एकूण आठशे आकृती चित्रबद्ध आहेत. उत्तरेकडील संत मीराबाई व दक्षिणेकडील संत अंडाळ यांचे संमिश्र पद्धतीतील चित्रण हा अनोखा रचनाविष्कार म्हणता येईल.

# 'मागे वळुनि पाहता'-
# 'तीन पिढ्यांचा सराफी व्यवसाय'
# मे. यशवंत विठ्ठल मराठे (प्रा.) लि., ठाणे.

**मराठे प्रतिष्ठानचे उत्साही अध्यक्ष श्री.आनंदराव यांची मुलाखत पुन:प्रत्ययाचा आनंद देईल. - *संपादिका***

***मे. यशवंत विठ्ठल मराठे (प्रा. लि., ही पेढी गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ ठाण्यात सोन्या-चांदीच्या दागिन्यांचा व्यवसाय करीत आहे. अलिकडेच त्यांनी यशवंत विठ्ठल मराठे अँड सन्स या नावाने फक्त हिऱ्याच्या दागिन्यांचे नवीन दुकान ठाण्यातच उघडले आहे. तिसऱ्या पिढीत घेतलेली ही नवी झेप आपणा सर्व कुलबांधवांना खचितच अभिमानास्पद आहे. या संदर्भात या पेढीचे मालक आनंदराव (आनंद यशवंत - पृ.२७७) यांच्याशी झालेली ही बातचीत. - लक्ष्मण शंकर (पृ.५२०)***

यशवंतरावांचे वडील (विठ्ठल लक्ष्मण) ज्योतिषी. ते पंचांग करीत. भिक्षुकीचा व्यवसाय करीत. मग यशवंतराव या सोन्याचांदीच्या व्यवसायात कसे काय आले याबाबत आनंदरावांना विचारले असता त्यांनी सांगितले.

''यशवंतराव ४-५ वर्षाचे असतांना त्यांचे वडील वारले. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण बेळगावात बहिणीकडे झाले. मॅट्रिकच्या परीक्षेसाठी ते ठाण्याला थोरले बंधु शंकर यांचेकडे आले. ते तिथे नोकरीला होते. परीक्षा पास झाल्यावर यशवंतरावांनी मुंबईत उदबत्या विकण्याचा व्यवसाय सुरू केला. भांडीकुंडी व अन्य वस्तूहि उदबत्यांबरोबरच विकू लागले.''

''त्यांची ही व्यवसाय करण्याची जिद्द व सचोटी पाहून ठाण्यातच देशपांडे नावाच्या गृहस्थांनी त्यांना आपल्या सोन्याचांदीच्या दुकानात नोकरी दिली. तिथे ते सोनारकाम शिकले. या निमित्ताने त्यांचा मुंबईतल्या 'मिकामोटो' या कल्चर मोत्यांच्या व्यापारातल्या अग्रगण्य कंपनीशी संपर्क आला. या कंपनीने यशवंतरावांना मोत्यांच्या व्यापारात यायला प्रोत्साहन दिले. महाराष्ट्रभर फिरून कल्चर मोती विकण्यासाठी उधारीवर माल दिला.''

''फिरत्या विक्रीव्यवसायातून मग स्थायिक दुकानदारीची कल्पना स्फुरली. भाड्याचे दुकान घेऊन लोकांकडून ऑर्डर घेऊन दागिने घडवून देण्याचे काम सुरू केले. या अनुभवातून आत्मविश्वास आला. तसेच मणिलाल चिमणलाल आणि मोहनलाल भगवानदास या दोन सोने विकणाऱ्या प्रसिद्ध पेढ्यांनी सर्व प्रकारच्या सहकार्याचे आश्वासन दिले. या बळावर १९४५-४६ च्या सुमरास यशवंत विठ्ठल मराठे (प्रा.) लि. या नावाने सध्याचे दुकान चालू केले.''

दुकान चालू झाल्यानंतरच्या वाटचालीबाबत सांगताना आनंदराव म्हणाले ''सुरवातीच्या काळातच अडचणीचे प्रसंग निर्माण झाले. प्रथम दुकानावर दरोडा पडला. गांधीवधानंतर तर काही काळ फारच अस्वस्थतेत गेला. आमच्या घरावर दगड येत. 'मराठे पितळ विकतात, सोने नव्हे' असे भिंतीवर लिहिले जाई. पण या सर्व प्रसंगातून धीराने व सचोटीने वाटचाल करीत दुकानाची प्रगती चालू राहिली. अडचणींच्या वेळी अनेकांनी ठेवींच्या रूपाने मदतहि केली. पुढे १९६६ मध्ये गोल्ड कंट्रोल कायदा आला. फक्त १४ कॅरेटचेच दागिने करायला परवानगी होती. शुद्ध सोन्याच्या दागिन्यांना बंदी घालण्यात आली. कायद्यातील पळवाटांचा फायदा घेऊन, शुद्ध सोन्याचे दागिने बनवून देणाऱ्या अनेकांनी या काळात खोऱ्याने पैसा केला.''

''पण वडलांनी या मार्गाने जायचे नाही असे ठरवले. नियमबाह्य काम करून पैसा मिळवण्याचा मोह टाळला. याच वेळी मीहि B.Sc. होऊन दुकानाच्या कामात लक्ष घालीत होतो. पण लोकांच्या ठेवी परत करण्याचे तगादे वाढू लागले. त्यांना वाटले आता मराठे सराफ बुडणार. म्हणून काही दिवस मी निश्चित उत्पन्नासाठी नोकरी केली. घरच्याच धंद्यात काम करणारे माझे दोन काका - वामन आणि श्रीधर, यांनीहि साडी विक्रीचे दुकान काढले. पुढे गोल्ड कंट्रोल रद्द झाल्यावर त्यांनी साडीऐवजी दागिन्यांचे दुकान (शृंगार आर्ट ज्युवेलर्स) चालू केले. मागणी करणाऱ्यांना निश्चित तारीख देऊन त्या त्या वेळी नियमितपणे ठेवी परत करू लागलो. पैसे परत मिळतात हे पाहून लोकांचा विश्वास पुन्हा निर्माण झाला. काहींनी तर काढलेल्या ठेवी पुन्हा आणून दिल्या.''

''१९७३ पासून मी स्वत: पूर्णपणे व्यवसायात काम करू लागलो. माझे दोघे भाऊ - विश्वास आणि विलासहि दुकानांत कामाला येऊ लागले. लोकांचा विश्वास वाढला तसतसा व्यवहार वाढला. आमच्या दुकानांतल्या मालाच्या शुद्धतेची खात्री लोकांना पटली. एकाकडून दुसऱ्याला, दुसऱ्याकडून तिसऱ्याला अशी 'माऊथ टु माऊथ' पब्लिसिटी झाली. धंदा वाढत गेला.''

सोन्याचांदीकडून हिऱ्यांकडे कसे काय वळलात असे विचारले असता आनंदराव म्हणाले, ''आम्हा तिघा भावांबरोबरच माझा मुलगा मंदार आणि विलासचा मुलगा शंतनु पण आता हाताशी आले. मंदारने B.Sc. नंतर आमच्याच वर्कशॉपमध्ये कारागिरीचे शिक्षण घेतले. तसेच जेम अँड ज्वेलरी कौन्सिलतर्फे दिले जाणारे कलर स्टोन, डायमंड इ.चेहि शिक्षण घेतले. विश्वासची मुलगी गौरीही आता हे कोर्सेस करते आहे. तेव्हा व्यवसाय वाढीच्या दृष्टीने सर्वांनी सोन्या-चांदीतच गुरफटून न राहता नवी वाट चोखाळावी म्हणून हिऱ्यांच्या व्यवसायात नुकतेच (या दिवाळीतच) पदार्पण केले.''

''केवळ हिऱ्यांच्या दागिन्यांचे असे ठाण्यातले आमचे एकमेव दुकान आहे. मुंबईत सुद्धा केवळ हिऱ्यांची अशी एकदोनच दुकाने असावी, बहुतेक सारी दुकाने सोन्या-मोत्यांबरोबर हिऱ्याचे दागिने विकतात. ठाण्यातले आमचे हे दुकान अगदी मुंबईतल्या नेपियन्सी रोडवरच्या पॉश लोकॅलिटीतल्या दुकानांहूनहि काकणभर सरस वाटते. अशी प्रतिक्रिया काही दुकानदार मित्र व ग्राहकांनी व्यक्त केली.'' असेहि आनंदरावांनी अभिमानाने सांगितले.

हिऱ्यांचे दागिने बनवणाऱ्या व्यवसायांत बंगाली लोकांची जवळजवळ मोनोपॉली आहे, आपले लोक तर क्वचितच आढळतात. मराठी माणूस खपतो तो 'डायमंड कटिंग' च्या मेहनतीच्या कामात. अतिअल्प वेतनावर. पुढे त्याचे दागिने बनविण्याचा व्यवसाय हा खरा महत्त्वाचा म्हणून या व्यवसायात मराठी

माणसांनी आले पाहिजे. असेहि आनंदरावांनी अतिशय तळमळीने सांगितले. आपणाकडे कोणी मराठे कुटुंबीय अथवा मराठी माणूस सोने-चांदी-हिऱ्याचे काम शिकण्यासाठी आला तर त्याला शिकवण्याचीहि तयारी त्यांनी दाखवली. मात्र त्याच्याकडे प्रबळ इच्छाशक्ती व दोन अडीच वर्षे वाट पहाण्याची तयारी हवी. 'पी हळद की हो गोरी' अशा तऱ्हेने आज काम सुरू केले की २/४ महिन्यांत झाले सारे शिक्षण अशा 'झटपट रंगारी' पद्धतीने हे शिक्षण होऊ शकत नाही याची पूर्ण जाणीव इच्छुकांनी ठेवायला हवी असा इशाराहि द्यायला ते विसरले नाहीत.

केवळ आपल्यापुरते न पाहता आपण समाजाचेहि काही देणे लागतो या भावनेचेच हे प्रत्यंतर. याच भावनेतून 'यशवंत विठ्ठल मराठे स्कॉलरशिप फंड' दुकानाच्या नफ्यातून निर्माण केला आहे. गरजेनुसार या फंडात वेळोवेळी भर घातली जाते आणि येणाऱ्या व्याजातून विशेषत: ठाण्यातल्या गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, फी, लॅबोरेटरी इक्विपमेंट इ. साठी मदत करण्यात येते.

तसेच सर्व नोकरवर्गाच्या कुटुंबीयांसमवेत वर्षातून एकदा दुकानाच्या खर्चाने तीन दिवसांची सहलहि काढली जाते. दुकानातल्या नोकरांना हॉस्पिटलमध्ये रहावे लागले तर तो खर्च दिला जातो. त्यांच्या मुलांचा शिक्षणाचाहि खर्च केला जातो. यंदापासून सर्व नोकर वर्गाच्या कुटुंबीयांसमेत वर्षातून दोनदा सहभोजनाचीहि नवीन प्रथा सुरू केली आहे.

ज्ञानसाधना कॉलेज, कळवा संगीत सभा, महाराष्ट्र राज्य सराफांची संघटना अशा संस्थांच्या कार्यातहि आनंदरावांचा सहभाग आहे. मराठे प्रतिष्ठानचेहि ते विश्वस्त आहेत. आणि विशेष म्हणजे ''विश्वस्त म्हणून मला काहीतरी निश्चित असे काम करायचे आहे आणि अजून तसे क्षेत्र वा संधी मिळालेली नाही.'' अशी टोचणी त्यांच्या मनात आहे हेहि मला त्यांच्याशी बोलताना जाणवले. असे 'कर्ते' विश्वस्त किती असतात ? अनेक विश्वस्तांचा संस्थेच्या लेटरहेडवर नावापुरताच संस्थेशी संबंध असतो याचा अनुभव आपणापैकी अनेकांना असेलच.

मी आनंदरावांशी बोलत असतानाच त्यांच्या भावाने आम्हाला जरा थांबवले आणि पुढील २/३ दिवसातल्या काही महत्त्वाच्या देण्याघेण्याबाबतच्या नोंदीबाबत त्यांना दाखवल्या. या संदर्भात मी आनंदरावांना विचारले की दुकानाच्या व्यवहाराच्या वेगवेगळ्या खात्यांची जबाबदारी एकेकाने वाटून घेतली आहे काय ? त्यावर आनंदराव म्हणाले ''आम्ही व्यवहाराचे वेगवेगळे विभाग पाडून एकेकजण एकेक खाते सांभाळतो'' पण पुढे त्यांनी सांगितलेली गोष्ट अधिक महत्वाची. ते म्हणाले की ''दर दोन महिन्यांनी आम्ही जबाबदारी बदलून घेतो. त्यामुळे सर्वांचा सर्व व्यवहाराशी, दुकानदारांशी, गिऱ्हाइकांशी सततचा संपर्क राहतो. शिवाय आम्ही सारे भाऊ-भाऊ आणि आता तर आमची मुलेपण रोज एकत्रितपणे दिवसाच्या व्यवहाराबाबत, महत्त्वाच्या घटनांबाबत चर्चा करतो. त्यामुळे सर्वांना सर्व व्यवहाराची माहिती असते. सर्वांचे विचार ऐकले जातात.एकोपा रहायला त्यामुळे मदत होते. आम्ही सारे भाऊ रहायलाहि एकाच घरात, पण बिऱ्हाडे वेगवेगळी, खाजगी व्यवहार प्रत्येकाचे स्वतंत्र, यामुळेहि मतभेदाला, संघर्षाला वाव मिळत नाही.''

आनंदरावांच्या या बोलण्यावरून मला सुमारे तीन वर्षांपूर्वी त्यांच्या घरी त्यांच्या वडलांच्या झालेल्या भेटीची आठवण झाली. ते एकटेच घरात होते. फुरसतीच्या वेळी आम्ही दोघे सुमारे तासभर बोलत होतो. त्यांच्याहि बोलण्यातून मला अशाच तऱ्हेची सुसंवादाची आणि सर्व मुले व्यवहार समर्थपणे संभाळीत असल्यामुळे समाधानी निवृत्तीची भावना जाणवली होती. व्यवसाय आणि सुखीसमाधानी कुटुंब या दोन्ही आघाड्यांवरचे हे यश पाहता 'सुयश' हे त्यांच्या बंगल्याचे नाव खचितच अन्वर्थक वाटते.

या यशाचे नवे शिखर - हिरे विक्री दुकान पहायला मात्र ते हयात नाहीत ही खंत आनंदराव आणि त्यांच्या भावांना वाटत असेल. मात्र आपल्या मुलांचे हे पुढचे पाऊल पाहून त्यांच्या वडिलांच्या आत्म्याला 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' या स्वरूपाचा पराभवातला आनंद नक्कीच वाटत असणार !

❑❑❑

**मानसन्मान**

ॲथलेटिक्स कु. श्रेया विद्वांसने आंतरविद्यापीठ स्पर्धेत विशेष यश संपादन केले व श्रेया ही मुलुंडच्या वझे केळकर कॉलेजची विद्यार्थिनी आहे. म.प्र. तर्फे कु. श्रेया विद्वांस चे हार्दिक अभिनंदन. (म.टा. १४ जुलै २००८)

बोरिवलीचा कु. हर्षद आठवले याने चार्टर्ड अकौंटंट सी.ए. च्या परीक्षेत रँकमध्ये अठ्ठेचाळीसावा (४८वा) येण्याचा मान पटकाविला मराठ्यांच्या माहेरवाशिणीचा (पूर्वाश्रमींची संजीवनी सदाशिव मराठे) यांचा हर्षद हा हुषार मुलगा म.प्र. तर्फे हर्षदचे हार्दिक अभिनंदन.

**हितगुज'च्या अमृतमहोत्सवी ७५व्या अंकानिमित्त**
**हार्दिक शुभेच्छा**

**श्री.शरद अरूण मराठे आणि कुटुंबिय, गोरेगांव**

● प्रवास वर्णन

# आम्ही दर्यापार

– श्री. ग.भा. मराठे (पृ.४२७),
घाटकोपर (पूर्व) दू.२५१६३९०७

बऱ्याच वर्षापूर्वी एका ज्योतिषाने हात पाहून मला सांगितले होते : ''तुमच्या नशिबात परदेशगमनाचा योग आहे.'' हे ऐकल्यावर मला असे वाटले होते की या ज्योतिषाला विनोदबुद्धी असावी. मी आणि परदेश गमन ? काहीतरीच काय ?

पण या वर्षी काय झाले कुणास ठाऊक ! जानेवारी महिन्यात निरनिराळ्या परदेश प्रवास आयोजित करणाऱ्या कंपन्यांच्या जाहिराती आमच्या वाचनात येऊ लागल्या. आपणही या कंपन्यांच्या प्रवासयोजनेत दाखल का होऊ नये असा प्रश्न मी आणि माझी पत्नी एकमेकांना विचारू लागलो.

अशा प्रवासात आम्ही उभयतांनी स्वतंत्रपणे परदेशगमन करणे प्रथमच ''कटाप'' केले कारण पु.ल. देशपांड्यांच्या ''अपूर्वाई'' च्या पहिल्या प्रकरणाचा धसका घेतला होता. त्याऐवजी एखाद्या नाणावलेल्या प्रवास कंपनीतर्फेच जावे असा निर्णय आम्ही घेतला.

यूरोपमध्ये जून-जुलै महिन्यात उन्हाळा असतो व ''स्प्रिंग टाईम इन पॅरिस'' हा अनुभव घेण्याजोगा असतो असेही आम्ही तरुणपणापासून ऐकले होते. म्हणून या सुमारास जावे असे आम्ही ठरविले.

सौ. ने पहिली सूचना केली. ''हे पहा, आता आपल्याला फॉरिनमध्ये वावरायचं आहे. तेव्हा सूट बूट वगैरे शिवून घ्या.'' म्हणून बूट व सूटाच्या शिवण्यापासून सर्व जामानिमा करावा लागला. परदेशी न जाताही पत्नीला ''फॉरिन''ची खडा न खडा माहिती होती. कारण आमच्या सोसायटीत ऑफिसतर्फे परदेशी जाऊन आलेल्या तांत्रिक अधिकाऱ्यांच्या बायका नेहमी त्याबद्दल अभिमानाने उल्लेख करायच्या. नंतर मात्र असे दिसून आले की इंग्लंड वगळल्यास इतर कुठेच सुटात वावरणारी मंडळी फारशी नाहीत.

तसेच, आमच्या ''फॉरिन रिटर्न'' मित्रानी आम्ही न विचारताही सूचना करायला सुरुवात केली. ''तुम्ही कॉन्टिनेन्टमध्ये जाताय. ठीक आहे. तिथं हमाल बिमाल काही नाही. तेव्हा लग्नाला गेल्यासारखं सामान नेऊ नका. शक्य तितकं कमी सामान घ्या. सामान तुम्हालाच उचलावं लागेल.'' म्हणून चाके असलेली सूटकेस विकत घ्यावी लागली.

नंतर ही माहिती खरी असल्याचे आढळून आहे. परदेशात ''हमाल'' ही संस्थाच अस्तित्वात नाही. त्यामुळे हमालीवरून भांडणे करण्याचा मनोरम अनुभव येत नाही. हमालाने - ''पोटाकडे पाहून द्या, साहेब.'' असे सांगण्याचे श्रुतीसौख्यही लाभत नाही. आमच्या बरोबर सहलीत सामील झालेल्या मंडळींमध्ये वयाची साठी पार केलेले पुष्कळ स्त्री पुरुष होते. त्यांनासुद्धा स्वत:चे सामान स्वत:च न्यावे लागले. अर्थात, सरकते जिने, विजेचे पाळणे इत्यादी सोयी असल्यामुळे फारसा त्रास जाणवला नाही. असो.

तर, दिनांक १० जूनला आम्ही विमानतळावर हजर झालो. परदेशगमनाच्या विचाराने आम्ही भारले गेलो होतो. आजवर अनेकदा पाहिलेला असूनही विमानतळ नवा भासत होता. पण रेल्वे स्टेशन आणि विमानतळ यात फारसा फरक आढळला नाही. मध्य आशियात जाणारे, तसेच इंग्लंड अमेरिकेला जाणारे भारतीय ''गावी जायला'' निघाल्याप्रमाणे पत्र्याचे डबे भरून निघाल्याचे दिसत होते. काही लोक ग्रामीण पोषाखातच चालले होते. इतर बऱ्याच बाबतीत विमानतळ आणि रेल्वे स्टेशन यात सारखेपणा दिसत होता. फक्त ''चाय गरम'', ''पान, बिडी, सिगारेट, माचिस'' अशा आरोळ्या मात्र ऐकू येत नव्हत्या. विमानतळाचे हे रुपडे दिसल्यावर ''उगाच सुटाच्या फंदात पडलो'' असे मला वाटू लागले. काही लोकांच्या सामानात सुंभाने बांधलेल्या वळकट्या होत्या. त्यात केरसुण्या व खराटेही दिसत होते. लांजाहून मुंबईला येणाऱ्याच्या सामानात ज्या वस्तू दिसतात तशाच वस्तू मुंबईहून लंडनला जाताना दिसत होत्या. भारतीय संस्कृतीचे हे ''ब्रेन ड्रेन'' दिसल्यावर मला उगीचच खटकल्यासारखे वाटले. आता सर्व थरातील भारतीय मोठ्या प्रमाणावर परदेशी जात आहेत या जाहिरातील तथ्य दिसत होते. आता ब्रेन ड्रेन नसून ''हेडस ड्रेन'' सुरू झाले याचे हे गमक होते. बुद्धीचा त्यांत काही संबंध राहिला नाही. आमच्या समूहामध्ये चाळीसजण होते. त्यातील पस्तीसजणांनी वयाची पंचावन्न वर्षे पार केली होती. दोन तरुण जोडपी होती व एक तरुण ब्रह्मचारीही होता. आमच्या समूहातील लोक भारताच्या विविध प्रांतामधून आले होते. असे असूनही सर्वजण अतिशय हौशी, उत्साही होते. ''हनीमून और एक बार'' असा आव काहींनी आणला होता.

''नेशील का मज मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला'' हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे काव्य आता कालबाह्य झाले आहे. आता मातृभूमीतून परदेशांत परत कधी न येण्यासाठी जाणाऱ्यांची गर्दी आहे. काही प्रवाशांनी विमानातच सीटच्या खाली रेल्वे डब्यातल्याप्रमाणे ताणून दिली पण हर्वा सुंदरीनी त्यांना प्रतिबंध केला व रीतसर बसण्यास सांगितले.

आमचा पहिला मुक्काम मॉस्को या शहरात झाला. मॉस्को विमानतळावर तपासणी अत्यंत कडक होती. सगळ्यांच्या बॅगा संपूर्णपणे तपासून घेण्यात आल्या, तसेच तीन-चार अधिकाऱ्यांनी निरनिराळे प्रश्न विचारून नाव काय, भेटीचा उद्देश काय वगैरे तपशीलवार विचारून घेतले. आम्ही पुढे जवळजवळ आठ-नऊ देशांमध्ये फिरलो. पण इतकी कडक तपासणी कुठेच आढळली नाही. मॉस्को या सहरी आमचा अडीच दिवस मुक्काम होता व व्यवस्था ''मॉस्को हॉटेल'' या प्रसिद्ध पंचतारांकित हॉटेलमध्ये करण्यात आली होती. या हॉटेलमध्ये एकंदर पाच हजार खोल्यांची सोय आहे. जगप्रसिद्ध ''लाल चौक''ला लागूनच हे हॉटेल आहे. हॉटेलमध्ये गेल्या गेल्या आमचे पासपोर्ट काढून घेण्यात आले, व आम्ही परत निघण्याच्या वेळी ते आम्हाला परत देण्यात आले. हे पासपोर्ट काढून घेतले जाताना यालाच ''फ्रॉम रशिया विथ लव्ह'' म्हणतात की काय असे माझ्या मनात आले. इतर कोणत्याही देशात आमचे असे पासपोर्ट काढून घेण्यात आलेले नव्हते. या शहराची

लोकवस्ती ८० लाख इतकी आहे. आमच्या रशियन गाईडने आम्हाला ''लाल चौक'', क्रेमलिनच्या इमारती, लेनिनचे थडगे वगैरे दाखविले. सर्व शहर स्वच्छ व प्रशस्त आहे. आमच्यापैकी काही लोक स्वतंत्रपणे टॅक्सीने शहराचा फेरफटका करून आले, तेव्हा कुठल्याही तऱ्हेचे अटकाव किंवा बंधन घातले गेले नाही. भिकारी, झोपडपट्टी कुठेही दिसली नाही. अर्थात भाषेच्या अडचणीमुळे स्थानिक जनतेशी बोलणे हे शक्य नव्हते. पण एकंदर हिंदुस्थानच्या रहिवाश्यांबद्दल आपुलकी व प्रेम आढळून आले. राजकपूर, नर्गीस ही जोडी अत्यंत लोकप्रिय आहे. एकंदर रशियन लोक जाडे-जुडे दिसले. आरोग्य सेवा, युनिव्हर्सिटी पातळीपर्यंतचे शिक्षण इत्यादी सर्वांना मोफत आहे. येथे घरांचा तुटवडा आहे, व पाच वर्षांच्या प्रतिक्षेनंतर मॉस्कोत जागा मिळू शकते. त्याकरिता सुलभ कर्जही मिळू शकते. जागेचे रेशनिंग आहे व ठराविक फॉर्म्युल्याप्रमाणेच खोल्यांचा आकार, खोल्यांची संख्या ठरवली जाते. तेथील स्त्रिया सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कामे करतात व अत्यंत साध्या, विशेष मेकअप न करणाऱ्या अशा आहेत. अर्थात येथे पश्चिम युरोप एवढी सुबत्ता नाही. डिपार्टमेंट स्टोअर्स मोठी आहेत. पण त्यात वस्तूंची विविधता फारशी आढळून येत नाही. उदाहरणार्थ, साबणाच्या प्रकारात स्नानाच्या साबणाचे दोनच प्रकार व कपडे धुण्याच्या साबणाचेही दोनच प्रकार आहेत. तसेच मांस (डुकराचे) विकत घेण्याकरिता काही ठिकाणी लोकांच्य ारांगा लागलेल्या दिसल्या. रशियन भुयारी रेल्वे मात्र अप्रतिम ! जमिनीच्या खाली १०० फूट खोलीवर ही रेल्वे आहे. बऱ्याचशा भुयारी स्थानकावर झार कालीन, आरसे, झुंबरे, रंगीत काचेची तावदाने लावलेली आहेत. मॉस्को युनिव्हर्सिटीलाही आम्ही भेट दिली. तेथे ४५ हजार विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय आहे. भारतातून काही विद्यार्थी येथे उच्च शिक्षणाकरिता आलेले आहेत असे कळते. अलिकडेच वैद्यकीय शिक्षणाकरिता उच्च माध्यमिक परीक्षा पास झालेली काही भारतीय मुळे तेथे दाखल झालेली आहेत.

रशियन सर्कस अत्यंत लोकप्रिय असून सर्कशीकरिता कायमचे तंबू उभारलेले असतात. निरनिराळ्या सर्कशींचे लोक येतात व प्रयोग करतात. आम्हीही एका सर्कशीच्या प्रयोगाला गेलो होतो. जंगली जनावरांच्या कामापेक्षा, कसरतीच्या कामावर त्यांचा विशेष जोर दिसला.

मॉस्कोला ''पॅनोरामा'' नावाचे एक वस्तू संग्रहालय आहे. तेथे १८१२ साली नेपोलियनशी रशियाचे जे युद्ध झाले त्याचे चित्रण करण्यात आले आहे. हे चित्रण एका घुमटाखाली चारही बाजूंनी करण्यात आले आहे. लाईट इफेक्टस, प्रकाश व ध्वनीयोजना, इतक्या उच्च दर्जाच्या आहेत की आपण खरोखरच युद्धच पहात आहोत असे वाटते. महाभारतामध्ये मयसभेचा जो उल्लेख आहे व कौरव कसे फसले, त्याची यावेळी आठवण झाली. क्षणभर आपण त्या काळात न कळत जातो. हे पहात असताना असे वाटले की आपले बाबासाहेब पुरंदरे यांनी अशा धर्तीचे काहीतरी प्रताप गडावर करावे. त्यांना त्याकरिता मॉस्कोला, हा पॅनोरमा बघण्याकरिता पाठवावे.

रशियन शाकाहारी अन्न हे बरेचशे उकडलेले असते व रशियन लोक हे मांसाहारी आहेत. आमच्या गाईडने राजकीय विषयावर चर्चा करण्यास मात्र नकार दिला. पण इतर माहिती आनंदाने दिली. हे गाईडसुद्धा सरकारी सेवेतच असतात. कारण तेथे खासगी ट्रॅव्हल कंपन्या वगैरे प्रकार नाहीत. मॉस्को हॉटेलमध्ये मात्र हळूच ''डॉलर'' आहेत का अशी कर्मचाऱ्यांकडून चौकशी व्हायची व ते नेहमीच्या दरपेक्षा जास्त दराने रुबल्स द्यायला तयार होते.

मॉस्कोनंतर आम्ही हॉलंडमधील ॲमस्टरडॅम, येथे आलो. त्या शहरात १०२ कालवे आहेत. या कालव्यातून बोटीचा प्रवास करणे हा एक सुखद अनुभव आहे. १४व्या शतकापासूनच्या इमारती, चर्चेस चांगल्या स्थितीत आढळून येतात. सुप्रसिद्ध पवनचक्क्या अजूनही आहेत परंतु त्यांचा आता पूर्वीसारखा वापर केला जात नाही. हिऱ्यांना पैलू पाडण्याचे कारखाने तसेच लाकडी पादत्राणाचा कारखानाही आम्ही पाहिला. या लाकडी पादत्राणांना डच भाषेत ''साबोत'' असे म्हणतात. पूर्वी चालू काम बंद पाडण्याकरिता या लाकडी पादत्राणांचा यशस्वी उपयोग केला जायचा त्यामुळे इंग्रजी भाषेत Sabotage हा शब्द रूढ झाला.

आमच्या प्रवासात प्रवासी कंपनीतर्फे सकाळची न्याहारी व रात्रीचे जेवण दिले जायचे. दुपारचे जेवण आमच्या स्वत:च्या खर्चाने आम्हास जिथे आम्ही स्थळे पाहत होतो तेथे घ्यावे लागे. बहुतेक ठिकाणी भारतीय उपहारगृहे असल्याने रात्रीचे जेवण भारतीय पद्धतीचे मिळायचे. दुपारी मात्र शाकाहारी लोकांना बरीच अडचण पडायची. सँडविच, पोटॅटो चिप्स, ब्रेड, योगार्ट (दही) वगैरे घेऊन दुपारचे जेवण उरकावे लागायचे. सकाळची न्याहारी मात्र भरपूर असल्यामुळे दुपारी विशेष भूक लागत नसे. हॉटेलमध्ये सकाळी न्याहारी घेताना असे आढळून आले की, कित्येक अमेरिकन, युरेपियन प्रवासीसुद्धा पाव, अंडी, दूध, साखरेचे क्यूब्ज इ. आपआपल्या पिशव्यांमध्ये भरून घ्यायचे हा प्रकार आम्हीही आचरणात आणला. आणि त्याचप्रमाणे ब्रेड, अंडी वगैरे पदार्थ पिशव्यात भरून घेण्यास सुरुवात केली. त्यांचा वापर दुपारी केला जाई. शिवाय आम्ही आमच्याबरोबर लाडू, शेव वगैरे भारतीय पदार्थ घेतलेले होते. आमचे सहप्रवासी श्री. लेले, श्री. फडके यांनी चकल्या, शंकरपाळी, चिवडा वगैरे बरोबर आणले होते. तसेच श्री. खेडेकर यांनी पुरणपोळ्या आणल्या होत्या. त्याचा आम्हाला प्रवासात जेवण्याच्या वेळी उपयोग झाला. नाहीतरी पाव अंडी खाऊन थोड्या दिवसांनी कंटाळा येतो. आमचा अमेरिकेत रहाणारा एक नातेवाईक इथे आल्यावर कडबोळी करा, थालिपीठ करा अशी मागणी का करू लागतो ते आम्हाला आता कळले. कितीही पंचतारांकित हॉटेलमध्ये पार्ट्या झोडल्या, तरी पिठले भाताची चव त्यास येणार नाही हे खरे. ॲमस्टरडॅमला २ दिवस राहून आम्ही पुढे प्रयाण केले. वाटेमध्ये कॅटासिया लँडला भेट दिली. ती डिस्नेलँडची छोटीशी प्रतिकृती होती. तिथे मोनोरेल, भयचकित देखावे असणारी भुयारे वगैरे गोष्टी होत्या.

तेथून आम्ही कोलोन या पश्चिम जर्मनीमधील शहरी गेलो. या शहरात चामड्याच्या वस्तू व इलेक्ट्रॉनिक्सची उपकरणे या वस्तू अत्यंत दर्जेदार मिळतात. नंतर आम्ही बोपार्ड ह्या गावी गेलो व ऱ्हाईन नदीतून बोटप्रवास केला. किनाऱ्यावर दोन्ही बाजूला १२व्या शतकापासून बांधलेल्या इमारती, चर्चेस व किल्ले दिसत होते. नंतर आम्ही फ्रँकफूर्ट येथे गेलो. हे शहर म्हणजे पश्चिम जर्मनीची व्यापारी राजधानीच आहे. हे शहर अत्यंत सुबक, प्रशस्त व स्वच्छ आहे. येथे पुष्कळ भारतीय नागरिकसुद्धा आढळले. रात्री एका पंजाबी

हॉटेलमध्ये आम्ही भारतीय पद्धतीचे जेवण घेतले. या हॉटेलमध्ये श्रीकृष्ण गोपीची वस्त्रे चोरून झाडावर बसला आहे व गोपी किनाऱ्यावर वस्त्रहीन अवस्थेत उभ्या आहेत व त्याची विनवणी करीत आहेत असे मोठे चित्र हॉटेलच्या प्रवेशद्वारात लावलेले आढळले. आम्ही हॉटेल मालकाला म्हटले की भारतीय संस्कृती दाखविणारे हे एकच चित्र तुम्हाला मिळाले का ? तेव्हा त्यांनी उत्तर दिले की, इथल्या आजूबाजूला असलेल्या कॅब्रे शो दाखविणाऱ्या संस्कृतीशी साम्य असणारे पण भारतीय म्हणून हे चित्र मुद्दाम निवडले. ''कृष्ण लीला'' आणि कॅब्रे यात साम्य पाहू शकणाऱ्या त्या दिव्य?????? मनोमन दंडवत घातले. यानंतर आम्ही काळ्या पाईन वृक्षांच्या गर्द झाडीतून ब्लॅक फॉरेस्टमधून प्रवास करून ऱ्हाईन नदीचा धबधबा पाहिला व झुरीचमार्गे स्वित्झलैंडला गेलो. स्वित्सर्लंडमध्ये प्रवेश करताच उंच पर्वताची शिखरे दिसू लागली व डोंगरकुशीतून पुढचा प्रवास सुरू झाला. आमच्या स्विस गाईडने गंमतीने म्हटले की, कोणाला काळा पैसा ठेवावयाचा असेल तर स्वित्सलैंडमध्ये छान सोय आहे, मात्र इथल्या बँका आपण पैसा ठेवल्याबद्दल त्यावर व्यात देत नाहीत. पण गुप्तता ठेवण्याकरिता उलट व्याज आकारतात. स्वित्सर्लंडला तीन दिवस आमचा एका खेड्यामध्ये मुक्काम होता. हे खेडे असले तरी शहरासारख्या सर्व सुखसोयी तेथे उपलब्ध होत्या. माऊंट टिटलीस या दहा हजार फूट उंचावर असलेल्या पर्वत शिखरावर आम्ही ट्रॉलीमधून प्रवास केला. पर्वत माथ्यावर बर्फ पडत होते. पायथ्याशी सुंदर सरोवर होते. हवा अत्यंत उत्हासहवर्धक होती. काश्मीरमध्ये जसे लोक सहलीकरिता येतात तसे जगातील निरनिराळ्या देशातील परदेशी प्रवासी स्वित्सलैंडला सृष्टीसौंदर्याचा आस्वाद घेण्याकरिता येतात.

तिथून आम्ही ईन्सवृक या ऑस्ट्रियामधील शहरात आलो. तिथे १८व्या शतकातील राजवाडे व चर्चेस, किल्ले पाहिले. गमतीची गोष्ट म्हणजे अननसाला जर्मन भाषेत अननसच म्हणतात हे आम्हाला प्रथमच कळले. तसेच साखरेला तिथे शक्कर म्हणतात. या शहरात १९६४ १९६४ आणि ७६ मध्ये ऑलिंपिक स्पर्धा झाल्या होत्या. तेथे ऑलिंपिक स्टेडियमही पाहावयास मिळाले. तिथून आम्ही इटालीतील व्हेनिस शहराला भेट दिली. हे कालव्याचे शहर असून सर्व दळणवळण बोटीतून कालव्यामधूनच करण्यात येते. शेक्सपियरच्या ''मर्चंट ऑफ व्हेनिस'' या नाटकाची आम्हाला तीव्रतेने आठवण झाली. तेथे अजूनही ज्यू लोकांची बरीच वस्ती आहे. तिथे जगप्रसिद्ध वेनिशियन ग्लासेस बनविण्याचा कारखाना आम्ही पाहिला. नंतर आम्ही रोमला प्रयाण केले. रोम शहर हे पुण्यासारखे आहे. तेथे दगडी रस्ते व गल्ल्या बोळ पुष्कळ आहेत. ठिकठिकाणी जुने रोमन संस्कृती दाखविणआरे कारंजी, सभागृहे, राजवाडे यांचे अवशेष आहेत. इटालीमध्ये मात्र चोरींचे व बनवाबनवीचे खूप प्रकार होतात तेव्हा त्याबद्दल काळजी घेण्यास आम्हाला आमच्या प्रवासी कंपनीने सांगितले होते. पासपोर्टसुद्धा हॉटेलच्या खोलीवर ठेवू नका असे बजावण्यात आले होते. कारण पासपोर्टवरून दुसरे बनावट पासपोर्ट तयार करण्याचे प्रकार इटालीत मोठ्या प्रमाणावर चालतात. रोम जवळच पोपचे निवासस्थान असलेले व्हॅटिकन शहर आहे. अर्थात तेथे इटालियन सरकारचा राज्यकारभार नाही. येथील शासन व्यवस्था पोपच्या हाताखाली स्वतंत्र आहे. तेथे व्हॅटिकन-म्युझियम अत्यंत पाहण्यासारखे आहे. त्यात मायकेल एन्जेलोच्या चित्राकृती लावलेल्या आहेत. सेंट पीटर्स चर्च हे अत्यंत भव्य आहे. पोप जेव्हा व्हॅटिकन मध्ये असेल तेव्हा त्या चर्चमध्ये जमलेल्या लोकांना दर्शन देतो. हजारो लोक दररीज तेथे जमतात. आम्ही सकाळी ११.०० वाजता पोहोचलो तेव्हा तेथे पोप दर्शनाचा कार्यक्रम अर्ध्या तासापूर्वीच आवरला होता व लोक परत जात होते. रोम व व्हॅटिकन शहरात भिकारी मात्र आढळून आले. विशेष गंमत म्हणजे चहा व कॉफीपेक्षा इटालीमध्ये वाईन स्वस्त मिळते. इटालियन पिझाही प्रसिद्ध आहे. त्याचाही आस्वाद घेतला.

नंतर इटालीती फ्लॉरेन्स या ऐतिहासिक शहराला आम्ही भेट दिली. या शहरात इटालीचा शेक्सपियर ''डांटे'' यांचा जन्म झाला. हे जन्मस्थळ अजून जुन्या त्या अवस्थेत ठेवलेले आहे. जवळच एक मोठे चर्च व वाचनालय आहे. फ्लॉरेन्सला १२व्या शतकात बांधली गेलेली रोमन सभागृह व डेव्हिड व हरक्युलसचे पुतळे आहेत.

त्यानंतर ''टॉवर ऑप पिसा'' हा झुकलेला मनोरा पाहण्यास आम्ही गेलो. याला सात मजले आहेत व कुतूबमिनार प्रमाणे त्यात चाता येते. हे एक जगातील आश्चर्य समजले जाते. कारण हा मनोरा कललेला असला तरी पडत नाही. या चमत्कृतीबद्दल इंजिनियरिंग शास्त्रामध्ये याचे खास असे उत्तर अजून मिळालेले नाही. आमच्या समूहामध्ये दर २-४ तासाने मद्य घेणारे एक गृहस्थ होते. ते तर्र व्हायचे त्यांचा कधी थोडा तोल जायचा पण ते ट्रिपमध्ये कधी पडले नाही. त्यांना ''टॉवर ऑफ पिसा'' असा फिशपॉन्ड आम्ही दिला. नंतर आम्ही दिला. नंतर आम्ही लुसान या आल्प्स पर्वतातील शहरी आलो. वाटेत १७ किलोमीटर भुयारी बोगदा पार केला. लुसानला मुक्काम करून नंतर पॅरिस शहरात आलो. तेथे आयफेल टॉवर मनोरा, फाऊंटन ब्ल्यू हा नेपोलियनचा राजवाडा वगैरे पाहिले. हा राजवाडा ८०० वर्षापूर्वी बांधलेला आहे. रात्री सीन नदीतून पॅरिसशहरी फेरफटका केला. सर्व शहर दिव्यांच्या झगमगाटांनी उजळून निघाले होते.

दुसऱ्या दिवशी ''लिडो'' या जगप्रसिद्ध असलेल्या नाईट क्लबला भेट दिली. तेथे समूह नृत्याचे कार्यक्रम दाखविले जातात. काही नृत्यामधून कलाकार जवळजवळ वस्त्रहीन असतात. पण त्यांचे नृत्य व हावभाव इतके कलात्मक असतात की त्या अश्लील असे काहीच वाटत नाही. जवळजवळ १०० युवक-युवती एकत्र येऊन निरनिराळे नृत्य सादर करतात. पाण्यातून बोट चाललेली आहे, डोंगरमाध्यावर सूर्य उगवला आहे असे देखावे इतके सुंदर केलेले होते की, प्रत्यक्ष ते खरेच आहे असे वाटत होते. या लिडो शोमध्ये शॅम्पेनच्या बाटलीचा आकारसुद्धा घेतला जातो. शॅम्पेनचे घुटके घेत घेत हा शो पाहावयाचा असतो. या शोचे जवळजवळ ६० डॉलर तिकीट असते. पण पॅरिस मध्ये जाऊन शो न पहाणे म्हणजे काशीला जाऊन विश्वेश्वरांच्या देवळात न जाण्यासारखे आहे, असे समजले जाते. त्यामुळे त्या शोकरिता दररोज प्रचंड गर्दी असते. व प्रवासी कंपनीतर्फे आधीच तिकीटे काढून ठेवावी लागतात. पॅरिसचे ''नोत्र दाम'' हे चर्च सुद्धा पाहण्यासारखे आहे. या शहरात भुयारी रेल्वेची सोय आहे. निरनिराळ्या तऱ्हेची सेंट्स परफ्युमस् इथे मिळतात. परदेशी प्रवाशांकरिता तिथे खास सवलत दिली जाते.

प्रवासी कंपनीतर्फे आमचा लंडनचा मुक्काम फक्त दोन दिवसांचा होता. त्यानंतर आम्ही श्री. फाटक ह्या स्नेह्यांकडे पुढे सात

दिवस राहिलो. त्यामुळे लंडन शहर सावचितपणे बघता आले. तेथील पार्लमेंट हाऊस, लंडन टॉवर, टेन डाऊनी स्ट्रीट, वेस्ट मिनिस्टर अब इत्यादि ठिकाणे पहाता आली तसेच थेम्सनदीमधून नौकाविहार केला. बंकिमहॅम पॅलेस या राजवाड्यात ''चेंड ऑफ गार्डस'' हा समारंभ दररोज दुपारी १२.०० वाजता होतो व तो ही आम्हास पहावयास मिळाला. नवे पहारेकरी बँड वाजवत मिरवणुकीने येतात व जुन्या पहारेकऱ्यांच्या जागी काम सुरू करतात. हे पहारेकरी अगदी पुतळ्याप्रमाणे व रंगीबेरंगी पोशाख घातलेले असतात.

मादाम ठुशा यांचे मेणाचे पुतळे असलेले प्रदर्शन हे लक्षात राहाण्यासारखे आहे. निरनिराळ्या देशांच्या पुढाऱ्यांच्या अगदी हुबेहुब प्रतिमा बनविलेल्या आहेत. त्यामध्ये इंदिरा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमांचाही समावेश आहे. लंडन शहर हे विस्तृत व पसरलेले असून सगळीकडे हिरवीगार वनश्री आढळून येते. लंडन शहराचा काही भाग मुंबईसारखा आहे. ऑक्सफर्ड स्ट्रीट, पिकॅडेली ही ठिकाणे तर आपल्याकडे दादाभाई नौरोजी मार्ग, फ्लोरा फाऊंटन यासारखी आहेत. येथील एकएक डिपार्टमेंट स्टोअर्स बघायला दिवस पुरत नाही. इतकी ती प्रचंड आहेत.

या शहरामध्ये प्रत्येक वॉर्डमधील मध्यवर्ती ठिकाणी त्या भागाचा नकाशा लावलेला असतो. त्याच्या सहाय्याने आपण कुठलाही पत्ता चटकन शोधून काढू शकतो. तसेच प्रत्येक टॅक्सी चालकाकडे लंडन शहराचे रस्ते व गल्ल्याबोळ दाखवणारे नकाशे असतात व त्याचा वापर करून तो आपल्या गिऱ्हाईकांना त्यांच्या इच्छित स्थळी नेऊ शखतो. अर्थात, तेथील टॅक्सी प्रवास हा अत्यंत महागडा आहे.

साऊथ हॉल हा लंडनचा विभाग म्हणजे पंजाबमधील अमृतसर, लुधीयाना या शहरासारखा वाटतो तेथे प्रामुख्याने शिख व पंजाबी लोकांची वस्ती व दुकाने आहेत. सर्व तऱ्हेचे भारतीय पदार्थ अगदी लोणचं, पापड सारख्या वस्तूही उपलब्ध आहेत. वेम्बली या भागात गुजराथी लोकांची खूप वस्ती आहे व आपण काळबादेवीसारख्या भागात आल्यासारखे वाटते. लंडन शहरी भारतीय लोकांची इतकी वस्ती आहे की आपण परक्या देशात आलो आहोत असे वाटतच नाही. महाराष्ट्रीयन लोक हे बरेचसे नोकरी करणारे असतात किंवा डॉक्टर, आर्किटेक्ट वगैरे व्यवसाय करणारे असतात. येथे महाराष्ट्र मंडळ असून ''गणपती उत्सव'' साजरे केले जातात. तसेच भारतातून येणाऱ्या लोकांच्या गायनाचे, भाषणाचे कार्यक्रम वेळोवेळी आयोजित केले जातात.

''हाईडस् पार्क'' हे लंडनमधील सर्वात मोठे मैदान असून तेथे लोक फिरण्यासाठी व ''सनबाथ'' घेण्यासाठी येतात. या पार्कमध्ये ''स्पीकर्स कॉर्नर'' नावाचा एक भाग आहे. तिथे कोणीही कोणत्याही विषयावर कांहीही भाषण करू शकतो. फक्त वक्त्याने ब्रिटिश राजघराण्याविषयी काही वाईट बोलता कामा नये असे बंधन आहे. ते बघण्यासाठी म्हणून एक पोलीस नेहमी हजर असतो. आम्ही गेलो तेव्हा ब्रिटीश सरकारने बंदी घातलेली एक कादंबरी तेथे वाचून दाखविण्यात आली. शेकडो लोक ती ऐकत होते. पण भाषण स्वातंत्र्य असल्यामुळे बोलणाऱ्याविरुद्ध काही कृती केली जात नव्हती. मी पण हाईडस् पार्कवर भाषण करण्याची माझी हौस भागवून घेतली. माझ्या आधी बोलणारे जे गृहस्थ होते त्यांनी ''कम्युनिझम का चांगला आहे'' याचे भाषण दिले होते. त्यानंतर मी ''कॅपिटॅलिझम, कम्युनिझम् हे विसरून जा व गांधीझम् - 'प्रेम व विश्वास' हे आचरणात आणा'' अशा तऱ्हेचे भाषण केले. प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली. ब्रिटीश लोक एके काळी अत्यंत उद्योगी असे समजले जात पण सध्या कामगार चळवळीचा एवढा प्रभाव आहे की पूर्वीची कार्यक्षमता आता अजिबात राहिलेली नाही. कामगार जास्तीतजास्त कामचुकारपणा करतात व वेतनवाढी इत्यादी करिता वारंवार संप करतात. थॅचर बाई सत्तेवर आल्यापासून त्यांनी या कामगार चळवळीला बराचसा आळा घातला आहे. इथे एक किस्सा सांगितला जातो की, एका पंचतारांकित हॉटेलमध्ये फक्त खाण्याच्या बशा धुणारे व फक्त सिगरेटचे रक्षापात्र साफ करण्यासाठी असे वेगवेगळे कामगार नेमलेले होते.... काही लोकांनी खाण्याच्या डिशमध्ये जेवण संपल्यावर सिगरेटची राख टाकली तेव्हा दोन्ही तऱ्हेच्या कामगारांनी हे आमचे काम नाही असे सांगून राख टाकलेल्या डिशेस साफ करण्यास नकार दिला. प्रकरण थेट पार्लमेंटपर्यंत गेले. शेवटी मॅनेजरला त्या राख टाकलेल्या बशा साफ कराव्या लागल्या. इथे कुत्रे पाळण्याचे वेड अतिशय आहे. कुत्र्यांची ''ब्युटी सलून्स'' ठिकठिकाणी आहेत. लंडन शहरात महागाई खूप असून राहण्याच्या घरांची भाडी जबरदस्त आहेत. खुद्द लंडन शहरातील वस्ती आता कमी होत चालली आहे. लोक उपनगरात जागा घेऊन शहरात कामाला येतात. सर्व लोकांना वैद्यकीय सेवा मोफत आहे. तेथे सोश्यल सिक्युरिटी सिस्टीम सरकारने राबविली आहे. त्यानुसार बेकारांनासुद्धा बेकार भत्ता मिळतो. काही कंपन्यांमध्ये कर्मचारी निवृत्त झाल्यावर, एकदम त्यांच्या जीवनात पोकळी निर्माण होऊ नये म्हणून वर्षभर आधी त्याची मानसिक तयारी केली जाते. नेहमीचा ५ दिवसांचा आठवड्याऐवजी संपूर्ण पगारासहित काही महिने ४ दिवसांचा आठवडा, काही महिनेय ३ दिवसांचा आठवडा अशा तऱ्हेने त्याला काम दिले जाते. म्हणजे तो रिकाम्या वेळेचा कसा उपयोग करायचा यासंबंधी तयारी करू शकतो. आपणांकडे हे कधी येणार ?

लंडन शहरामध्ये रहाणाऱ्या काही भारतीय लोकांना, एअर इंडियामध्ये काम करणाऱ्या लोकांनी, त्यांच्याकडे रहायला आलेले आवडत नाही. कारण हल्ली एअर इंडियाच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्याविषयी त्यांचे आई, वडील, बहिणी, भाऊ, बायको यांनाही फ्री पासेस मिळतात. एकदा एक जण येऊन गेला, की पुढे त्याच्या पाठोपाठ त्याचे नातेवाईकही लंडन पहाण्यास येण्यास रीघ लागते. आणि हे लंडनमधील रहिवाश्याला फार त्रासदायक वाटते. व शेवटी नकार द्यायची पाळी येते. आम्ही 'एअर इंडिया' वाले नाही म्हटल्यावर आमचे मनापासून स्वागत झाले. टी.व्ही. आणि व्ही.डी.ओ. च्या वापरामुळे सिनेमागृहे जवळजवळ बंदच पडली आहेत, परंतु नाट्यगृहे मात्र जोरात चालू आहेत.

लंडनला ''पेटीकोट लेन'' म्हणून भाग आहे तेथे रविवारी आपल्यासारखाच चोरबाजार भरतो. याला ''पेटीकोट'' नाव का पडले ते मात्र सांगता आले नाही. लंडनमध्ये हवा नेहमी कुंद व मधून मधून पाऊस सारखा पडत असतो. त्यामुळे जेव्हा स्वच्छ सूर्यप्रकाश पडतो तेव्हा लोक घराबाहेर पडून मैदानात ''सनबाथ'' घेतात. लंडनमधील भारतीयांना पाश्चिमात्य देशांमध्ये असल्याप्रमाणे जो एकटेपणा जाणवतो तो जाणवत नाही कारण भारतीयांची संख्या खूप आहे व वेळोवेळी ते एकत्र जमून उत्सव, सण कार्यक्रम साजरे करतात. सेल्फ सर्व्हिस हॉटेलमध्ये अन्न घेणे परवडते कारण तिथे वेटर्स

नसतात. आणि जिथे वेटर्स नेमलेले असतात तिथे अन्न जास्त महाग असते, कारण इथे माणसांचा तुटवडा आहे. सर्व युरोपात मोटारींचे प्रमाण खूप असले तरी अपघातांचे प्रमाण खूपच कमी आहे, कारण इथल्या लोकांमध्ये शिस्त आहे. आम्ही एकदा सकाळी ६ वाजता बसने जात असता एक सायकलस्वार सिग्नलचा दिवा लाल होता म्हणून थांबलेला होता. वास्तविक त्यावेळी वाहतूक अजिबात नव्हती पण त्या सायकलस्वाराने नियमांचे उल्लंघन केले नाही, ही गोष्ट फार बोलकी आहे. तसेच सार्वजनिक स्वच्छताही लोक कटाक्षाने पाळतात. पब्लिक टॉयलेट अतिशय स्वच्छ असतात व त्याचा वापर करण्याकरिता थोडासा आकार आकारण्यात येतो.

जवळजवळ एकवीस दिवसांमध्ये आम्ही नऊ यूरोपीय देशांचा प्रवास केला. इटाली हा देश सोडला तर पश्चिम युरोपातील देशांमध्ये राहणीमान आपल्यापेक्षा फारच उच्च आहे. तिथेही आता थोड्या प्रमाणात बेकारी वगैरे समस्या सुरू झाल्या आहेत व त्यामुळे कृष्णवर्णीय लोकांविरुद्ध स्थानिक लोकांनी मोहिम सुरू केली आहे. या सर्व देशातील रस्ते????? अतिशय स्वच्छ आहेत. कोठेही घाणीचे ढीग आढळून येत नाहीत. बऱ्याचशा रस्त्यांच्या बाजूला वृक्ष आहेत व त्यांची उत्तम तऱ्हेने निगाही ठेवली जाते. बऱ्याच नागरिकांकडे स्वत:च्या मोटारगाड्या असतात. त्यामुळे बसेल, लोकल रेल्वे यांच्यावर फारसा ताण पडत नाही. बऱ्याचशा बसेसमध्ये फक्त ड्रायव्हर असतो व तो तिकिटे देण्याचेही काम करतो. फक्त काही गर्दीच्या मार्गावरच दुमजली बसेस असतात व त्यात सुद्धा कंडक्टर एकच असतो. लंडनमध्ये बसच्या वरच्या मजल्यावर कुत्रा घेऊन बसण्याची मुभा आहे. अर्थात कुत्र्याचेही तिकिट काढावे लागते. बासस्ट वर्षावरील सर्व नागरिकांना मोफत बस पासेस दिले जातात. फक्त त्यांना त्याचा वापर सकाळी ९.३० नंतर करता येतो. त्यामुळे दुपारच्या वेळेला बसमध्ये वृद्ध माणसे हिंडताना दिसतात. लंडनमध्ये प्रत्येक बसस्टॉपवर त्या रुटची बस कोणत्या मार्गाने जाते तसेच बसचे वेळापत्रक दाखविलेले असते आणि खरोखरच बसेस त्याप्रमाणे येतात. बस थांब्यावर बसण्यासाठी बाकेही आहेत. बस ड्रायव्हर व कंडक्टर सर्व काही कामे करतात. बसमधे पाणी टाकणे, छोटी दुरुस्ती इत्यादी. आपल्या बस कंडक्टर व ड्रायव्हरच्या कामाच्या तुलनेने, लंडनमधील ड्रायव्हर व कंडक्टर्स यांचे काम सोपे व पुष्कळ कमी जिकीरीचे आहे. स्त्रिया सुद्धा त्यामुळे ही कामे करतात.

या संपूर्ण दौऱ्यामध्ये आमची रहाण्याची व्यवस्था पंचतारांकित हॉटेलमध्ये होती. काही हॉटेल्समध्ये सुई, दोरा, निरनिराळ्या रंगांची बटणे ठेवलेली असत. आयत्या वेळी शर्ट पॅन्टची बटणे तुटली तर पंचाईत नको म्हणून ही व्यवस्था होती. सर्व हॉटेल्समध्ये टी.व्ही सेटस् होते. विजेची बचत व्हावी म्हणून प्रसाधनगृहातील दिवे स्नानगृहाची कडी लावून घेतली तरच प्रज्वलित करण्याची व्यवस्था होती. चहा पिण्याचा कप कागदी पण कप गरम लागू नये म्हणून कपाभोवती एक निराळी पट्टी लावलेली असे. चादरी, उशा, टॉवेल्स, ब्लँकेटस् अत्यंत स्वच्छ होती. प्रत्येक हॉटेलात लॉंड्रीची सोय होती. जेवण मात्र सगळीकडे ''बुफे'' पद्धतीचे. बऱ्याच ठिकाणी वेटरचे काम कॉलेजमधील विद्यार्थि-विद्यार्थिनी करीत असलेले दिसून आले.

सर्व देशांमध्ये जननप्रमाण अतिशय कमी व मोटारगाड्यांचा वापर प्रचंड प्रमाणावर. त्यामुळे रस्ते जवळ जवळ निर्मनुष्यच. आम्हा भारतीयांना मात्र त्यामुळे चुकल्यासारखे वाटायचे. राहून राहून माझ्या मनात यायचे. आमच्याबरोबर राजकीय पुढारी असते तर रस्त्याच्या एका कडेला जाऊन विलाप करून आले असते. कारण त्यांना जमसमूहाच्या संपर्काचे वेड असते आणि इथे तर मनुष्यच दिसायला अवघड. आपण सारेच जण परदेश प्रवासवर्णने वाचतो, चित्रपट-दूरदर्शनवर परदेशातील रमणीय स्थळांची दृश्ये पाहतो. पण या प्रतिकृतींऐवजी प्रत्यक्ष दर्शन घडणे हा एक आगळाच रोमांचक अनुभव आहे. या अनुभवाला आयुर्विम्याप्रमाणे पर्याय नाही. ज्याला शक्य असेल त्याने हा अनुभव अवश्य घ्यावा.

❑❑❑

**हसरे 'हितगुज'**

## टायटॅनिक...
## रजनीकांत स्टाइल !

'शिवाजी' फेम दिग्दर्शक शंकर याने रजनीकांतला घेऊन 'टायटॅनिक'ची घोषणा केली आहे. सिनेमाचा शेवट फक्त बदलण्यात आलाय. शेवटी सुखान्त करण्यात आलाय. रजनीकांत आणि त्याची नायिका हे दोघेही अखेरीस जिवंत राहतात. क्लायमॅक्सला रजनीकांत पोहत किनाऱ्याला लागतो, तेव्हा त्याच्या एका हातात प्रेयसी असते आणि दुसऱ्या हातात....

...अख्खी टायटॅनिक !!!!


## हितगुज'च्या अमृतमहोत्सवी ७५व्या अंकानिमित्त
## हार्दिक शुभेच्छा

**- हितचिंतक**

‘हितगुज’ला हार्दिक शुभेच्छा

# मंदार कर्णिक

# “‘स्वरगंधार प्रतिष्ठान’”

मोबाईल क्रमांक : ९८२०७५७४३५

## 'मागे वळुनि पाहता'

# अभिनेत्री कै. उषा किरण यांची मुलाखत

**मुलाखतकार : श्री.वि.गो. मराठे आणि श्री.वा.ग. मराठे**

***उषा किरण म्हटले की, 'आली हासत पहिली रात' गाणं म्हणणाऱ्या नववधू रुपातल्या डोळ्यापुढे येतात. आपल्या अभिनयाने व नृत्याने सुमारे तीस वर्षे त्यांनी मराठी, हिंदी व गुजराथी चित्रपटसृष्टी गाजविली. त्या मुंबईच्या माजी नगरपाल होत्या. अत्यंत प्रामाणिकपणे त्यांनी 'अुष:काल' हे आत्मचरित्र लिहिले. उषा किरण या मराठ्यांच्या माहेरवाशिण होत्या हे सांगताना अभिमान आणि आनंद वाटतो. उषा किरण यांचे पूर्वाश्रमीचे नाव उषा बाळकृष्ण मराठे (पृ.१९०) त्यांची मुलाखत पुन:प्रकाशित करत आहोत, वाचकांना ती निश्चितच पुन:प्रत्ययाचा आनंद देईल.***

***- संपादिका***

## आमची कर्तृत्ववान माहेरवाशीण

आम्ही सौ. उषाताईंनी 'हितगुज'साठी मुलाखत घ्यायचं ठरवलं आणि 'लोकसत्ता' व 'महाराष्ट्र टाईम्स' या दोन अग्रगण्य मराठी दैनिकातू त्यांच्या वैयक्तिक जीवनाची, कलाजीवनाची सविस्तर माहिती अतिशय सुंदर शब्दात प्रसिद्ध झाली. (दि. ७ ऑगस्ट १९८८).

आम्ही हे दोन्ही लेख काळजीपूर्वक वाचले. प्रत्येक कुळबंधू-भगिनींनी हे लेख अवश्य वाचावेत.

सप्टेंबर महिना गणपतीचा महिना. त्यात यंदा वरुणराजांनी नको नको म्हणेपर्यंत पाठपुरावा केला. आम्ही टेलीफोनवरून सौ. उषाताईंशी दोन-तीन वेळा संपर्क साधला.

शेवटी गणपती विसर्जनानंतर मुलाखतीचा कार्यक्रम आखावा असं ठरलं.

मुलाखतीमध्ये विचारायचे प्रश्न तयार करताना विचार केला की जी माहिती वरी दोन लेखांमध्ये प्रसिद्ध झालेलीच आहे त्या माहितीची द्विरुक्ती करून मुलाखतीचे प्रश्न तयार केले तर ही मुलाखत 'हितगुज' मध्ये वाचताना वाचकांना औत्सुक्य वाटणार नाही. तेव्हा आपण शक्य तो निराळ्या धर्तीचे प्रश्न तयार करावेत व कुलबांधवांना वरील दोन लेख वाचण्याची विनंती हितगुजमध्ये करावी.

आमचे प्रयत्न कितपत यशस्वी झाले आहेत हे वाचकांनीच ठरवावे.

रविवार दि. २ ऑक्टोबर १९८८ रोजी सकाळी मी आणि प्रतिष्ठानचे कार्यवाह श्री.वा.ग. मराठे सौ. उषाताईंच्या बांद्रे येथील पाली हिलवरील 'शुभं करोति' या सुंदर टुमदार बंगल्यावर हजर झालो. आमच्या माहेरवाशींणींनी स्वत:च्या कर्तृत्वावर हे सुंदर बांधलेले घरटे पाहून आम्ही भारावून गेलो.

हॉलमध्ये आम्ही दोघे व सौ. उषाताई बसलो. सौ. उषाताईंना प्रत्यक्ष पाहण्याचा हा पहिलाच योग. त्यांना पाहिलं आणि त्यांच्या चित्रपटातील अनेक नायिका डोळ्यांसमोर आल्या. अस्सल ब्राह्मणी बांध्याच्या, बोलण्याच्या , वागण्याच्या त्या मराठी चित्रपटातील नायिका एकत्र मूर्तस्वरूपात आमच्या समोर बसल्या होत्या. सौ. उषाताईंनी या जन्मी किंवा मागच्या जन्मी म्हणा खूप तपश्चर्या केलेली असली पाहिजे. तपश्चर्या म्हणजे जपजाप्य व ध्यानधारणा नव्हे तर आपल्या अंगिकृत कार्यात सर्वस्वपणाला लावून रमून जाणं. 'योग: कर्मसुकौशलं' असं प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णांनीच गीतेमध्ये म्हटलं आहे. हाच 'योगधर्म सौ. उषाताईंनी अगदी या क्षणापर्यंत पाळला आहे. म्हणूनच वाढत्या वयाची कोणतीही चिन्हे त्यांच्या चेहऱ्यावर शरीरावर दिसत नाहीत. जरासुराचा त्यांनी चक्क पराभव गेला आहे.

मग आम्ही मुलाखतीचे एक एक प्रश्न विचारण्यास सुरुवात केली.

**१) चित्रपटनिर्मितीमध्ये पटकथा, संवाद यांचं स्थान काय असावे ?**

पटकथा आणि संवाद यांना चित्रपटनिर्मितीमध्ये नि:संशय महत्त्वाचं स्थान आहे. चटका लावणाऱ्या कथा आणि संवाद यांनी चित्रपट गाजलेले आहेत. पण चित्रपटनिर्मिती हे एक टीमवर्क आहे. त्यामध्ये अनेक घटक आहेत. या घटकांचा योग्य त्या प्रमाणात सहभाग झाला तरच उत्तम चित्रपट निर्माण होऊ शकतो. उत्तम स्वैंपाक साधण्यासारखंच हे कसब आहे.

**२) पण समजा उत्तम अभिनयसंपन्न कलावंत असेल आणि कथा दुबळी, संवाद दुबळे असले तर अडचण निर्माण होऊन अपयश येणार नाही का ?**

अहो दुबळेच काय पण संवादच नसले तरी जातीवंत कलावंत नुसत्या अभिनयाच्या जोरावर यश प्राप्त करू शकतो. शब्दाशिवाय चित्रपट आहेतच. नाही का ? अर्थात कसदार कथा व चटकदार संवाद यांना महत्त्व आहेच.

**३) चित्रपटातील गाणी कथाप्रवाहता अडथळे आणतात. यावर आपले काय म्हणणे आहे ?**

संगीत हे चित्रपटाचे आवश्यक अंग आहे. प्रेक्षकांना गाणी अतिशय आवडतात. काही चित्रपट तर फक्त गाण्यांच्या रूपाने आपल्या आठवणीत आहेत. गाण्यांनी चित्रपटात रंजकता येते. थोडा रिलीफ येतो. अर्थात् रचनाकार, संगीत दिग्दर्शक आणि गायक कलाकार कसदार पाहिजेत.

**४) महाराष्ट्रात संगीत नाटकांनी एकेकाळी लोकांना वेड लावलं होतं. काही वेळा गाणी नाटकाचं कथानक अडवून धरीत, पण लोकांचं संगीत प्रेम काही कमी झालं नाही. असे मराठी प्रेक्षक चित्रपटातसुद्धा गाण्यांना महत्त्व देतात, हा त्यांचा स्वभावच आहे नाही का ?**

तसंही असेल. पण लोकांना चित्रपटात गाणी आवडतात. त्याने कथानक थांबलं आहे वगैरे ते विचार करीत नाहीत. आणि चित्रपटनिर्मिती हा व्यवसाय आहे. लोकांच्या इच्छांची, आवडींची कदर करणं भाग आहे.

**५) प्रभातच्या कुंकू या पहिल्या सामाजिक चित्रपटात निराची भूमिका आपण केली असतीत तर आपण काही बदल सुचवले असते का ?**

कठीणच आहे. शांतारामबापू हे कडक शिस्तीचे भोक्ते आहेत आणि त्यावेळच्या परिस्थितीचा विचार करता बदल सुचविण्यासारखे कारणच दिसत नाही. त्यावेळचे प्रश्न फारच सुरेख मांडले गेले आहेत.

**६) कुंकूची सुधारीत आवृत्ती या स्वरूपात चित्रपट काढण्याची कामगिरी आपल्यावर सोपविण्यात आली, तर आपण कोणते बदल कराल ?**

एक तर चित्रपटनिर्मिती माझं क्षेत्र नाही. मी कलाकार आहे. अभिनय माझं क्षेत्र आहे. दुसरी गोष्ट कुंकूचा जमाना व आताचा जमाना यात खूपच फरक आहे. जरठ-बाला विवाह हा प्रश्न आता खूप पाठी पडला आहे. आता 'कुंकू' ची सुधारीत आवृत्ती असे चित्रपटाचे स्वरूप राहणार नाही. कारण बदल हे संपूर्णतया असणार.

त्यावेळचे प्रश्न व आजचे प्रश्न हे फारच वेगळे आहेत.

**७) 'ब्रह्मचारी' वा 'पेडगावचे शहाणे' या स्वरूपाचे मराठी चित्रपट निघणे शक्य आहे का ? निघाल्यास आर्थिक दृष्ट्या परवडतील का ?**

या स्वरूपाचे म्हणजे ?

निकोप विनोद असलेले. बौद्धिकतेकडे झुकणारे विनोद असलेले चित्रपट.

आमच्या वेळी मराठीतून शिक्षण घेतलं म्हणून इंग्रजी कच्च पडतं अशी आमची समजूत होती आणि काही प्रमाणात ते खरं आहे. ही चूक सुधारण्यासाठी आम्ही मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातलं. परिणाम असा झाला आहे की आता आपली भाषा मराठी भाषा हीच त्यांच्या बाबतीत कच्चा दुवा झाली आहे. निकोप विनोदाचा बौद्धिकतेकडे झुकणाऱ्या विनोदाचा आस्वाद घ्यायला प्रेक्षकवर्ग काही मर्यादेत मराठी भाषेची वैशिष्ट्ये जाणणारा पाहिजे. मला वाटतं हीच गोष्ट आता दुर्मिळ होत जाणार. जी गोष्ट प्रेक्षकांची तीच गोष्ट अशा पटकथा असे संवाद लिहिणाऱ्या साहित्यिकांचे वि.स. खांडेकर, पु.भा. भावे, शिवराम वाशीकर यांच्यासारखे सिद्धहस्त व समर्थ लेखक आता दुर्मिळच होत जाणार. हलके फुलके संवाद, दोन अर्थाच्या शब्दांचा भरणा, उथळ अभिनय हेच लोकरंजन असा आता जमाना आहे.

**८) मनोविश्लेषणात्मक चित्रपट भारतात तोट्यातच जातील या मताशी आपण सहमत आहात का ?**

अशा चित्रपटांना समर्थ लेखन, समर्थ कलावंत लागतात. प्रेक्षकवर्ग सुजाण लागतो. प्रायोगिक चित्रपट सुंदर असतात. पण त्यांना प्रेक्षकवर्ग मिळतो का ? मी मघाशीच म्हटलं की चित्रपटनिर्मिती हा व्यवसाय आहे. व्यवसायाला पडणारी बंधनं त्याला आहेत. या संदर्भात आपल्या प्रश्नाचं उत्तर काय असणार हे आपण सहज जाणू शकू.

**९) माणसाला गौण ठरवून दैवाला शरण जाणारे चित्रपट असावेत का ?**

भले आपण दैवाला कितीही गौण ठरवलं तरी आपल्याला आपल्या आयुष्यात काय अनुभव येतो ? मरमर मेहनत करून सर्व गुण पणाला लावून यश मिळेलच असं नाही. काही वेळा मेहनत व गुण पुरेसे नसतानासुद्धा घवघवीत यश मिळतं असंही दिसून येतं. हा जिवंत अनुभव आहे. दैवाला शरण जाऊ नये. सर्व गुण पणाला लावावेत. प्रयत्नांची पराकाष्ठा करावी व त्यातच समाधानी असावं हेच व्यावहारिक ठरेल. दैव आपला खेळ खेळणारच.

'संथ वाहते कृष्णामाई' या चित्रपटात प्रयत्नवाद आला आहे. हे खरं आहे. पण समाधीच्या देखाव्यात अस्थीकलशाची माहिति असणं हा योगायोग आला.

दैवावर मात करण्याचा प्रयत्न करणं यातच खरा पुरुषार्थ आहे. सरतेशेवटी लोकांना काय पसंत पडेल याचाच विचार या व्यवसायातील लोक करणार.

**१०) स्वप्नात रंगविलेला तरुण भारत कसदार कथानकातून रुपेरी पडद्यावर येईल असे आपणाला वाटतं का ?**

स्वप्नं रंगवायला उज्ज्वल भवितव्याची निदान पुसट रेखा तरी दिसली पाहिजे. आजजी परिस्थिती काय आहे ? तरुण भारताची परिस्थिती काय आहे ? स्वप्न तरुणांनी रंगवायची असतात. तरुण भारताचं सोडाच पण स्वतःचं भविष्य स्वप्नात रंगविण्यासारखी परिस्थिती आहे का ? मागच्या पिढीला रोजच्या गरजांची चिंता नव्हती. छोटी का होईना खोली सहज मिळे. दोन वेळा जेवणाची तेवढी भ्रांत नव्हती. आज काय स्थिती आहे ? लाखो रुपये मोजल्याशिवाय दीड खोलीची जागा मिळत नाही. रोजगाराची गोष्ट तर फारच दूर. या वेढ्यात अडकलेला माणूस तरुण भारताचं स्वप्न काय रंगवणार ?

आपण कसदार कथानकाचा उल्लेख केलात. मी मघाशीच सांगितलं कसदार कथानक हेच आता स्वप्न आहे. ते दिवस संपले. बरं ही गोष्ट आपल्या देशाची नाही. आर्थिकदृष्ट्या श्रीमंत देशातील तरुण ही त्या त्या समाजापुढे एक समस्याच होऊन बसली आहे. स्वप्न रंगवण्यासारखे आदर्श हीच मुळी दुर्मिळ गोष्ट झाली आहे.

**११) मराठी भाषेत शब्दाविना चित्रपट निघेल का ? शब्दाविना म्हणजे 'बायसिकल थीफ' सारखा.**

मी आपल्याला सांगितलंच आहे की अभिनय हा मोठा समर्थ घटक चित्रपटनिर्मितीचा आहे. अभिनय काय करू शकणार नाही ? तो आपल्याला कोणत्याही वातावरणात नेऊ शकेल. तिथं संवाद समजण्याची, त्यांचे संदर्भ लक्षात घेण्याची पाळीच येणार नाही. पण असा अभिनयसंपन्न कलाकार व त्याचे तितकेच समर्थ सहकारी यांचा मेळ बसला पाहिजे. मात्र अशा चित्रपटाला शोभतील असे अनेक विषय आज आहेत. गरज आहे ती योजकाची.

**१२) घरखरेदीचे हप्ते भरण्यासाठी वर्षानुवर्षे लांबलांबच्या ठिकाणाहून लोकलमध्ये लोंबकळत ऑफीस गाठणारी मराठी गृहिणी हा चित्रपटाचा विषय होऊ शकेल का ?**

कोणती समस्या चित्रपटाचा विषय होऊ शकेल याला अनेक घटक जबाबदार असतात.

मी पुन्हा पुन्हा म्हणते की चित्रपटनिर्मिती हा 'व्यवसाय' आहे. धुंदपणे वावरावं असं ते कलाक्षेत्र नाही. अर्थात् हे कटू सत्य आहे.

गंभीर विषय लोभस असतो. आकर्षित करणारा असतो. काळजाला जाऊन भिडणारा असतो हे वादापुरतं मान्य केलं तरी गंभीर समस्या समजाऊन घेण्याच्या म्हणजेच गंभीर चित्रपटाचा आस्वाद घेण्याच्या मन:स्थितीत सामान्य प्रेक्षक आहे का हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

बरं, अशा कथानकातून जर उपदेशाची झालर दिसू लागली तर प्रेक्षक पाठ फिरवणार. हे जनमानसशास्त्र आहे. सामान्य माणूस उपदेशाच्या पलीकडे गेला आहे. त्याला रिलीफ पाहिजे आहे. जे त्याला अनुभवायला मिळत नाही ते त्याला रूपेरी पडद्यावर हवं आहे. कारण असलं आपल्याला रोमहर्षक वाटणारं पण त्याला दुर्दैवी वाटणारं आयुष्य तो या नाही त्या स्वरूपात भोगतच असतो.

आपल्या दु:खांचं पुनर्दर्शन त्याला आवडत नाही. त्याला पाहिजे रोजच्या कटकटीच्या आयुष्यापासून दूर नेणारं दोन घटकांचं मनोरंजन.

याला अपवाद असणारच. पण व्यवसायाचं गणित अपवादांवर बसवीत नाहीत. आणि चित्रपटनिर्मिती हा तर अखेर व्यवसायच.

जर कोणी अशा विषयांवर गंभीर चित्रपट काढला तर तो कदाचित् यशस्वी होईल पण व्यावहारिक दृष्टीने नाही, फार तर कलात्मक दृष्टीने.

आमची 'मुलाखत' संपली. नंतर पुन्हा अनौपचारिक गप्पा झाल्या.

सौ. उषाताईंना अकरा वाजता दुसऱ्या ठिकाणी जायचं होतं.

सुरुवातीलाच आम्ही त्यांना म्हटलं होतं की केवळ मुलाखत घेण्यासाठी आम्ही आलेलो नाहीत. प्रतिष्ठानच्या मार्फत तमाम मराठे कुळातील स्त्री-पुरुषांच्या माहेरवाशिणींच्या आणि सासुरवाशिणींच्यासुद्धा शुभेच्छा, कौतुक, आशिर्वाद घेऊन आलो आहोत. सौ. उषाताई चटकन भारावून गेल्या. पण सबंध मुलाखत संपेपर्यंत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या नाहीत.

आम्ही त्यांचा निरोप घेताना त्या म्हणाल्या, ''मी मराठे कुटुंबात जन्मले याचा मला अभिमान वाटतो.'' यातच सर्व काही आलं. खरं की नाही ? ❑❑❑

# ''मला उमगलेले अध्यात्म''

– यशवंत मराठे

**मराठे प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री.यशवंतराव मराठे यांचा एक चिंतनशील लेख. – *संपादिका***

अध्यात्म हा शब्द उच्चारला की सर्वसामान्यपणे अंधश्रद्धा, देवपूजा, कर्मकांड असेच चित्र उभे रहाते. ज्याला आयुष्यात काही जमले नाही (म्हणजे पैसे कमावता आला नाहीत) अश्याच व्यक्ती अध्यात्माच्या मार्गाला लागतात ही साधारण समजूत आहे. जे काही अंशी बरोबर देखील असावे कारण यशोशिखरावर असलेला माणूस अध्यात्मिक आहे असे चित्र कधी दिसतच नाही. आपण सर्वच जण दु:खाच्या किंवा संकटाच्या क्षणीच देवाची आठवण काढतो. यश माझ्या कर्मामुळे, म्हणजेच माझ्यामुळे, परंतु दु:ख मात्र देवामुळे अशीच धारणा दिसून येते.

मी स्वत: काही या कल्पनेपासून फार वेगळा नव्हतो. मी लहानपणी कधीच कुठच्याच मंदिरात स्वखुशीने गेलो नाही. आपले मत आई-वडिलांना सांगण्याएवढे किंवा पटवून देण्याएवढे वय देखील नव्हते. मला अत्यंत अपवादात्मक मंदिरामध्ये प्रसन्न वाटायचे. आणि बाकी सर्व ठिकाणांहून पळून जावे असेच वाटायचे.

मी सज्ञान झाल्यावर विचार करू लागलो की मला अश्या ठिकाणी अस्वस्थ का वाटते ? माझ्या मनात प्रश्नांचे मोहोळ उठायचे पण त्याची उत्तरे काही मिळत नव्हती.

१) अध्यात्म म्हणजेच पूजा, उपवास, व्रते का ?

२) हिंदू धर्मात ३३ कोटी देव मानले जातात मग कोणता देव मोठा ?

३) देवाचे अस्तित्व सिद्ध कसे करायचे ?

४) जर देवाचे अस्तित्व सर्वत्र आहे तर मग देवळात जायलाच हवे का ?

५) भक्तांच्या देवाकडील मागण्या संपत का नाहीत ?

६) सगळे भाविक देवाची भक्ती एक प्रकारे घाबरून का करतात ? नाही केले तर कोप होईल वगैरे.

७) देवळात जाताना प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या कुवतीप्रमाणे मोठ्यात मोठे हार, फुले, प्रसाद घेऊन जाताना का दिसतात ?

८) आपल्या समाजात गुरुच्या नावाखाली भोंदू बाबा, साधू लोकांचा सुळसुळाट झाला आहे. आपल्याला खरंच अश्या गुरुंची गरज आहे का ?



यशवंत मराठे

९) अध्यात्मिक होणे म्हणजे एक प्रकारची निष्क्रियता का ?

ह्या सर्व प्रश्नांबरोबरच समाजात वावरत असताना खूप गोष्टी जाणवतात आणि त्यांची कारणमिमांसा समजत नाही ?

१) समाजातील सर्वजण सदैव सुखाच्या शोधात असतात आणि ते प्राप्त न झाल्यामुळे कायम एक प्रकारचा निरुत्साह, विषण्णपणा आलेला दिसतो.

२) प्रत्येक मनुष्य वासनेने तसेच स्वार्थाने लडबडलेला दिसतो. वासना अनेक प्रकारची दिसते. अन्नाची, पैशाची, कपड्याची, प्रतिष्ठेची, लौकिकाची, मोठेपणा मिरविण्याची आणि शरीराची.

३) इतरांना हेवा वाटाव्या अश्या अनेक गोष्टी मिळाल्यानंतर सुद्धा माणसांना आनंद झालेला का दिसत नाही ?

४) आपल्याला दुसऱ्या व्यक्तिची एखादी गोष्ट आवडत नाही त्यामुळे आपण तिचा राग किंवा द्वेष करतो.

५) प्रत्येक जण सर्व चैनीच्या गोष्टी या दुसऱ्यांना दाखविण्याकरिताच का करतो ? घर, गाडी, कपडा वगैरे वगैरे, आणि अपेक्षा काय तर लोकांना त्याचे कौतुक वाटावे किंवा हेवा वाटावा.

६) अध्यात्माचा समाजाला उपयोग काय ? असा प्रश्न सर्वांनाच पडलेला दिसतो.

७) अनेक श्रीमंत लोक खूप प्रकारची आर्थिक मदत करताना दिसतात, परंतु असे नेहमी वाटते की ते एक प्रकारे पुण्य पदरी जोडण्याचा तर मार्ग नाही ना ? ज्यायोगे पापाचे पातक कमी होईल.

ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळत नव्हती त्यामुळे मनाचा गोंधळ आणखी वाढत होता. असे वाटायचे की आपल्याला कोणी मार्गदर्शक मिळणार नाही जो मला मदत करेल ? आता मार्गदर्शक म्हणजे गुरु का ? आपल्या समाजात इतके तथाकथित गुरु दिसतात, त्यातला चांगला कुठचा आणि तो आळखायचा कसा ? विचार केला या सर्वांपासून चार हात दूर राहिलेलेच चांगले.

गेल्या ८-१० वर्षात मला माझ्या वैयक्तिक तसेच व्यावसायिक जीवनात खूप खडतर प्रसंगांना तोंड द्यावे लागले, ते करत असताना मानसिक रितेपण खूप जाणवायचे, वाटायचे की काहीतरी कुठेतरी कमी आहे (मन:शांती अजिबात नव्हती) हा काळ माझ्या दृष्टीने अत्यंत कठीण होता. माझ्या सुदैवाने त्यावेळी माझे साडू श्री. सुधीर दांडेकर ह्यांनी खूप दिशादर्शन केले. त्यांनी मला हे पटवून दिले की आपल्याला जिवीत गुरुंची गरजच काय ? आपल्याकडे ऐवढी थोर संतपरंपरा आहे की ज्यांचे वाङ्मय हाच सगळ्यात मोठा गुरु आहे. त्यांच्या सांगण्यानुसार विविध प्रकारचे भरपूर वाचन केले व त्यातून स्वत:चा असा मार्ग शोधला आणि मार्गक्रमण करायला सुरुवात केली.

पुढे माझ्या आयुष्यात अश्या काही अतर्क्य गोष्टी घडल्या की ज्यायोगे श्री स्वामी समर्थ यांचा सद्‌गुरु म्हणून माझ्या जीवनात प्रवेश झाला. याच काळात मला श्री. सचिन परांजपे यांचेही बहुमूल्य मार्गदर्शन मिळाले. आज मागे वळून बघताना ह्या कालखंडाला मी फक्त चमत्कार असेच म्हणून शकेन.

मला माझ्या प्रश्नांची हळूहळू उकल होऊ लागली. मी ज्या क्षणी अडलो तेव्हा तेव्हा कोणी वेगवेगळ्या व्यक्ती जीवनात आल्या आणि ज्यायोगे मार्ग मिळणे सुकर झाले. काही वेळी अगम्य पद्धतीने त्यांची उत्तरे मिळू लागली. मला जी उत्तरे मिळाली ती सर्वांनाच पटतील हे शक्य नाही आणि तशी माझी इच्छा अथवा आकांक्षा ही नाही कारण ही सर्वस्वी वैयक्तिक गोष्ट आहे.

हे सर्व लिहिताना मी कुठल्याही प्रकारचे प्रवचन देण्याचा प्रयत्न नाही तसेच मी स्वत:ला अजिबात ज्ञानी वगैरे काही समजत नाही. मला ज्या गोष्टी जाणवल्या त्या मांडण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

✻ मी कोण आहे ? हे जग काय आहे ? आणि या जगाशी आपला संबंध कसा आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न म्हणजेच अध्यात्म त्याचा कर्मकांडाशी काहीही संबंध नाही. पूजा

अर्चा, तीर्थयात्रा, व्रते वगैरे ही साधने असून परमेश्वरप्राप्ती हे आपले साध्य आहे. पण साध्य बाजूलाच राहून आपण सर्व साधनालाच घट्ट धरून बसलो आहोत.

मनुष्याला आपल्या आचारांमध्ये, विचारांमध्ये तसेच जगण्याच्या पद्धतीमध्ये expected आणि reality मध्ये जाणवत gap असेल तर हा बदल घडवून आणण्याचे सगळ्यात मोठे साधन म्हणजे अध्यात्म.

✼ सगळे देव एकच आहेत. एकच चैतन्य - चेहरे वेगवेगळे. ज्याला ज्या रूपाबद्दल प्रेम वाटते त्याने ते भजावे व सर्व ठिकाणी तेच रुप आहे असे मानावे म्हणजे श्रद्धेचा गोंधळच उडणार नाही.

✼ देव ही गोष्ट सिद्ध करण्याची नसून अनुभवण्याची आहे.

✼ आपण आपल्या घरालाच जर मंदिर अथवा देवळाप्रमाणे पवित्र ठेवले तर देवाला शोधण्यासाठी कुठे जाण्याची गरजच राहणार नाही.

✼ देव अथवा कुल देवी म्हणजे काय कोपऱ्यावरचा गुंड आहे की जो वर्गणी अथवा दक्षिणा दिली नाही तर त्रास देईल ? मनापासून केलेला नमस्कार देवाला/देवीला पोहोचतो.

✼ देवाला वाहिलेले हार, फुले या गोष्टींची त्याला गरजच नाही आहे. हे सर्व फक्त आलेल्या इतर भक्त मंडळींना दाखविण्यासाठी असते. ही एक प्रकारे देवाला दिलेली लाच आहे. ज्या बदल्यात त्याच्याकडून अपेक्षापूर्तीची आसक्ती असते.

✼ देव/सद्गुरू आपल्या हृदयातच ठाण मांडून बसले आहेत, तिथेच प्रश्न विचारावे - उत्तरे नक्की मिळतील. सद्सद्विवेकाच्या पारड्यात कोणतीही गोष्ट तोलून बघितली की सत्य समोर येईल.

✼ अध्यात्मिक होणे म्हणजे निष्क्रियताहे साफ चूक आहे. ''योगक्षेमं वहाम्यहम्'' याचा अत्यंत चुकीचा विपर्यास केला जातो. कर्म करणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे.

✼ कितीही धन कमावले, कितीही प्रतिष्ठा मिळाली तरी जोपर्यंत मन:शांती नाही तोपर्यंत त्यास काही अर्थ नाही.

✼ वासना जिंकता येत नाही. तिची उपेक्षा करणे जमले पाहिजे म्हणजे ती आपोआप गळून पडेल.

✼ आपण जीवन जगत असताना १००% स्वत:साठी जगत असतो. अगदी आपल्या आईपासून अगदी नि:स्वार्थी समाजसेवकापर्यंत विचार केला तरी कुठेतरी वृद्धावस्थेत काळजी घेण्यापासून, समाजाकडून मिळणाऱ्या श्रेयापर्यंत अत्यंत सूक्ष्म पातळीवर कुठेतरी स्वार्थ हा दडलेला असतोच. प्रत्येक नाते हे भावना, प्रेम या सगळ्या धाग्यांपेक्षा ही स्वार्थाच्या बळकट धाग्याने जोडलेले असते ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

✼ जोपर्यंत दुसऱ्याशी तुलना करणे आपण थांबवणार नाही तोपर्यंत कुठचीही गोष्ट मिळाली तरी आनंद मिळणार नाही.

✼ आपण ज्या कारणामुळे दुसऱ्याचा द्वेष करतो तेच कारण दुसऱ्याने आपला द्वेष करायला पुरेसे आहे. कारण त्याला न आवडणारी गोष्ट आपल्याला आवडते.

✼ आपला सगळ्यात मोठा शत्रू हा आपला अहंकार असतो. आत्मपरिक्षण हा अहंकार नाहीसा करण्याचा सगळ्यात सोपा मार्ग आहे.

✼ समाजकार्य करणाऱ्या व्यक्तीचे अंतिम ध्येय समाजाने अशा काही चांगल्या गोष्टी अंगिकाराव्या की जेणे करून समाजातील प्रत्येक घटकाला सुख, समाधान मिळावे हे असते. समाज म्हणजे आर्थिक, मानसिक, वैचारिक, भौगोलिक अशा अनेक गोष्टींनी बांधलेल्या व्यक्तींचा समूह. समाजातील व्यक्तींमध्ये जल परस्पर संबंध नसतील तर तो मनुष्य प्राण्यांचा कळप होईल. समाजस्वास्थ्यासाठी प्रत्येक घटकाने नीतीनियमाने वागणे, दुसऱ्यावरती अन्याय न करणे, स्वार्थ कमी करणे, संयम आणि विवेक यांचा अंगिकार करणे अशी अपेक्षा असते. अध्यात्म व्यक्तीमध्ये वरील बदल स्वयंस्फूर्तीने घडवून आणत असल्यामुळे ते कायमस्वरुपी असतात. अध्यात्मामुळे असा बदल झालेल्या व्यक्तींचे आचरणच दुसऱ्यांना बदल घडविण्याची स्फूर्ती देते. हे कार्य मूक असले तरी प्रभावी असते. आता हे समाजकार्य नव्हे का ?

✼ आर्थिक मदत करताना कुठची तरी लालसा अथवा परतफेडीची/प्रतिष्ठेची इच्छा असेल तर काय उपयोग ? मदत सत्पात्री असावी. ती समुद्रात पडणाऱ्या पावसाप्रमाणे, भरल्या पोटावर जेवणाप्रमाणे अथवा दिवसा दिव्याच्या उजेडाप्रमाणे असू नये.

✼ आपला आत्मा शुद्ध पाण्याप्रमाणे आहे. अशा पाण्यात कितीही घाण टाकली आणि ते गढूळ झाले तरी त्यातले शुद्ध पाणी निघून गेलेले नाही. त्याचप्रमाणे कितीही वाईट, दुष्ट मनुष्य असला तरी त्यात मूळचा चांगुलपणा असलाच पाहिजे.

✼ आपल्या सर्वांना अनेक प्रकारच्या भीती असतात. अंधार, गरिबी, अपयश, मृत्यू अशा अनंत. या सर्वांचे मूळ कारण अज्ञान आहे. ज्या दिवशी त्या गोष्टींचे ज्ञान होईल तेव्हा भीतीचे काही कारणच उरणार नाही.

✼ जर आपल्याला अध्यात्म नीट समजून घ्यायचे असेल तर सर्वप्रथम स्वत:चे जीवन एखाद्या उघड्या पुस्तकाप्रमाणे वाचता यायला हवं, चिकटलेली पाने सोडवायला हवी.

✼ लहान बालक जेव्हा भूक लागते तेव्हा आईचे लक्ष वेधण्यासाठी रडतं, तसे आपण देखील आपल्या सद्गुरुंपाशी अधूनमधून रडायला हरकत नाही परंतु ते रडणं केवळ लक्ष वेधण्याइतपतच मर्यादित असावं.

✼ आपल्या सद्गुरुंच्या चरणकमलांपाशी अत्यंत विनयाने, मनात कसलाही विकल्प न ठेवता नुसते शांतपणे नतमस्तक झालो तरी बऱ्याच समस्यांची उकल होते.

✼ सद्गुरुंशी बोलणे अथवा संवाद साधणे म्हणजेच आपल्या आत्मस्वरुपाशी बोलणे आहे.

✼ सद्गुरु हे एखाद्या चिलखताप्रमाणे अथवा Shock Absorber प्रमाणे काम करतात, ज्यायोगे क्लेश, दु:ख, भय, असुरक्षितता आपल्यापर्यंत येते, आपल्याला पार मुळापासून हलविते पण संपवून टाकू शकत नाही.

✼ मागण्या मागत वेळ घालविण्यापेक्षा नामस्मरण. मानसपूजा आणि संवाद हे सद्गुरुपर्यंत पोहचण्याचे जास्त जवळचे मार्ग आहेत.

✼ भक्तीत शरणागती यायला हवी, आत्यंतिक तळमळ हवी. डोळ्यांतून अश्रू ढळले पाहिजेत.

✼ अध्यात्माने आपल्यात बदल घडलाच पाहिजे. काम, क्रोध, मद, मोह, मत्सर आणि अहंकार तसेच असतील तर आपले अध्यात्म वृथा आहे.

✼ अध्यात्माचे खरे गमक म्हणजे अत्युच्च आनंद किंवा अपरिमीत दु:खाच्या वेळी आपले मानसिक संतुलन कसे ठेऊ शकतो ह्यात आहे.

शेवटी के.वि. बेलसरे ह्यांच्या पुस्तकातील एक परिच्छेद उधृत करतो तो माझ्यामते हा विषय समजण्याकरिता उत्तम उहादरण आहे. ''बीजगणितात उदाहरण सोडविताना एक अज्ञात 'क्ष' घ्यावा लागतो. उदाहरणाचे उत्तर येईपर्यंत त्या 'क्ष' ची खरी किंमत काय हे आपल्याला कळत नाही पण तो घेतल्याशिवाय चालत नाही. त्याचप्रमाणे जीवनाचे कोडे सोडविण्यासाठी आज अज्ञात असा भगवंत आपल्याला गृहित धरलाच पाहिजे. त्या भगवंताचे खरे स्वरुप, जीवनाचे कोडे सुटेल त्यावेळी आपल्याला कळेल.''

**।। श्री स्वामी समर्थ ।।**

### भाषाप्रभु पु.भा. भावे स्मृतिसमिती आयोजित

## भाषाप्रभु पु.भा. भावे यांचा २८वा स्मृतीदिन

शुक्रवार दि.१५ ऑगस्ट, २००८ला संध्याकाळी ६ वा. शुभमंगल कार्यालय, डोंबिवली (पूर्व) येथे भाषाप्रभु पु.भा. भावे यांच्या २८व्या स्मृतिदिन कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे या होत्या. भाव्यांच्या प्रकाशचित्राला त्यांनी पुष्पहार अर्पण केला. त्यांच्या शुभहस्ते भावे पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. भाव्यांच्या साहित्यसेवा पुरस्कार, श्री.शं.ना. नवरे, साहित्य समीक्षा प्रा.रविंद्र घवी, नाट्यसेवा श्री.ॲड. मधुसूदन करमरकर, सांगली, नाट्यसमीक्षा श्रीरविंद्र पाथरे, वक्तृत्व श्री.वा.ना. उत्पात, समाजसेवा सौ.रंजना करंदीकर, पत्रकारिता श्री.पृथ्वीराज हजारे, लेखकपत्नी सौ.जनाबाई कचरू गिऱ्हे, कार्यकर्ता श्री.रविंद्र आवटी व श्री.अरूण खाडिलकर हे पुरस्काराचे मानकरी होते.

'पुरुषोत्तम भास्कर भावे' ही महाराष्ट्रातील अेक प्रचंड शक्ती आहे. मराठी माणसाची ती अस्मिता आहे. पराकोटीची उत्कटता आणि भव्यता हे भाव्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य. तेच त्यांच्या साहित्यात दिसते. आज जागतिकीकरणाच्या युगात मराठी समाज सर्व क्षेत्रांत सर्व दिशांना फाकू लागला आहे. विश्वाला अलिंगन देताना, मिठीत घेताना स्वत्व हातून घरंगळून जाऊ नये यासाठी सत्वशील भावे यांचे चिरंतन स्मरण करणे आजही आवश्यक ठरते'' असे अुद्गार अध्यक्षा डॉ.सौ. सुमेधा प्रभाकर यांनी काढले. सभागृह प्रेक्षकांनी तुडुंब भरलेले होते.

'किरातकार' श्रीधर मराठे यांना वर्ष २००७चा पु.भा.भावे पत्रकार पुरस्कार मिळाला होता, हे वाचकांना आठवत असेल !

**– सहसंपादक : सी.गो. खांबेटे**

❑❑❑



**मराठे प्रतिष्ठान पुणे शाखा कार्यकारिणी सदस्य : बसलेले डावीकडून – अरुण मराठे, अच्युत चक्रदेव, सौ.नीलांबरी मराठे, श्रीनिवास मराठे, प्रभाकर मराठे. उभे असलेले – गजानन मराठे, मुकुंद मराठे, श्रीकृष्ण मराठे, कर्नल प्रमोदन मराठे, रमेश मराठे, विजय भालचंद्र मराठे, माधव मराठे, विजय विष्णू मराठे**

## श्री.सुरेंद्रनाथ ग. मराठे (पृ.२८४) यांचा पत्रव्यवहार

हितगुज-जून २००८चा अंक मला आजच, १४ ऑगस्ट रोजी मिळाला. यातील काही निवेदने/आवाहने वाचनात आली. त्यानुसार लगेचच पत्र लिहित आहे.

अ) पान ४ वरील आवाहनानुसार प्रकाशित झालेल्या माझ्या पुस्तकांची यादी खाली देत आहे.

१) 'अणुऊर्जा व उपयोग' लेखक डॉ.सुरेंद्रनाथ ग. मराठे, दुसरी आवृत्ती, भाषा-मराठी, पाने-८८, मूल्य रु.७५/- मे-२००३ (जिज्ञासा प्रकाशन, पुणे)

२) 'युरेनियम अँड प्लुटोनियम इन ॲटॉमिक एनर्जी'' लेखक डॉ.सु.ग. मराठे, भाषा इंग्रजी, पाने-७६, मूल्य रु.५०/- सप्टेंबर २००१ (जिज्ञासा प्रकाशन, पुणे)

३) 'ॲडम्स्, रेडिओॲक्टिव्हिटी अँड न्युक्लिअर पॉवर'' लेखक डॉ.सु.ग. मराठे, भाषा इंग्रजी, पाने ४५, मूल्य रु.४०/- ऑक्टोबर २००३ (जिज्ञासा प्रकाशन, पुणे)

अ-१) बी.ए.आर्.सी. मध्ये 'रिसर्च अँड डेव्हलपमेंट ॲक्टिव्हिटिज्' मध्येच काम करत असल्याने माझे बरेच शोध निबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत प्रसिद्ध झाले आहेत. परंतु तेथी कामाचाच हा भाग असल्याने यांची यादी देणे येथे संयुक्तिक वाटत नाही.

ब) अंतिम तारीख ३१ जुलै असली तरी अंक आजच मिळाल्यामुळे लगेच लिहिले आहे. पान २२ वर दिलेल्या आवाहनानुसार थोडक्यात लिहायचे आहे ते असे:

मुखपत्राचे खरे प्रयोजन काय असावे याबद्दल स्पष्ट मत मी मागेच दिले होते. नंतर याबाबतचा उहापोह आपण पुढील अंकात केला होता. हितगुजच्या मुख्य उद्देशांचे 'इतर गोष्टींमुळे' dilution होते की काय याची मला शंका येते. अर्थात् हे माझे वैयक्तिक मत आहे व चुकीचे असू शकेल. म्हणून आपण आता हे आवाहन केले आहे हे महत्त्वपूर्ण वाटते. मुखपत्र एकूण किती जणांच्या हातात पडते व त्यापैकी किती जणांच्या प्रतिक्रिया (पॉझिटिव्ह/ निगेटिव्ह) आपणास प्रत्यक्ष मिळतात याचा टक्केवारी सकट आढावा घ्यावा ही विनंती आहे. मुखपत्राचे खरे प्रयोजन काय हे जोखण्याची सुवर्णसंधी याद्वारे आपणास मिळणार आहे.

अमृत महोत्सवी विशेषांकासाठी शुभेच्छा !

**डॉक्टर साहेबांच्या सूचनेनुसार वाचकांच्या प्रतिक्रियांचा आढावा घेतला जाईल. - *संपादिका***

❑❑❑



**मराठे प्रतिष्ठान मुंबई सहकुटुंबासह**

**नांदा सौख्यभरे**

गोवा येथील सौ. मोहिता व श्री. गणेश (सुरेश) शंकर मराठे यांचा सुपुत्र (श्री. आदित्य याचा विवाह चि. सौ.कां. सिद्धी (सौ. स्वाती व श्री. सत्यपाल आर्सेकर, पणजी गोवा यांची कन्या) हिजबरोबर दि. ३०-४-२००८ ला पणजी गोवा येथील महालक्ष्मी मंदिरात संपन्न झाला. नवविवाहीतांना मराठे प्रतिष्ठान तर्फे शुभेच्छा.

**हितगुज'च्या अमृतमहोत्सवी ७५व्या अंकानिमित्त**
**हार्दिक शुभेच्छा**

**- हितचिंतक**

# मोबाईल - गरज की फॅड?

सुनीता सुधाकर गोखले, माहेरची - उषा गोपाळ मराठे फोन.नं.२५५३६८४४

रस्त्याने जात होते, मागून एका माणसाचा बोलण्याचा आवाज आला. मागे वळून बघितले माणूस एकटाच होता. पण मोठमोठ्याने काही बोलत होता. कळेचना वेडा म्हणावा तर चांगला सुशिक्षित दिसत होता. घरी आल्यावर मुलाला सांगितले तर त्याने सांगितले अग तो मोबाईलवर बोलत असेल. तेव्हाच कळले की एखाद्याशी कुठेही केव्हाही संपर्क साधता येण्याच साधन म्हणजे हा मोबाईल. यालाच सेलफोन ही म्हटले जाते.

खरच माणूस दिवसेंदिवस प्रगती करतोच आहे आणि ह्या नवीन नवीन शोधांमुळे जग जवळ आलं आहे. फोनच्या शोधाने अमेरीका, इंग्लंड, जपान, मलेशिया कुठेही असलेल्या माणसाशी बोलता येते. आपल्या माणसाला प्रत्यक्ष भेटल्याचे समाधान मिळते. कीतीतरी नवनवीन साधन माणसांनी निर्माण केली आहेत. आमच्या लहानपणी रेडीओ घरोघर नव्हते पण कालांतराने तेही घरोघर पोहोचले. मोठ्या रेडीओच्या जागी ट्रान्झिस्टर, टेपरेकॉर्डर आले, कालांतराने दूरदर्शन नंतर अनेक वाहिन्या आल्या नी २४ तास दूरदर्शनचे कार्यक्रम दिसू लागले मग आले संगणक, इंटरनेट त्यातच फोन आणि अनेक कंपन्यांनी आणलेले सेल फोन.

पूर्वी कुठे घरोघर फोन होते. काहीही निरोप देण्यासाठी समक्षच जावे लागे. फोन नाही म्हणून अडत नव्हते. निरोप घरोघरी पोहोचत होते. माणसं एकमेकांच्या घरी जात परंतू आता घरोघरी फोन. कशाला घरी जा. काय सांगायचे ते फोनवरच. त्यामुळे कोणाच्या घरी जाणे, गप्पागोष्टी करणे, क्षेम कुशल पहाणे ह्या गोष्टी कालबाह्य झाल्या आहेत. एकाच गावातील नातेवाईक महिनोंमहिने भेटतही नाहीत. त्यालाही कारण म्हणजे सर्वचजण इतके दूर अंतरावर रहातात की जाणे येणे जमणे कठीण झाले आहे. रहाण्याची ठिकाणे आणि कामाची ठिकाणे लांब लांब. कामाच्या वेळा निरनिराळ्या. त्यामुळेच फोनची आवश्यकता निर्माण झाली. त्याचबरोबर ह्या मोबाईलची पण. कामावरून घरी येण्यास उशीर होणार असेल तर घरी तसे कळवता येते. आणि ह्या आवश्यकता लक्षात घेऊनच मोबाईल फोन निर्माण झाले. या फोनमुळे माणसांचा कोठेही संपर्क साधणे सोपे झाले.

नुकतीच घडलेली घटना दोघे नवरा बायको त्यांची छोटी मुलगी स्वत:च्या कारने प्रवास करत होते. एकाएकी गाडीला मोठाच अपघात झाला. अपघात होण्यापूर्वीच कारमधील पुरुष एका नातेवाईकांशी मोबाईलवरच बोलत होते. अपघातात दोघे नवरा बायको जबर जखमी झाले. पण त्यांच्या हातातील फोन वरून ड्रायव्हरने पुण्यातील नातेवाईकांशी संपर्क साधून अपघाताबाबत सांगितले. त्यामुळेच नातेवाईकांना ताबडतोब अपघातस्थळी पोहोचता आले व दोघाही जखमींवर उपचार करता आले हे शक्य झाले मोबाईल मुळेच.

आठवड्यापूर्वीच शाळेत गेलेल्या माझ्या नातवाच्या एकाएकी पोटात दुखू लागले. काही केल्या त्याला चैन पडेना. शाळेतील शिक्षकांनी त्याला फोन नंबर विचारला पण आई बाबा दोघेही कामावर पण नातवाला आईचा मोबाईल नंबर पाठ होता. शिक्षकांनी मोबाईलवर आईशी संपर्क साधला. त्याची आई लगेचच शाळेत गेली व नातवाला नेहेमीच्या डॉक्टरांकडे घेऊन जाऊशकली. हे शक्य झाले मोबाईल मुळे. अशीच कितीतरी उदाहरणे देता येतील.

आजच्या धावपळीच्या दिवसात मोबाईल जवळ असणे अत्यंत आवश्यक झाले आहे. ह्या मोबाईलमध्ये अनेक कंपन्यांनी अनेक सुविधा निर्माण केल्या आहेत. त्यातून फोटो काढता येतात. गाणी ऐकता येतात. अनेक फोन नंबर संग्रहित करता येतात. लहान मुलांना त्यावर काही गेम खेळता येतात.

ह्या मोबाईल वापरात त्या मानाने ज्येष्ठ नागरीक जरा कमीच आहेत. परंतू लहान मुले, तरुण अगदी सहजतेने मोबाईल हाताळतात. आजकाल प्रत्येक तरुण तरुणींच्या हातात मोबाईल असतातच बसमध्ये, रस्त्याने चालताना, गाडीवरून जाताना सतत मोबाईलवर बोलणे चालू असते. गाडी चालवताना मोबाईलवर बोलत राहिल्याने जीवघेणे अपघातही घडल्याचे ऐकीवात आहे. अशावेळी वाटत की मोबाईल जितका गरजेचा तितकाच त्याचा अनाठायी वापर केल्यास तो घातकीही ठरु शकतो. एखाद्या सभेच्या ठिकाणी नाट्यगृहात प्रथमच सूचना दिली जाते की मोबाईल बंद ठेवावेत. योग्यच आहे कारण मोबाईलची रींग वाजू लागली की इतरांना त्याचा त्रास होणारच.

एक मात्र निश्चित आहे की आजच्या ह्या धावपळीच्या जीवनात मोबाईलची खरोखरच गरज आहे. मी तर म्हणेन की प्रत्येकालाच मोबाईल असणे आवश्यक आहे. फक्त त्याचा वापर नीटपणे झाला पाहिजे. विद्यार्थी त्याचा गैरवापर करतात तो त्यांनी टाळला पाहिजे. नवीन नवीन येणारी उपकरणे त्यात योग्य अयोग्य दोन्ही बाजू आहेतच परंतू योग्य वापर केल्याने त्याला कोणी फॅड म्हणणार नाही.

(कै.चिंतामण बळवंत मराठे स्मरणार्थ निबंध स्पर्धेतील बक्षिस पात्र लेख)

❑❑❑

## तुका म्हणे...

*ब्राह्मण तो याती अत्यंज असता।*
*मानावा तत्त्वता निश्चयेसी।*
*रामकृष्ण नामे उच्चारी सरळे।*
*आठवी सावळे रुप मनी।।धृ।।*
*शांती क्षमा दया अलंकार अंगी।*
*अभंग प्रसंगी धैर्यवंत।।*
*तुका म्हणे गेल्या षड्उर्मीअंग।*
*सांडुनिया मग ब्राह्मण तो।।*

जो सावळ्या विठ्ठलाच्या रुपाचे मनोमन ध्यान करतो, रामकृष्ण नामाचा उच्चार करतो, शांती, क्षमा, दया हे अलंकार ज्याने धारण केले आहेत आणि जो प्रतिकूल परिस्थितीतही धैर्य न सोडता अभंग रहातो तो लौकिक व्यवहारात जन्माने अत्यंज असला तरी त्याला निश्चितपणे ब्राह्मणच समजावे. ज्याच्या अंगी कामक्रोधादी षड्विकार वास्तव्य करतात तो अब्राह्मण आणि ज्याच्या अंगी ते नाहीत तो ब्राह्मणच मानावा.

*****

‘हितगुज’ला हार्दिक शुभेच्छा

# श्रीकांत ओक
# ठाणे

# ज्ञानतपस्वींनी सौ. शुभा रमाकांत विद्वांस (पृ.६२३)

बुद्धिमत्ता, विद्वत्ता व नीतिमत्ता या बाबतीत परिपूर्ण असलेल्या सौ. शुभाताईंचे वाचन, चिंतन, मनन तितकेच सखोल आहे. आपल्या अध्यापनाच्या कार्याबद्दल आवड, कळकळ तर होतीच परंतु आत्मविश्वासही दांडगा होता. शुभाताईंची अभिरुची व निर्णयशक्ती अुच्च दर्जाची होती. अनेक गुणांनी संपन्न असलेल्या शुभाताईंनी आपला ज्ञानयज्ञ यशस्वी करून विद्यार्थ्यांसमोर अेक नवा आदर्श निर्माण केला.

मंगळवार दि. १२ ऑगस्ट २००८ ला दुपारी ४.३० वा. मी सौ. शुभाताईंची मुलाखत घ्यायला त्यांच्या घरी गेले त्यावेळी आमची जी दिलखुलास बातचित झाली त्या आधारे सौ. शुभाताईंच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन वाचकांना थोडक्यात करून देण्याचा प्रयत्न करीत आहे.

सौ. शुभा रमाकांत विद्वांस म्हणजे पूर्वाश्रमींच्या कुसुम बाळकृष्ण आपटे. त्यांचा जन्म दि. १८.७.१९३९ला बेळगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बाळकृष्ण आपटे ते पूर्वीचे सुवर्णपदक मिळविलेले इंजिनिअर असून मुंबई पी. डब्लू.डी. मधे क्लासवन ऑफीसर म्हणून मानाची नोकरी त्यांना सरकारने देऊ केली. मुख्य अभियंता आणि सचिव पदावरून (Irrigation) ते निवृत्त झाले. अे.आर.सी. आजची नाबार्ड याचे तांत्रिक संचालक पद त्यांनी भूषविले. सौ. शुभाताईंच्या मातोश्री सौ. रमाबाई आपटे या प्रेमळ, गृहकृत्यदक्ष गृहिणी होत्या. अशा हुषार आई-वडिलांच्या प्रेमळ छत्राखाली आणि संस्कारमय वातावरणात शुभाताईंचे व्यक्तिमत्त्व फुलत होते. वडिलांच्या बदलीमुळे मुलांच्या शिक्षणाचे नुकसान नको म्हणून वडिलांनी पुण्यात घर घेतले आणि पुण्याच्या मॉडर्न हायस्कूलमध्ये शुभाताईंचे शिक्षण झाले. शालेय कारकीर्द त्यांनी वक्तृत्त्व, लेखन, क्रीडा, कला या बहुविध क्षेत्रातील बक्षिसे मिळवून गाजविली. शाळेची स्कॉलरशिप त्यांना मिळाली. चित्रकलेचीही त्यांना आवड होती. याचकाळात त्या सायकलही शिकल्या. १९५७ साली प्रथम श्रेणीत, पाच विषयात डिस्टींक्शनचे मार्क मिळवून त्या मॅट्रिक झाल्या. फर्ग्युसन कॉलेजात त्या १९५९ मधे बीग्रुप घेऊन इंटर सायन्स झाल्या. मेडिकलला जाऊन डॉक्टर होण्याची त्यांची मनिषा होती. जामनगर येथे मेडिकल कॉलेजात त्यांना ॲडमिशनही मिळणार होती. परंतु हॉस्टेल वर अेकट्या मुलीने इतक्या दूरवर राहाणे यासाठी



आईला काळजी वाटत होती. तेव्हा शुभाताईंच्या संवेदनशील मनाला आईला काळजीत टाकणे रुचणारे नव्हते. म्हणून त्यांनी आपल्या इच्छेला मुरड घालून डॉक्टर न होण्याचा निर्णय अेका क्षणात घेऊन टाकला आणि शिक्षणाची दिशा बदलून फर्ग्युसनमधेच तत्त्वज्ञान या स्पेशल विषयात बी.अे. अुत्तम गुणांनी १९६१ साली पास झाल्या.

## विवाह

जुलै १९६१ मध्ये रमाकांत विद्वांस या हुषार सिव्हिल इंजिनिअरशी त्यांचा विवाह होऊन कुसुम बाळकृष्ण आपटे या सौ. शुभा रमाकांत विद्वांस झाल्या. रमाकांतच्या मातोश्रींना आणि स्वत: रमाकांतना हुषार, बुद्धिमान मुलगी हवी होती. लग्नाच्या वेळी तेवढीच त्यांची अेक अट होती. कुसुम बुद्धिमान, हुषार असल्यामुळे त्यांच्या या अटीला पात्र ठरली. टाटाच्या भिरा प्रकल्पावर श्री. रमाकांत काम करीत असल्यामुळे काही काळ त्यांना डोंगराळ, शहरी सुविधांच्या अभावात राहावे लागले. पण पतीकार्याशी सहकार्य या जाणिवेतून शुभाताईंनी जराही कुरकुर करून आपली नाराजी दर्शविली नाही. चक्क पाचवर्षे त्यांनी तेथे काढली. तसेच श्री. रमाकांत कोयना धरण प्रकल्पाचे काम करीत असताना आणि दंडकारण्यातील रेल्वे प्रकल्पाचे काम करीत असताना त्यांना असेच शहरापासून दूर राहावे लागले. पण पतीला अुत्तम साथ देण्याची भूमिका शुभाताईंनी चोख बजावली. पतीच्या जीवनाशी त्या समरस झाल्या. खऱ्या अर्थाने त्या रमाकांतच्या सहधर्मचारिणी आहेत हे मला प्रकर्षाने जाणवले.

## शैक्षणिक कारकीर्द

१९६६ साली रमाकांत यांची बदली मुंबईत झाली आणि त्या मुंबईत राहायला आल्या. त्याबरोबरच सौ. शुभाताईंची शैक्षणिक कारकीर्द बहरायला सुरुवात झाली. शिक्षणाची अुपजतच असलेली ओढ शुभाताईंच्या मनाला स्वस्थ बसू देईना त्यांनी निर्मला निकेतनमधे पोस्टग्रॅच्युएशनसाठी होम सायन्स मधे प्रवेश घेतला. प्रिन्सिपॉल मॅडम गॉलबी यांनी त्यांची मुलाखत घेतली आणि शिक्षण कोर्स सुरु झाल्यावर अेकही दिवस अनुपस्थितीत राहायचे नाही. रोज हजेरी लावणे सक्तीचे आहे. कॉलेज चुकवून चालणार नाही. तुम्ही विवाहित आहात तुम्हाला हे सर्व शक्य होईल काय ? मी शिस्तीची आहे, रमाकांतना बायको विसरावी लागेल असेही स्पष्टपणे बजावले. पाहा विचार करून सांगा. पण रमाकांतचा सौ. शुभाताईंना शिक्षणासाठी पूर्ण पाठिंबा होता. पती सहकार्य आणि सौ. शुभाताईंची बुद्धिमत्ता या जोरावर अत्यंत कठीण असा हा कोर्स त्यांनी यशस्वी पूर्ण केला. विशेष लक्षणीय बाब अशी की मुळात ब्राह्मण, शाकाहारी असलेल्या शुभाताईंनी नॉनव्हेजिटेरियन (मांसाहारी) हा विषय घेतला आणि त्यात प्रॅक्टिकल करून म्हणजे मांसाहारी पदार्थ अुत्तम शिजवून रुचकर करून त्यातही प्राविण्य मिळविले. 'निर्मला निकेतन' मधे सगळ्यांनी त्यांचे या गुणाचे कौतुक केले.

## प्रेरणादायी सिंधुताई घारपुरे

सौ. शुभाताईंना पुण्याच्या मॉडर्न स्कूलमधील शिक्षिका सौ. सुधाताई घारपुरे या भेटल्या. शुभाताई हुषार असल्यामुळे सिंधुताईच्या लाडक्या विद्यार्थिनी होत्या. त्या नेहमी त्यांना प्रोत्साहन देत. भेटल्यावर नेहमी हस्तांदोलन करीत आणि म्हणत माझा हा मदतीचा हात सदैव पुढे आहे असे समज. सध्या तू काय करत्येस ? असे विचारल्यावर शुभाताईंनी मी मोकळीच आहे असे सांगितले. अेवढे अुच्च शिक्षण घेऊन तू घरी बसू नकोस. माझ्या शाळेत शिकवायला ये. शुभाताईंनी सिंधुताईंची ही आज्ञा प्रमाण मानून कधीपासून शाळेत येऊ असे विचारताच अुद्यापासूनच ये. त्याबरोबर पडत्या फळाची आज्ञा मानून शुभाताई दुसऱ्याच दिवशी शाळेत जाऊ लागल्या. शुभाताईंनी शाळेत शिकवण्याच्या या निर्णयाचे सौ. सिंधुताईंनी कौतुक केले. शुभताईंच्या ज्ञानदानाच्या पवित्र कार्याला सिंधूताई घारपुरे यांची प्रेरणा निमित्त

कारण ठरली. आणि १९६९ साली शुभाताई म्युनिसिपल हायस्कूल मधे शिक्षकेच्या पदावर रुजू होऊन काम करू लागल्या. शिक्षिकेसाठी आवश्यक असणारे बीएड् चा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे त्यांनी ठरवले. तसा अर्जही शाळेकडे केला पण शाळेने काही प्रतिसाद दिला नाही म्हणून पती रमाकांतच्या पाठिंब्यामुळे त्यांनी स्वखर्चाने १९७४ साली बीएड् पहिल्या वर्गात, गणित आणि सायन्स विषय घेऊन गोखले कॉलेज ऑफ अेज्युकेशन परळ या संस्थेमधून पूर्ण केले.

## विद्यार्थीप्रिय शिक्षिका

बीएड् झाल्यावर दादरच्या बालकविहार शाळेत अेकूण पंचवीस वर्षे नोकरी केली. नित्य नवीन शिकण्याची जिज्ञासा आणि ज्ञानार्जनाची ओढ शुभाताईंना स्वस्थ बसू देईना. त्यांच्या मनात आलं भाषेविषयीचा अभ्यास आपण करावा आणि अेमूअे स्पेशल मराठी विषय घेऊन त्यांनी पूर्ण केले. मुंबई विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख आणि प्रसिद्ध समीक्षक कै. वा.ल. कुलकर्णी यांनी त्यांना यासाठी प्रोत्साहन दिले होते. अेम्.अे.च्या परीक्षेच्या आधी अभ्यासासाठी शाळेने त्यांना रजाही दिली नाही. त्यामुळे थोड्या मार्कांनी त्यांचा फर्स्टक्लास हुकला याची त्यांनी आजही हळहळ वाटते.

शाळेत नोकरी करीतअसताना शुभाताईंनी हस्तकला, भरतकाम, चित्रकला यासारख्या विविध कला शिकून घेतल्या आणि विद्यार्थ्यांनाही शिकविल्या. शाळेत कोणताही विषय शिकवायला त्यांना वर्ज्य नव्हता. गणित, सायन्स, भाषा, कला सर्व विषयात त्या पारंगत असल्यामुळे त्यांचे कधी अडले नाही सर्व विषय त्यांना तितक्याच ताकदीने शिकवता येत असल्यामुळे त्यांच्या विषयी प्राचार्यांपासून ते सहकारी शिक्षक आणि विद्यार्थी वर्ग यांना प्रचंड आदर वाटत असे. विद्यार्थी वर्गाच्या त्या आदर्श शिक्षिका होत्या. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांच्या स्मरणात राहिल्या. विद्यार्थ्यांच्या मनात शुभाताईंना आदराचे स्थान होते.

## विद्यार्थ्यांकडून आलेले विलक्षण अनुभव

शाळेत शिकविताना त्यांनी मुलांना सांगितले, तोंडावर पांघरूण घेऊन झोपू नये. कारण त्यामुळे शुद्ध हवा मिळायला अडथळा निर्माण होतो. त्यावर काही मुलांनी सांगितले पातळ पांघरूण तोंडावर घेतले असता शरीराला अूब मिळते, श्वास घ्यायला पातळ पांघरूणात त्रास होत नाही हा अनुभवाचा बोल अैकून शुभाताई चकीत झाल्या. तसेच अुन्हाळ्यात गडद रंगाचे कपडे वापरू नयेत, सौम्य, फिक्या रंगाचे कपडे वापरावेत त्यामुळे सूर्यकिरण शोषून न जाता त्यांचे उत्सर्जन होते आणि शरीराला अपाय होत नाही. त्यावर मुले म्हणाली गडद रंगाचे कपडे जास्त टिकतात. लगेच जुने दिसत नाहीत म्हणून आम्ही गडद रंगाचेच कपडे वापरणे योग्य मानतो. परिस्थितीमुळे, गरीबीमुळे प्रत्यक्ष वागणे आणि व्यावहारिक अुपयुक्तता आणि नियम यातली तफावत समजली.

तसेच वर्गात शिकविताना अेकदा शुभाताईंनी मुलांना विचारले घराचे महत्त्व सांगा. त्यावर अेक विद्यार्थी उत्स्फूर्तपणे म्हणाला भानगड करून घरात लपले तर मार चुकतो. हा घराचा आसरा आणि आश्रय देणारा महत्त्वाचा अुपयोग होय. या त्याच्या अुत्तराने शुभाताई अवाक् झाल्या. तसेच अेका विद्यार्थीनीला पायात चपला न घालून आल्याने अेका शिक्षकाने वर्गाबाहेर अुभे राहाण्याची शिक्षा केली होती. तेव्हा शुभाताईंनी तिला त्याचे कारण विचारले असता ती आणि तिचा लहान भाऊ दोघे मिळून अेकच चपलेचा जोड वापरत होते. सकाळी शाळेत जाताना भाऊ चपला घालायचा, त्याच चपला ती दुपारी शाळेत येताना घालायची पण त्यादिवशी भावाला अुशीर झाल्याने तिला शाळेत अनवाणी जावे लागले हे कारण कळताच शुभाताईंनी हस्तक्षेप करून तिला शिक्षा करणे योग्य नसल्याचे सांगितले. एवढ्यावरच शुभाताई न थांबता त्यांनी पालकांच्या अनुमतीने नवीन चपला खरेदी करून आणून दिल्या. नव्या चपला घातल्यावर मुलांचा आणि पालकांचा आनंद चेहऱ्यावर लपत नव्हता.

शुभाताई हाडाच्या शिक्षिका होत्या. नुसत्या कोरडा अुपदेश करणाऱ्या ठोकळेबाज शिक्षिका नव्हत्या. यावरून शुभाताई या कृतीशील आणि परिवर्तनशील शिक्षिका होत्या हे माझ्या लक्षात आले.

मुलांच्या समस्या, अडचणी जाणून त्यावरत्याव सोडवण्याचा मार्ग त्यांना सूचत असे. प्रेम आणि माणूसकी, आत्मीयता या भावनेने त्या विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेत. त्यांच्याशी संवाद साधताना त्यांच्या लक्षात आले की, शिकविताना अुपदेश करणे सोपे असते पण प्रत्यक्ष व्यवहारात वागतानाते आचरणात आणताना किती कठीण असते.कमी उत्पन्न असलेल्या गरीब मुलांच्या बाबतीत तर ही तफावत जास्त जाणवते. जीवनाकडे ही मुले कोणत्या दृष्टिकोनातून पाहातात हे पाहून शुभाताईंनाही त्यांच्याकडून शिकायला मिळाले. परिस्थितीमुळे जीवनात अुपयुक्तता महत्त्वाची असे त्यांना वाटत असते हे ही त्यांना अुमगले. प्रचलित सिद्धान्त किंवा नियम अशा वेळी कसे कुचकामी ठरतात याचे नव्याने आकलन शुभाताईंना झाले.

## प्रवासाची आवड

पती रमाकांत बरोबर त्यांनी अनेक देशविदेश हौसेने पाहिले. देशांर्तगत प्रवासाबरोबरच अे टू झेड अमेरिका पाहिली. युरोप, मॉरिशस, मलेशिया, थायलंड, सिंगापूर, कॅनडा, हाँगकाँग इ. सर्व जगाची सफर शुभाताईंनी आनंदाने केली.

मागे म्हटल्याप्रमाणे नवीन नवीन शिकण्याची अुर्मी शुभाताईंना स्वस्थ बसू देत नाही. रिटायर्ड झाल्यावरही त्यांनी दासबोधाचा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला. अखिलभारतीय कीर्तनसंस्थेतून कीर्तन करण्याचे शिक्षण घेतले. योगासने शिकली नियमित योगासने त्या करीत असल्यामुळे त्यांची प्रकृती चांगली राहाण्यास मदत होते. आजही त्या श्रद्धानंद महिलाश्रम आणि दादरची कमलामेहता अंधमुलींची शाळा या संस्थामधे कार्यरत आहेत.

आज शुभाताई अडुसष्ट वयाच्या आहेत. पण तरीही वार्धक्याचा थकवा त्यांच्या उत्साहाच्या आड येत नाही. प्रसन्न, हसतमुख, शांतपणे त्या कामे करीत असतात. मराठे प्रतिष्ठानची बैठक अनेकदा त्यांच्या घरी भरते त्या आनंदाने सर्वांचे स्वागत, आदरातिथ्य करतात. शुभाताईंशी संवाद साधताना त्यांचे हे ज्ञानसंपादन आणि ज्ञानदानाचे पवित्र कार्य पाहून मला सावित्रीबाई फुले यांच्या 'काव्यफुले' या काव्यसंग्रहातील कविता आठवली जी शुभाताईंच्या व्यक्तिमत्त्वाला समर्पक आहे. म्हणून पुढे देत आहे.

*''अभ्यास करी विद्येचा। विद्येस देव मानून*
*घे नेटाने तिचा लाभ। मनी अेकाग्र होऊन*
*विद्या हे धन आहे रे। श्रेष्ठ साऱ्या धनाहून*
*तिचा साठा जयापाशी। ज्ञानी तो मानती जन।''*

या कवितेत म्हटल्याप्रमाणे ज्ञानतपस्वीनी सौ. शुभाताईंचे कार्य प्रेरणादायी आहे. कधीही न संपणाऱ्या ज्ञानसंपत्तीचा साठा त्यांच्याकडे आहे. 'न हि ज्ञानेन, सदृशं पवित्रं इह विद्यते' याप्रमाणे ज्ञानतपस्वीनी, विद्यामयी असणाऱ्या या साधिकेला, सौ. शुभाताईंना माझे अभिवादन !

**- डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे**

❑❑❑

# डॉ.श्री.अशोक राजाराम मराठे, पुणे

**शब्दांकन : श्री.अच्युत चक्रदेव**

''नव्वद हजार वर्षांपूर्वीच्या गुहेचा व सर्वात जुन्या सुनामीचा शोध लावणारे उत्खनन तज्ज्ञ श्री.मराठे''

श्री.अशोक राजाराम मराठे हे पुण्यातील डेक्कन कॉलेजमधील उत्खनन तज्ज्ञ. वरील मथळ्यात नमूद केलेले शोध त्यांनी त्यांचे संशोधनांतर्गत लावून पुरातत्व खात्यात एक मानाचे असे स्वत:चे स्थान निर्माण केले आहे व जागतिक स्वरूपाचे मानांकन त्यांना मिळाले आहे. आपल्या मराठे परिवाराचे दृष्टीने ही एक अत्यंत अभिमानास्पद घटना आहे. या संबंधी वृत्तपत्रांत आलेली बातमी आपणा सर्वांच्या माहितीसाठी सोबत जोडली आहे. त्यामध्ये त्यांनी केलेले संशोधन स्वयंस्पष्ट आहे.



त्यांची स्वत:ची माहिती पुढीलप्रमाणे आहे-

| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | **डॉ.अशोक राजाराम मराठे** |
| जन्मदिनांक | : | २५ मे १९५० |
| शिक्षण | : | पुणे विद्यापीठ |
| १९७० | : | बी.एस्‌सी., बॉटनी हा विषय घेवून |
| १९७२ | : | पुणे विद्यापीठ, एम.एस्‌सी. |
| १९७७ | : | पुणे विद्यापीठ, पी.एच्‌डी. |
| १९७९ | : | पुणे विद्यापीठ, एम.ए. |
| १९८७ | : | मेट्रिका कॉम्प्युटर्स प्रा.लि., एम.सी.ए. |

श्री.अशोक मराठे यांनी निरनिराळ्या संस्थांमध्ये, विविध स्तरावर अध्यापनाचे कार्यही केलेले आहे व पी.एचडी. चे मार्गदर्शक म्हणूनही काम केले आहे.

अनेक परिषदांमध्ये त्यांनी सहभाग घेतलेला आहे व ४ आंतरराष्ट्रीय परिषदांमध्येही भाग घेतलेला आहे.

## संशोधनपर कार्य

श्री.मराठे यांनी संशोधनपर आत्तापर्यंत एकूण ३८ शोधनिबंध लिहिले आहेत व एकूण दोन पुस्तके प्रसिद्ध केली आहेत.

प्रणवतीर्थ चॅरिटी ट्रस्टचे ते संस्थापक सदस्य आहेत.

प्रणवतीर्थ मिशनचे ते कार्यकारी संचालक आहेत.

अनेक केंद्रिय समित्यांमध्ये संशोधनासाठी म्हणून त्यांची नेमणूक झाली होती व ते काम त्यांनी यशस्वीपणे पार पाडले आहे.

श्री.मराठे यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मनुष्याच्या चेहेऱ्यावरील हावभाव, नजर, वेगवेगळे अवयव जसे नाक, तोंड, कान इ. बाबतच्या त्यांच्या अभ्यासपूर्ण, सूक्ष्म निरिक्षणावरून ते संबंधीत व्यक्तीच्या भूत, भविष्याकाळाबाबत बरोबर अंदाज व्यक्त करतात. त्यांचा या विषयात गाढा अभ्यास आहे. या त्यांच्या अभ्यासामुळे त्यांचेकडे व्यक्तिगत प्रश्न विचारण्यास व जरूर ते मार्गदर्शन घेण्यास अनेकजण येतात.

## नव्वद हजार वर्षांपूर्वीची गुहा सापडली

पुरातन भारतीय संस्कृतीच्या अभ्यासात क्रांतिकारी ठरणारा शोध लावण्यात, पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयाचे प्रा.अशोक मराठे यशस्वी ठरले असून, त्यांना उत्खननात गुहानगरजवळील पालशेत येथे नव्वद हजार वर्षांपूर्वीची गुहा सापडली आहे.

या गुहेजवळ समुद्रकिनाऱ्यापासून समांतर असा महामार्ग आणि नियोजनपूर्वक बांधलेली गोदी यांचेही अवशेष मिळाले आहेत. देशाच्या साडेसात हजार किलोमीटर किनारपट्टीवरील ही पहिलीच गुहा आहे.

गुहागर या कोकणातील सुप्रसिद्ध पर्यटनस्थळापासून केवळतेरा किलोमीटर अंतरावर दक्षिणेला पालशेत गाव आहे. या गावाजवळ समुद्र किनाऱ्यापासून दोन किलोमीटर आत सुसरोंडी येथे ही गुहा सापडली. समुद्रसपाटीपासून ८५ मीटर उंचीवर ही गुहा आहे. या भागातून अनेक छोटे-मोठे ओहोळ, अरुंद व खल घळ्यांमधून वाहतात. या गुहेजवळ ते धबधब्याचे रूप घेतात. त्या धबधब्याजवळच ही गुहा आहे. गोड्या पाण्याचा नियमित पुरवठा आणि सागरसान्निध्य या दोन्ही बाबी लक्षात घेता, ही गुहा पुराश्मयुगीन मानवाने वस्तीसाठी का निवडली असावी, हे स्पष्ट होते. या गुहेच्या बाहेरील बाजूला सुरुवातीला एक पुराश्मयुगीन हत्यार सापडले. त्यानंतर या परिसरात उत्खननास सुरुवात झाली. गुहेचे प्रवेशद्वार दक्षिणेला असून, आयताकृती आहे. रुंदी दीड मीटर आणि उंची अडीच मीटर आहे. गुहेच्या तोंडाशी असलेली प्रचंड शिळा सुरुंगाच्या सहाय्याने फोडून गुहेत जाण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला. या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता चंद्रशेखर जोशी यांनी विशेष मदत केली, असेही मराठे यांनी सांगितले.

गुहेच्या उत्खननामध्ये हातकुऱ्हाड, तोडहत्यार, फरशी, तासण्या अशा प्रकारची एकूण ५४ पुराश्मयुगीन अवजारे सापडली आहेत. हे सर्व अवशेष गुहेच्या २.४ ते २.७ मीटर खोलीवरील भागातच मिळाले. आसपास उपलब्ध असलेल्या दगडांपासून ही हत्यारे तयार केली आहेत. ही तयार करताना आदिमानवाने उडवलेले छिलके आणि त्यामुळे तयार झालेल्या हत्यारांच्या कडा आणि मुखे अत्यंत ताजी दिसून येतात.

कोकण किनारपट्टीवर गेल्या सुमारे ७५ वर्षांपासून संशोधन करण्यात येत आहे. १९३२ मध्ये कमांडर टॉड यांनी कोकणातील रायगड येथे पुराश्मयुगीन हत्यारांचा शोध लावला. त्यानंतर १९७० मध्ये डॉ.गझदर यांनी आणि १९७२ मध्ये डॉ.जोशी यांनी असेच संशोधन केले. त्यानंतर तीस वर्षांनी २००१ मध्ये डॉ.अशोक मराठे यांनी गुहागर, पालशेत, हेदवी आणि अंजनवेल भागात पुरातत्त्वीय संशोधन सुरु करीत हा परिसर पिंजून काढला. या संशोधनामुळे 'गुहागर' म्हणजेच 'गुहांचे आगर' हे नाव सार्थ ठरले आहे.

गेल्या वीस वर्षांच्या संशोधनावरून रत्नागिरी, गुहागर हा भाग भूकंपप्रवण असावा,

असे अनुमान निघते; तसेच दहा हजार वर्षांपूर्वी सागरपातळी सध्याच्या सागरपातळीच्या तुलनेत बरीच उंच होती, असेही स्पष्ट झाले आहे. या बरोबरच गुहागर परिसरात सागर किनाऱ्याला समांतर अशा 'महामार्गाचा' शोध लागला आहे. नियोजनपूर्वक बांधलेली गोदीही आढळून आली आहे. जलव्यवस्थापनाच्या अनेक योजनांचे अवशेषही सापडले असून, त्यावरही संशोधन सुरु आहे. यासाठी डॉ.मराठे यांना डॉ.राजगुरू मदत करीत आहेत. या संशोधनामुळे आदिमानवाचे कालमापन, सागर पातळीतील बदल आणि तत्कालीन वातावरणीय बदल यांच्या अभ्यासाला मदत होणार आहे. उत्तर ॲश्युलियन मानवाचे वस्तीस्थान असलेल्या या गुहेमुळे मानव आणि सागर यांच्यातील घनिष्ठ नाते शोधण्यास नवी दिशा मिळेल, अशीही अपेक्षा डॉ.मराठे यांनी व्यक्त केली.

केळशी येथे जगातील सर्वात जुन्या सुनामीचा शोध

रत्नागिरी जिल्ह्यात केळशी येथे जगातील सर्वात जुनी सुनामीनिर्मित वाळूची टेकडी आढळून आली आहे. डेक्कन कॉलेजच्या पुरातत्त्व विभागाचे प्रा.अशोक मराठे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ''सुमारे पाचशे वर्षांपूर्वी ६ किंवा ७ सप्टेंबर, १५२४ रोजी अरबी समुद्रामध्ये सुनामी आली होती. त्याचा संदर्भ वास्को द गामाच्या तिसऱ्या सफरीच्या वर्णनामध्ये आढळतो,'' असे सांगून प्रा.मराठे म्हणाले, की त्यामुळे दापोली तालुक्यातील केळशी येथे १८ मीटर उंचीचा वाळूचा थर टेकडी रूपाने झाला.

❑❑❑

## ● वाचकांचा पत्रव्यवहार

आपला 'हितगुज'चा अंक फारच लोकप्रिय झाला आहे. परंतु तो फारच उशीरा मिळतो तरी आपणास विनंती आहे की किमान १५ तारखेपर्यंत प्रत्येक तिन महिन्याचा पाठवल्यास बरे पडेल. आपला मार्चचा अंक पुण्यात मे महिन्यात मिळाला.

सौ.प्रतिभा सुधाकर मराठे, रहाणार ठाणे याच्या वयाची ७०चा कार्यक्रम गजानन मराठ्यांच्या खरी १-३-०८ पार पडला. वरील कार्यक्रमास सर्व मराठे परिवार हजर होता तसेच मराठे प्रतिष्ठानचे ट्रस्टी व युनायटेड वेर्स्टन बँकेचे माजी अध्यक्ष श्री.सतीश मराठे वरील कार्यक्रमाला हजर होते.

### व्रतबंध

सौ.प्रतिभा सुधाकर मराठे यांचे नातू व श्री.मिलिंद मराठे यांचे पुत्र अनुक्रमे अनामय व अनुव्रत यांच्या व्रतबंधनाचा (मुंजीचा) कार्यक्रण दि.१८-४-०८ रोजी ठाण्यात पार पडला. वरील कार्यक्रमास सर्व मराठे परिवार हजर होता व बटुना शुभ अर्शिवाद दिले.

### मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभाशिर्वाद

कै.चिंतामण बळवंत मराठे यांच्या स्मरणार्थ सामान्य ज्ञानची चाचणी स्पर्धा घेण्यात येईल. स्पर्धेला वयो गटाचे बंधन नाही. सामान्य ज्ञान या संदर्भात कला, क्रीडा, साहित्य, राजकारण, संगीत, नाट्य या संदर्भात १०० प्रश्नांची उत्तरे पाठवायाची आहेत. अचूक पहिल्या ३ नंबरांना अनुक्रमे रु.५००, रु.३०० व रु.२०० चे बक्षीस देण्यात येईल. स्पर्धेचे नियम पुढील प्रमाणे -

१) वयाची अट नाही.
२) उत्तरे काळ्या शाईने लिहून पाठवायाची आहेत.
३) मराठ्याच्या माहेरवाशीन स्पर्धेत भाग घेऊ शकतील.
४) स्पर्धेस उत्तरे पाठवण्याची शेवटची तारीख २८-१-०९.
५) फेब्रुवारी २००९ मध्ये निकाल जाहीर होईल.
६) विजेतय स्पर्धकाला १०-३-०९ पर्यंत बक्षीस पाठवण्यात येईल.
७) स्पर्धकानी त्याची उत्तरे खालील पत्त्यावर पाठवावीत -
गजानन चिंतामय मराठे
प्लॅट न.३४अ, सार्थक सेनादल कॉलनी, पुणे-४११ ०३०.

**- गजानन मराठे,**
प्लॅट नं.३४अ, सार्थक सेनादल
कॉलनी,
पुणे-४११०३०


**हितगुज'च्या अमृतमहोत्सवी ७५व्या अंकानिमित्त**
**हार्दिक शुभेच्छा**

**- हितचिंतक**

# मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २००९
## १०० रुपयात आपले नांव छापलेली डायरी मिळवा
## सौ.निलांबरी मराठे, पुणे शाखा

मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेने २००६ सालापासून डायरी काढून सुरुवात केली व हा उपक्रम यशस्वीपणे राबविला आहे.

आता २००९ सालची डायरी काढण्याचा निश्चय पक्का केला आहे. या डायरीमध्ये प्रत्येक दिवसासाठी (शनिवार व रविवार सहित) पूर्ण पान असेल. पृष्ठदानाची कल्पनाही राबवली जाईल. ही डायरी ४०० पानांची असून त्यातील ३६५ पाने पृष्ठदानाची असतील. ३५ पानांमध्ये विविध विषयांवरील उपयुक्त माहिती व जाहिराती असतील. अनेक कुलबांधवांच्या सूचनेनुसार डायरीला प्लॅस्टिक कव्हर केलेले असेल.

पृष्ठदानासाठी १०० रु. निश्चित केले आहेत. आपल्या स्वत:चा, मुलांचा, बायको, बहीण, भाऊ, आई, वडील यांचे वाढदिवस किंवा कोणाच्या स्मृतिप्रीत्यर्थ तारखा कळवून आपण पृष्ठदान करू शकाल. गेल्या वर्षीच्या डायरीत पृष्ठदान केलेले असेल त्यांनी यंदाही पुन्हा करण्यास काहीच हरकत नाही. लवकरात लवकर आपण पृष्ठदानाच्या तारखा कळवल्या म्हणजे त्याच दिवशीच्या पानावर घालता येतील. याशिवाय आपल्या इच्छेनुसार आपण आपला ई-मेल कळविल्यास त्याचाही छापावयाच्या माहितीत समावेश करता येईल तरी आपली माहिती कळवून जास्तीत जास्त पृष्ठदानासाठी नोंदणी करावी.

डायरीमध्ये जाहिरात छापण्यासाठीचे दर खालीलप्रमाणे:-

१. डायरीचे मलपृष्ठ रंगीत ७००० रु.
२. मलपृष्ठाचे आतील पान रंगीत ६००० रु.
३. रंगीत पूर्ण पान ५००० रु.
४. काळे पांढरे पूर्ण पान ३००० रु.
५. काळे पांढरे अर्धे पान १५०० रु.
६. काळे पांढरे पाव पान ५०० रु.
७. शुभेच्छा पट्टी ३०० रु. व पृष्ठदान १०० रु.

बाहेरगावच्या लोकांनी पृष्ठदान किंवा जाहिरातीचे पैसे पाठवताना शक्यतो ड्राफ्ट किंवा मनिऑर्डरने पाठवावे. चेकने बँकेत कमीशन खूप कापले जाते असा अनुभव आहे. मनिऑर्डरने पैसे पाठवल्यास आमच्याकडे जो भाग राहतो त्यावरही आपले पूर्ण नाव, पत्ता, रक्कम व तपशील लिहावा म्हणजे नोंदणी करणे सुलभ होईल.

डायरीच्या सुरुवातीच्या पानांतल्या माहितीत कोणत्या विषयांचा समावेश असावा, त्या विषयाची माहिती कोणाकडे मिळेल याबद्दल आपले विचार आणि आपल्या अन्य काही सूचना असतील तर त्याही कळवाव्या.

गेल्या वर्षी वेळे अभावी सर्व कुलबांधवांशी आम्ही संपर्क साधू शकलो नाही. यावर्षी जास्तीत जास्त कुलबांधवांना डायरीमध्ये सहभागी होता यावे म्हणून हे निवेदन लवकर देत आहोत. तरी आपण पृष्ठदान, जाहिराती व आवश्यक माहिती पाठवावी म्हणजे छपाईसाठी पुरेसा वेळ मिळू शकेल. आपल्या ज्या कुलबांधवांकडे हितगुज जात नसेल त्यांनाही आपण वरील माहिती द्यावी अशी नम्र विनंती आहे. लोभ आहेच, वृद्धी व्हावी.

- सौ.नीलांबरी रमेश, पुणे

संपर्क व पत्रव्यवहारासाठी पत्ता:

१. सौ.नीलांबरी रमेश मराठे
व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र, ६४२ नारायण पेठ, प्राथमिक नूमवि समोर, अप्पा बळवंत चौक, पुणे-४११०३०.
फोन : २४४५६२७०/६५२००६९८ (निवास)

२. श्री. अरुण दत्तात्रय मराठे
१७५९ सदाशिव पेठ, भिकारदास मारुती जवळ, पुणे-४११०३०. फोन : २४४७३२८१

३. श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे
त्रिवेणी नं.१, डेक्कन पाटबंधारे सोसायटी, एस.एन.डी.टी. कॉलेज समोर, सर्व्हे नं.३६/९, एरंडवणे, पुणे-४११०३८
फोन : २५४६४७०६
सेल : ९८२२७७७३६१.

❑❑❑

# जाखोटिया ॲण्ड असोसिएट्सतर्फे ‘स्ट्रॅटेजी लॅब’ कार्यान्वित

डॉ.गिरीश व मंजिरी जाखोटिया या दाम्पत्याच्या ‘जाखोटिया ॲण्ड असोसिएट्स’ या उद्योजकीय व व्यवस्थापकीय सल्लागार संस्थेतर्फे नुकतीच ‘स्ट्रॅटेजिक लॅब’ कार्यान्वित करण्यात आली. छोट्या व मध्यम आकाराच्या उद्योगांसाठीचे ‘स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग’ या लॅबद्वारे करण्यात येईल. दूरगामी व्यूहरचना, उद्योजकीय नियंत्रण पद्धती, उद्योगाचे व ब्रॅण्ड्सचे व्हॅल्युएशन, वित्तीय पुनर्रचना, उद्योजकीय नेतृत्व, फॅमिली गव्हर्नस सिस्टिम इ. अनेक गोष्टींचा अंतर्भाव स्ट्रॅटेजिक प्लॅनिंगमध्ये होतो. यासंबंधीचे डॉ.जाखोटियांचे ‘अग्नी’ हे विस्तृत मॉडेल आता पेटंटिंगच्या प्रक्रियेमध्ये आहे.

जाखोटिया ॲण्ड असोसिएट्सच्या सुसज्ज वास्तूमध्ये आता उद्योजकीय व व्यवस्थापकीय सल्लामसलतीच्या अभिनव सेवा पुरविण्यात येतील. जागतिक दर्जाचा उद्योग कसा उभा करावा, टिकवावा व वाढवावा यासंबंधी विस्तृत व्यूहात्मक व वित्तीय सल्ला आता उद्योजकांना मिळेल. उद्योजकीय केस-स्टडीज व उद्योजकीय कल्पनांचा अव्याहत पुरवठासुद्धा आता उपलब्ध होऊ शकेल.

डॉ.जाखोटियाच्या प्रदीर्घ अनुभवावर आधारित भारतीय समाजजीवनास अनुकूल अशी ‘व्यवस्थापकीय पद्धती’, ‘अग्नी’ या मॉडेलद्वारा मांडण्यात आली आहे. उद्योजकीय महत्त्वाकांक्षा असणाऱ्यांनी ‘अग्नी’चा पुरेपूर फायदा घ्यावा असे आवाहन जाखोटिया दाम्पत्य करते. मराठी माणसाने मोठा उद्योग करावा, अशी धारणा बाळगून ‘जाखोटिया ॲण्ड असोसिएट्स’ नवनव्या वैश्विक कल्पना मांडत आले आहेत. ‘स्ट्रॅटेजी लॅब’ ही त्यातील मोठी झेप! www.jakhotiyaassociates.com या वेबसाइटवर उद्योजकीय व व्यवस्थापकीय प्रयोगांची अधिक माहिती मिळू शकेल.

(सौ.मंजिरी (पृ.१२८) मराठ्यांची माहेरवाशीण आहे. गिरीश जाखोटिया जावई)

हा श्री व्याडेश्वराचा महामंत्र आहे. प्रात:काली स्नान केल्यावर या मंत्राचा किमान ११ वेळा जप करावा. अधिक केल्यास उत्तम

**ॐ नमो भगवते श्री व्याडेश्वराय। भूतनाथाय।**
**भूतबांधां नाशय नाशय। कष्टं चूरय चूरय।**
**मनोवांछितं पूरय पूरय।**
**ॐ ह्रीं श्री व्याडेश्वराय नम: ॐ।**

## कवि विश्वनाथकृत श्री व्याडेश्वर स्तोत्रम

अनाथबन्धूं करूणैकसिन्धुं प्रसन्नमुर्ति सुपवित्रकीर्तिम्।
गौरीकलत्रं कमनीयगात्रं वाडेश्वरं नौमि जगन्निवासम्॥१॥

लसालिनेत्रं सुभश्चवक्त्रं भुजङ्भूषं लघुचित्रवेषम्।
भस्माङ्गरागं क्रतुशिष्टभागं वाडेश्वरं नौमी जन्निवासम्॥२॥

चनद्रावदातं गजवक्त्रतातं चन्द्रार्धचूडं जगदेकनीडम्।
पवित्रगोत्रं वृषराजपत्रं वाडेश्वरं नौमि जग्नन्निवासम्॥३॥

आनंन्दंकन्दं हतवेरिवृन्दं कृतान्तकालं नृकपालमालम्।
तीवप्रतापं प्रलयाग्निकोपं वाडेश्वर नौमि जग्नन्निवासम्॥४॥

शिरोधिनीलं करिचर्मचलं पिनाकहेतिं भृतभूरिभूतिम्।
समस्त हेतुं प्रलयान्तकेतुं वाडेश्वरं नौमि जग्नन्निवासम्॥५॥

वाडेश्वरं नौमि हरं महेश्वरं गङ्गाधरं पापहरं कृपाकरम्।
गौरीवरं शूलधरं हतासूर विश्वम्भरं देववरं पारात्परम्॥६॥

इति वाडेशदेवस्य स्तोत्रं य: सर्वदा जपेत्।
लब्ध्वा वाडेश्वर भक्ति भुक्तिमुक्ति लभेत स: ॥७॥

गाणी पावसाची

## सर एक पावसाची

सर एक पावसाची, कधी मोहरत येते
दमलेल्या मनाला, हळूच लपेटून घेते

सर एक पावसाची, झिमझिमत येते
झुमझुमणाऱ्या नादांनी, रिझवून जाते

सर एक पावसाची, घोंघावत येते
नैराश्याच्या अभ्रांना, कुठे दूर पळवून नेते

सर एक पावसाची, संतत संतत येई
आत लपलेला बीजांकुर, हळूच वर येई

सर एक पावसाची, कळेना बाई कशी येई
टपोऱ्या टपोऱ्या थेंबांनी, चिंब भिजवून जाई

या इवल्याशा सरीमध्ये, अशी काय दडलीय जादू ?
सर थांबता, कोवळ्या उन्हात बाई, इंद्रधनुष्य कसे लागे चमकू ?

*****

## पाऊस मनीचा

पाऊस बसतो मनांत मनांत, भिजलाय हृदयींच्या रानात
पाऊस थबके थेंबात थेंबात, दिसे टपोरा हसरा मोती फुलात
पाऊस इवल्या इवल्या कळ्या, फुलुनी आल्या डोळीयांच्या पाकळ्या
पाऊस भासे केवढा केवढा, हुंकारला शब्द तेवढा तेवढा
पाऊस करी नर्तन डोंगरावरी, मन मोर नाचतो आनंद उरी
पावसाची रिमझिम प्राजक्ताचा सडा, मनी आनंद हर्षाचा दरवळ केवढा
भिजल्या पावसाचे कसे करू स्वागत ? ओठीयांचा वेळू, गुज आनंदाचे गात

*****

## भिमाशंकराचे डोंगरी

धुक्यात हरवली वळणाची वाट, ढगांनाच सापडेना पुढची वाट
हळूच उतरले ढग खाली खाली, मोतीयांची पखरण पाचूवर सजली
धरती सुंदर रत्नांनी सजली नटली, चमचमती ओंजळ भरुनीया घेतली
ह्या भीमशंकरासी लवूनी अर्पण केली, अन् मनींची यात्रा सुफल सफल झाली

**सौ.उर्मिला श्रीनिवास मराठे - पृ.३८९**
३६/९, दख्खन, पाटबंधारे सोसायटी,
१/६ त्रिवेणी, एरंडवणे, पुणे-४११०३८.
दूरध्वनी-०२०-२५४६४७०६

## मस्टरसाठी वाट्टेल ते !

पाचच्या गजराला डोळे चोळत उठायचं
घरातल्यांसाठी नाश्ता-जेवण करायचं
मुलांच्याही डब्यात काहीतरी भरायचं
आंघोळ-तयारी सर्व घाईघाईत करायचं
कचऱ्याच्या डब्यासोबत मुलांना बाहेर काढायचं
पाळणाघराच्या पायरीवर मातृत्व विसरायचं
वाटेत पाहुणा दिसला तरी नाही ओळखायचं
बसस्टॉपवर धावत पळत यायचं
बसने वेळेचं बंधन नसतं पाळायचं
रिक्शासाठी अक्कल खातं उघडायचं
सिग्नल, ट्रॅफिकमध्ये मीटर वाढतांना पहायचं
अन् शक्य झाल्यास मन घट्ट करायचं
वेळ वाचवायला मध्येच उतरायचं
पायावर विश्वास ठेवून चालत रहायचं
गर्दीतल्या धक्क्यांनी नाही वैतागायचं
जीव मुठीत घेवून स्टेशन गाठायचं
चुकलेल्या ट्रेनकडे हताशपणे पहायचं
पुढच्या ट्रेनच्या भरवश्यावर रहायचं
ट्रेन आली की चक्क लटकायचं
एका हातापायावर बॅलन्स करायला शिकायचं
सीटची अपेक्षा करणं सोडून द्यायचं
एक तास निमुट उभं रहायचं
हातपाय नी डोकं नसतं हलवायचं
अन हलवलच तर बाहेर असल्याचं भासवायचं
पावला पावलावर ट्रेनला असतं थांबायचं
पण घड्याळाच्या काट्यांना कसं रोखायचं
गाडीला प्लॅटफॉर्मवर नेहमीच असतं थांबायचं
पण जिन्याजवळ स्वत: आपण झोकून द्यायचं
ढोपरातल्या कळा विसरून जिना चढायचं
ऑफीसचं आवार दिसताच धावत सुटायचं
लिफ्टने आपल्यासाठी नसतं थांबायचं
थांबलीच तर साहेबांच्या कारनं येऊन थडकायचं
आपण आपलं चरफडत जिने चढायचं
दम लागला तरी नसतं मागे पहायचं
एवढ सगळं फक्त एका मस्टरसाठी करायचं !

**- 'प्रिया-प्रकाश'ची**

## सौ. मैघना मंदार केळकर यांना पीएच.डी.



मराठे प्रतिष्ठानचे आजीव सदस्य श्री. श्रीराम व्यंकटेश मराठे, (पृष्ठ क्र. ४३) यांची विवाहित कन्या, मराठ्यांची माहेरवाशिण सौ. मेघना मंदार केळकर यांना टाटा समाज विज्ञान संस्थेने म्हणजे टीआयएसएस अभिमत विद्यापीठाने पीएचडी प्रदान केली आहे. 'शेतकरी स्त्रियांचे ऋषिक्षेत्रातील पारंपारिक ज्ञान: सातारा जिल्ह्यातील मृद व्यवस्थापनाचा अभ्यास' हा त्यांचा संशोधनाचा विषय होता.

टीआयएसएसच्या प्रा. छाया दातार यांच्या मार्गदर्शनाखाली सौ. मेघना यांनी प्रबंध सिद्ध केला. दि. ७ मे ला 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' चे डॉ. मेघनाद देसाई यांच्या हस्ते त्यांना पीएच.डी. प्रदान करण्यात आली.

### तिच्याविषयी अधिक माहिती

२. सांगली येथे जाने. २००८ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात निमंत्रित कवयत्री म्हणून स्वरचित काव्यवाचनाचा मान मिळाला.

३. विवाहापूर्वी चंद्रलोकनगरी स.गृ.नि. संस्थेत, कृषि महाविद्यालयात विविध गुणदर्शनाच्या स्पर्धांत, वक्तृत्त्व स्पर्धांत भाग घेऊन अनेक पारितोषिके व चषक मिळविले.

४. कृषि महाविद्यालयातील शिक्षणाच्या चारही वर्षी झालेल्या परीक्षांमध्ये प्रथम क्रमांकाची रजत पदके मिळविली.

५. बी.एससी. (कृषि) अंतिम परीक्षेत (१९९४: राहूरी कृषि विद्यापीठ) सर्वप्रथम येऊन चार सुवर्ण पदके मिळविली. १९९७ मध्ये एम.एससी (उद्यान विद्या) विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण.

६. डॉक्टरेटच्या संशोधनासाठी टाटा समाज विज्ञान संस्था, मुंबई, येथे व सातारा जिल्ह्यातील दुर्गम खेड्यात जाऊन तेथील शेतकरी स्त्रियांशी संवाद साधला. तसेच इंग्लंड मधील नॉरिच येथील ईस्ट अँग्लिया विद्यापीठात एक वर्षभर संशोधन केले. यासाठी बहुवांछित व प्रतिष्ठेची कॉमनवेल्थ शिष्यवृत्ती सौ. मेघनाला मिळाली.

७. सौ. मेघना केळकर या सध्या महाराष्ट्र शासनाच्या कृषिविभागात कृषि उपसंचालक म्हणून पुणे येथे कार्यरत आहेत.

डॉ. सौ. मेघना मंदार केळकर यांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक अभिनंदन.

**पत्ता:-** सी/५/२, सरिता नगरी (फेज-खख) सिंहगड रस्ता, पुणे - ४११०३०. दूरध्वनि क्र. - ०२०-२४२५०५२६

***- संपादिका***

### नवीन उपक्रमांसाठी आवाहन

-सी.गो.खांबेटे, सहसंपादक (पृ.६७६)

**हितगुजची हेल्पलाईन**

आपल्या परिवारात अनेक व्यक्ती अशा आहेत की ज्या काही विशेष सेवा, मार्गदर्शन, सल्ला देऊ शकतात. उदा. वैद्यकीय क्षेत्रातले तज्ञ, थेरपिस्ट, वकील, समुपदेशक, लेखापरीक्षक, इन्व्हेस्टमेंट एजंट, वास्तूविशारद इ. आपल्यापैकी प्रत्येकाला कधी ना कधी अशा सेवा सुविधांची गरज लागते. बऱ्याच वेळा असे होते की आपल्याला हवी असलेली नेमकी मदत कुठे मिळेल हे माहित नसते. हितगुज ही माहिती देणारा दुवा बनू शकतो. काही व्यक्ती खूप वेगळ्या प्रकारचे कार्य करत अतात. पण बऱ्याच जणांना असे काही काम अस्तित्वात आहे हे सुद्धा माहित नसते. अशा सर्व व्यक्तींनी हितगुजकडे आपण देत असलेल्या सेवेविषयीच्या माहितीसंबंधी ''कुठे ? कुणाकडे ?'' अशी पत्राने विचारणा करावी. त्यातून ''हितगुजची हेल्पलाईन'' अथवा ''परस्पर सहाय्य योजना'' तयार होईल. किंबहुना आपल्या प्रतिष्ठानच्या ध्येय धोरणांपैकीचे ते एक महत्त्वाचे अंग आहे. यामुळे तुमच्या कामाची माहिती परिवारातील सर्वांपर्यंत पोहोचेल व हितगुज खऱ्या अर्थाने संपर्क माध्यम बनेल. परिवारातील व्यक्तींसाठी खास सवलत देऊ इच्छिणाऱ्या सेवा-दात्यांनी आमचेकडे प्रस्ताव पाठविल्यास त्यांना हितगुजच्या माध्यमातून प्रसिद्धी दिली जाईल. **- सहसंपादक**

**पणजी सौ. यशोदा प्रभाकर मराठे**

यांच्या स्मरणार्थ

**(C.A.) प्रभाकर दामोदर मराठे**

वडाळा, मुंबई ४०००३१

सेल:९८२० २३२०८२ दूरध्वनी : २४१५ ०८८९

ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

## ॥श्री गणपतीची आरती ॥

**जयदेव जयदेव मयूरेश्वरा ॥ संकटी रक्षूनी द्यावा आसरा ॥धृ०॥**

आकाशवाणीने ज्ञात सिंधूरा । शत्रूचा उद्भव उमा उदरा ।
वायूने जाऊनी तोडी त्या शीरा । नर्मदेत टाकी जाई माघारा ॥१॥

नर्मदे - जल ते झाले रक्ताळे । त्यातून गणेश परत आले ।
सिंदूरासूराला मारुनी डोले । साऱ्या जगताने कौतुक केले ॥२॥

ब्रह्मतपाने परापकृती । गणेशोपासने तीज महती ।
गणकृपेने माता चतुर्थी । शुल्क कृष्णा अक्षी चतुर्विंशती ॥३॥

सिद्धि बुद्धी या ब्रह्म कन्यका । गणेशर्धांगिनी मानी धन्यता ।
भार घेई सिद्धी दक्ष दिशेचा । उजव्या सोंडेचा सिद्धि गणेशा ॥४॥

सर्वाग्र पूजेचा मान हा तूझा । निविघ्न कार्याचा तू विघ्न राजा ।
सुख संपदेचा धनी तू माझा । श्रीनिवासाचीही चरणी पूजा ॥५॥

---

## ॥श्री गणेश आराधना ॥

वक्रतुंड गणनायक मूर्ते भक्तजना दे सुख सदना ॥
पंचारतीचा दीप दावितो लाभ कृपेचा सदा जना ॥
जय प्रथमेशा जय गणराया रिद्धिसिद्धिवर शुभवदना ॥
हरसुत कटिवर फणिवर वंदन तुजला गजवदना **॥धृ०॥**

विश्वचालका विराटरूपी विश्वाचा तो रथ हाकी ॥
विश्वारंभी विषा प्राशुनी सुरा नराना शिव राखी ॥
विधायकाचे कार्य ठेउनी विश्वांतील ते जीव सुखी ॥
विनाशकाला जाणुन घ्यावे गजाननाचे नाव मुखी ॥१॥

नारायण हर नाम कोणते घ्यावे ते तुम्ही ठरवा ॥
नामातील त्या शिवशक्तीचा प्रत्यय सत्वर घ्या बरवा ॥
नामधारका शिष्योद्धारा आशीर्वच तो गुरुवरा ॥
नाश कराया षडरीपूंचा लीन सदा व्हा विघ्नहरा ॥२॥

यदा कदाचित् षडरीपूचे तांडव चाले मनामधें
यज्ञ करावा अपुल्या कर्मा, यज्ञ भाग हेरंब मुखें
यमाभयाचे कारण नाही 'शील वर्तने, जनामधे
यमनियमाचे पालन करुनी एकरूप चैतन्य सुखे ॥३॥

कवण्या देशी कवण्या जातीं जन्म कुणाचा कसातरी ॥
कधीं जन्माने कधीच जावे कधीं कुणाचा संसारी ॥
कशी कल्पना दिली गणेशें श्रीनीवासा - अंतरी ॥
कवी - कल्पना हेतु नसे हा, सर्वस्वाचे दान करी ॥४॥

रचनाकार :- श्री. श्रीनिवास कृ. मराठे, हंसापूर - गोवा. ता. पेडणे
फोन नं. (०८३२) २२०५१४४.

## वयोवृद्धांचे मनोगत

जीर्ण जाहली सारी काया,
शिथिलता ये माझ्या गात्रा
आस न उरली कसली आता,
नेत्र लागले पैलतीराला॥१॥

पुत्रपौत्र हे आजूबाजूला,
मनापासूनी करिती सेवा
बघुनी त्यांच्या सौख्य संपदा,
तृप्त मनी मी जीवनी माझ्या॥२॥

जीवन वर्षे नव्वद सरता,
सगे सोबती उरले न आता
आठवणी त्यांच्या मनी दाटता,
भेटीस त्यांच्या मनी आतुरता॥३॥

ध्यास एकच ह्या जीवाला,
प्रभुचरणी मज मिळो आसरा
संपावी ही जीवनगाथा,
ईशपदी ही एक प्रार्थना॥४॥

तरी विनवणी तुजसी देवा,
किती काळ हा देह झिजावा
पराधीन मी हतबल आता,
पूर्ण करी मम जीवन आता॥५॥

**श्रीमती सुनीता गोखले,**
(उषा गोपाळ मराठे - पृ.३८९)
३५/३७ शिवाजीनगर कोर्टासमोर,
पुणे - ४११००५.

**'हितगुज'च्या या अंकासाठी सुप्रसिद्ध निवेदक सदानंद विष्णु ऊर्फ भाऊ मराठे (पृ.५०७) यांनी अनेक मान्यवरांच्या मुलाखती उत्कृष्ट घेतल्या त्या या अंकात प्रकाशित केल्या आहेत. परंतु अचानक भाऊंची प्रकृती बिघडली डॉक्टरांच्या आदेशानुसार विश्रांती घेणे आवश्यक असल्याचे समजले. त्यामुळे भाऊंनी घेतलेल्या काही मुलाखती 'हितगुज'च्या या अंकात प्रसिद्ध होऊ शकल्या नाहीत, पुढील अंकात त्या (डिसेंबर २००८) प्रसिद्ध केल्या जातील.**

**- संपादिका**



# कै. श्री. महादेव व्यंकटेश विद्वांस
(पृ.६२३)

## यांच्या स्मरणार्थ

सन १८५० च्या सुमारास ब्रिटिश राज्यकर्त्यांनी त्यांच्या दप्तरातील पाच कर्मचाऱ्यांची निवड करून त्यांना सिव्हिल इंजिनिअरिंगचे शिक्षण दिले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांची सब ओव्हरसियर म्हणून नेमणूक केली गेली.

भारतातील हे पहिले पाच इंजिनिअर. त्यातील एक होते आमचे खापरपणजोबा - कै. श्री. महादेव व्यंकटेश विद्वांस.


सब-इंजिनिअर या पदावरून निवृत्त झाल्यावर त्यांनी पुण्यातील मंडईपाठीमागे श्री मार्कंडेश्वराचे मंदिर बांधले. विश्वस्त निधी स्थापन करून मंदिर विश्वस्तांच्या ताब्यात दिले. आयुष्याचे शेवटचे दिवस त्यांनी याच मंदिरात काढले.

शेलारवाडी ते देहू हा रस्ता त्यांनी स्वखर्चाने बांधला व बोर्डाच्या स्वाधीन केला, जिच्या व्याजातून या रस्त्याच्या मेन्टेनन्सचा खर्च निघेल एवढी देणगीही त्यांनी बोर्डाला दिली.

पुणे वेदपाठशाळेच्या संस्थापकांपैकी ते एक होते.

अशा आमच्या खापरपणजोबांना आमचे नम्र अभिवादन व 'हितगुज'च्या अमृतमहोत्सवी ७५व्या अंकाला शुभेच्छा !

- *विद्वांस कुटुंबीय.*




**नेरळ स्टेशनपासून फक्त १ कि.मी. अंतरावर,**

**उल्हास नदीकिनारी वसलेली बंगलो स्कीम**

आमचे अन्य प्रोजेक्टस्

- निर्माण माथेरान व्हॅली नेरळ - बंगलो स्कीम
- निर्माण नगरी नेरळ - मिनी टाऊनशिप
- ऋतुनिर्माण नेरळ - बंगलो स्कीम
- खंडाळा - निर्माण हायलॅन्ड बंगलो स्कीम
- मधुसुमित्रा निर्माण - गोरेगांव-माणगांव (मुंबई-गोवा महामार्ग) - अपार्टमेंटस् स्कीम
- निर्माण लेक व्ह्यू - गोरेगांव-माणगांव (मुंबई-गोवा महामार्ग) - अपार्टमेंटस् स्कीम

आमचे मुंबईतील प्रोजेक्टस्

- महालक्ष्मी,
- जोगेश्वरी,
- गोरेगाव,
- मालाड,
- कांदिवली,
- विलेपार्ले (पूर्व) आणि विलेपार्ले (पश्चिम) स्टेशन समोर

हेड ऑफिस :१४, न्यायसागर अपार्टमेंट, नागरदास रोड, चिनॉय कॉलेज समोर, अंधेरी (पूर्व), मुंबई-६९
संपर्क : २६८३ ३१३१ () साईट ऑफिस : नेरळ (सेंट्रल रेल्वे मुंबई-कर्जत मेन लाईन),
दूरध्वनी : ०२१४८-२३८२५१ / ०२१४८-२३६६९६


**BOOK POST**

**If undelivered, please return to**

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१


त्रैमासिक हितगुज हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक : डॉ.सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ● ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल (१)**sitaram_khambete@yahoo.com** (२)**maratheparivar@yahoo.co.in** वेबसाईट: **www.marathepratishthan.org**